सभापतीस्थानी - मा.उप सभापती

अशासकीय कामकाज - विधेयके

पृ.शी.: रोजगार हमी (सुधारणा) विधेयक .

L.C. BILL NO.III OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

पृ.शी.: माथाडी,हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण)(सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IV OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MATHADI, HAMAL AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACTs, 1969.)

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .अे-2

पृ.शी.: हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE HINDU MARRIAGE ACT, 1955 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 7 - हिंदू विवाह अधिनियम, 1955 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न मतास टाकून संमत झाल.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 7 मांडते.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

. . . .अे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. VIII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 8 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्यांना दोन-तीन वर्षाच्या काळात जी भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आली किंवा दिली जाते, ती संपुष्टात आणणे हा या विधेयकाचा हेतू आहे. दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांच्या निवृत्तीवेतनाच्या संदर्भात 1976 चा कायदा आहे. त्यानुसार निवृत्ती वेतन कोणाला आणि किती मिळेल, तर त्या व्यक्तीने पाच वर्षे सदस्य म्हणून काम केले पाहिजे अशी मुळामध्ये तरतूद होती. पण ज्यांनी एक वर्षे, दोन वर्षे काम केले आहे, त्यांच्यावर यामुळे अन्याय होत होता. म्हणून यात काही बदल करण्यात आले आणि त्यानुसार ज्यांनी सदस्यत्वाची शपथ घेतली आहे, त्यांना निवृत्तीवेतन मिळेल. पण त्याचवेळी त्यात दुसरा असा बदल केला की, " एखाद्या व्यक्तीने पाच वर्षे अथवा सहा वर्ष, अशी जी असेल ती मुदत" असे शब्द त्यात घालण्यात आले. 1999 पूर्वी असे होते की, विधानसभा सदस्य असो किंवा विधान परिषद सदस्यय असो, त्याबाबतीत पाच वर्षे असा उल्लेख त्यात होता. त्याचा परिणाम असा झाला की, अनेक सन्माननीय सदस्यांकडून रिकव्हरी झाली. पार्लमेंटमध्ये लोकसभा सदस्य आणि राज्यसभा सदस्य यांच्यामध्ये भेदभाव केला जात नाही. तेथे "सदस्यांचे वेतन भत्ते, निवृत्ती वेतन अधिनियम 1954"मध्ये याबाबतीत तरतूद केलेली आहे. तेथे दोन्ही सभागृहाच्या सदस्यांमध्ये भेदभाव करण्यात आलेला नाही. येथे सुध्दा 1976 पासून 1999 पर्यंत असा भेदभाव नव्हता. पण आज विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांमध्ये भेदभाव झालेला आहे.

उपसभापती : असे होता कामा नये.

. . . .अे-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विधानसभेच्या सदस्यांसाठी पाच वर्षाची आणि विधान परिषदेच्या सदस्यांसाठी सहा वर्षाची मुदत, असे करण्यात आल्यामुळे विधान सभेच्या सदस्यांसाठी एक वर्षाची मुदत कमी झाली आहे. ही गोष्ट योग्य नाही. या हेतूने मी येथे विधेयक मांडलेले आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : अनुमती देण्यात आली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 8 मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO.IX OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976.)

(मा.सदस्य श्री.मधुकर चव्हाण अनुपस्थित)

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XXI OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE CHILD LABOUR (PROHIBITION AND REGULATION) ACT, 1986, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 21 बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, 1986 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

सभापती महोदय, 1986 चा बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम त्यात आणखी काही सुधारणा करण्यासाठी मी हे विधेयक आणले आहे. कलम 17 नंतर पुढील कलम 17 (अ) दाखल करुन "समुचित सरकार राज्यातील बाल कामगार शोधून काढण्यासाठी जिल्हावार दक्षता समित्या स्थापन करील व दक्षता समित्यांनी शोधून काढलेल्या बाल कामगारांचे यथोचित पुनर्वसन करील", अशाप्रकारची दुरुस्ती मी मांडलेली आहे. त्याचप्रमाणे खंड 3 मध्ये मुख्य अधिनियम हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या अनुसूचिमध्ये (1) भाग अ मधील नोंद क्रमांक (5) नंतर पुढील नोंद समाविष्ट करण्याची दुरुस्ती सुचविलेली आहे :- " 6 उपहारगृह चालविणे", (2) भाग व मधील नोंद क्रमांक 11 नंतर पुढील नोंदी समाविष्ट करण्यात येतील : "12. विटा बनविणे. 13. ऊस तोडणी करणे", या नोंदी समाविष्ट करण्यासाठी दुरुस्ती सुचविलेली आहे. मुले ही देवा घरची फुले आहेत, असे आपण समजतो. तसेच मुले ही राष्ट्रीय संपत्ती आहे. मुलांचे हक्क अबाधित ठेवणे, चांगल्या सुसंस्कृत समाजाचा पाया मानला जातो व लोकशाहीचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त (पुढे चालू....

आधारस्तंभ समजला जात असतो. मात्र सभापती महोदय, त्याच्या उलट परिस्थिती आपल्या देशात व राज्यात दिसून येत आहे. ज्या वयात या मुलांनी शिक्षण घेऊन भावी आयुष्याची आखणी करावयाची असते, त्या वयात त्यांना मात्र पोटाची खळगी भरण्यासाठी बालमजुरी करावी लागत आहे. आपल्या राज्यात 1986 पासून बाल मजुरी प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला असला तरीही मोठ्या प्रमाणात आजही राज्यभर बाल मजूर काम करीत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्याच्या बाल मजुरी संदर्भातील निरिक्षीय समितीवर काही काळ काम केलेल्या ॲड. आशा वाजपेयी यांच्या मते 1986 चा व 1996 चा बाल कामगार विधेयक कायद्यातील त्रुटी दूर करुन एम.सी.मेहता केस संदर्भात उच्च न्यायालयाने जी भरपाई आणि पर्यायी रोजगार सुचविला आहे, त्याची ठोस अंमलबजावी केली गेली पाहिजे. 14 वर्षाखालील मुलांना शाळेत जाणे सक्तीचे केले पाहिजे. लहान मुलांविषयी अनेक तरतुदी घटनेत असल्या तरीही मुलांच्या परिस्थितीला केंद्रस्थानी ठेवून बनविण्यात आलेल्या नाहीत. सध्या अस्तित्वात असणाऱ्या बाल कामगारांविषयीच्या विविध प्रकारच्या कायद्यातील त्रुटी दूर करून नव्या प्रकारचा कायदा अंमलात आणावा, असे मी सुचवीत आहे. सभापती महोदय, याबाबत ज्या वेळेला केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या अनेक योजना अयशस्वी होतात, अनेक धोरणे फसतात, त्यावेळेला बाल कामगारांच्या शोषणाचा एक सामाजिक प्रश्न निर्माण होतो. 1981 च्या जनगणनेनुसार आपल्या देशामध्ये 1 लाख 40 हजार बाल कामगार आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. संजय दत्त .....

देशात मात्र ज्या विविध स्वयंसेवी संस्था आहेत त्यांच्या अभ्यासानुसार आणि सूचनेनुसार आपल्या देशामध्ये आज रोजी 4 कोटी 40 लाख बाल कामगार आहेत असे सांगितले जाते. सभापती महोदय, 2001 च्या जनगणनेनुसार आपल्या देशातील एकूण कामगारांच्या 3 टक्के बाल कामगार असल्याचे आढळून येते. ही समस्या फक्त आपल्या देशामध्येच आहे असे नाही. कारण जगामध्येच बाल कामगारांची समस्या गंभीर स्वरुपाची झालेली आहे. माझ्याकडे काही देशातील बाल कामगारांची टक्केवारी उपलब्ध आहे. त्यामध्ये जपानमध्ये 27.3 टक्के, थायलंडमध्ये 20.7 टक्के बांगलादेशमध्ये 19.5 टक्के, ब्राझीलमध्ये 18.8 टक्के, पाकिस्तानमध्ये 16.6 टक्के, इंडोनेशियामध्ये 12.4 टक्के, मेक्सिकोमध्ये 11.5 टक्के, इजिप्तमध्ये 8.2 टक्के आणि अर्जेंटिनामध्ये 6.6 टक्के बाल कामगार आहेत. यावरुन असे दिसून येते की, बाल कामगारांच्या समस्यांवर जागतिक परिषदेनेही म्हणावी तेवढी उपाययोजना आखली नाही. हे प्रमाण कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना किमान आपल्या तरी प्रगतिशील राज्याने केल्या पाहिजेत. आपले महाराष्ट्र राज्य पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते याचा मला सार्थ अभिमान आहे परंतु बाल कामगारांची एवढी प्रचंड संख्या देशात किंवा महाराष्ट्रात पाहिली तर ते आपल्याला भुषणावह नाही. देशात बाल कामगारांच्या आकडेवारीत महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक आहे हेही मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. मात्र ही बाब महाराष्ट्रासाठी नक्कीच चांगली नाही. देशात एकूण जे बाल कामगार आहेत त्यापैकी आंध्र प्रदेशमध्ये 14.30 टक्के, मध्यप्रदेशमध्ये 12.45 टक्के, महाराष्ट्रामध्ये 11.42 टक्के आहे. ही सर्व आकडेवारी 1981 च्या जनगणनेनुसार आहे. आज त्यात खूप भर पडलेली आहे. बाल कामगार समस्या नष्ट करण्यासाठी महाराष्ट्रापेक्षा पश्चिम बंगाल अग्रेसर असून आज रोजी पश्चिम बंगालमध्ये 4.40 टक्के बाल कामगारांचे प्रमाण आहे. एका बाजूने आपण आपले राज्याला प्रगतिशील, पुरोगामी राज्य म्हणतो त्याच राज्यात मोठया संख्येने वेठबिगारी, बाल कामगार पध्दत असेल तर त्या समस्येचा खूप गांभीर्याने विचार करण्याची सरकारला गरज आहे असे शासनाला नम्रपणे सांगू इच्छितो.

सभापती महोदय, केंद्र शासनाचा 1986 चा बाल कामगार कायदा आपण आपल्या राज्याला

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त .....

लागू केला परंतु त्या कायद्याची योग्य ती अंमलबजावणी झालेली दिसून येत नाही. म्हणून ही समस्या फार भयानक स्वरुपात आपल्यापुढे उभी आहे. राज्य सरकारने या कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी आतापर्यन्त कोणती पावले उचललेली आहेत याची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहास देण्याविषयी मी विनंती करतो. पण माझ्या माहितीप्रमाणे आवश्यक तेवढी ठोस पावले उचलली गेली नाहीत व बाल कामगार कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत आजपर्यन्त राज्यात काहीसे दुर्लक्ष करण्यात आले आहे अशी जनतेमध्ये भावना दिसून येते. या कल्याणकारी राज्यामध्ये बाल कामगारांची संख्या किती आहे याचा शोध आणि माहिती घेण्याचे काम सुध्दा प्रामुख्याने आपल्या राज्यात रितसरपणे करण्यात आलेले नाही व तशा पध्दतीची कोणतीही यंत्रणा आज राज्यामध्ये उपलब्ध नाही. एखादा बाल कामगार सापडला तर त्याचे पुनर्वसन कसे करावयाचे यासंदर्भात खूप व्यापक तरतुदी आपल्या कायद्यामध्ये नाहीत. म्हणून ही दुरुस्ती सूचना मांडत असताना या बाल कामगारांना शोधण्याच्या दृष्टीने दक्षता समित्या कार्यरत असाव्यात. बाल कामगार उध्दार समित्या आणि विविध योजना यांच्या पलीकडेही या योजनांसाठी ठोस उपाययोजना आणि गाईडलाईन्स आखून दिल्या पाहिजेत. तरच हा प्रश्न काही अंशी सुटू शकेल. बाल कामगारांविषयी अनेक तरतुदी घटनेत असल्या तरीही त्या मुलांच्या परिस्थितीला केंद्रस्थानी ठेवून बनविण्यात आलेल्या नाहीत. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाच्या प्रयत्नाने सर्वोच्च न्यायालयाने चाईल्ड लेबर प्रोहिबिशन अँड रेग्युलेशन ॲक्ट,1986 चा भंग करणाऱ्यांना प्रत्येकी 20 हजार रुपये दंड ठोठावण्यात यावा असाही नियम केला आहे पण तो नियम प्रत्यक्षात अमलात आणला जात नाही. धोकादायक ठिकाणी काम करणाऱ्या मुलाला जर तिथून काढून शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्या घरातील एका व्यक्तीला योग्य रोजगार मिळेल याची व्यवस्था करणेही राज्य सरकारची जबाबदारी असेल असेही माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. जर सरकार ही उपाययोजना करण्यास असमर्थ असेल तर त्या कुटुंबाला त्या मोबदल्यात भरपाई दिली गेली पाहिजे असेही माननीय सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने याबाबतीत काही धोरण आखलेले आहे. देशातील 100

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. संजय दत्त .....

जिल्हयांची, बाल कामगारांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने निवड केली आहे. या 100 जिल्हयांमध्ये आपल्या राज्यातील 17 जिल्हे समाविष्ट आहेत. एका बाजूला शिक्षणावर एवढा खर्च होत असताना जी 14 वर्षे वयोगटाच्या आतील मुले बाल कामगार आहेत ती आपल्या राज्यातील गरिबांची मुले आहेत. ती शाळेत जात नाहीत.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अनंत तरे)

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

राज्यातील शिक्षणातील गळतीचे प्रमाणही खूप जास्त आहे. हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. शिक्षणापासून गळती झालेली मुले ही संभाव्य बाल मजूर असतात असे "युनिसेफ" या संघटनेने देखील मान्य केलेले आहे. शिक्षणातील गळती रोखणे हे त्यासाठी आवश्यक आहे. हा सोडविण्यासाठी केवळ बाल कामगार प्रतिबंधक कायदा राबवून चालणार नाही तर त्याचे पुनर्वसन सुध्दा चांगल्या पध्दतीने करावे लागेल. शिक्षण ही या गरीब मुलांची महत्वाची गरज आहे. ती पूर्ण करण्यासाठी त्यांना विशेष वसतिगृहे काढून 14 वर्षापर्यंत सक्तीने शिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या विभागांमध्ये ऊस तोडणीसाठी काम करणारे कामगार हे मोठया प्रमाणावर सहकुटुंब स्थलांतरित होत असल्यामुळे त्यांची लहान मुले देखील त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे बाल मजूर म्हणून कामाला लावले जातात. स्थलांतर व शिक्षणाच्या व्यवस्थेचा अभाव हेच त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे व बाल कामगार होण्याचे महत्वाचे कारण ठरते. यासाठी प्रत्येक साखर कारखान्यावर साखर शाळा सुरु करणे अनिवार्य करावे. दिल्लीमध्ये सात मोठया उद्योग व्यवसायामध्ये प्रचंड प्रमाणात बाल कामगारांना राबविण्यात येत असल्याबाबतचे प्रकरण सुप्रीम कोर्टात आले असता सुप्रीम कोर्टाने प्रत्येक बाल कामगारांस 50,000/- रुपये नुकसान भरपाई द्यावी असा निर्णय दिला होता.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये बाल कामगारांचे पुनर्वसन करण्याचे उद्दिष्ट ठरविलेले आहे. महाराष्ट्रासारख्या मोठया राज्यामध्ये जवळजवळ 30 लाख बाल कामगार असताना दरवर्षी फक्त 400 बाल कामगारांचे पुनर्वसन करण्याचे उद्दिष्ट आहे. मुंबई शहरासाठी 30, सांगली-कोल्हापूरसाठी 5 तर पुण्यासाठी 30 बाल कामगारांचे पुनर्वसन करण्याचे उद्दिष्ट आहे. एवढे छोटे उद्दिष्ट ठेवल्यामुळे ही मुले बाल गुन्हेगारीकडे वळतात व त्यामुळे बाल गुन्हेगारीचे प्रमाणही मोठया प्रमाणात वाढते आहे, ही चिंतेची बाब आहे. ही वाढती बाल गुन्हेगारी थांबवावयाची असेल तर आपल्या राज्यातील बाल कामगारांचे परिपूर्ण पुनर्वसनाचे हे उद्दिष्ट वाढविण्याची आवश्यकता आहे. या कामासाठी जास्त बजेट द्यावे लागेल किंवा वेगळी यंत्रणा निर्माण करावी लागेल. माझ्या सूचनेस दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य पाठिंबा देतील याचा मला पूर्ण विश्वास आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.संजय दत्त...

सभापती महोदय, मुंबईतल्या वेगवेगळया भागात, वेगवेगळया व्यवसायात चार वर्षांपासून ते चौदा वर्षापर्यंतच्या मुलांना जनावरांसारखे 14-14 तास राबविले जाते. आता अनेक कंपन्या व संस्थांनी कंत्राटी पध्दती अवलंबली असल्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणात बाल मजुरांकडून कामे करुन घेऊन त्यांची प्रचंड प्रमाणात पिळवणूक केली जात आहे, त्यांच्या खाण्यापिण्याकडे लक्ष दिले जात नाही, राहण्याकडे लक्ष दिले जात नाही. किंबहूना, त्यांच्या आरोग्याकडेही लक्ष दिले जात नाही, शिक्षणाचा तर पत्ताच नाही, त्यांना योग्य मोबदला दिला जात नाही, एक-एक, दोन-दोन वर्षे त्यांना कुटुंबियांकडे पाठविले जात नाही, या लहान चिमुकल्या मुलांना स्वत:चे, घराचे व बाहेरचे जग काय आहे हे माहीतच नाही. सभापती महोदय, या कंत्राटदारांनी लहान मुलांचे विश्वच हरण केले आहे. एवढेच नव्हे तर त्यांना ब्रिटिशांच्या गुलामगिरीपेक्षाही अत्यंत वाईट अवस्थेत ठेवले आहे. सभापती महोदय, या बाल मजुरांच्या व्यथा नेहमीच वृत्तपत्रात छापून येत असतात. अशीच एक हृदयद्रावक घटना दि.9 मार्च, 2005 रोजीच्या महानगर या दैनिकाच्या अंकात "गुदमरलेले बालपण" या मथळयाखाली पत्रकार श्रीमती शर्मिला कलगुटकर यांनी मुंबई व परिसरातील बाल मजुरांविषयी फारच विदारक व मन सुन्न करणारी बातमी दिली आहे. उल्हासनगर - 3 मधील अशोक नगर भागात वाधवा यांच्या राजेश कंपनीत 10 वर्षे वयाचा सुमित तपन आरक हा मुलगा बार्पिंग मशिनमध्ये ऊसाच्या चिपाडासारखा भरडून निघाला. या घटनेनंतर या कंपनीचा मालक वाधवा मात्र जामिनावर सुटला पण त्या चिमुकल्या मुलाच्या शरीराची किंमत वाधवाने केली फक्त 3320 रुपये. सुमितचे वडील किडणीने आजारी तर आई ही दुस-या आजाराने ग्रस्त आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय दत्त पुढे सुरु...

सभापती महोदय, अशी किती तरी लाखो लहान बालके आज मुंबई शहरात वेगवेगळया उद्योगात भरडली जात आहेत. हॉटेल्समध्ये, तंदुरी कॉनर्समध्ये, कचरा गोळा करणारे, हि-यांना पॉलिश करणारे, जरीकाम करणारे असे हजारो बालमजूर मुंबईच्या कानाकोप-यात आहेत. घटनेने आखून दिलेल्या चाईल्ड लेबर प्रोहिबिशन अँड रेग्युलेशन ॲक्ट 1986 मध्ये अनेक त्रुटी राहिलेल्या आहेत. लहान मुलांनी मोठ्या कारखान्यात काम करायचे नाही असा हा कायदा सांगतो. पण छोट्याशा गॅरेजेसमध्ये, वर्कशॉपमध्ये काम करण्यावर प्रतिबंध लावण्यात आलेला नाही. शहरी भागातील मुलांचे प्रश्न, त्यांच्या समस्या व त्यांच्या व्यथा मांडताना राज्याच्या नियोजनात मात्र ग्रामीण भागातल्या मुलांना स्थानच देण्यात येत नाही याची खंत मी या ठिकाणी व्यक्त करीत आहे. बालमजुरांपैकी 52 टक्के मुले ही शेती व्यवसायातील असतात. घरकाम करणा-या व हॉटेल्समध्ये काम करणा-या मुलांना मजूर मानण्यात येत नाही.

सभापती महोदय, विदर्भात चिल्ड्रेन वेल्फेअर ऑर्गनायझेशनने बालमजुरांचे सर्वेक्षण केले असता मोठ्या प्रमाणात बालमजुरीचे प्रमाण दिसून आले आहे. याबाबत सामाना या वृत्तपत्रात दिनांक 10 मार्च 2005 रोजी या विषयी सविस्तर माहिती छापून आली आहे. मुंबई सारखीच विदर्भातही बालमुरांची समस्या गंभीररुप धारण करीत आहे. चिल्ड्रेन वेलफेअर ऑर्गनायझेशनने केलेल्या सर्वेक्षणानुसार हजारो बालमजुरांना आजही मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे.

सभापती महोदय, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळकांचा वारसा असलेल्या आपल्या या राज्यास ही बाब शोभनीय नाही. राज्यातील हा बालमजुरीचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा आहे म्हणून प्रभावी यंत्रणा राबवून तो थांबविला पाहिजे. जिल्हास्तरावर पालक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली किंवा लोकप्रतिनिधी किंवा पोलीस विभागाचे अधिकारी यांच्या अधिकाराखाली ही यंत्रणा राबविणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बालकामगार विषयी धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार असून या कायद्यामध्ये मी ज्या दुरुस्त्या सुचविल्या आहेत त्या मान्य कराव्यात. सभासगृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी माझ्या या भूमिकेस पाठिंबा द्यावा, अशी विनंती करतो व मा. मंत्री महोदय, मी सुचविलेल्या सर्व सूचनांसह हे विधेयक स्वीकारतील अशी अपेक्षा व्यक्त करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय दत्त पुढे सुरु...

सभापती महोदय, "दो कलियॉ" हा जुन्या काळातील सिनेमा आपण सर्वांनी पाहिला असेल. त्यामध्ये गीतकाराने सुंदर अशा शब्दात मुलांचे वर्णन केले आहे.

"बच्चे मन के सच्चे, सारी जगकी आँखो के तारे,

यह वो नन्हे फूल है, जो भगवान को लगते प्यारे ||

आपल्या देशाचे पहिले पंतप्रधान आदरणीय पंडित जवाहरलाल नेहरु यांना लहान मुले फार आवडत असत. म्हणून नेहरुजींना आजही "चाचा नेहरु" म्हणून या देशात ओळखले जाते. त्यांचा जन्म दिवस बालदिन म्हणून आपण साजरा करतो. मात्र या नेहरुजींच्या देशामध्ये लहान वयातच मुलांना बालमजुरीच्या माध्यमातून हालअपेष्टांना सामोरे जावे लागत असून आमच्या देशाची उद्याची पिढी बाल वयातच भरडली जात आहे याचेही मला अतीव दु:ख होत आहे. म्हणून शासनाने या बाल मजुरांचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, त्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम आखावा व या बालकामगार कायद्यात मी सुचविलेल्या दुरस्त्या मान्य कराव्यात आणि हे विधेयक शासनाने स्वीकारावे, अशी मी विनंती करीत आहे. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

प्रश्न प्रस्तुत झाला.

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, बालकामगारांचे जे शोषण होते ते होऊ नये म्हणून बाल कामगार कायद्यामध्ये बदल करण्यासाठी मा.सदस्य श्री. संजय दत्त यांनी बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक सभागृहामध्ये मांडलेले आहे, त्या विधेयकाला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे. आताच बालदिनाचा उल्लेख झाला. 14 नोव्हेंबर रोजी मोठया प्रमाणावर मुले घोषणा देत रस्त्यातून मिरवणुकीने जातात. मुले हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. मुले हेच राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. मुले हेच घराचे बहुमोल अलंकार आहेत. हा राष्ट्राचा भावी आधारस्तंभ कोलमडून पडलेला आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. आज अशी असंख्य मुले आहेत की, त्यांना घरच नाही. मग ते घराचे बहुमोल अलंकार कसे होतील? मुलांचे वय हे खेळण्याबागडण्याचे असते, संस्कार शिकण्याचे असते. बालवयातील संस्कार हे आयुष्यभर पुरत असतात. समाजात माणूस म्हणून उभे राहाण्यासाठी जे संस्कार लागतात ते या छोट्या वयात होतात. जीवनाची जडणघडण या बालवयातील वातावरणामुळे बनत असते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर..

पण आज काय अवस्था आहे ? देशाच्या अवस्थेचा विचार करणापेक्षा महाराष्ट्राच्या अवस्थेचा आपण विचार केला पाहिजे. महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे जेथे 2002 मध्ये "चाईल्ड डेव्हलपमेंट पॉलिसी" स्वीकारण्यात आली. तरीही बालमजुरांचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चालले आहे. या गोष्टीस गरिबी हेच कारण आहे काय ? या गोष्टीस असंख्य कारणे आहेत. भारतीय घटनेमध्ये मुलांनी धोकादायक ठिकाणी आणि अपरात्री काम करु नये असे म्हटले आहे. हा अपुरा कायदा आहे. धोकादायक असलेल्या ठिकाणी बालमजुरांनी काम करावे काय ? रात्री नाही तर त्या बालमजुरांनी दिवसा काम करावे काय ? हॉटेल्स, तंदुरी कॉर्नरस्, कचरा वेचणे, हि-यांना पॉलीश करण्याचे काम यामध्ये शेकडो बालमजूर आज काम करीत आहे. बालमजुरांमध्ये कुशलता आहे, त्यांच्यामध्ये एकाग्रता असते. चाईल्ड लेबर प्रोव्हीबीशन ॲक्ट 1986 मध्ये अनेक त्रुटी आहेत. मुलांनी मोठया कारखान्यात काम करावयाचे नाही. म्हणजे त्यांनी छोटया कारखान्यात काम करावयाचे काय ? हॉटेल्स्मध्ये, वर्कशॉपमध्ये बालमजुरांकडून काम करुन घेतले जाते. तेथे मात्र त्यांना काम करण्यास प्रतिबंध नाही. 52 टक्के मुले शेती काम, घरकाम, हॉटेल्स् इत्यादि ठिकाणी मजुरी करीत आहेत. बालमजुरांसबंधीचा कायद्याचा जो भंग करील त्यास 20 हजार रुपये दंडाची शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. पण प्रत्यक्षात मालक ही मोठी मुले दाखवितात आणि या कायद्यातून पळवाट काढतात. बिगर धोकादायक ठिकाणी बालकामगारांना चारच तास देण्यात आले पाहिजे. तसेच त्या बालकामगारांना दोन तास सक्तीचे शिक्षण मालकांनी दिले पाहिजे. प्रत्यक्षात मात्र बालकामगारांकडून 12-12 तास काम करुन घेतले जाते. मालकांकडून त्यांना शिकविले जात नाही. मोठया मुलांसाठी सुंयुक्त राष्ट्रसंघाने मसुदा तयार केला आहे.यात लहान मुलांच्या मागण्या, हक्क, इच्छा यांना मात्र या मसुद्यात स्थान देण्यात आलेले नाही. मानवी हक्कांपेक्षा मुलांच्या हक्कांचा विचार झाला पाहिजे तो विचार कुठेही झालेला नाही. इयत्ता 10 वी पर्यन्त मोफत शिक्षण दर्जेदार नसेल तर फायदा काय ? बालमजुरी करणा-या मुलांमध्ये एक प्रकारची बिनधास्त,उर्मट इ ाक दिसते. अकाली मोठेपण त्यांच्यावर लादले जाते. आरोग्यास अपायकारक असलेल्या उद्योगास बालकामगारांना मनाई केली पाहिजे. शाळेत पाठविण्याची सक्ती मालकांवर केली पाहिजे. निदान रात्रशाळेत तरी मालकांनी आपल्या खर्चाने त्या बालकामांना शिक्षण घेण्यासाठी पाठविले पाहिजे. रात्रशाळांचे रिझल्टचे प्रमाण लक्षात घेऊन आज राज्यातील रात्र शाळा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर..

बंद पडण्याची वेळ आलेली आहे. ही जी मुले आहेत यांना दोन-दोन, तीन-तीन वेळा परीक्षेस बसवून त्यांना पास होण्याची संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे.या मुलांना शिक्षणाचा फायदा दिला गेला पाहिजे. परंतु तसे न होता बालमजुरांना वेठबिगारी म्हणून काम करावे लागत आहे. अतिशय अल्प प्रमाणात बालमजुरांकडून मालक काम करुन घेत आहेत. महाराष्ट्र राज्य हे प्रगत असतानाही बालकामगारांच्या बाबतीत अमानुषता आढळून येते. यावरुन शासनाचे बालमजूर निर्मूलनाचे प्रयत्न किती फोल आहेत याचा प्रत्यय येतो. मुंबई शहरात लहान मुले भीक मागतात. ती देखील एक प्रकारची वेठबिगारीच आहे. ही लहान मुले स्वेच्छने मागत नाहीत. मुलांना पळवून आणून त्यांना अपंग करुन भीक मागावयास लावतात. या मुलांचा भीक मागण्यासाठी अमानुष छळ केला जातो. 20 हजारापेक्षा जास्त बालमजूर जरीच्या व्यवसायात काम करीत आहेत. त्या ठिकाणी त्यांना 18-18 तास राबविले जात आहे. पोटच्या मुलाचे पालन करणे पालकांना अशक्य असते म्हणून पालक आपल्या मुलांना जरीचा व्यवसाय करणा-या मालकांच्या स्वाधीन करतात. अंधा-या,अपु-या जागेमध्ये त्या बालकामगारांकडून काम करुन घेतले जाते. अनेक वेळेला या बालकामारांना मोठया प्रमाणात मारहाण केली जाते, चटके दिले जातात, अशी अमानुषपणे मालक या बालकामगारांशी वागत असतात. या बालकामगारांना या सर्व गोष्टी सहन कराव्या लागत आहेत. धारावी, मानखूर्द, गोवंडी या ठिकाणी असंख्य कारखाने आहेत. या मुलांना शोषणमुक्त करण्यासाठी शासनाची यंत्रणा कार्यक्षम नाही असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. या कारखानदाराच्या मालकांकडून बालकामगारांना शासनाने मुक्त केले पाहिजे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने देखील निर्णय दिलेला आहे. परंतू त्या निर्णयाची अंमलबजावणी या राज्यात होताना दिसत नाही. बालकामगारांच्या संदर्भातील कायद्याचा भंग करणा-या मालकास 10 हजार रुपये दंडाची शिक्षा करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु या कारखान्यांच्या मालकांवर कोणत्याही प्रकारची कायदेशीर कारवाई मात्र केली जात नाही ही पुरोगामी राज्याला न शोभणारी गोष्ट आहे. मानवी आयोगाचे दोन सदस्य बालकामगारांच्या चौकशीच्या संदर्भात महाराष्ट्रात आले होते. त्यांनी मुंबई शहरात विविध विभागाचे सचिव, विविध संस्था, विविध संघटनांचे प्रतिनिधी यांना चर्चेसाठी बोलाविले होते. राज्य सरकारचे बालकामगारांचे ज्यावेळी त्यांनी धोरण ऐकले. ते धोरण ऐकल्यानंतर आम्ही बिहारमध्ये तर नाहीत ना असे उदगार त्यांनी यावेळी काढले..

. यानंतर श्री. कानडे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्रीमती संजीवनी रायकर ...

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन केले जात नाही यासाठी सरकारला धारेवर धरले होते. मालकांनी सुध्दा 14 वर्षावरील मुले आहेत असे दाखविले होते. ही मुले बुटपॉलीश करणारी,रेल्वेमध्ये वस्तू विकणारी आहेत. मुंबईत अशा मुलांची संख्या 1 लाखापेक्षा जास्त आहे. आपल्या देशामध्ये आणि राज्यामध्ये बालश्रमविरोधी दिन,मेळावे,परिसंवाद आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. परंतु ही मुले आजही फूटपाथवर राहतात आणि महालक्ष्मी किंवा माहीम दर्गा येथे 5 स्टार हॉटेलमधून फेकून दिलेले अन्न खातात. राज्यामध्ये स्वयंसेवी संस्था आहेत त्या संस्था अशा 15-20 हजार मुलांना मदत करु शकतात. परंतु बाकीची मदत कोण करणार हा प्रश्न निर्माण होतो. मुलींबाबत काय सांगावे ? 50 टक्के बालके कुपोषणग्रस्त आहेत. अनाथालये,शिशुपालनगृहे,वसतीगृहे तसेच जवळचे नातेवाईक लैंगिक शोषण करतात.या सर्वांसाठी स्वतंत्र न्यायालयाची आवश्यकता आहे. शासनाने सर्वशिक्षा अंतर्गत या मुलांची शोधमोहीम सुरु केली आहे. यासाठी पुनर्वसन प्रकल्प संस्थेकडे जबाबदारी टाकावी. सर्वशिक्षा अभियानाअंतर्गत 10 लाख रुपये केंद्र शासनाने दिलेले आहेत. प्रत्येक दोन प्रशिक्षक यांना प्रशिक्षण देतात. या सगळया दृष्टीने विचार करुन बालकामगारांची समस्या शासनाने युध्द पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न करावा एवढी विनंती करते आणि या विधेयकाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): सभापती महोदय, मा.सदस्य श्री. संजय दत्त यांनी बालकामगारांच्या संदर्भात मूलभूत अशा कायद्यातील तरतुदीमध्ये काही बदल करण्याच्या दृष्टीने जे विधेयक याठिकाणी आणलेले आहे त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो आणि त्यांचे अभिनंदन करतो. हे बिल आणीत असताना राज्यामध्ये असलेले सरकार हे वेगवेगळया प्रश्नांकडे पाहण्यास असमर्थ ठरलेले आहे त्याचे विदारक चित्र त्यांच्याच पक्षातील एका सदस्याने अत्यंत सखोल पध्दतीने मांडले म्हणून त्यांचे मी अभिनंदन करतो. ज्या समस्येकडे सरकारचे लक्ष जायला पाहिजे ते जात नसेल तेव्हा सदस्य कुठल्याही पक्षाचा असो तो सदस्य मनापासून जेव्हा एखादी गोष्ट सांगतो असा प्रयत्न श्री. दत्त यांनी केला त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी अतिशय पोटतिडीकीने हा प्रश्न याठिकाणी मांडला आहे. यावेळी त्यांनी बालकामगार आणि शाहू,डॉ.आंबेडकर,फुले ,टिळक यांची नांवे घेतली पण त्याचा याविषयाशी काही संबंध नाही. आपले शासन किती कमजोर आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला याबद्दल मनापासून धन्यवाद देतो. बाल कामगारांच्या समस्या महाराष्ट्रात कायद्याने सुटू शकणार नाहीत. कुठलेही सरकार असले तरी या समस्या सोडविणे शक्य नाही कारण परिस्थिती हाताबाहेर गेलेली आहे. प्रचंड प्रमाणावर गरिबी आहे आणि महाराष्ट्रामध्ये अशी अनेक कुटुंबे आहेत की ज्यांना गुजराण करण्याकरिता मुलांना कामाला लावावे लागते. बालकामगारांच्या संज्ञेमध्ये ग्रामीण भागातील शेतक-याची मुले येतात गुरे चारणा-या मुलांना किंवा आई-वडिलांना शेतीच्या कामामध्ये मदत करणा-या मुलांना तुम्ही पकडणार काय ?हे काम आहे त्यांना करावे लागते. त्यांना बालकामगार कायदा लागू करणार काय ? या समस्येची व्याप्ती इतकी मोठी आहे की या विषयावर बोलावयाचे झाले तर 5 तास सुध्दा पुरणार नाहीत. सरकारच्या मर्यादा आणि आपल्या अपेक्षा याची जर व्यवस्थितपणे सीमारेषा पकडली तर जास्तीत जास्त या कायद्याअंतर्गत मुलांना न्याय देण्याचा आपण प्रयत्न करु शकू असे मला वाटते. बालकामगारांच्या प्रश्नाकडे पहात असताना काही मुले आणि ते कौतुकास्पद आहे अयोग्य आहे किंवा योग्य यापेक्षाही भीक मागण्यापेक्षा कुणाकडे अनैतिकतेने एखादी गोष्ट मिळविण्यापेक्षा बूटपॉलीश करुन, काही वस्तू विकून स्वत:ची गुजराण करीत असेल तर त्या मुलामध्ये स्वत:चा स्वाभिमान आहे.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

तो स्वाभिमान जर आपण जपू शकलो तर भविष्यामध्ये त्यातून एखादा चांगला उद्योगपती निर्माण होऊ शकेल. तेव्हा एखाद्या कामाकडे आपण कोणत्या दृष्टीकोनातून पाहतो त्याला जास्त महत्व आहे. सर्वच शोषित आहेत आणि त्याकडे सरकारने लक्ष घालावे असे जर आपण म्हणत असू तर त्या मध्ये आपण काय सहभाग देऊ शकतो हा सुध्दा प्रश्न निर्माण होत असतो.सभापती महोदय, महाराष्ट्रात आणि खास करुन ठाण्या पासून ते घोडबंदरपर्यन्त आणि पुढे बेलापूर पर्यन्त कामगारांचा पट्टा आहे. त्या भागात कामगारांच्या मोठया वस्त्या आहेत.जेथे कामगारांची वस्ती असते ते दारु हा विषय निश्चितच असतो. किंबहुना त्याची तेथे अत्यंत आवश्यकता असते.या दारुची वाहतूक करण्याचे काम लहान कामगारांकडून केले जाते. त्या मागचे कारण सुध्दा कायदेशीर आहे. दारुची वाहतूक करीत असतांना जर एखाद्या मोठया व्यक्तीला पकडले तर ती व्यक्ती महिला असो वा पुरुष असो त्या व्यक्तीला त्या गुन्हया प्रमाणे गुन्हेगार ठरवून दंड आणि सजा अशी शिक्षा दिली जाते. परंतु दारुची वाहतूक करीत असतांना जर लहान मुलांना पकडण्यात आले तर पोलिसांचीसुध्दा मोठी कुचंबणा होत असते. या मुलांना जर कोर्टा समोर उभे केले तर या मुलांचे काय करावयाचे ? असा कोर्टापुढे प्रश्न पडतो आणि कोर्टाची परिस्थिती गंभीर बनते. ही मुले अज्ञान असल्यामुळे त्यांना कोणती शिक्षा द्यावयाची असाही प्रश्न कोर्टासमोर निर्माण होतो.त्यामुळे अशा व्यवसायात लहान मुलांचा उपयोग करुन घेण्याचा कल आज वाढत चालला आहे. हा कल कायद्याने कसा मोडून काढता येईल हा महत्वाचा भाग आहे. गुन्हेगारीकडे वळण्याचा कारखाना अशा प्रकारे निर्माण होत असतो.अशा प्रकारे लहान मुलांकडून अनैतिक कामे करुन घेतली जातात कारण कायद्यामध्ये त्यांना नकळत संरक्षण असते.एखादा गुन्हा या लहान मुलांकडून घडला व त्याला कोर्टासमोर उभे केले तर हा मुलगा अज्ञान असल्यामुळे त्याला सुधारगृहाकडे पाठविण्यात येत असते.अर्थात तो एक वेगळा विषय आहे. महिला व बाल कल्याण विषयाच्या संदर्भात अडीच तास चर्चा घेण्यात यावी अशी विनती मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे केली होती. पुढच्या आठवडयात जर अधिवेशन चालू राहिले तर त्या विषयावर चर्चा होण्याची शक्यता आहे. आजच्या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी जे मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत ते मुद्दे त्या वेळच्या चर्चेत उपस्थित करण्यासाठी उपयोगी पडू शकतील असे मला वाटते. महिला व बाल कल्याण विभागामध्ये बाल कामगारांचा प्रश्न वेगळा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे.नाईलाजाने उपजिविका करण्याकरिता लहान मुलांना जर नोकरी करावी लागत असेल तर तो प्रश्न कसा सोडवावयाचा.? हा महत्वाचा प्रश्न आहे. लहान मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे परतु शिक्षकांसाठी पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर आणि गडगंज पगार दिल्यानंतर राजकारणी आम्हाला वापरुन घेतात आणि शासनाने आम्हाला अतिरिक्त काम सांगितले आहे ती कामे थांबविण्यात यावीत असे शिक्षक सांगत असतात. त्यामुळे ते आपल्या कामापासून वंचित राहतात. महाराष्ट्रामध्ये शिक्षणावर एवढया मोठया प्रमाणावर खर्च होत असतांना आठ लाख मुलांना लिहिता वाचता येत नाही ही परिस्थिती चांगली नाही.म्हणून मी काल अशी सूचना केली होती क, या शिक्षकांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी. अशिक्षितपणामुळे बाल कामगार निर्माण होत असतात अशिक्षितपणामुळे हे बाल कामगार हॉटेलमध्ये कपबशा धुण्यासाठी येत असतात.त्या बाबतीत आपण काहीही करु शकत नाही..सामाजिक प्रश्न म्हणून आपण त्याकडे पाहिले पाहिजेअसे मला वाटते.या बाबतीत हायकोर्टान किंवा सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला असला तरी कायद्याची अंमलबजावणी कशी केली जाईल हे मला माहीत नाही.सभापती महोदय, एका गोष्टीचा उल्लेख करीत असतांना मला अतिशय वाईट वाटते. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर बोलतांना असे म्हणाल्या काही महाराष्ट्रात मानवी हक्क आयोगाचे दोन सदस्य आले होते आणि त्यांनी असे सगितले की ,येथील स्थिती बिहारपेक्षा सुध्दा वाईट आहे. प्रत्येक वेळा महाराष्ट्राची तुलना बिहार बरोबर का केली जाते ? शेतीच्या संदर्भात बोलत असतांना मी आज ही तुलना करणारच आहे.बिहारमध्ये काय स्थिती आहे ? त्यापेक्षा आपली स्थिती खराब आहे काय ? प्रत्यक्षात तसे नाही.महाराष्ट्र राज्य हे प्रगत राज्य आहे.आणि प्रगत महाराष्ट्रामध्ये काही गोष्टी घडविल्या जात आहेत आपण त्याचे कौतूक केले पाहिजे. ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या बाबतीत युती शासनाने निर्णय घेतला होता आणि या शासनाने तो पुढे रेटला परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये काही अडचणी निर्माण आहेत . हया निर्णयाची अंमबजावणी करीत असतांना शासनाच्या सुध्दा काही अडचणी आहेत. सन्माननीय उर्जा राज्यमंत्री श्री. विनय कोरे या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की , "पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखानदारांना वठणीवर आणून एखादे काम करुन घेणे इतके सोपे आहे काय ?" हे त्यांना माहीत आहे आणि मलाही माहीत आहे.ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा का काढण्यात आल्या नाहीत.?

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

याकरता शिक्षा देणे एवढे सोपे नाही. ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा काढल्या पाहिजेत. यासाठी त्यांच्या सतत मागे लागले पाहिजे. काही ठिकाणी ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा काढण्यात आल्या आहेत. ही कौतुकाची बाब आहे.सभापती महोदय, यानंतर मला दुसरा एक मुद्दा येथे मांडावयाचा आहे. ज्याप्रमाणे शेतीच्या कामासाठी त्या शेतक-याचे संपूर्ण कुटूंब शेतीमध्ये काम करीत असते त्याप्रमाणे वीट भटयामध्येसुध्दा संपूर्ण कुटूंब काम करीत असते त्या ठिकाणीसुध्दा लहान मुले काम करीत असतात त्याबाबतीत काय करता येईल हे मला माहीत नाही.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

परंतु उपहारगृहासंबंधीचा मुद्दा काढला आणि खरोखरी त्याबाबत आपण काही बंदी वगैरेसारखे उपाय केले तर आज ज्याप्रमाणे आझाद मैदानावर डान्स बार मधील बारबाला वगैरेंचे आंदोलन झाले त्याप्रमाणे मग ती मुले देखील करतील आणि मग सरकारला नको जीव करतील अशी परिस्थिती आहे. अध्यक्ष महाराज, महापालिकेच्या गटारांमध्ये उतरण्यासाठी 'बॉय' वापरले जातात आणि हे कायदेशीर आहे कारण त्या गटारांमध्ये उतरून गाळ काढण्यासाठी मोठी माणसे उतरू शकत नाहीत म्हणून मग तेथे 'बॉय' वापरले जातात. आता त्यावर उपाय म्हणून सक्शन मशीनने हा गाळ-घाण गटारातून काढले जाते. केवळ हाच एक त्यावर पर्याय आहे. म्हणून कायद्याने यासाठी किती बंधने आणता येतील हे आता सांगता येत नसले तरी महाराष्ट्रात याबाबत कायदा आणण्याची सक्षमता आपण दाखवावी आणि आपल्याच पक्षाच्या सदस्यांनाही आश्वासित करावे अशी विनंती करतो आणि भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

*****

..... आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाच्या संदर्भात अशासकीय विधेयक आणलेले आहे आणि त्याद्वारे त्यांनी बालकामगारांच्या बाबतीतील विषय मांडला आहे. अनेक सदस्यांनी या बाबतीत आपले विचार येथे व्यक्त केले आहेत. खरे म्हणजे 'बाल कामगार' ही एक आज सामाजिक समस्या निर्माण झालेली आहे. या बाबतीत 1986 किंवा 1996 चा कायदा असला, तरतूद असली किंवा या बाल कामगारांना संरक्षण देणारी काही तरतुदी वा नियम असले तरीसुद्धा त्याची अमलबजावणी योग्य प्रकारे, प्रभावीपणे होत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने या बाल कामगारांना आपण संरक्षण देऊ शकणार नाही आणि त्यांचे हक्क प्रस्थापित करू शकणार नाही. International Labour Organisation ने या बाल कामगारांची व्याख्या केलेली आहे किंवा त्या संबंधात ही ऑर्गनायझेशन असे म्हणते आहे की, "Child labour includes children permanently leading adult lives, working long hours for low wages..." हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा आहे म्हणजे लहान लहान मुले मोठ्या माणसांसाठी तासन् तास कमी पगारावर काम करीत आहेत ... "under condition damaging to their health and to their physical and mental development" ज्या वयाची मुले ही कामे करतात आणि ज्या परिस्थितीमध्ये ही कामे करीत आहेत त्यांचे दुष्परिणाम त्यांच्या एकूणच प्रगतीवर, प्रकृतीवर, शारीरिक विकासावर, मानसिक विकासावर होत आहे. "sometimes separated from their families" आपल्या कुटुंबियांपासून दूर राहून हे बाल कामगार कारखान्यांमध्ये काम करीत आहेत अशी ही मुले "are frequently deprived at meaningful educational and training opportunities that could open up for them a better future." उज्ज्वल भवितव्यासाठी या मुलांना आपण खरे म्हणजे सर्वच सुविधा, सोयींपासून, त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवतो आहोत. त्यांना सुविधा, प्रशिक्षण, शिक्षण मिळणे आवश्यक आहे पण त्याबाबतीत त्यांना वंचित ठेवले जात आहे असा हा सारा प्रकार होत आहे. 19946 मध्ये लेबर वेल्फेअर कमिटी स्थापन झालेली आहे आणि तिचा अहवाल देखील आलेला आहे. त्यामध्ये या बाल कामगार प्रथा सुरू होण्यामागील जी कारणे दिलेली आहेत ती अत्यंत महत्त्वाची आहेत. बेरोजगारी हा त्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. या बेरोजगारीमुळेच मुख्यत्वे करून बाल कामगारांची प्रथा वाढीस लागली आहे. मोठ्या माणसांना नोकरी मिळत नाहीत आणि लहान मुलांना कमी पगारावर का होईना पण सहजगत्या

..... आय 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोते ...

नोकरी मिळते आहे आणि मालकांना देखील अल्प वेतनामध्ये जास्त काम करणारी ही मुले मिळत असल्यामुळे 'बाल कामगार' प्रथा मोठ्या प्रमाणात वाढीस लागली. म्हणजेच बेरोजगारी हा यातील महत्त्वाचा घटक आहे. अर्थातच त्यामध्ये दारिद्र्य हाही महत्त्वाचा घटक आहे. भौगोलिक, सामाजिक आणि राजकीय स्वरूपामध्ये देखील होणारे बदल हेही याला कारणीभूत आहे. अध्यक्ष महाराज, आर्टिकल 24 मध्ये या संबंधात स्पष्टपणे तरतूद आहे.. त्यात असे म्हटलेले आहे की, "No child under 14 years should be made to work in any factory or a mine or engaged in any other hazardous employment." ...

(यानंतर श्री. जागडे .... जे 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

अशा प्रकारची तरतूद आर्टिकल 24 मध्ये असतानाही अशा प्रकारच्या धोकादायक ठिकाणी बाल कामगार राबविले जात आहेत. यामुळे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, अशी शंका येत आहे.

सभापती महोदय, आर्टिकल 39 मध्ये असे म्हटले आहे की, "every State should see that the tender age children are not abused and that citizens are not compelled by economic circumstances to do work to their age or strength. त्यांच्या वयात त्यांच्या क्षमतेपेक्षा जास्त ताण देणारे काम त्या मुलांना दिले गेले तर त्या मुलांचा विकास होण्याऐवजी त्यांच्यावर विपरीत परिणाम होणार आहे. तेव्हा लहान मुलांना अशा प्रकारचे काम देऊन त्यांच्यावर अन्याय होत आहे. म्हणून याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. शासनाची ही जबाबदारी आहे. सभापती महोदय, आज ही सामाजिक समस्या निर्माण झाली आहे. आपण कितीही कायदे केले तरी बाल कामगार बंद होऊ शकणार नाहीत. तेव्हा एका वेगळ्या दृष्टीकोनातून शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. या बाल कामगारांना संरक्षण मिळण्यासाठी शासनाने योग्य ते नियोजन केले पाहिजे. 1986 आणि 1996 साली जे कायदे करण्यात आले आहेत, त्या कायद्यांचे काटेखोरपणाने अंमलबजावणी करावी, असे मला वाटते.

धन्यवाद ।

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगन्नाथ शेवाळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी बाल कामगारांच्या समस्यांबाबत एक अशासकीय विधेयक सदनात मांडले आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करीत आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या संदर्भात जे वक्तव्य केले आहे, त्याबद्दल आम्ही सर्वजण सहमत आहोत. सभापती महोदय, बाल कामगार हा हौसेने इ ालेला नाही. समाजातील आर्थिक समतोल याला ख-या अर्थाने कारणीभूत आहे. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी या बाबतची विविध कारणे सांगितली आहेत. ही सर्व कारण समाजाशी तसेच समाजाच्या नेतृत्वाशी निगडीत आहेत. म्हणून ज्यावेळी समाजातील आर्थिक असमतोल दूर होईल, त्यावेळी बाल कामगारांची संख्या कमी होऊ शकेल. म्हणून या दृष्टीने समाजात पावले टाकली पाहिजे. कायदे केल्यानंतर बाल कामगार कमी होतील, असे नाही तर समाजातील ही स्थिती बदलल्यानंतर बाल कामगार कमी होतील. हा एकमेव उपाय आहे. माननीय सदस्य श्री.रावते यांनी सांगितल्याप्रमाणे शेतक-यांची मुले शेतावर काम करीत असतात, आई - वडिलांना मदत करीत असतात. म्हणून त्यांना बाल कामगार प्रतिबंधक कायद्यात आणता येणार नाही. परंतु जी मुले दारुच्या धंद्यावर काम करीत आहेत, अवैध काम करीत आहेत, त्यांच्यावर मात्र या कायद्यान्वये कारवाई करता येईल. माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी हे विधेयक आणण्यामागे जो खटाटोप पाहता शासनाने या बाबत योग्य प्रकारची उपाययोजना करुन त्याची अंमलबजावणी करावी. मी पुन्हा एकदा माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचे अभिनंदन करुन माझे भाषण संपवितो.

--

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक (पर्यावरण, उत्पादन शुल्क व कामगार मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी या ठिकाणी बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, 1986 मध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. या विधेयकातील 17 व्या कलमामध्ये 17अ अशा प्रकारची नवीन तरतूद करुन "समुचित सरकार राज्यातील बाल कामगार शोधून काढण्यासाठी जिल्हावार दक्षता समित्या स्थापन करील व दक्षता समित्यांनी शोधून काढलेल्या बाल कामगारांचे यथोचित पुनर्वसन करील" अशाप्रकारची भूमिका मांडली आहे. तसेच, दुसऱ्या टप्प्यामध्ये वीट भट्टीवर काम करणे, ऊस तोडणी करणे आणि उपहारगृहांमध्ये काम करणे या संबंधीच्या असलेल्या "ब" सेक्शनमध्ये सुधारणा करावी अशी मागणी केली आहे. त्यांनी या विधेयकावर भाषण करतांना अतिशय आत्मियतेने आपले विचार मांडले आहेत. त्यांनी मांडलेल्या भावनेशी हे राज्य सरकार सहमत आहे. त्यांनी आपल्या भाषणामध्ये बाळ गंगाधर टिळक, शाहू महाराजांचा उल्लेख केला. परंतु त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या बाल वयात पराक्रम केला आहे. आणि त्यांचा उल्लेख जर या ठिकाणी करण्यात आला तर या विधेयकाच्या निमित्ताने सर्वच बालकांना आपण बाल वयात पराक्रम करावयास सांगू असे त्यांना वाटले असेल, म्हणून कदाचित त्यांनी तो उल्लेख केला नसावा. हे विधेयक मांडण्यामागील त्यांची भावना अतिशय शुध्द आहे. त्यांनी देशाच्या विविध भागामध्ये असलेले बाल कामगारांचे प्रमाण आणि त्यांना होत असलेल्या त्रासाबाबत बऱ्याच गोष्टी नमूद केल्या आहेत. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हवाला देऊन बालकांविषयी पंडितजींच्या मनामध्ये असलेली भावना, असलेले प्रेम "मुले ही परमेश्वराच्या घरची फुले" अशा पध्दतीने त्यांनी आपले विचार या ठिकाणी मांडले. ही गोष्ट खरी आहे की, मुलांकडून सक्तीने काम करुन घेतले जाते. ज्या वयामध्ये त्यांनी खेळावे, बागडावे असे वाटत असते त्या वयात त्यांना आपल्या मनाविरुध्द काम करावे लागत आहे हे अतिशय वाईट आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या बाबत व्यक्त केलेल्या मताशी मी सहमत आहे. हे प्रकार कां होतात याच्या पाठीमागची कारणमीमांसा आपण शोधली पाहिजे. समाजामध्ये असलेली आर्थिक विषमता, वाढलेली लोकसंख्या हे या समस्येमागील मूळ आहे. या अनुषंगाने मी सभागृहाचे लक्ष वेधतो की, या देशामध्ये अनेक कायदे झाले, त्यामध्ये सक्तीच्या कुटुंब नियोजनाचा कायदा संमत झाला. परंतु त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक....

कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही. अनेक समस्यांच्या मागे कुटुंब नियोजन हा देखील एक महत्वाचा भाग आहे. या देशामधील लोकसंख्येचे प्रमाण दिवसें दिवस वाढत आहे. आपण रोज टी.व्ही. वर देशाच्या वाढणाऱ्या लोकसंख्येची माहिती पहात असतो. गॅट आणि डंकन यांच्या मूळ करारामध्ये हाच उद्देश आहे की, कोणत्या देशाने कोणत्या गोष्टींची निर्मिती करावी याला बंधन घालण्यात आले आहे. आपल्या देशात जर ऊसाचे उत्पादन जास्त झाले तर ऊसाचे गळीत होत नाही. तो अतिरिक्त ऊस फेकला जातो, जाळून टाकला जातो. कांद्याचे पिक मुबलक आले तर त्या कांद्याचे ढीग रस्त्याच्या बाजूला टाकले जातात. तेव्हा शेतीचे नियोजन करण्याच्या बाबतीत शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये समन्वय घडविण्याची गरज आहे. त्यामध्ये केंद्रीकरण करण्याची, व्यवस्थापन करण्याची गरज आहे. कोणत्या जिल्हयात, कोणत्या तालुक्यात किंवा कोणत्या गावात शेतीचे कोणते पिक घ्यावे याचे नियोजन झाले पाहिजे. राज्याच्या स्तरावर व देशाच्या स्तरावर नियोजन झाले पाहिजे. साखरेचे उत्पादन भरपूर झाले तर साखरेला मागणी होत नाही. त्यावेळी आपण शेतकऱ्यास पर्यायी सोयाबीनचे उत्पादन घेण्यास सांगतो. अशावेळी ऊसाचे उत्पादन कमी झाले व साखरेची मागणी वाढली तर आपल्याला परदेशातून साखर आयात करावी लागते. तेव्हा या सर्व बाबींच्या पाठीमागचे मूळ कारण आपण शोधले पाहिजे. सभापती महोदय, आपण स्वत: लहानपणी असतांना मोठया माणसांबरोबर हौसेने मासळी पकडण्यासाठी जात होता. शेतामध्ये लहान मुले नांगर धरण्यासाठी जातात, गुरे राखायला जातात, ती हौसेने त्याठिकाणी जातात. तेव्हा हौसेने काम करणे निराळे आणि सक्तीने काम करणे निराळे. त्या ठिकाणी मनाविरुध्द एखादी गोष्ट करावी लागणे अतिशय वाईट आहे. माननीय सदस्या श्रीमती रायकर यांनी बाल कामगारांविषयी आपले मत व्यक्त केले. काही ठिकाणी त्यांना आठ-आठ तास काम करावे लागते. काही ठिकाणी त्यांना सक्तीने राबविले जाते. या गोष्टींकडे शासनाचे लक्ष आहेच. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्याप्रमाणे बीफोर एज एक्झर्शन होते. माणसाची शारिरीक क्षमता तयार होण्यापूर्वी त्यांचा शारिरीक व मानसिक छळ होणे अयोग्य आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक . . . .

बाल कामगार आहेतच. पण त्यांनी किती आणि कोणती कामे करावीत याबाबतीत निर्बंध आहेत. सन्माननीय सदस्य श्री.शेवाळे यांनी सांगितले की, आज प्रत्येक गावामध्ये दारुचे गुत्ते कुठे आहेत ? हे ग्राम पंचायतीच्या सदस्यांना, जिल्हा परिषदेच्या सदस्यांना, आमदार आणि खासदार या सर्वांना माहिती आहे. कोण चोरी करतो, कोण कोणते धंदे करतो, कोणाचे नैतिक, अनैतिक धंदे आहेत हे सर्वांना माहिती असते. पण समाजाची हे लपविण्याची जी प्रवृत्ती आहे, ती या देशाला आणि या राज्याला मारक आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी या विधेयकाच्या माध्यमातून ही सुधारणा सुचविलेली आहे, त्याचा भाग फार छोटा आहे. जिल्हाधिकारी आणि सी.ई.ओ. यांच्या नेतृत्वाखाली बाल कामगार शोधून काढणे आणि सक्षम करण्याच्या दृष्टीने काम सुरु आहे. त्यामुळे 17(अ) ची गरज आहे असे मला वाटत नाही. सन्माननीय सदस्यांची अशी मागणी आहे की, वीट भट्टीच्या ठिकाणी, ऊस तोडणीच्या ठिकाणी तसेच उपहार गृहामध्ये बाल कामगार असू नयेत. ऊस तोडणी हे काम धोकादायक स्वरुपाचे नसल्यामुळे केंद्र शासनाने याचा धोकादायक कामांच्या यादीमध्ये समावेश केलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे वीट भट्टीचे काम, ऊस तोडणीचे काम आणि उपहारगृहामधील कामाच्या ठिकाणी बाल कामगारांना बंदी करण्याच्या संदर्भातील अधिकार हे "बाल कामगार(प्रतिबंध व विनियमन) अधिनियम, 1986 च्या कलम 4 अन्वये केंद्र शासनाला आहे. वीट भट्टीच्या ठिकाणी बाल कामगारांना ठेवण्यास मनाई आहे. पण ऊस तोडणीच्या कामावर आणि उपहार गृहामध्ये बाल कामगारांना बंदी करण्यासाठी केंद्र शासनाने सुधारणा करावयास पाहिजे. ज्याप्रमाणे मुले आपल्या घरातील लोकांबरोबर आंबे तोडण्यासाठी झाडावर चढतात, रानामध्ये गुरे राखण्यासाठी जातात, शेळया राखण्यासाठी आनंदाने जातात. पण ही कामे आनंदाने करणे, घरच्या लोकांच्या प्रेमाखातर करणे ही वेगळी गोष्ट आहे. पण सक्तीने कामावर जाणे ही निराळी गोष्ट आहे. त्यामुळे मला असे वाटते की, 17(अ) ची गरज नाही. मघाशी सांगितल्याप्रमाणे ऊस तोडणीच्या कामावर आणि उपहार गृहामध्ये बाल कामगारांना काम करण्याबाबत बंदी करणारा कायदा केंद्र शासनाने केला पाहिजे. तसेच ज्याप्रमाणे महिला आयोगाची स्थापना झालेली आहे, त्याप्रमाणे बाल आयोग स्थापन करण्यासाठी शासन अतिशय गांभीर्याने विचार करीत आहे. ही बाब लक्षात घेता सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी आपले अशासकीय विधेयक मागे घ्यावे अशी मी त्यांना विनंती करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सर्व प्रथम मी याठिकाणी जे सुधारणा विधेयक मांडलेले आहे, त्यासंबंधात सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकरताई, सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते, रामनाथ मोते, जगन्नाथ शेवाळे इ. सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो, तसेच या विषयाच्या संबंधात सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या विविध सूचना केलेल्या आहेत, त्याचे मी स्वागत करतो. त्याचबरोबर सन्माननीय कामगार मंत्री श्री.गणेश नाईकसाहेबांनी सुध्दा याठिकाणी हे विधेयक मांडण्यामागची माझी जी भावना आहे, जी प्रेरणा आहे ती समजून घेतली, त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो. स्वत: माननीय श्री.गणेश नाईकसाहेब हे एक उत्कृष्ट संवेदनाशील कामगार मंत्री आहेत, कामगार नेते आहेत. त्यामुळे मला खात्री आहे की, मी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावरील चर्चेच्या माध्यमातून या सदनामध्ये ज्या सूचना केलेल्या आहेत, यामागची भावना समजून घेतील आणि त्यानुसार जे-जे बदल करण्याची आवश्यकता आहे, विशेषत: बाल कामगारांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने व्यवस्था करणे. हे सर्व लक्षात घेऊन आणि त्यादृष्टीने पुढाकार घेऊन शासनामार्फत अशा प्रकारचे विधेयक योग्य वेळी, लवकरात लवकर सभागृहासमोर आणतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणामध्ये बाल आयोगासंबंधी जी घोषणा केलेली आहे, त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो आणि मला हे विधेयक परत घेण्यासाठी सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी विनंती करतो.

सभागृहाच्या अनुमतीने विधेयक परत घेण्यात आले.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी. : सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक.

मु. शी. : **L.C.BILL NO.XXII OF 2004.**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETY ACT, 1960).

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, स-ा 2004 चे वि.प.वि. क्रमांक 22- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेज्यात यावे असा मी आपल्या अ-ुमती-ो प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, गेली तीन चार वर्षे मी हे विधेयक आणण्याचा प्रयत्न करीत आहे परंतु येन केन प्रकारे ते राहून गेले. मध्यंतरी माझी सदस्यत्वाची मुदत संपली म्हणून बिल लॅप्स झाले व हे बिल परत पुर:स्थापित करुन आणावे लागले. अशा प्रकारची तरतुद व्हावी याकरिता मी मंत्री नसताना आणि सत्तेमध्ये नसताना संबंधित मंत्रिमहोदयांच्या माध्यमातून प्रयत्न करीत होतो. यामध्ये मुंबईत ज्या दोन गोष्टी बाधित होतात त्यातील एक बाब घडली. जे ऑक्युपंसी चार्जेस घेण्यात येतात त्याबाबतीमध्ये सातत्याने सत्ताधारी पक्षाच्या, सहकार खात्याच्या, शासनाच्या मागे लागलो होतो. त्याबाबतीत पत्रव्यवहार केला होता. सभापती महोदय, एखाद्याने आपला ब्लॉक घेतला आणि तो भाडयाने दिला किंवा जागा घेतली व ती भाडयाने दिली आणि त्या ठिकाणी जर सहकारी सोसायटी असेल तर त्या सहकारी सोसायटीचे अध्यक्ष आणि सेक्रेटरी सर्व कारभार पाहात असतात आणि मुंबईमध्ये अनेक ठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झाली की, ते सांगतील तेवढे पैसे त्या सोसायटीला द्यावे लागत होते. एखाद्याने ब्लॉक घेतला आणि तो 10 हजार रुपये एवढया भाडयाने दिला तर सोसायटीचे पदाधिकारी म्हणावयाचे की, सदस्य म्हणून तुम्ही त्यामध्ये कमाई करीत आहात त्यामुळे तुम्ही आम्हाला एका महिन्याच्या भाडयाचे अर्धे पैसे म्हणजे 5 हजार रुपये दिले पाहिजेत. अशा प्रकारे एक वेगळे आणि विचित्र असे अरेरावीचे वातावरण तयार झाले होते. स्वत:चा ब्लॉक दुसऱ्याला भाडयाने दिला, दुसऱ्याने तो ऑक्युपाय केला, भोगवटादार बदलला त्यामुळे त्यासंदर्भात त्याला जे काही उत्पन्न मिळते त्यातील काही रक्कम सोसायटीला मिळावी की मिळू नये याबाबतीत आपण अशी कायदेशीर तरतूद आणली की, सोसायटीला त्यासंदर्भामध्ये पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

मिळणे आवश्यक आहे. कारण त्यातून उत्पन्न निर्माण होते. ती रक्कम किती असावी यावर बंधन नसल्यामुळे अनेक ठिकाणी याबाबतीत मुंबईमध्ये जाच निर्माण झाल्यामुळे मी हे प्रकरण धसास लावले. ऑक्युपंसी चार्ज किती असावा यासंबंधी शासनाने पहिला निर्णय दिला की, हा चार्ज 10 टक्के असावा. महिन्याला जे बिल येते त्याच्या 10 टक्के असावा. मग हे प्रकरण कोर्टात गेले. उच्च न्यायालयाच्या संपूर्ण न्याय प्रक्रियेतून बाहेर पडत असताना एक निर्णय चांगला आला की, "Occupancy charge will be taken at one time but it will not exceed more than...." ऑक्युपंसी चार्जेस कशाचे देतो ते महत्वाचे आहे. तुमचे जे सेवाशुल्क असेल त्यापेक्षा ते जास्त असता कामा नये अशा प्रकारचा निर्णय आला. त्यामुळे संपूर्ण मुंबईमध्ये या निर्णयामुळे भाडयाने दिलेल्या ब्लॉकमधून सोसायटीला किती उत्पन्न मिळावे हा प्रश्न निकाली निघाला. त्याच पध्दतीचे हे विधेयक मी या ठिकाणी आणलेले आहे. या विधेयकामध्ये मी असे म्हटले आहे की, एखाद्या सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये विविध अशा क्षेत्रफळाच्या जागा असतात. कोणाची 550 चौरस फूट जागा असते. कोणाची 750 चौरस फूट जागा असते. कोणाची एक हजार चौरस फूट जागा असते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

कोणाचे क्षेत्रफळ 450 चौ.फू.असते. त्या सोसायटीमध्ये त्या भोगवटदाराला महापालिकेच्यावतीने जो कर लावला जातो तो कर त्या जागेच्या क्षेत्रफळानुसार असतो आणि मग तुमच्या कायद्यामध्ये अशी तरतूद केलेली आहे की, सिंकिंग फंड आहे तो कसा असावा तर तो सरसकट नसावा. त्या जागेच्या क्षेत्रफळाप्रमाणे आणि जागेच्या किंमतीप्रमाणे काही टक्क्याप्रमाणे असावा, त्यासाठी काही सूत्र दिलेले आहे त्याप्रमाणे असावा. याचा अर्थ स्पष्ट आहे की, ज्या गृहनिर्माण सोसायटीत त्याची जेवढी जागा असेल त्याप्रमाणे त्याला कर द्यावे लागतील. त्याप्रमाणे त्याला सोसायटीचा सिंकिंग फंड द्यावा लागेल. कायद्यामध्ये ते स्पष्ट करुन त्या त्या भोगवटदाराला त्याच्या क्षेत्रफळाप्रमाणे न्याय दिलेला आहे. मग हाच न्याय सोसायटीच्या प्रत्येक बिलात असावयास पाहिजे अशा कायद्यातील तरतुदीसंबंधी हे बिल आणले आहे. सोसायटीचा कर महापालिकेने ठरविलेला आहे. सिंकिंग फंड हा सहकारी कायद्याप्रमाणे ठरवून दिलेला आहे. तो त्याच्या जागेच्या किंमतीच्या प्रमाणामध्ये व आकारमानाप्रमाणे आहे. त्या सोसायटीत इतर सेवा सुध्दा आहेत मग ती विद्युत सेवा, पाणीपुरवठयाची सेवा, सामायिक विद्युत सेवा, वॉचमनचा खर्च असे इतर खर्च असतात ते त्यामध्ये अंतभूर्त आहेत. त्या गृहनिर्माण संस्थेमध्ये जे कर येतात त्याला आपण आपल्या सहकार कायद्याच्या भाषेमध्ये सेवा आकार म्हटलेले आहे आणि हे सेवा आकार त्या त्या जागेच्या त्या प्रमाणामध्ये असावेत असा कायदा करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. सोसायटीच्या जागेच्या आणि किंमतीच्या प्रमाणामध्ये महापालिकेचा कर असतो. महानगरपालिकेचा सिंकिंग फंड असतो, इतर कर असतात यासाठी कायदा आणत असताना त्याला कायद्याचा सुध्दा आधार आहे म्हणून मी हे विधेयक आणले आहे. मुंबई महानगरपालिकेच्यावतीने केवळ कर वसूल केला जात नाही तर त्यात पाणीपट्टी वसूल केली जाते, मुंबई महानगरपालिकेच्यावतीने केवळ पाणीपट्टी वसूल केली जात नाही तर त्यात मलनिस्सारणाचा कर सुध्दा वसूल केला जातो. पूर्वी मुंबईमध्ये सिव्हरेज टॅक्स आणि सिव्हरेज बेनिफिट टॅक्स वसूल केला जात असे. हा कर जागतिक बँकेच्या कर्जातून सुरु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

झाला. मलनिस्सारणाच्या सेवा आहेत त्याच्यातून सिव्हरेज बेनिफिट टॅक्स आणि सिव्हरेज टॅक्स असा दुप्पट टॅक्स वसूल केला जात होता. त्याच्यातून मुंबई महानगरपालिका 2 हजार कोटी रुपयांचा कर वसूल करीत आहे असे मी त्यावेळी नगरविकास खात्याच्या मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यांनी हा कर मागे घेतला. मुंबईमध्ये पाणीपट्टीची बिले दोन प्रकारे आकारली जातात. पाण्याचे बिल आणि पाण्याचा कर अशी पध्दती आहे. या पाण्याच्या बिलामध्येही मलनिस्सारणाचा कर वसूल केला जात होता. त्यावेळी एखादा सूज्ञ नागरिक हायकोर्टामध्ये गेला असता तर मुंबईच्या नागरिकांकडून हजारो कोटी रुपये परत द्यावे लागले असते तर मुंबई महापालिकेच्या नाकी नऊ आले असते. परंतु त्यावेळच्या मंत्रिमहोदयांनी मी उपस्थित केलेला मुद्दा मान्य केला व हा कर रद्द केला होता आणि मी त्यांचे आभारही मानले होते. मी त्यावेळच्या मुंबई महानगरपालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणले होते परंतु ते त्याला तयार नव्हते. परंतु येथून आदेश गेल्यावर त्यांनी ते केले. सभापती महोदय, या विधेयकामध्ये असलेली तरतूद स्पष्ट आहे ती तरतूद वाचण्यापूर्वी मी एक बाब आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. कारण तेथे बसलेले अधिकारी बरोबर शब्दामध्ये पकडतील आणि तेथून चिठ्ठी पाठवतील. मुंबई महानगरपालिकेचे भाडेकरु हा विषय आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

मुंबई महानगरपलिकेच्या हद्दीतील कोणत्याही गृहनिर्माण सोसायटीची कर रचना करीत असताना पहिल्यांदा गाळ्याचे भाडे ठरविले जाते आणि त्यानंतर कर आकारला जातो. मुंबई महानगरपालिका त्या त्या विभागाप्रमाणे जागेचे भाडे ठरविते. कायद्यातील तरतुदीप्रमाणे हे भाडे ठरविले जाते आणि त्यानंतर त्यावर कर आकारणी केली जाते. भोगवटदार हा भाडेकरु अशी कायद्यातील तरतूद आहे. म्हणून मी सुरुवातीलाच सांगितले की, मा. मंत्री महोदयांना अधिकारी असे मार्गदर्शन करतील की भोगवटदार हा भाडेकरु असे कायद्यामध्ये म्हटलेले आहे. मूळ कायद्याच्या तरतुदीनुसार गृहनिर्माण सोसायट्यांची कर आकारणी करीत असताना पहिल्यांदा भाडे निश्चित केले जाते आणि त्यानंतर कर आकरणी होते. जेव्हा महानगरपालिकेकडे आपण विविध करासंबंधी विचारणा करतो त्यावेळी ॲब्स्ट्रॅक्ट मागतो. परंतु त्या ॲब्स्ट्रॅक्टमध्ये कर येत नाही तर त्या इमारतीमध्ये किती गाळे आहेत किती चौ.फुटाचे आहेत, त्यांचे भाडे किती आहे याची माहिती दर्शविणारा ॲब्स्ट्रॅक्ट मिळतो. मग आपण अधिका-यांना ॲब्स्ट्रॅक्ट प्रमाणे वर्कआऊट करायला सांगतो आणि त्याप्रमाणे कर भरला जातो. भोगवटदार, भाडेकरुला त्या त्या चौ.फुटाप्रमाणे भाडे लावले जाते. म्हणून त्याबाबतीत ॲब्स्ट्रॅक्ट काढला जातो. महानगरपालिकेच्या कायद्यातील कलम 173 (अ)मध्ये तरतूद आहे... मी पाण्याच्या बिलाच्या संदर्भात बोलतो. जे करपात्र मूल्य असते ते त्या जागेच्या चौ.फुटाप्रमाणे असते. सिंकिंग फंड त्या जागेच्या किंमती प्रमाणे असतो. याचा अर्थ तो चौ.फुटाप्रमाणे असतो. पाण्याची आकारणीसुध्दा महानगरपालिकेकडून घेतली जाते. यासंदर्भात कलम 173(अ) मध्ये असे म्हटलेले आहे की, ज्या जागेस मापयंत्रणेने पाणी पुरवठा होतो, - मुंबई आणि ठाणे शहरातील सर्वात जुन्या इमारती वगळल्या, 1940 पूर्वीच्या इमारती सोडल्या तर सर्वच इमारतींना हे मापयंत्र लावलेले आहे. आता शेतक-यांना सुध्दा या मापयंत्रातून पाणी देण्यात येणार आहे. ".. ज्या जागेस मापयंत्राणे पाणी पुरविण्यात येते त्या जागेत एका पेक्षा अधिक गाळे असतील आणि त्यास सामाईक मापयंत्राणे पाणी पुरविण्यात येत असेल - सोसायट्यांना सामाईक मापयंत्र लावलेले असते- जर पुरविलेल्या पाण्याच्या संबंधात पाणी पट्टी उक्त जागेच्या मालकाकडून किंवा त्याच्यावतीने काम करणा-या कोणत्याही व्यक्तीकडून -येथे सहकारी संस्था अभिप्रेत आहे- आयुक्तांना देण्यात येत असेल व अशा मालकास गाळयाचा भोगवट करणा-या व्यक्तीकडून उक्त आकारणी सामाईक मापयंत्रणेने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु...)

ज्या मुदतीसाठी पाणी पुरविण्यात आले असेल त्या मुदतीत भाड्याने दिलेल्या अशा गाळयाच्या भाड्याच्या रकमेच्या प्रमाणात - "भाड्याच्या रकमेच्या प्रमाणात" हे शब्द महत्वाचे आहेत. म्हणजे त्या जागेची जी रेटेबल व्हल्यू आहे त्या प्रमाणात- अशा पाण्याच्या बिलाच्या आकाराची रक्कम यथाप्रमाण वसूल करण्याचा हक्क असेल. अशा प्रकारची स्पष्ट तरतूद महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मलनिस्सारणाच्या बाबतीत सुध्दा 173 (ब) असे म्हणतो की, जागांच्या मालकांकडून अथवा त्याच्या वतीने काम करणा-या कोणत्याही व्यक्तीकडून जागांच्या बाबतीत मलप्रवाह कराऐवजी मलप्रवाह आकार वसूल करण्यात आला असेल अशा मालकाला अशा आकाराची रक्कम अशा गाळयापैकी प्रत्येक गाळा ज्या भाडयावर देण्यात आल्या असेल, त्या भाडयाच्या प्रमाणात गाळयाच्या भोगवटादाराकडून यथाप्रमाण वसूल करण्यात यावा. याचा अर्थ या दोन्ही कायद्यात स्पष्ट म्हटले आहे की, भोगवटादाराकडे त्याच्या भाडयाच्या प्रमाणात म्हणजेच त्याच्या रिटेबल व्हल्यूप्रमाणे, आणि येणा-या कराच्या प्रमाणामध्ये त्या व्यक्तीकडून पाण्याचा आणि मलनिस्सारणाचा आकार घेण्यात यावा. त्या इमारतीमध्ये ओव्हर टँक आहेत. पाणी वरुन खाली येते. त्या इमारतीमध्ये जर व्यापारी गाळे असतील तर सभापती महोदय, मुंबई महानगपालिकेच्या वतीने व्यापारी गाळयाच्या खालच्या बाजूला वेगळे असे कमर्शियल मीटर लावले जाते. त्या इमारतीची दोन बिले येतात. पाण्याचा इंटेक एकच आहे. वरच्या टँक मधून आऊट-ले सामायिक आहे. परंतु त्या इमारतीमध्ये दोन बिले येतात. तेथे कमर्शियल मीटर मागतात. ज्या टाकीतून जेवढे पाणी गेले असेल तसे बील काढतात. मुंबई महानगरपालिकेने एखाद्या सोसायटीला पूर्ण पाणी आले तर तेथील पाण्याच्या मीटरवर जेवढे पाणी नोंदले गेले असेल त्याची नोंद आणि वरुन आलेल्या पाण्याच्या टाकीतून कमर्शियल मीटरप्रमाणे वापरण्यात आलेल्या पाण्याची नोंद घेण्यात येत असते. त्या इमारतीत रहाण्याकरिता 80 लिटरचे बील येते आणि 20 लिटरचे कमर्शियल बील येते. कमर्शियल बील आणि दुसरे बील आल्यानंतर त्याचा वापर त्या त्या विभागाप्रमाणे करावयास पाहिजे अशी कायद्यात तरतूद आहे. सभापती महोदय, करपात्र मूल्य प्रथम ठरविले जाते. जागेच्या आकारमानाप्रमाणे भाडे ठरविले जाते. भाडे ठरविल्यानंतर महानगरपालिका करपात्र मूल्य ठरवित असते. मुंबई महानगपालिकेचाच कायदा आपल्याकडे लागू आहे. करपात्र मूल्य ठरविल्यानंतर त्याचा कर ठरविला जात असतो. ज्याचा गाळा 700 फूट आहे,त्याला जास्त, ज्याचा 500 फूट आहे त्याला थाडा कमी, 400 फूट आहे त्याच्याहून कमी असा सहकार कायद्याप्रमाणे सिकींग फंड घेतला जातो. ही सगळी तरतूद करासाठी आहे. ही सगळी तरतूद पाण्यासाठी आहे. ही सगळी तरतूद मलनिस्सारणाकरिता आहे. त्या इमारतीमध्ये रहाणारा जो भोगवटादार आहे त्याला इतर ज्या सेवा आहेत त्या सेवेचा लाभ त्यालाही मिळाला पाहिजे अशा प्रकारचा बदल करण्यासंदर्भातील हे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. मी सहकार मंत्री असताना अशा प्रकारचे विधेयक आणण्याचा प्रयत्न केला. मला सहकार मंत्री पदाचा कार्यभार सांभाळण्यासाठी साडेचार महिन्यांचाच कालावधी मिळाला. एखादे शासकीय विधेयक सभागृहात आणावयाचे असेल त्यासाठी बरीच प्रक्रिया पार पाडावी लागते. यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी, संबंधित विभागाचे सचिव, विधी व न्याय या सर्वांना एकत्रित करुन त्यानंतर विधेयक सभागृहात आणणे शक्य होते. विधेयक सभागृहात आणेपर्यन्त माणूस मेटाकुटीस येतो. मंत्री सुध्दा विधेयक सभागृहात आणताना नेटाकोटीस येत असतात. या ठिकाणी मंत्र्यांना अत्यंत जबाबदारीने सांगावे लागते मी ही गोष्ट करीन. मी 2001 साली या ठिकाणी करपात्र इमारतींच्या पुर्नबांधणी संदर्भात एक अशासकीय विधेयक आणले होते.या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय मंत्र्यांनी मला शब्द दिला होता. त्या प्रमाणे मंत्र्यांनी बैठक घेतली. त्यासंदर्भात आदेश दिले गेले होते. आज 2005 हे वर्ष सुरु आहे. अजूनही ते विधेयक या सभागृहात मांडले गेलेले नाही. काल माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, हा विषय मी मंत्री मंडळापुढे आणतो आणि अधिवेशन झाल्यानंतर त्या अनुषंगाने जी.आर. काढू. निर्णय घेतलेला असताना, निर्धार व्यक्त केलेला असताना यासंदर्भात काही करता येत नाही. या विषयाचे विधेयक मला आणावयाचे आहे असे मी सहकार मंत्री असताना सचिवांना सांगितले. सचिवांनी मला सांगितले की, या सोसायटयांच्या भानगडीत आपण कशाला पडता. जर सहकारी सोसायटयांच्या भानगडीत पडावयाचे नसेल तर मग सहकार कायदाच रद्द करा असे मी त्यांना सांगितले. सहकारी संस्थांना आपल्या कायद्यामध्ये घेऊ नका. त्यांना घेतले नाही तर सहकारी संस्थांचा संबंधच येणार नाही. या सहकारी सोसायटया आहेत, त्यांचा कारभार सहकार कायद्यांतर्गत चालतो आहे, त्या सहकारी संस्थांमध्ये काही गैरप्रकार झाले तर आपले सहकार निंबंधक त्या ठिकाणी जातात. त्या सोसायटीची ते चौकशी करतात. एखादी तक्रार आली तर त्यांची आपण हिअरींग घेतो. या सर्व गोष्टी आपण करतो. त्या भोगवटादाराला पूर्ण अधिकार आणि संरक्षण सहकार कायद्याने दिले असेल तर त्याला कायदेशीर तरतूदी प्रमाणे संरक्षण देण्याची जबाबदारी ही सरकारची आहे. ती स्वीकारली पाहिजे असे मी सांगितले

यानंतर श्री. कानडे...

अशोधित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 11:20

श्री. दिवाकर रावते ..

हे सर्व कोण करीत बसणार असा प्रश्न निर्माण होतो. पण का नाही करणार? मी माझ्या सोसायटीमध्ये स्वत: करीत होतो. फक्त त्याच्यामध्ये गणिताचे मूळ आहे. म्हणून सोसायटीच्या कामकाजामध्ये बिले बनविताना किती त्रास होईल याची चिंता तुम्ही आणि मी का करायची ? सभापती महोदय, एखाद्या छोटया 500 फूटाच्या गाळयामध्ये 10 माणसे रहात आहेत आणि 700 फूटाच्या गाळयामध्ये 4 माणसे रहात आहेत . म्हणजे 10 माणसे जास्त पाणी वापरत नाहीत काय ? 500 फूटाच्या गाळयामध्ये एका कुटुंबातील 10 माणसे राहतात म्हणजे त्यांची गैरसोय काय आहे आणि एकाच कुटुंबातील चारच माणसे 700 फूटाच्या गाळयात रहात असतील तर त्यांची सोय काय आहे याचा जर विचार केला तर एक लक्झरी आहे आणि एक अगतिकता आहे. त्याला छोटया गाळयात राहण्याची हौस नाही. 1000 फूटाच्या गाळयामध्ये सर्व कुटुंब राहिले तर त्यालाही आनंद होईल. त्याच्या ऐपतीमध्ये बसत नाही म्हणून छोटा गाळा घेतो. तो किती पाणी वापरतो याचे प्रमाण महापालिकेने ठरवून दिलेले नाही. तो लिफ्ट जास्त वापरणार,पाणी जास्त वापरणार कर जास्त घेता का ? त्याच्याकडून कर आणि सिंकींगफंड जास्त घेत नाही. पाणीपट्टी जास्त घेत नाही. लक्झरी आणि अगतिकता याचा विचार केला तर जास्त कोण राहतो आणि कमी कोण राहतो यापेक्षा ज्याच्याकडे जास्त जागा आणि कमी माणसे आहेत ती त्याची लक्झरी आहे आणि कमी जागा आणि जास्त माणसे ही त्याची अगतिकता आहे. या सगळयांचा विचार करुन या कायद्यामध्ये तरतूदी व्हाव्यात याकरिता मी त्यावेळी जीआर काढला. जीआर छोटया सदनिकाधारकाला होणारा अन्याय दूर होण्याकरिता काढला. राज्य शासनाने सहकार विभाग आदेश क्रमांक समुयो-1096/137-14 दिनांक 26 मे,1999 रोजी निर्गमित करुन क्षेत्रफळाच्या संदर्भात सेवाकर आकारण्यात यावेत असे निर्देश दिले. युती शासन गेले दुसरे सरकार आले. कोणाला काय वाटले माहीत नाही आदेश रद्द केले. त्या आदेशाप्रमाणे कायदा आणून या सभागृहात मंजूर होण्याऐवजी तो आदेश रद्द केला. सातत्याने अशा प्रकारची कायद्यात तरतूद झाल्याशिवाय अंमलात येणार नाही. हा एकच कायद्याचा प्रश्न नाही. मुंबईमध्ये आणखी एक प्रकरण निर्माण झालेले आहे ते पार्किंगचे झालेले आहे. त्या संदर्भात कायदेशीर तरतूद नसल्यामुळे अनेक सोसायटयांमध्ये भांडणे होतात. त्यासंदर्भातील कायदा करावा लागेल जुन्या सोसायटयांकरिता करावा लागेल. कारण आता मुंबई शहरामध्ये कुठलाही नकाशा हा पार्किंगची व्यवस्था असल्याशिवाय मंजूरच होत नाही. एक तर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ..

नवीन इमारत ही पूर्ण पार्किंगची व्यवस्था असलेली असते. गाडया वर नेण्यापासून खाली तळमजल्यापर्यंत सर्व व्यवस्था असते. जुन्या इमारतींमध्ये या भानगडी आहेत. मी ज्यावेळेला परिवहन मंत्री होतो त्यावेळी अशा प्रकारचा कायदा आणण्याच्या खटपटीत होतो की मुंबई शहरामध्ये वाहन उभे करण्याची व्यवस्था असल्याशिवाय वाहन रजिस्टरच होणार नाही. मुंबईची परिस्थिती गंभीर आहे. ते खाते माझ्याकडून गेले आणि सहकार खाते आल्यामुळे तो कायदा करता करता राहून गेला. सुधारणा या समाजाकरिता असतात पक्षाच्या नसतात सत्तेच्या नसतात. तेथे कोण आहे हे पाहण्यापेक्षा सुधारणा योग्य असल्यास त्या करणे हे तुमचे आमचे आणि विधिमंडळाचे काम आहे. या भावनेतून मी पुन्हा एकदा अशा प्रकारची विनंती करणारे विधेयक मी येथे आणले आहे. त्याच्यातील कायदेशीर तरतुदी,कायदेशीर बाबी आणि भोगवटादारांची परिस्थिती याचे विश्लेषण करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मी शासनाला विनंती करतो की, हे विधेयक आपल्याला योग्य वाटेल तर मान्यता द्यावी अन्यथा याबाबतीत निश्चित धोरण काय करणार हे आपण जाहीर करावे अशी विनंती करतो आणि हे विधेयक मांडण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देतो .

जयहिंद,जयमहाराष्ट्र.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीय नोंद

प्रा.जोगेन्द्र कवाडे (नामनियुक्त) :सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 2004 चे वि.प.वि.क्रमांक 22 - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 यात आणखी सुधारणा करण्याकरिता जे अशासकीय विधेयक आणलेले आहे त्या संदर्भात माझे मनोगत व्यक्त करण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय,या विधेयकाचा उद्देश आणि कारणे यांचे निवेदन देत असतांना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी भूमिका मांडली आहे त्या भूमिकेशी माझ्या सहीत इतरही सन्माननीय सदस्य सहमत होतील असा मला विश्वास वाटतो. सदनिकांच्या बाबतीत लक्झुरीयस सदनिका आणि लहान सदनिका अशी विभागणी करणे आवश्यक आहे. काही लहान सदनिकांमध्ये गरज आहे म्हणून एकाच परिवारातील तीन चार कुटूंबे एकत्र राहतात. त्या ठिकाणी 8 ते 10 व्यक्ती एका लहान सदनिकेत राहत असतात.त्याच्या उलट एखाद्या मोठ्या सदनिकेत दोन ते तीन व्यक्ती राहत असतात. मोठया सदनिकाधारकाना जेवढे सेवा शुल्क आकारले जाते तेवढेच सेवा शुल्क लहान सदनिका धारकांना आकारले जाते.सभापती महोदय, इतर बाबतीत आपण समानतेचे तत्व वापरतो परंतु या ठिकाणी मात्र लहान सदनिका आणि मोठी सदनिका या दोन्हीसाठी सारखेच सेवा शुल्क आकारुन लहान सदनिकाधारकावर एक प्रकारे अन्याय केला जात असे मला वाटते.त्या अन्यायाची दखल घेऊन लहान सदनिकाधारकांसाठी सेवा शुल्काची आकारणी करीत असतांना जो अन्याय झाला आहे तो दूर व्हावा म्हणून शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाने आदेश क्रमाक समूयो 1096/प्र.क्र. 137/14, दिनांक 26 मे 1999 निर्गमित केला होता व क्षेत्रफळाच्या प्रमाणात सेवा शुल्क आकारण्यात यावा अशा प्रकारचे निर्देश सहकार व वस्त्रोद्योग विभागाने दिले होते. त्या निर्देशाची काही गृह निर्माण संस्थांनी तंतोतंत अंमलबजावणी केली आहे व त्या गृह निर्माण संस्थांचे मी अभिनंदन करतो.परंतु काही गृह निर्माण संस्था मोठया आहेत आणि धनदांडग्या आहेत त्या गृह निर्माण संस्थांनी मात्र या विभागाने काढलेले हे आदेश चुकीचे आहेत असे लबाडीचे कारण दाखवून हा आदेश रद्द करुन घेतला आहे. शासनामध्ये आणि मंत्रालयामध्ये जी एक लॉबी आहे ती लॉबी मोठया गृहनिर्माण संस्थांना संरक्षण देत असते असे मला वाटते. त्यामुळे जे गरजू आहेत आणि जे लहान सदनिकाधारक आहेत त्यांच्यावर अन्याय करण्यात आला आहे. एका लहान सदनिकेमध्ये अनेक जण आपल्या कुटुंब कबिल्यासह राहतात त्यांच्यावर मात्र ही बाब निश्चितपणे अन्यायकारक आहे.सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या कायद्यात सुधारणा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.कवाडे ...

करण्याकरता हे अशासकीय विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे . त्यांनी जरी अशासकीय विधेयक मांडलेले असले तरी त्या विधेयकाचे पुढे काय होते हे आपणा सर्वांना माहीत आहे.हे विधेयक मागे घेण्यात यावे याकरिता सन्माननीय मंत्रीमहोदय त्यांना विनंती करतील आणि त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे विधेयक मागे घेतील.मला या निमित्ताने शासनाला असे सांगावयाचे आहे की, या अशासकीय विधेयकाची दखल घेऊन शासनाने तसा आदेश काढावा आणि त्या आदेशानुसार कायद्यात तशा प्रकारची दुरुस्ती शासनाने स्वत: करावी. लहान सदनिकाधारकांसाठी सध्या जे सेवा शुल्क आकारले जाते ते योग्य प्रमाणात आकारले जावे आणि त्यांना परवडेल असे आकारले जावे यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 यामध्ये सुधारणा करुन गृहनिर्माण संस्थांनी क्षेत्रफळाच्या प्रमाणात सेवा शुल्क आकारण्याची तरतूद केली तर लहान सदनिका धारकांवर सध्या जो अन्याय सुरु आहे तो अन्याय निश्चितपणे दूर होण्यास मदत होईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे अशासकीय विधेयक मांडलेले आहे त्याचे मी स्वागत करतो आणि हे जरी अशासकीय विधेयक असले तरी शासनाने त्याची दखल घेऊन, त्याचा आदर करुन लहान सदनिकाधारकांना न्याय द्यावा अशी विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीरित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 22 - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, 2004 लहान सदनिका धारकांच्या सेवा सुविधांच्या बाबतीतील अडचणी संदर्भात मांडलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी या बाबतीत सूचना केल्या. धनदांडगे आणि सर्वसामान्य सदनिका धारक यांच्यामध्ये फरक करावा असे त्यांना सांगितले. अध्यक्ष महाराज, मुळात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी ज्या दोन तीन गोष्टी .. मालमत्ता कराच्या बाबतीत, पाणीपट्टीच्या बाबतीत किंवा सिवरेजच्या बाबतीतील असो, हे कर आपल्याला सेवा शुल्काशी निगडित करता येणार नाहीत असे सांगितले. अध्यक्ष महाराज, सेवा शुल्क म्हणजे सर्व्हिस चार्जेस.. संस्था ज्या ज्या गोष्टींची सेवा देत असते मग त्यात लिफ्टची सेवा असेल, पाण्याची सेवा असेल वा इतर विविध सेवा असतील, ज्या सेवा आपण वापरतो वा उपभोग घेतो त्याचे शुल्क संस्था आपल्या सदस्यांवर आकारते. ती आकारणी करताना गाळ्याच्या आकारमानाप्रमाणे, सदनिकेच्या साईजप्रमाणे केली जावी असे आपण सांगितले. पण तसे करणे बरोबर होणार नाही. आपणच येथे सांगितले की, एका एका सदनिकेमध्ये, गाळ्यामध्ये 10-10 जणांचे कुटुंब राहते तर काही ठिकाणी केवळ 2-3 जणांचेच कुटुंब राहते. आपल्या म्हणण्यानुसार सधन कुटुंबातील 2-3 लोकच तेथे राहत असतात याचाच अर्थ ते सेवा कमी वापरतात. असे असले तरी सहकारी संस्था सेवा शुल्काची आकारणी करताना सर्व सदस्यांना सारखी करीत असते. कारण त्या सगळ्याच सदस्यांना संस्थेकडून सारखीच सेवा दिली जाते आणि म्हणूनच त्यामध्ये फारसा बदल करणे सोयीचे होणार नाही असे मला वाटते. आपण सांगितले की, रेटेबल व्हॅल्यू नुसार सेवा शुल्क घ्यावे. परंतु रेटेबल व्हॅल्यू संबंधात अनेक वाद महापालिकेकडे आणि उच्च न्यायालयामध्ये देखील रिट पिटीशनद्वारे दाखल आहेत. शिवाय काही भागामध्ये ही रेटेबल व्हॅल्यू जास्त असते तर काही भागामध्ये ती कमी असते आणि त्यामुळेच त्या आधारावर आपण सेवा शुल्क आकारणी ठेवली आणि पुढे ते सेवा शुल्क वसूल झाले नाही तर ऑडिटला अडचण येईलच शिवाय सेवा देण्यामध्ये देखील अडचणी येऊ शकतात. तेव्हा सदनिका लहान असो वा मोठी, त्यात राहणारे संस्थेकडून देण्यात येणाऱ्या सेवांचा वापर सारखाच करीत असतात. मग ती लीगल मॅटरच्या बाबतीत असो वा इतर कोणत्याही बाबतीत असो. या सगळ्यांमध्येच अडचणीचे होईल. म्हणून माझी विनंती आहे की, आपण आपल्या काळामध्ये, 1999 मध्ये जो एक जीआर काढला

..... एस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दांडेगावकर .....

आहे. पण त्यानंतर त्या संबंधात अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे शासनाने विविध संस्थांची मते त्या संबंधात घेतली, महासंघाचेही मत घेण्यात आले आणि या सर्वच मंडळींनी सदनिकेच्या साईजनुसार सेवाकर लावण्यास विरोध दर्शविला आहे. त्यामुळे सरकारला देखील नंतर 2000 मध्ये हा जी.आर. परत घ्यावा लागला आणि पूर्वी प्रमाणेच सेवा शुल्क वसूल करावे असे आदेश काढावे लागले आहेत. तेव्हा आपण ज्या अडचणी येथे सांगितल्या आहेत त्या तशा बरोबर आहेत. आपण चुकीचे सांगत आहात असे मी म्हणत नाही, परंतु एखादा कायदा करताना त्यातून पुन्हा नवीन प्रश्न निर्माण होऊन लोकांना अडचणी निर्माण होऊ नयेत हेही पाहणे आवश्यक असते. म्हणून माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण हे विधेयक मागे घ्यावे. ....

(यानंतर श्री. जागडे .... टी 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मुंबई महानगरपालिकेची कार्यपध्दती माहिती करुन घेणे आवश्यक आहे. कर आकारणीच्या बाबतीत अनेक बाबी कोर्टात पडून आहेत, असे माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सरसकट विधान केले आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इछितो की, मी सदरहू कार्यालयात आठ वर्षे नोकरी केली आहे. त्यामुळे प्रलंबित बाबी कशा आहे, ती माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो. एखादा गाळा किंवा दुकान बँकेला दिल्यानंतर त्याचे 70 हजार रुपये भाडे आकारले जाते. आमचे ॲसेसमेंट डिपार्टमेंट 10 ते 15 टक्क्यानी टॅक्स वाढविते. तेव्हा अशा प्रकारच्या बाबी कोर्टात आहेत. निरनिराळ्या विभागात वेगवेगळे कर आहेत. मलबार हिल भागात वेगळा कर आहे, दादरला वेगळा कर आहे, मालाडला वेगळा कर आहे, पार्ल्याला वेगळा कर आहे, मुलूंडला वेगळा कर आहे. त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी कर आकारण्याची पध्दत वेगळी आहे. परंतु इमारतीला कर आकारताना तो चौरस फुटावर असतो. त्या इमारतीमध्ये असलेल्या चौरस मीटर गाळ्यावरच तो कर असतो. मुंबई महानगरपालिकेमध्ये नवा वाद निर्माण झाला आहे. असे आपणाला बरोबर वाटत असेल तर मी मा. मंत्रिमहोदयांच्या माहितीकरिता काही बाबी सांगत आहे. भाडे नियंत्रण कायद्याच्या दुरुस्तीबाबतचे प्रकरण सुप्रिम कोर्टात पडले आहे. त्याचा निर्णय अजून लागलेला नाही. भाडे नियंत्रण कायद्याप्रमाणे भाडेवाढ करण्याचा प्रयत्न मालकांच्या बाजुने झाला आहे. भाडेकरु विरुध्द मालक हा वाद सुप्रिम कोर्टात गेला आहे. सभागृहात जेव्हा हे विधेयक आले होते, त्यावेळी ही भाडेवाढ योग्य आहे की अयोग्य आहे, याची चर्चा झाली होती. वाद असा निर्माण करण्यात आला आहे की, उपनगरात राहणा-या सदनिका धारकांना 5 हजार रुपये भाडे द्यावे लागते. परंतु मुंबईतील भाडेकरुना 500 आणि 700 रुपये भाडे भरावे लागते. सभापती महोदय, 500 रुपये भरणारा भाडेकरु हा मुंबईत 100 वर्षे राहत आहेत. त्या इमारती 100 वर्षापूर्वीच्या आहेत. त्यामुळे तेथील भाडेकरुंना भाडे कमी आहे. आता उपनगरात पैशाच्या जोरावर मोठमोठ्या सदनिका काही लोकांना घेतलेल्या आहेत. त्यांना कर जादा द्यावा लागत असल्यामुळे हा वाद निर्माण झाला आहे. समान पातळीवर कर आणावा असा हा वाद आहे. उपनगर आणि शहर असा हा नवीन वाद आहे. तो विषय फार मोठ्या चर्चेचा आहे. त्या वादात आता मी जाऊ इच्छित नाही. म्हणून माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी जे काही सांगत आहेत, ते मला पटत नाही. मी मंत्री असताना या बाबत जी. आर. काढला होता, त्यावेळी फक्त फ्लॅट ओनर असोसिएशनचे प्रमुख श्री. सावंत माझ्याकडे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आले होते. त्यांनी मला असे सांगितले की, " यामुळे गोंधळ निर्माण होईल. याचे हिशेब कोण करणार? पाणीपट्टी जी येईल तिला सदनिकेने भागून सर्वांना पाणीपट्टी आकारण्याची जी पध्दत आहे, ती बरोबर आहे." सभापती महोदय, मी माझ्या भाषणात कायद्यातील तरतुदी मांडल्या होत्या. म्हणून प्रथम आपण मुंबई महानगरपालिकेच्या कायद्यात दुरुस्ती करा. पाणीपट्टी ही गाळ्याच्या सम प्रमाणात घेतली पाहिजे, असे दुरुस्ती प्रथम शासनाने करावी. कायद्याने हा अधिकार दिला आहे. म्हणून कायद्याची तरतूद नाकारणे संपूर्णपणे योग्य आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी जो एक उल्लेख केला आहे, त्या बाबत मा. मंत्रिमहोदयांनी काहीच सांगितले नाही. सिंकींग फंड हा त्या जागेच्या मुल्यावर आधारीत असतो. आता जागेचे मुल्य हे क्षेत्रफळावर ठरविले जाते. असे असेल तर गाळ्याच्या सम प्रमाणात हा लावला जात नाही ? तेव्हा इमारतीची दुरुस्ती करावयाची ही देखील एक सेवाच आहे. म्हणून सेवाआकाराची डेफीनेशन शासनाने जाहीर करावी. सेवा आकारामध्ये दुरुस्तीचाही अंतर्भाव असतो.इमारत दुरुस्त करावयाची असेल, इमारतीला प्लॅस्टर करावयाचे असेल, एखादी भिंत घालावयाची असेल तर त्या दुरुस्तीसाठी जो खर्च येत असतो, तो महिन्याच्या बिलातून सदनिका धारकांकडून वसूल केला जातो.

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

तो सेवा आकार, सिंकिंग फंड त्या इमारतीच्या भविष्यातील डागडुजीकरिता असेल तर तो फंड वापरतांना सहनिबंधकांची परवानगी घ्यावी लागते. आणि मग सहनिबंधक तो सिकिंग फंड किती टक्के वापरावयाचा याबात परवानगी देतो. या सिकींग फंडाच्या बाबतीत सुध्दा तुम्हाला पुन्हा सुधारीत कायदा करावा लागेल. त्या बाबत मी सुधारणा आणण्यापेक्षा आपण जर आणली तर ती फार मोलाची ठरेल. मी माझ्या इमारतीत 30 वर्षापासून रहातो, माझा सिकींग फंड 160 रुपये आहे. संपूर्ण इमारतीचा सिकींग फंड महिन्याला 5 ते 6 हजार रुपये जमा होतो. 12 मजल्याच्या इमारतीची दुरुस्ती हाती घेतली तर ती लाखाच्या घरात जाते. तुम्ही कॉंट्रॅक्टरला काम दिल्यानंतर त्याच्या किंमतीमध्ये नंतर दहा-दहा टक्के वाढ होत जाते, त्या पध्दतीने या सिकींग फंडच्या कायद्यात कुठे तरी बदल करणे आवश्यक आहे. नाही तर भविष्यात त्या इमारतीची डागडुजी कधीच होणार नाही. त्या सोसायटीत नेहमी भांडणे होत रहातील. सिकींग फंडासाठी कायदा आहे, पाणी पट्टीसाठी कायदा आहे. तर मग आपण सेवा शुल्क कशासाठी डिस्ट्रीब्युट करता? याबाबत कुणाचीही तक्रार आलेली नाही याची मला 100 टक्के माहिती आहे. त्यांनी हे रद्द करा सांगितल्यानंतर रद्द केले. ते प.बा.सामंत कोण आहेत हे मला माहीत आहे. त्यांचे त्या क्षेत्रातील काम मोठे आहे, मी त्यांना मानतो. त्यांचे वर वजन आहे. आणि म्हणून कायद्याने सांगितल्याशिवाय काही होत नाही. सेवा शुल्कापेक्षा ऑक्युपेन्सी चार्जेसबाबत असाच वाद होता, प.बा. सामंत यांचा सुध्दा वाद होता. त्या बाबत मुंबई शहरासाठी कायदा केल्यानंतर हे सर्व वाद मिटले. त्यामुळे फ्लॅट ओनर्स असोसिएशनला काही काम राहिले नाही. या असोसिएशनकडे सर्व सोसायटयांच्या तक्रारी असायच्या. परंतु आपण कायदा केल्यानंतर असोसिएशनची सर्व कामे संपली. आपल्या एवढया मोठया असोसिएशनकडे हा कायदा केल्यानंतर काहीच काम रहाणार नाही. आपण मला पुन्हा विनंती केली आहे. तरीसुध्दा या कायद्याचे एवढे विवेचन केल्यानंतर आपण या बाबत गांभीर्याने विचार करावा आणि मुंबईतील सदनिकांच्या बाबतीत सर्व सामान्यांना आपण न्याय द्यावा अशा प्रकारची मी विनंती करतो.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रावते साहेब असे म्हणाले की, मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत सर्व कायदे मला माहीत नसतील. निश्चितपणे मलाच नाही तर वकिलांना सुध्दा सगळे कायदे माहीत नसतात हे सभागृहाला ज्ञात आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर...

मी 40 रिट पिटीशनबाबत बोललो. आपल्या भाषणात ऑक्युपन्सी चार्जेसबाबत जो निर्णय घेतल्याचे सदस्यांनी सांगितले. त्या अनुषंगाने 40 रिट पिटीशन दाखल झाले आहेत असे मी बोललो होतो. तेवढा फक्त खुलासा करावयाचा होता. आपण सिंकींग फंडाच्या बाबतीत म्हणालात. त्याबाबत आपण स्वत: व आणखी अनुभवी माननीय सदस्यांची एक वेगळी बैठक घेऊ व त्यांना न्याय देऊ.

श्री. दिवाकर रावते : याही बाबतीत आपण बैठक घ्यावी.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : होय, याही बाबतीत बैठक घेऊ. शेवटी आपण या ठिकाणी लोकांना न्याय देण्यासाठी बसलेलो आहोत. कायदा बदलण्याचा कंटाळा आहे, सेक्रेटरी ऐकणार नाहीत, फार मोठे प्रोसिजर करावे लागते अशातला भाग नाही.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी अशी विनंती आहे की, मुंबईतील जनतेबाबत पोट तिडिकीने या ठिकाणी हे विधेयक मांडले आहे. तेव्हा या बाबत आपण याच अधिवेशन काळात बैठक घ्यावी. आणि आवश्यक असेल तर त्याबाबत जी.आर. काढावा.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : याच अधिवेशन काळात बैठक घेऊ व त्या नंतर आपण त्या संबंधीचा निर्णय घेऊ.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला हे विधेयज परत घेज्यासाठी सभाजृहा-ी अ-ुमती द्यावी.

विधेयज सभाजृहाच्या अ-ुमती-ी परत घेज्यात आले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 12 व सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 12 बाबत

तालिका सभापती (श्री.अनंत तरे) : आजच्या कामकाजपत्रिकेवरील अनु.क्र.3 "सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 12 - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, 2003 - प्रा.शरद पाटील, वि.प.स.यांचे." तसेच अनु.क्र.4 "सन 2004 चे वि.प.वि.क्रमांक 12 - अन्न भेसळ प्रतिबंध (महाराष्ट्र दुसरी सुधारणा) विधेयक, 2004 - श्री.अनंत तरे, वि.प.स. यांचे आहे. सदरहू दोन्ही विधेयके शुक्रवारी होणा-या अशासकीय कामकाजामध्ये प्राधान्याने घेण्यात येतील.

. . . .व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. IX OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA HOUSING AND AREA DEVELOPMENT ACT, 1976).

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, मघाशी मला सभागृहामध्ये येण्यासाठी दोन-तीन मिनिटांचा उशीर झाला. तरीही आपण मला याठिकाणी अशासकीय विधेयक मांडण्यास परवानगी दिली आहे, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री.अनंत तरे) : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 9 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

तालिका सभापती : आता सभागृहाच्या सकाळच्या सत्रातील बैठक स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा सुरु होईल.

(यानंतर सभागृहाची बैठक 11 वाजून 47 मिनिटांनी स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा.सभापती)

पृ.शी.व मु.शी. : तोंडी उत्तरे.

श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक 2013.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाशी संबंधित असेलेले कॅबिनेट मंत्री आणि राज्य मंत्री महोदय उपस्थित नाहीत. असे नेहमीच प्रकार होत आहेत.

(मा.मंत्री श्री.गणेश नाईक सभागृहात प्रवेश करतात.)

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, खालच्या सभागृहामध्ये माझ्या विभागाचा प्रश्न शेवटी चर्चेला आल्यामुळे आणि राज्य मंत्रीमहोदय दौऱ्यावर गेले असल्यामुळे मला येथे येण्यास उशीर झाला, त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो.

सभापती : ठीक आहे.

--

उल्हास□जर (जि.ठाजे) येथे राज्य उत्पाद□ शुल्ज विभाजा□ धाडी टाजू□ जप्त जेलेला ब□ावट विदेशी दारुचा साठा

(1) * 2013 श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्री. सुधाज र जजजजे , श्री. ध□जी साठे , श्रीमती सुधा जोशी , श्री. यशवंतराव जडाज : स-मा-न-नीय राज्य उत्पादन शुल□ मंत्री पुढील □ोष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) ठाजे जिल्ह्यातील उल्हास□जरमध्ये दि. 3-7-2004 रोजी राज्य उत्पाद□ शुल्ज विभाजा□ दो□ ठिजाजच्या जोदामावर धाडी टाजू□ ब□ावट विदेशी दारुचा साठा जप्त जेला हे जरे आहे जाय,

(2) असल्यास, सदर प्रजरजी चौजशी जरज्यात आली आहे जाय,

(3) असल्यास, चौजशीचा तपशील जाय व तद्□ुसार दोषींवर जोजती जारवाई जरज्यात आली,

(4) □सल्यास, होत असलेल्या विलंबाची जारजे जाय आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2013 (पुढे चालू....

श्री.ज्जेश □ाईज : (1) होय, तथापि, राज्य उत्पाद□ शुल्ज विभाजा□ दि.3.7.2004 ऐवजी दि.1.7.2004 रोजी उल्हास□जर ॅम्प-1 परिसरात ब□ावट विदेशी मद्य ब□विज्याच्या ज्ारजा□यावर छापा टाजू□ ब□ावट विदेशी मद्याचा साठा जप्त ज्ेला.

(2) होय.

(3) सदर प्रज्रजात ती□ ठिज्ाजी छापा टाज्ज्यात आला असू□ त्यात एज्ूज रु.1,92,159/- जिंमतीचा मुद्देमाल जप्त ज्रज्यात आला व चार आरोपीं□ा अटज ज्रज्यात आले आहे. सदर आरोपी विरुध्द मुंबई दारुबंदी ज्ायदा 1949 चे ज्लम 65 (ज्) (ई) (फ), 66 (1) ब, 81, 83, 90, 108 तसेच 11, 12, 13 अ□ये जु□हा क्र.92/2004 प्रमाजे जु□हा □ोंदविज्यात आला आहे. सदर प्रज्रजातील दोषारोप पत्र दि□ांज 16.3.2005 रोजी मुरबाड ज्ोर्टात सी.सी.क्र.54/2005 अ□ये दाजल ज्रज्यात आला असू□ प्रज्रज □ायप्रविष्ठ आहे.

(4) चौज्शी ज्रज्यात आली असू□ प्रज्रज □ायप्रविष्ठ आहे.

श्री.संजय दत्त : या ठिकाणी बनावट विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. अशाप्रकारे शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडतो. या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली आणि त्यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला. अशाप्रकारे प्रत्येक वेळेला शासनातर्फे सांगण्यात येते. नंतर आरोपी पुन्हा जामिनावर सुटतात आणि पुन्हा अशाप्रकारचे धंदे चालू ठेवतात. हे धंदे कायमस्वरुपी बंद करण्यासाठी शासन काही ठोस उपाययोजना करणार आहे काय ? दुसरे असे की, असे प्रकार वारंवार घडू नये म्हणून शासनाने कोणती प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे ?

श्री.गणेश नाईक : धाडी टाकून बनावट विदेशी दारुचा साठा जप्त केलेला आहे. दारुचा साठा करणाऱ्यांवर कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. त्यांच्या विरूध्द मुरबाड कोर्टामध्ये केस दाखल करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासन या प्रकरणी कारवाई करण्यामध्ये कमी पडलेले आहे अशी परिस्थिती नाही.

श्री.रामनाथ मोते : या प्रकरणी आरोपींना पकडलेले आहे. उल्हासनगरच्या परिसरामध्ये ही घटना घडलेली आहे, असे असतांना या प्रकणात उल्हासनगर न्यायालयात केस दाखल करण्याऐवजी मुरबाड येथील न्यायालयात कशी दाखल केली ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KGS/ MAP/ MHM/

ता.प्र. 2013 (पुढें चालू...

श्री.गणेश नाईक : बातमीदारांनी अशी बाब निदर्शनास आणली की, हॉटेल सारिका येथे दारु घेऊन लोक येणार आहेत. त्याप्रमाणे मुरबाड येथील आमच्या अधिकाऱ्यांनी जाऊन श्री.शहा यांची स्कूटर आणि दारु पकडली, म्हणून मुरबाड कोर्टामध्ये केस नोंदविलेली आहे.

श्रीमती सुधा जोशी : कोणतीही घटना घडल्यानंतर पोलीस यंत्रणा ही खडबडून जागी होते. मुंबईत विषारी दारू पिऊन लोक मृत्यूमुखी पडल्यानंतर धाडीचे सत्र सुरू झाले. अवैध दारुच्या विक्रीच्याबाबतीत 19 डिसेंबर 1995 आणि 21 मार्च 2000 रोजी या विषयीचा प्रश्न चर्चिला गेलेला होता. या संबंधाने चर्चा झालेल्या आहेत. तरी देखील पुन्हा पुन्हा या गोष्टी वारंवार घडतात. मी मंत्री महोदयांना विचारु इच्छिते की, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विचारल्याप्रमाणे अशा घटना वारंवार घडू नयेत म्हणून कायमस्वरुपामध्ये शासन कोणती उपाययोजना करत आहे ? ही बनावट दारू बनविलेली आहे, त्यामध्ये कोणती रसायने वापरली जातात याची मला कल्पना नाही. तेव्हा त्यामध्ये कोणती रसायने वापण्यात आलेली आहेत, सदर रसायने पोलिसांनी जप्त केलेली आहेत काय, असल्यास, ती कोठून आणलेली आहेत ?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच ही रसायने ज्यांच्याकडून आणलेली आहेत ती बेकायदेशीर आणण्यात आल्यामुळे सप्लायवर कोणती कारवाई केली गेली ?

श्री. गणेश नाईक : सन्माननीय सदस्यांनी मुंबईतील विषारी दारुचा हवाला दिला तसेच एकूणच गावठी दारुच्या होणाऱ्या दुष्परिणामांबाबत त्यांनी सांगितले. कायद्यामध्ये पूर्वी विषारी दारु किंवा गावठी दारु विकणाऱ्याच्या बाबतीत आणि उत्पादित करणाऱ्याच्या बाबतीत बेलेबल ऑफेंस असावयाचा. भविष्य काळात अशाप्रकारे विक्री करणे, वाहतूक करणे, उत्पादित करणे हा नॉन बेलेबल ऑफेंस करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे. लवकरच याबाबतीत बदल केला जाईल. सभापती महोदय, गावठी दारु बनविण्याकरिता गूळ, नवसागर वापरतात आणि मिथेनॉल नंतर ॲड केले जाते. एवढी माहिती आमच्याकडे आहे. यापेक्षा अधिक माहिती पाहिजे असेल तर पटलावर ठेऊ.

श्री. जयंत प्र. पाटील : या बेकायदेशीर कारखान्याचा मालक कोण होता आणि या मालकाविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली ? या मालकाविरुध्द आधी असे गुन्हे दाखल झाले होते काय ?

श्री. गणेश नाईक : या ठिकाणी श्री. मुन्ना दिनानाथ तुराह यांना बनावट विदेशी मद्याच्या बाटल्या आत मशीनवर सिलबंद करताना अटक करण्यात आली. त्याच्या अनुषंगाने केस दाखल करण्यात आली आहे आणि विहित कालखंडामध्ये त्या अनुषंगाने त्या ठिकाणी पुरावे...

श्री. जयंत प्र. पाटील : कोणाला अटक केली हे मी विचारले नाही. त्या बेकायदेशीर कारखान्याचा मालक कोण होता ? अटक केलेले कोणी तरी नोकर असतात. कोणाला तरी अटक होते. त्या कारखान्याचा मालक कोण होता ?

श्री. गणेश नाईक : या गुन्हयातील मुख्य आरोपी श्री. तुलसी हिरांनद येलानी, राहणार उल्हासनगर, यांच्याकडे धाड टाकली व त्या ठिकाणी बनावट माल मिळाला. त्या अनुषंगाने श्री. लक्ष्मण महाराज प्रसाद व श्री. मुन्ना दिनानाथ तुराह या दोन लोकांना अटक करण्यात आली आहे.

ॲड. अनिल परब : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, आतापर्यन्त जे गुन्हे दाखल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केले जात होते ते बेलेबल ऑफेंस होते आणि याच्या पुढे त्यामध्ये बदल करुन हे नॉन बेलेबल ऑफेंस करणार आहेत. हे नॉन बेलेबल ऑफेंस केले तरी ते मॅजिस्ट्रट कोर्टातून ताबडतोब सुटण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे सेशन कमिटेड ऑफेंस तयार करणार का ? की, जेणेकरुन कायद्याच्या बाबतीत जरब बसेल ?

श्री. गणेश नाईक : जास्तीत जास्त सजा कशी करता येईल याबाबत विधी व न्याय विभागाकडून माहिती मागविण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : विदेशी दारुचा साठा जास्त प्रमाणात जमा करुन शासनाने लाखो रुपयांचे नुकसान होत असून अशा प्रकारचे नुकसान होऊ नये याकरिता उत्पादन शुल्क खात्याने कायम स्वरुपी काय उपाययोजना केली आहे वा करण्यात येणार आहे ?

श्री. गणेश नाईक : कस्टम विभागाकडे एक पध्दत आहे की, एखाद्या घटकाने जर एखादा परदेशातून आणलेला एखादा माल कस्टम डयुटी न भरता बाहेर नेला आणि तो पकडला तर त्याला साधारणपणे त्या वस्तूच्या किंमतीच्या रकमेच्या 20 टक्के रक्कम दिली जाते. तशा प्रकारे हे देशी, विदेशी दारु जे घटक पकडतील त्यांना सुध्दा अवॉर्ड देण्याचे शासनाच्या मनामध्ये आहे.

श्री. संजय दत्त : ठाणे जिल्हयात विदेशी दारु विक्रीचे एकूण किती परवाने दिले आहेत व त्याव्दारे मद्य विक्रीतून एकूण किती उत्पादन शुल्क राज्याला मिळते याची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री. गणेश नाईक : ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : हा जो प्रश्न या ठिकाणी उत्तरीत झाला अशाच प्रकारचे अनेक प्रश्न या सभागृहामध्ये नेहमी येतात आणि प्रत्येक वेळी त्याच ढाच्याचे उत्तर दिले जाते. त्यामध्ये धाड टाकली आहे, आरोपी पकडले आहेत, इतके हजार रुपयांची, इतक्या लाख रुपयांची दारु जप्त केली आहे, यासंबंधी कोर्टात केस दाखल केली आहे, असे उत्तर दिले जाते. ते कोर्टातून परत येतात आणि परत धंदा सुरु करतात. त्याला यांच्या खात्याचा आशीर्वाद मिळतो अशी आजपर्यन्तची परिस्थिती आहे. असे जे दारुचे गुत्ते किंवा धंदे असतात ते संपूर्ण नष्ट करण्यासाठी या व्यतिरिकत या लोकांची नावे वर्तमानपत्रातून छापून

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2013.... श्री.मधुकर सरपोतदार....

हे लोक अशा अवैध दारुच्या धंद्यामध्ये गुंतलेले आहेत, त्यांची नावे छापून त्यांच्याशी कोणताही व्यवहार करु नये अशाप्रकारच्या माणसांकडे समाजकंटक म्हणून पाहण्याची शासनाची भूमिका आहे काय आणि त्यांना आपल्या खात्यातर्फे ब्लॅक लिस्टेड करुन त्यांचे फोटो जनतेसमोर आणून ही दारु विकली जाऊच नये असा प्रयत्न केला जाणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : मा.सदस्यांनी अत्यंत पोटतिडीकीने हा प्रश्न उपस्थित केला आहे. एक गोष्ट खरी आहे की, नेहमीची पध्दत आहे, खात्याकडे प्रश्न विचारल्यानंतर खात्याचेच लोक उत्तर देतात, त्यामुळे राज्यसरकार कोणत्याही पक्षाचे आले तरी त्यामध्ये बदल होणार नाही. मा.सदस्यांनी सांगितले आहे ते सत्य आहे. सगळेच दुर्जन नाहीत तसेच सगळेच सज्जन नाहीत. खात्यातील काही अधिका-यांचे अशा लोकांशी संबंध असतीलच, असतातच यासंबंधी माझी खात्री आहे. अशा घटकांसंबंधी आपण पॉईन्ट आऊट करुन दिले तर त्या घटकांना माफ केले जाणार नाही आणि सर्वच घटकांचा फोटो छापणे शक्य होणार नाही. परंतु जे तथाकथित पांढरपेशी लोक असतील, जे हॅबिच्युअल ऑफेंडर्स, सराईत गुन्हेगार असतील त्यांना प्रसिध्दी दिली जाईल.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, याप्रकरणी छापा टाकण्यात आला त्यात 1,92,159/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशाप्रकारे अनेक ठिकाणी छापे टाकले जातात आणि मुद्देमाल जप्त केला जातो. आताच मंत्रिमहोदयांनी कस्टम विभागाच्या कारवाईची माहिती दिली आहे. हा जो मुद्देमाल आहे त्याची विल्हेवाट कशी लावली जाते ? त्या बाटल्या तशाच पडून राहणार की नंतर रिकाम्या होणार ? नंतर त्याचा लिलाव करुन त्याच्यातून शासनाकडे काही पैसे येणार आहेत का याचे उत्तर द्यावे.

श्री.गणेश नाईक : या प्रकरणातील जप्त केलेला मुद्देमाल डयुप्लीकेट असून तो शास्त्रीयदृष्टया पोर्टेबल आहे की नाही याची खात्री होत नाही तोपर्यंत त्याचा लिलाव करुन त्याची विक्री करणे अनुचित ठरणार आहे. म्हणून तो माल वरिष्ठ अधिका-यांच्या उपस्थितीत डिस्ट्रॉय केला जातो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गिरज्याच्या चाळीतील भाडेज रुंना संरजज देज्याबाबत

(2) * 3297 श्री. मधुज र सरपोतदार , श्री. अ□ल तरे , डॉ. दिपज सावंत , श्री. विलास अवचट , श्री. अ□ल परब , श्री. अरविंद सावंत , डॉ. □लम जोऱ्हे , श्री. दिवाज र रावते : स-मा-न-नीय मु□य मंत्री पुढील □ाष्टींचा □ुलासा □रतील □ाय :-

(1) गिरजी चाळीतील भाडेज रुंना संरजज मिळावे यासाठी विज ास □ियमावली 58 मध्ये आवश्यज ती तरतुद ज रज्याची बाब राज्य शास□ाच्या विचाराधि□ आहे हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, याबाबत □िर्जय घेज्यात आला आहे ज ाय, असल्यास त्याचे स्वरुप ज ाय आहे,

(3) अद्याप □िर्जय घेज्यात आला □ासल्यास, विलंबाची ज ारजे ज ाय आहेत व यासाठी अजू□ ज िती ज ालावधी लाज्जे अपेज्जित आहे?

श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता : (1),(2) व (3) होय, मुंबईतील ज ापड गिरज्यांच्या जमि□ीच्या विज ासासाठीच्या □ियम ज्र.58 (7) मध्ये गिरजी चाळीतील भाडेज रुंना संरजज मिळावे यासाठी शास□ाने दि□ांज 20.6.2002 च्या □िदेशा□ुसार तरतूद जेलेली आहे. तसेच गिरज्यांच्या जमि□ीवरील जु□या चाळीचे पु□र्वस□ होज्याच्या दृष्टी□ प्रोत्साह□ात्मज अतिरिक्त चटई जेत्र □िर्देशांज अ□ुज्ञेय ज रज्याबाबत शास□ाने □ियम 58 मध्ये महाराष्ट्र प्रादेशिज व □ज्र रचना अधि□ियमाच्या ज लम 37 अ□ाये फेरबदल प्रस्ताव शास□ाच्या विचाराधी□ आहे. तथापि शास□ाच्या असे □िदर्श□ास आले आहे ज ी, गिरज्यांच्या जमि□ीचा पु□र्विज ास प्रस्तावामध्ये चाळीच्या पु□र्विज ासासाठी समावेश होत □ाही. यासाठी शास□ाने गिरज्यांच्या जमि□ीवरील चाळीतील धारज ांना 225 चौ.फु.चटई जेत्राची सदि□ज ा गिरजी मालज ांने चाळीच्या पु□र्विज ासाद्वारे मोफत उपलब्ध ज रुन दिली आहे याची जात्री झाल्याशिवाय पु□र्विज ास प्रस्तावास भोज्वटा प्रमाजपत्र देऊ □ये असे बृह□ुंबई महा□ज्रपालिजेस आदेश देज्यात आलेले आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, गिरणी कामगारांचा प्रश्न या सदनामध्ये वारंवार गाजत आहे. परंतु आजपर्यंत हा गिरणी कामगार सुटकेचा नि:श्वास टाकू शकला नाही, शासनाकडून त्यांच्यासाठी कोणतीही कृती झालेली नाही त्यामुळे त्यांची आंदोलने थांबतील असे वाटत नाही, उलट रोज आंदोलने वाढत आहेत आणि शासन मात्र मख्ख माणसासारखे बघत आहे. हा मूळ प्रश्न गिरणी कामगारांचा आहे. नुकतीच या सदनामध्ये चर्चा झाली होती त्यावेळी मा.मुख्यमंत्र्यांनी आणि आपणही पर्यायी जागा दिली जाईल असे सांगितले होते. त्याठिकाणीच जागा देऊ त्यानंतरच त्या लोकांना घरातून काढले जाईल. सगळयात महत्वाचा प्रश्न होता की, या मालकांनी अनेक ठिकाणच्या चाळी तोडून ,मोडून इमारती उभ्या केल्या, लोकांना बेघर केले अशा लोकांची चौकशी करुन बेघर झालेल्या लोकांना संरक्षण देणार काय ? आता नुकताच हायकोर्टाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3297.... श्री.मधुकर सरपोतदार....

स्टे दिला आहे. त्यामुळे कोणतीही विकासाची कामे मालकाला करता येणार नाहीत. मध्यंतरी स्टे दिला गेला परंतु त्याला आपण नकार दिला होता, कारण तो आपल्या अधिकारामध्ये नव्हता तर मा.मुख्यमंत्र्यांच्या अधिकारातील विषय होता. आता हा प्रश्न मिटला आहे. परंतु त्या लोकांवर अन्याय करुन, त्यांना बाहेर काढून, गुंडांच्या मदतीने, गँगस्टर्सला बोलावून हया लोकांना पळवून टाकतात याविषयी आपल्याला माहिती आहे काय आणि माहिती असल्यास आपण त्याविषयी कोणती कार्यवाही केली आणि भविष्य काळामध्ये या चाळीतील लोकांना संरक्षण कसे देणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, डी.सी. च्या नियम क्र.58 वर सभागृहात अनेकदा चर्चा झाली आहे. मी ती प्रश्नोत्तराच्या माध्यमातून असेल किंवा खास चर्चा उपस्थित करुन झालेली असेल. डी.सी.58, 2001 यामध्ये कामगारांच्या चाळींच्या पुनर्वसनाविषयी कोणताही उल्लेख नव्हता म्हणून खास बाब म्हणून 20.6.2002 रोजी 154 एमआरटीपी ॲक्टला दुरुस्ती करुन 37 (1) हा चाळींच्या पुनर्वसनाच्या दृष्टीकोनातून निर्णय घेण्यात आला.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.3297 पुढे सुरु...) (श्री. राजेश टोपे पुढे सुरु...)

जोपर्यन्त चाळीतील रहिवाशांना पर्यायी जमीन दिली जात नाही, त्यांना जोपर्यत 225 चौ.फू.ची सदनिका दिली जात नाही तोपर्यन्त कोणत्याही परिस्थितीमध्ये विकासकाला विकासाच्या संदर्भात परवानगी मिळणार नाही अशा प्रकारचे संरक्षण या 2001च्या डीसी रुल 58,च्या कलम 7 अन्वये देण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांना कोणीही काढू शकणार नाही.

श्री. दिवाकर रावते : उत्तरामध्ये मंत्री महोदयांना सुधारणा करावयाची आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : छापील उत्तरामध्ये असे म्हटलले आहे की "यासाठी शासनाने गिरण्यांच्या जमिनीवरील चाळीतील धारकांना 225 चौ.फू.चटई क्षेत्राची सदनिका गिरणी मालकाने चाळीच्या पुनर्विकासाद्वारे मोफत उपलब्ध करुन दिली आहे याची खात्री झाल्याशिवाय पुनर्विकास प्रस्तावास भोगवटा प्रमाणपत्र देऊ नये असे बृहन्मुंबई महानगरपालिकेस आदेश देण्यात आलेले आहेत." माझा प्रश्न असा आहे की, गेल्या वर्षभरामध्ये अशा किती गिरणीमालकांनी गिरण्यांच्या जमिनीचा विकास करण्यासाठी मागणी केलेली आहे ? तसेच शासनाने ठरविलेल्या धोरणानुसार किती लोकांना 225 चौ.फू. सदनिका देण्याचे मान्य केलेले आहे? शासनाच्या धोरणानुसार 225 चौ.फू.ची सदनिका पुनर्रचित इमारतीमध्ये दिलेली नसेल तर ही अट न पाळताही गिरण्यांच्या जमिनीचा विकास करायला परवानगी का देण्यात आली ?

श्री. राजेश टोपे : एकूण गिरण्या 54 आहेत. विकासाला परवानगी देण्याची एकूण 23 प्रकरणे आहेत. या बाबतीत मी सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी सांगितलेले आहे. जेथे चाळी अस्तित्वात आहेत अशा एकूण 10 गिरण्या आहेत. 1796 कामगारांना सदनिका अनुज्ञेय आहेत. परंतु या सर्वांना परवागी देऊन देखील अजून एकाही ठिकाणी चाळींतील लोकांचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भात बांधकाम झालेले नाही. याबाबतीत मालकाची उदासिनता दिसून येते. म्हणून 58 (7)(अ) अशी सुधारणा आणण्याचे ठरविलेले आहे. ज्या पध्दतीने सेसच्या इमारतींच्या संदर्भात आपण अधिक 50 टक्के एफएसआय इन्सेन्टीव्ह म्हणून देतो त्या पध्दतीने इन्सेन्टीव्ह दिले तर मालक सदनिका बांधू शकतील. म्हणून 58 (7) या नियमाला (अ)अशी सुधारणा आणण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेला सूचना दिलेल्या आहेत. याबाबतीत महानगरपालिकेने वैधानिक कारवाई पूर्ण केलेली आहे. हा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.3297 पुढे सुरु...)

श्री. मधुकर चव्हाण : पर्यायी जागा दिल्या नाहीत. शासनाने ठरवून दिलेल्या धोरणाप्रमाणे त्यांनी अटी पाळल्या नाहीत. तर मग त्यांना सेलेबल एफएसआय विकण्यास स्टे का दिला जात नाही.

श्री. राजेश टोपे : मी स्पष्ट करु इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीत विकासकाला...

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे. मुंबई शहरामध्ये ज्या जुन्या इमारती आहेत त्यांच्या संदर्भात इन्सेन्टीव्ह देण्याचा निर्णय घेतलेला आहे. मुंबई शहरामध्ये शंभर वर्षापूर्वीच्या 16000 चाळी आहेत. या चाळी जेंव्हा बांधल्या त्यावेळी एफएसआयचा प्रश्न नव्हता. जशी जागा उपलब्ध झाली त्याप्रमाणे त्या चाळी बांधल्या गेल्या. ...

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईमध्ये परिस्थिती अशी निर्माण झालेली आहे की, त्या इमारतींचे पुर्नबांधणी करावयाची असेल तर आताच्या कायद्यात 1.33 मध्ये बसत नाही. म्हणून त्यांच्या बाबतीमध्ये 2.5 एफ.एस.आय. किंवा भाडेकरुंना जेवढी जागा दिलेली आहे तेवढीच अतिरिक्त जागा द्यावी असे सुत्र तिकडे सुध्दा लावण्यात आलेले आहे. मिलच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर त्यांच्याकडे प्रचंड जमीन पडलेली आहे. टिचभर एका कोप-यात असलेल्या मिल चाळीच्या संदर्भात त्या मिल मालकांना अतिरिक्त एफ.एस.आय. देण्याची गरज नाही. सभापती महोदय, मुंबईचे मिल मालक अतिशय बदमाशीने वागत आहे. मिल मालक हे आपले आहे ते राखून ठेवत आहेत आणि अतिरिक्त जमिनीचा फायदा ते शासनाकडून घेत आहेत. शासन मिल मालकांच्या बाजूने धोरण स्वीकारीत आहे. असलेला एफ.एस.आय. चाळक-यांना द्या. उर्वरित जमिनीवर विकास करा.म्हाडाला आणि महानगरपालिकेस त्या जागेचा टी.डी.आर. ते परत देणार आहेत. मिल मालकांना अतिरिक्त जागा मिळते आणि अजून ते अतिरिक्त जागा मिळवून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. अतिरिक्त जागा मिळावी अशी मागणी मिल मालक शासनाकडे सातत्याने करीत आहेत. प्रचंड एफ.एस.आय. उपलब्ध असताना त्यांना अतिरिक्त एफ.एस.आय. का दिला जातो आहे ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो प्रथम प्रश्न विचारला होता त्यास मी उत्तर देऊ इच्छितो. आपण ऑक्यूपेशन सर्टिफिकेट कोणालाही देणार नाही. सभापती महोदय, मला आपण संरक्षण द्या..

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनीसभागृहात शांतता ठेवावी.

श्री. दिवाकर रावते : मी बसून माननीय मंत्री महोदयांना विचारले होते की, आपल्याला उत्तरात काही बदल करावयाचा आहे काय ? त्यांनी "नाही" असे उत्तर दिले. माननीय मंत्री महोदयांनी मघाशी उत्तर देताना सांगितले की, जो पर्यन्त गिरणीतील कामगारांच्या चाळी पुनरुज्जीवीत करीत नाही तो पर्यन्त विकासासाठी कुठल्याही प्रकारची परवानगी दिली जाणार नाही. सन्माननीय मंत्र्यांचे उत्तर रेकॉर्डवर आलेले आहे. म्हणून मी खाली बसून विचारले की, आपल्याला उत्तर बदलावयाचे आहे काय ? तर तुम्ही " नाही " असे सांगितले. गिरणी कामगारांच्या चाळी बाबत बनवा बनवी चालली आहे. आपण सांगितले की, विकास करण्यासाठी परवनगी दिली जाणार

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. तसेच उत्तरात नमूद केले आहे की, ऑक्यूपेशन सर्टिफिकेट दिले जाणार नाही. यातून असा प्रश्न निर्माण होतो की, गिरणी मालकांना तुमच्या ऑक्यूपेशन सर्टिफिकेटची गरज नाही. कारण गिरण्यांमध्ये पाण्याची सुविधा पूर्वीपासून उपलब्ध आहे. गिरणीत विजेची पूर्वीपासून व्यवस्थित आहे. गिरणीतील पाण्याच्या निचरा होण्यासाठी ड्रेनेजची व्यवस्था पूर्वीपासून अस्तित्वात आहे. त्यामुळे गिरणी मालक तुमचे कॉक्यूपेशन सर्टिफिकेट न घेता गिरण्यांच्या जागेवर टॉवर बांधतील. त्या टॉवरमधील सदनिकांसाठी तेथे उपलब्ध असेलेले पाणी वापरतील, तेथे असलेली वीज वापरतील, टॉवरमधील पाण्याचा निचरा होण्यासाठी ड्रेनेजचा वापर ते करतील. त्यांनी एकदा टॉवर बांधले की, त्यांच्या दबावाखाली तुम्ही या सुविधा वापरण्यास परवानगी द्याल. ती कामे तुम्ही रेग्युलाईज करणार. ही शुब्ध्द फसवणूकीची भूमिका शासनाकडून सभागृहात मांडली जात आहे. या गरीब गिरणी कामगारांना संरक्षण देणे महत्वाचे आहे.

सभापती : आपण उत्तर देत असताना कामगार हा आपला केंद्रबिंदू असावा. कामगार हा केंद्रबिंदू असला तर कोणत्याही परिस्थितीत त्या केंद्रबिंदुचे हित प्रथम सांभाळले जाईल यादृष्टीने आपण कायद्याच्या दृष्टीने अन्य व्यवस्था केली पाहिजे. ऑक्यूपेशन सर्टिफिकेट आम्ही देणार नाही असे म्हटले तर, सन्माननीय श्री. दिवाकर रावते यांनी सभागृहात सांगितल्या प्रमाणे या ठिकाणी सगळया सुविधा असतील तर मग त्या गिरणी मालकांना ऑक्यूपेशन सर्टिफिकेटची गरजच पडणार नाही. कामगार दुर्लक्षीत होता कामा नयेत असे शक्यतो शासनाचे धोरण असले पाहिजे. किंबहुना विकासाचे जे हक्क आहेत ते सुध्दा कामगारांचे हित पाळल्या शिवाय त्याला देता कामा नयेत अशा प्रकारचे आपले धोरण असावे. या पध्दतीने आपण काय करणार आहात याचे उत्तर या ठिकाणी द्यावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे सविस्तर उत्तर देऊ इच्छितो. आपण "अ" च्या माध्यमातून दुरुस्ती आणत आहोत. सभापती महोदय, त्या ठिकाणी उदासिनता आहे म्हणून ॲडीशनल एफ.एस.आय.ची योजना आणली जात आहे.सभापती महोदय, 2001 पासून हे धोरण लागू झालेले आहे. आता 2005 हे वर्ष चालू आहे. या चार वर्षाच्या कालावधीत 23 लोकांना परवानगी देऊन देखील त्या ठिकाणी बांधकाम केले गेलेले नाही. म्हणून सभापती महोदय, सभागृहाला माहिती आहे की, त्या ठिकाणी अंतरिम स्टे कोर्टाने दिलेला आहे. यासंदर्भात श्री. दीपक पारेख यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत झालेली आहे याचीही आपल्याला माहिती आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2158

श्री. राजेश टोपे...

ती समिती आपल्याला एक महिन्याचा आत अहवाल देणार आहे.सभापती महोदय, मला संरक्षण द्या..

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:25

ता.प्र.क्र.3297 पुढे सुरु...

श्री. राजेश टोपे..

सभापती महोदय,इंसेंटीव्ह देण्याच्या बाबतीत मा.सदस्यांचा विरोध आहे हे गृहीत धरुन शासनाने अद्यापि याबाबतीत निर्णय घेतलेला नाही. कोर्टाची स्थगिती .....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी गिरण्यांच्या विकासावर चर्चा नाही. मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. गिरणी कामगारांच्या चाळींच्या विकासाच्या संदर्भातील प्रश्न आहे. चाळी बांधून होत नाहीत तोपर्यंत ओसी देणार नाही असे सांगितले. मी सभापती महोदयांचा अतिशय आभारी आहे की त्यांनी कामगारांच्या हिताचा मानस व्यक्त केला. गिरणी मालकांना शासन एकीकडे सांगत आहे की चिंता करु नका आम्ही अतिरिक्त एफएसआय देत आहोत. मुळात त्यांच्याकडे एफएसआय उपलब्ध आहे. असे असताना अतिरिक्त एफएसआय कशासाठी देता ? गिरण्यांमध्ये वर्षानुवर्षे जो कामगार काम करीत आहे त्याचे पुनर्वसन करा. बिल्डर म्हाडाचा,महापालिकेचा टीडीआर वापरणार. याठिकाणी भाडेकरुंचा प्रश्न आहे मालकांचा नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कलम 58(7) मध्ये अे आणि बी असे दोन क्लॉज आहेत. एक म्हणजे पुनर्रचित इमारतीमध्ये 225 चौ.फूट कारपेट एरिया देणार आहात. दुसरा क्लॉज गिरणी कामगारांच्या मुलाला किंवा त्याच्यावर अवलंबून असलेल्याला नोकरी दिली जाणार आहे. त्याच्यामध्ये शैक्षणिक अट आहे आणि ट्रेनिंगची अट आहे.म्हणजे मेरीट आणि ट्रेनिंग देणार आहात. सभापती महोदय, सिटी मिलमध्ये मशीनरी बाहेर काढली जात आहे. खासदार मोहन रावले त्याठिकाणी गेले आणि त्यांना अटकाव झाला. सिटी मिल जाणीवपूर्वक बंद केली जात आहे. त्याला प्रतिबंध करणे आवश्यकआहे. बॉम्बे डाइंग मिलने धारिष्टय केले आम्ही काही देणार नाही. आपण अतिरिक्त एफएसआय देण्यासाठी उत्तर देत आहात. 24 मिलमधील 1196 गिरणी कामगारांची कुटुंबे आहेत त्याच्यापैकी एकालाही घर दिले नाही. कोणत्याही जागेचा विकास केला नाही. फिनिक्स मिलच्या मालकाने टॉवर बांधला. माझी विनंती आहे की मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये पुन्हा एकदा दुरुस्ती करावी. कुठल्याही गिरणीच्या जागेमध्ये विकास कामे सुरु नाहीत असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? दुसरे म्हणजे आपण ओसी दिली जाणार नाही असे म्हणाला परंतु ओसी ऐवजी सीसी दिली जाऊ नये. ओसी ची गिरणी मालकाला गरज नाही. गिरणी मालकाला सी सी दिले जाणार नाही अशी तरतूद शासन करणार आहे काय ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3297 पुढे सुरु...

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, मा.श्री.दिवाकर रावते यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे गिरणी मालकाने दिलेल्या आदेशाप्रमाणे काम केले नाही आणि चाळींच्या पुनर्वसनाचे काम न करता विकासाचे काम सुरु केले असेल अशा बिल्डरांच्या कामाला आपण स्थगिती देणार काय ? सभापती महोदय, 225 चौ.फू.सदनिका गिरणी कामगाराला दिली जाणार आहे ती कारपेट एरियामध्ये दिली जाणार आहे काय बिल्टअप एरियामध्ये दिली जाणार आहे ? तसेच गिरणी कामगारांना मोफत घरे दिली जातील असे सांगितले तर मोफत या शब्दाची व्याख्या काय आहे ? रजिस्ट्रेशन,डिपॉझीट इ. मोफत आहे काय ? मोफत या शब्दाची व्याख्या सांगावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला असे वाटते की,सगळया प्रश्नांचे एकच उत्तर असू शकेल. ऑक्युपेशन सर्टिफिकेटचा मुद्दा अतिशय रास्त आहे. निश्चित प्रकारे अनेक लोकांना ऑक्युपेशन सर्टिफिकेटची गरज पडणार नाही ही सभापतींनी सांगितलेली गोष्ट योग्य आहे. त्यामुळे निश्चित प्रकारे ओसी पेक्षा सीसी महत्वाची आहे असे श्री. सावंत यांनी सांगितले त्यानुसार ती गरज आहे आणि सीसी थांबविली पाहिजे तरच शासनाच जो उद्देश आहे की चाळी पुनर्रचित इ ाल्याशिवाय बिल्डरांना विकास करु द्यावयाचा नाही त्यांच्या स्वत:चा एफएसआय वापरु द्यावयाचा नाही यादृष्टिकोनातून या प्रकारे सीसी सुध्दा दिले जाणार नाही जोपर्यंते चाळीचे पुनर्वसन करीत नाहीत तोपर्यंत दिले जाणार नाही.

यानंतर श्री. गायकवाड..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

मुंबईच्या मढच्या किनाऱ्यावरील सी.आर.झेडची मर्यादा तसेच इतर नागरी नियमांचे उल्लंघन करुन बांधण्यात आलेले बंगले

(३) * २१५८ प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या मढच्या किनाऱ्यावरील सी.आर.झेडची मर्यादा तसेच इतर नागरी नियमांचे उल्लंघन करुन बेकायदा बांधण्यात आलेल्या अलिशान बंगल्यांना मुंबई महापालिका कायदा कलम ४८८ द्वारे जानेवारी, २००५ मध्ये वा त्या दरम्यान जागा खाली करण्यासंबंधीच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार उक्त जागा खाली करण्यासंबंधी महापालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे ,

(३) असल्यास, बेकायदा बांधकाम करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्यापही कारवाई झालेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे,विलासराव देशमुज यांच्याकरिता: (१) होय. ३ बंगले धारकांना दि.१२.१.२००५ रोजी नोटीसा देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) दिनांक १२.१.२००५ रोजी ज्या संबंधितांवर मुंबई महानगरपालिका कायदा कलम ४८८ द्वारे नोटीस बजावण्यात आल्या होत्या त्या बंगल्याची निष्कासन कारवाई दिनांक १४.१.२००५ रोजी निश्चित केलेले असताना त्यापैकी एका बंगला मालकाने स्वत:हून वाढीव बांधकाम निष्कासित केलेले आहे व उर्वरित दोन बंगले मालकांनी न्यायालयाकडून स्थगिती आदेश प्राप्त केल्याने निष्कासन कारवाई करता आली नाही. तसेच सदर परिसर हा जागृत निरिक्षणाखाली ठेवण्यात आलेला नाही. रविवार व सुट्टीच्या दिवशीसुध्दा दक्षता पथक ठेवण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.शरद पाटील :सभापती महोदय, सी.आर.झेडच्या मर्यादांचे उल्लंघन करुन बांधण्यात आलेल्या इमारतीसंबंधीचा हा प्रश्न असून गेली अनेक वर्षे सी.आर.झेड.च्या मर्यादांचे उल्लंघन करण्याचे प्रकार घडत आहेत.परंतु त्याकडे शासनाचे आणि मुंबई महानगरपालिकेचे लक्ष नाही.1995 नंतरच्या झोपडया पाडण्याची मोहिम जेव्हा सुरु झाली त्यावेळी सी.आर.झेडच्या मर्यादांचे उल्लंघन करुन ज्यांनी बेकायदेशीरपणे बांधकामे केलेली आहेत त्याकडे काही सामाजिक संघटनांनी शासनाचे लक्ष वेधले होते.त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी असे आश्वासन दिले होते की, अशा प्रकारची काही बांधकामे असतील किंवा काही बंगले असतील तर ते पाडले जातील.त्यानंतर ही बांधकामे पाडण्याची कार्यवाही सुरु झाली होती व बांधकामे पाडण्याची कार्यवाही सुरु केल्यानंतर व त्यासबंधी नोटीस दिल्यानंतर एक बंगलेधारक हायकोर्टात गेले आणि त्यांनी हायकोर्टातून स्टे मिळवला त्यामुळे हे बांधकाम पाडण्याचे काम थांबविण्यात आले. या संदर्भात मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की,सी.आर.झेड.चे उल्लंघन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करुन ज्यांनी बेकायदेशीर बांधकामे केलेली आहेत ती बांधकामे केव्हा पासूनची आहेत ? मढ - आयलॅन्ड भागात किंवा अंधेरी ते मालाड या भागात अशा प्रकारे किती बांधकामे करण्यात आलेली आहेत ? आणि हायकोर्टाने दिलेला स्टे उठविण्याच्या दृष्टीने शासन काय प्रयत्न करणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, खरे म्हटले तर या संदर्भात विस्तृत माहिती घेणे आवश्यक आहे. ही वस्तुस्थिती आहे की, सी.आर.झेड.च्या दृष्टीकोनातून मुंबई महानगर पालिका आणि नवीन मुंबई महानगरपालिका इत्यादी ठिकाणी सी.आर.झेड.च्या बाबतीत ज्या गोष्टी सांगितलेल्या आहेत त्याची सगळी नोंदणी झालेली आहे.सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील यांनी असा प्रश्न उपस्थित केलेला आहे की अशा प्रकारे किती इमारती या अनधिकृत बांधकाम केलेल्या आहेत आणि या इमारती कोणत्या सालातील आहेत ? त्या संबंधी मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,साधारणपणे 1960-61 च्या अगोदरची जी घरे आहेत त्यांना तेथे ठेवावयाचे असून त्यानंतर जे बांधकाम करण्यात आलेले आहे त्यांना सी.आर.झेड. लागू राहणार आहे. एका बाजूला आपण अनधिकृत असलेल्या झोपडया तोडतो तेव्हा दुस-या बाजूला सी.आर.झेड मध्ये येणारी जी अनधिकृतपणे केलेली बांधकामे असतील वा अतिक्रमण करुन बांधलेले घरे असतील तर त्यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे सर्वेक्षण आतापर्यन्त झालेले नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे.त्यामुळे अशा बांधकामांचे सर्वेक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून एक कालबध्द कार्यक्रम निश्चितपणे आखणे आवश्यक आहे.तशा पध्दतीच्या सूचना शासनाच्या वतीने मुंबई महानगरपालिकेला दिल्या जातील आणि त्यांच्याकडून सर्वेक्षण केले जाईल. त्याचबरोबर ज्यांनी अशा प्रकारचे अनधिकृतपणे बांधकाम केलेले आहे असे सर्वेक्षणात दिसून येईल त्यांच्याविरुध्द निश्चितपणे कारवाई केली जाईल .त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी जर कारवाई करण्यास कसूर करणार असतील तर त्या अधिका-यांच्या विरुध्द सुध्दा कारवाई केली जाईल..

नंतर श्री.सुंबरे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2158 ...

डॉ. अशोक मोडक : अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी असे झालेले आहे की, मंत्री महोदय जे केले जाईल त्याबद्दल सांगत आहेत. पण जे काही केले आहे ते सारे निरर्थक आहे हे या ठिकाणी दिलेल्या उत्तरावरूनच स्पष्ट होत आहे. यामध्ये म्हटले आहे की, आपण तेथील तीन बंगलेधारकांना नोटीसा दिला आहेत आणि त्यापैकी एकाने वाढीव बांधकामा बद्दलचे निष्कासन स्वीकारलेले आहे आणि बाकीच्या दोघांनी न्यायालयाकडून त्याबाबत स्थगनादेश मिळविलेला आहे. पण मग तेथील एक्झिस्टींग बांधकाम आहे त्याबद्दल काय परिस्थिती आहे ? त्याबाबत आपण काय करणार आहात ? वा केलेले आहे ? म्हणजेच आपण जे पहिले उत्तर दिलेले आहे की, बंगलेधारकांवर नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत ... त्यावर बोळा फिरविण्यात आलेला आहे असाच त्याचा अर्थ होतो. म्हणूनच हे उत्तर दिशाभूल करणारे आहे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महाराज, हा जो जास्तीचा अनधिकृत पोर्शन होता जो सीआरझेड खाली येत होता तो त्या बंगलेधारकाने स्वत:हून काढून टाकला आहे आणि बाकीचा जो पोर्शन सीआरझेड खाली येत नव्हता तो त्याने तसाच ठेवला आहे. अध्यक्ष महाराज, जो पोर्शन सीआरझेड खाली येत होता त्याबाबत आपण कलम 351 खाली नोटीसा दिल्या आणि त्यानंतर कलम 488 खाली जेव्हा इव्हिक्शनची प्रोसेस सुरू झाली त्यावेळेस जो पोर्शन सीआरझेडखाली येत होता तो त्या घरमालकाने स्वत:हून काढून टाकला आणि जो लीगलाईज पोर्शन आहे तो तसाच ठेवलेला आहे. बाकी दोन बंगलेधारकांनी कोर्टातून स्टे मिळविला आहे. म्हणूनच मी मघाशी सांगितले की, त्या ठिकाणी नेमकी काय परिस्थिती आहे, तेथील बांधकामे किती जुनी आहेत, त्यातील अधिकृत किती, अनधिकृत किती आहेत वगैरे सर्वच बाबतीत डिटेल असे सर्वेक्षण केले जाईल.

श्रीमती सुधा जोशी : अध्यक्ष महाराज, तीन बंगलेधारकांना नोटीसा दिलेल्या आहेत. तेव्हा तेथे केवळ 3 बंगलेधारकच सीआरझेड खाली येत होते काय ? आणि ते तीन बंगलेधारक कोण आहेत ? आणि सीआरझेडच्या मर्यादेचे उल्लंघन केलेले आहे म्हणून आपण त्यांना नोटीस दिलेली आहे की आणखी काही नागरी नियमांचे त्यांनी उल्लंघन केलेले आहे म्हणून नोटीसा दिलेल्या आहेत ? तसेच या तीन पैकी एका बंगलाधारकाने आपल्या बंगल्यातील वाढीव बांधकाम निष्कासित केलेले आहे असे आपण येथे सांगितले आहे. त्या संदर्भात सन्माननीय डॉ.मोडक यांनी जे

..... डीडी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले तेच मला विस्ताराने विचारावयाचे आहे की, सीआरझेड खाली हा येथील मोठा परिसर आहे असे असताना तेथील इतरही बंगले सीआरझेड खाली कसे येत नाहीत आणि हे इतकेच बंगले त्यामध्ये कसे येतात ? तसेच या ठिकाणी उत्तरात आपण म्हटले आहे की, '... सदर परिसर हा जागृत निरीक्षणाखाली ठेवण्यात आलेला नाही. रविवार व सुटीच्या दिवशीसुद्धा दक्षता पथक ठेवण्यात येत आहे.' तर याचा अर्थ काय आहे ? कारण येथे 'नाही' असे आपण म्हटलेले आहे.

श्री. राजेश टोपे : अध्यक्ष महाराज, मला त्या ठिकाणी थोडी सुधारणा करावयाची आहे. तेथे 'नाही' ऐवजी "आहे" असे म्हणावयास पाहिजे होते. मी ते लिहून देखील आणले होते पण सुरूवातीस ही दुरूस्ती सांगावयाचे विसरलो. दुसरे असे की, 1) श्रीमती सुनीता चेरियन, 2) श्री.शेखर सानील आणि 3) श्री. संजय सावंत अशी या तीन बंगलेधारकांची नावे आहेत. यापैकी दोघांनी कोर्टातून स्टे मिळाला आहे आणि एका बंगल्यामध्ये अनधिकृत बांधकाम होते ते त्या बंगलाधारकाने स्वत:हून डेमॉलिश केलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, या महाराष्ट्राचे, विशेषत: मुंबईचे दुर्दैव आहे की जे जे येथे अनधिकृत आहे त्याबाबत कोठलाही प्रश्न विचारला गेला तरी त्यावर मोघम असेच उत्तर दिले जाते. येथेही तसेच मोघम उत्तर दिले गेलेले आहे. अध्यक्ष महाराज, आपण येथे 351 ची नोटीस दिलेली आहे म्हणजे आपणास माहिती आहे की, हे अनधिकृत बांधकाम आहे तर मग नोटीसीची कारवाई करण्यापूर्वीच आपण त्याबाबत आपल्याकडून कॅव्हेट का दाखल केले गेले नाही. दुसरे असे की, हे तिन्ही बंगले बांधले गेले तेव्हा त्यासाठी महापालिकेकडून प्लॅन्स वगैरे मंजूर त्यांनी करून घेतले होते काय ? असतील तर ते अनधिकृत कसे काय ठरतात ? आणि हे अनधिकृत बांधकाम बांधले गेले होते तर तेथील वॉर्ड ऑफिसरवर त्याबद्दल काय कारवाई आपण करणार आहात ? ....

(या नंतर श्री. जागडे ... इइ 1 ...

अशुधीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

या बंगले धारकांची नांवे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावी. या बंगले धारकांनी प्लॅन मंजूर करुनच बंगले बांधले आहेत. प्लॅन महानगरपालिकेने मंजूर केले असेल तर हे बंगले अनधिकृत कसे होतात ? तसेच या ठिकाणी 351 अन्वये नोटीस देण्याचे कारण काय आहे ? तसेच या बाबतची कारवाई करण्यापूर्वी शासनाने कोर्टात कॅव्हीएट का दाखल केले नाही ? कॅव्हीएट दाखल करण्यात आले असते तर स्टे मिळाला नसता. याचा अर्थ असा आहे की, शासनाला या ठिकाणी कारवाई करण्याची इच्छा नाही. म्हणून या ठिकाणी योग्य प्रकारची कारवाई शासन करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : वॉड ऑफिसरवर कारवाई करणे हे बंधन कारक आहे.

श्री. दिवाकर रावते : मुंबई महानगरपालिकेमध्ये वॉर्ड ऑफिसर हे पदच नाही.

श्री. राजेश टोपे : वॉर्ड ऑफिसर किंवा ॲसिस्टंट कमिशनर असतील त्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. या ठिकाणभ योग्य प्रकारची कारवाई करण्यामध्ये दुर्लक्ष केल्यामुळे, योग्य वेळी कॅव्हीएट दाखल न केल्यामुळे संबंधीत अधिका-याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सीआरझेडच्या अंतर्गत बंगल्यांचे बांधकाम करण्यात आले आहे. ते कायदेशीर आहे की नाही, असा प्रश्न या ठिकाणी विचारण्यात आला आहे. हा महत्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, शासनाने 1995 पर्यन्तच्या झोपड्यांना अभयदान दिले आहे. त्यानंतर 80 हजार झोपड्या शासनाने तोडल्या आहेत. त्यानंतर आता 2000 सालापर्यन्तच्या झोपड्यांना अभयदान देण्याबाबतचे आश्वासन मा. मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. सभापती महोदय, 1995 सालापर्यन्तच्या झोपड्यांना संरक्षण दिल्यानंतरही कोणत्याही प्रकारचे सर्व्हेक्षण न करता, कोणत्याही प्रकारची चौकशी न करता 80 हजार झोपड्या तोडल्या आहेत. आता सीआरझेडमध्ये जे बंगले बांधण्यात आले आहेत, त्यांच्या बाबत सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे. परंतु 80 हजार झोपड्या पाडीत असताना कोणत्याही प्रकारचे सर्व्हेक्षण करण्यात आलेले नाही. आता मात्र या बाबतची कारवाई होत असताना त्या बंगले धारकांनी स्टे घेतला आहे. म्हणून स्टे उठवून अनधिकृत बंगल्यांच्या विरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सर्व्हेक्षण करुन बेकायदेशीर बंगल्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. स्टे उठविण्याबाबतची कारवाई करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2158....

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मढमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम होत आहे. त्या बाबत अनेक वेळा या सभागृहात चर्चा झाली आहे. म्हणून या भागात शासन सक्षम यंत्रणा उभी करणार आहे काय ? ज्या प्रमाणे असिस्टंट कमिशनरांच्या विरुध्द कारवाई शासन करणार आहे, त्याप्रमाणे त्या भागातील पोलीस अधिका-याच्या विरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : या बाबत जरुर कारवाई करण्यात येईल.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वेरुळ (जि.औरंगाबाद) येथे शहाजी राजे भोसले यांचे

स्मारक बांधणेबाबत

(४) * २६६६ श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड , डॉ. वसंत पवार , श्री. वसंतराव चव्हाण : दिनांक १५ डिसेंबर,२००४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या आठव्या यादीतील प्र.क्र. ४०८५० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा ुलासा रतील काय :-

(१) औरंगाबाद येथील वेरुळ येथे मालोजीराव भोसले यांच्या दुर्लक्षित गढीच्या जागेवर शहाजीराजे यांचे उचित स्मारक बांधण्याबाबत शासनाच्या विचाराधीन प्रस्तावावर अंतीम निर्णय घेण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर प्रश्नी अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुज यांच्याकरिता : (१) होय.

(२) शहाजी राजे भोसले यांचे स्मारक त्यांच्या वेरुळ (जि.औरंगाबाद) येथील गढीवर बांधण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली आहे. या स्मारक संकुलामध्ये शहाजी राजे भोसलेंचा पुतळा बांधण्यात येणार आहे. या कामामध्ये शहाजी राजेंचा १२ फुट उंचीचा पुतळा उभारणे, वेरुळ येथे गढीच्या उत्खननात सापडलेल्या वस्तुचे संग्रहालय करणे, स्मारक संकुलास भेट देणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ग्रंथालय व विश्रामगृह बांधणे, लोकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करणे तसेच तेथे असलेल्या तीन समाधींचे संरक्षण करणे असे स्मारकाचे स्वरुप आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सदाशिव पोळ : सभापती महोदय, या ठिकाणी शासनाने जे उत्तर दिले आहे, त्यामुळे माझे समाधान झाले आहे. माझा एकच प्रश्न प्रश्न आहे. या कामाला केव्हा सुरुवात होणार आहे.

श्री. राजेश टोपे : रुपये 32 लाख 07 हजार दि. 31.2.2005 रोजी वितरीत करण्यात आली आहे. या ठिकाणी सचिन कन्स्ट्रक्शन नावाचे कंत्राटदार नेमण्यात आले आहेत. त्या ठिकाणी काम सुरु झाले आहे. तसेच जवळ जवळ 80 ते 85 टक्के काम संपले आहे.

--

(यानंतर श्री. सरफरे.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तुपगाव (ता.खालापूर) येथील धानेश्वर मंदिरासमोरील जाजेवर झालेले अतिक्रमण

(५) * ३२२९ श्री. अनंत तरे , डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुपगाव (ता.खालापूर) गावातील श्रीक्षेत्र धानेश्वर मंदिराच्या समोरील जागेवर मुंबईतील धनिकांने अतिक्रमण केले आहे हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली का, असल्यास, कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

डॉ. राजेंद्र शिगणे, श्री.विलासराव देशमुज यांच्याकरिता: (१) व (२) श्रीजेत्र धा□श्वर मंदिराच्या समोरील सर्व्हे क्र.१३२/२ ही जागा खाजगी मालकीची आहे. सदर जमिनीच्या मालकाने जमिनीला कंपाऊंड घालण्यासाठी खोदकाम सुरु केले होते. मात्र या जागेवर यात्रेच्या वेळी तात्पुरत्या स्वरुपात दुकाने थाटली जात असल्यामुळे वरील खोदकामासंदर्भात स्थानिक ग्रामस्थांच्या तक्रारी आल्यामुळे याबाबत संबंधित जमिन मालक व स्थानिक ग्रामस्थ यांच्याशी चर्चा करुन तहसिलदार खालापूर यांनी सदर खोदकाम बंद केले आहे. सध्या या जागेवर कोणतेही बांधकाम नाही.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, छापील उत्तरावरुन कुणाला तरी पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसते. शासनाने या उत्तरामध्ये दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. खालापूर येथील तुपगाव येथे प्राचीन धानेश्वर मंदीर आहे. त्या ठिकाणी दरवर्षी महाशिवरात्रीला यात्रा भरते. हे हिंदूंचे देवालय असल्यामुळे त्या ठिक्राणी कुणीही जाऊ नये यासाठी मुंबईच्या धनिकांनी त्या ठिकाणी कंपाऊंड वॉल बांधण्याचे काम सुरु केले आहे. तेथील स्थानिक गावकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर ते काम थांबलेले आहे. तेव्हा हा धनिक कोण आहे ते सांगावे? तेथील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी या पुढे त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम होणार नाही यासाठी शासन खबरदारी घेईल काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे त्या व्यक्तीचे नाव श्री.अशफाक अली आहे. सर्व्हे नं. 132/2 ही खाजगी मालकीची जागा आहे. ही गोष्ट खरी आहे की, मंदिराच्या समोर ती जागा आहे. ती जागा त्याच्या मालकीची असल्यामुळे त्याठिकाणी भिंत उभी करण्यासाठी खोदकाम केले आहे. परंतु संबंधित गावकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. **३२२९... डॉ. राजेंद्र शिंगणे....**

त्याठिकाणी तहसिलदारांनी जाऊन भेट दिली व संबंधित लोकांबरोबर चर्चा केली. तेव्हा संबंधित इसमाने अशाप्रकारचे बांधकाम न करण्याचे मान्य केले असून हा प्रश्न सामोपचाराने मिटला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ते 150 वर्षापूर्वीचे प्राचीन मंदीर असून गावकऱ्यांची त्या ठिकाणी वहिवाट आहे. तेव्हा ही वहिवाट मान्य करुन कायम स्वरुपी ती जागा देवस्थानाला देण्या बाबत शासन कारवाई करणार आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ती खाजगी मालकीची जागा आहे...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, वहिवाट चालू असलेल्या अनेक जागा आपल्या राज्यात आहेत. परवा सभागृहामध्ये सांगितले की, मूळ मालकाच्या नावावर असलेली जागा रस्त्यासाठी सरकारने ताब्यात घेतली. तेव्हा या ठिकाणी 150 वर्षापूर्वीचे प्राचीन मंदीर आहे, त्या ठिकाणी वहिवाट चालू आहे. त्यामुळे ती वहिवाट कायम ठेवण्याची खबरदारी हे शासन घेईल काय?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या प्रश्नाला जोडून माझा प्रश्न असा आहे की, पाण्याच्या प्रश्नावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल असे माननीय राज्यपालांना कळवून सुध्दा तुम्ही अनुशेष भागातील पैसे पळविता. या ठिकाणी गावकऱ्यांची 150 वर्षाची वहिवाट असलेली जागा आहे. त्या ठिकाणी हिंदू धर्मियांचे मंदिर आहे. लोकांची श्रध्दा असलेल्या आणि वहिवाट सुरु असलेल्या जागेच्या ठिकाणी अडवणूक केली तर त्यामधून कायदा व सुव्यवस्था निर्माण होईल. शासनाच्या महसूल कायद्यानुसार अशा प्रकारच्या जमिनी देवस्थानासाठी ताब्यात घेण्याबाबत तरतूद आहे. त्याप्रमाणे आपण अंमलबजावणी करणार की नाही?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, देवस्थानासमोर ती जागा आहे. व ते देवस्थान फार जुने म्हणजे 150 वर्षापूर्वीचे आहे. त्या मंदिरासमोर दरवर्षी यात्रा भरते. त्या वेळी त्या जागेवर यात्रेच्या दिवसात दुकाने तात्पुरत्या स्वरुपात थाटण्यात येतात. ही जागा मंदिराच्या ताब्यात देण्याबाबत अजूनपर्यंत कुणीही मागणी केली नाही.. त्यामुळे ही जागा देवस्थानाच्या ताब्यात देण्याबाबत कुणी मागणी केली तर निश्चितपणे ती बाब तपासून त्या बाबत योग्य ती कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गणपती उत्सवाच्या मिरवणुकीची वाट आपण कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली बदलता. केवळ त्या ठिकाणी मुस्लिमाची जागा असल्यामुळे त्या मध्ये कायदा व सुव्यवस्था निर्माण होईल. ही कायदा व सुव्यवस्था हिंदू देवदेवतांच्या बाबतीत निर्माण होत नाही. या बाबतीत शासनाकडून कारवाई करण्यामध्ये हलगर्जीपणा होत आहे, हे बरोबर नाही...

सभापती : माननीय सदस्यांच्या प्रश्नातील "हलगर्जीपणा" हे शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येत आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3229 . . . .

सभापती . . . .

दुसरे असे की, त्याठिकाणी जर वहिवाट असेल आणि ती 12 वर्षापेक्षा जास्त असेल तर त्यादृष्टीने आपण विचार करणे आवश्यक आहे. तेव्हा त्याअनुषंगाने सरकारने जरुर काय ते पहावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये सांगण्यात आले की, त्याठिकाणी वहिवाट आहे आणि परंपरागत असे जुने मंदिर आहे आणि तेथे मोठी यात्रा देखील भरत असते. तेथील ग्रामस्थांच्या तक्रारी आल्या आणि त्यामुळे संबंधित जमीन मालक आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्याशी चर्चा करुन, सामंजस्याने हा प्रश्न सोडविण्यात आला असे येथे सांगितले गेले. अयोध्येमधील बाबरी तोडणा-या प्रवृत्तीला कोणत्याही प्रकारची संधी न देता . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याचा येथे काय संबंध आहे ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, यांनी आपला प्रश्न विचारावा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी फक्त प्रश्न विचारतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मला प्रश्न विचारु द्या.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अशा प्रवृत्तीला . . . . .

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडेसाहेब . . . .

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मला सांगा की, ते वाटेल तशी उदाहरणे देऊ शकतात. माझा मुलभूत प्रश्न असा आहे की, ...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा मुलभूत प्रश्न असा आहे की, अशा विश्वंसक प्रवृत्तीला चालना मिळू नये, कोणत्याही प्रकारची संधी मिळू नये म्हणून जसा ग्रामस्थ आणि जमीन मालक यांच्यामध्ये सामंजस्याने समझौता घडवून आणला, त्याप्रमाणेच ही जी

. . . .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3229 . . . .
प्रा.जोगेंद्र कवाडे . . . .

वहिवाटीची जागा आहे, ती जागा समझौता करुन मिळविता येईल का ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी मघाशी जे वक्तव्य केले, ते आपण कामकाजातून काढून टाकले का ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

सभापती : मी सन्माननीय सदस्यांचे वक्तव्य तपासून घेतो आणि तपासल्यानंतर जे चुकीचे आहे, ते काढून टाकेन.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, त्यांचा अधिकार आहे. . .

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांनी विचारलेला मूळ प्रश्नच समजलेला नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा साधा प्रश्न असा आहे की, विध्वंसक, सांप्रदायिक प्रवृत्तीला कोणत्याही प्रकारची संधी देता कामा नये. यादृष्टीकोनातून वहिवाटीची जागा मंदिराच्या वापरासाठी मिळावी, यात्रेसाठी मिळावी याकरता, जसे अगोदर जमीन मालक आणि ग्रामस्थ यांच्यात समझौता झाला, सामंजस्य निर्माण झाले. तशाच प्रकारे या बाबतीतही सामंजस्य दाखवून ही वहिवाटीची जागा आपल्याला मंदिरासाठी प्राप्त करुन घेता येईल का ? हा माझा प्रश्न आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, तुपगाव हे अतिशय शांत गाव आहे. या गावामध्ये मागच्या काळात कधीही शांततेच्या बाबतीत प्रश्न निर्माण झालेला नव्हता. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नव्हता. जेव्हा या मंदिराच्या समोरील जागेमध्ये बांधकाम करण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा तेथील गावकरी आणि संबंधित इसम, तसेच तेथील सर्व अधिकारी एकत्र आले आणि सामंजस्याने हा प्रश्न मिटवला. त्यामुळे भविष्यामध्ये सुध्दा तेथे अशा प्रकारचा प्रश्न निर्माण होईल अशा प्रकारची परिस्थिती नाही. परंतु सर्व सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी मागणी केलेली आहे की, ही जागा मंदिरासाठी मिळाली पाहिजे.मी अगोदरच सांगितले की, निश्चितपणे ही जागा मंदिराला मिळवून देण्यासाठी शासन स्तरावरुन सुध्दा योग्य ते प्रयत्न केले जातील.

. . . .2 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4757 बाबत

सभापती : आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनु.6, ता.प्र.क्र.4757 हा तहकुब केलेला आहे. हा प्रश्न नंतर घेण्यात येईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय. . . .

सभापती : मी हा प्रश्न तहकूब केलेला आहे. तो नंतर घेण्यात येईल. त्याबाबतीत मी सन्माननीय सदस्यांना कळवेन.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, हा प्रश्न केव्हा घेणार आहात ?

सभापती : नंतर म्हणजे दोन-तीन दिवसांनी घेतो.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई महा□□रपालि□ची शास□□डे ये□असलेली थ□बा□

(7) * 4513 श्री. प्रमोद □बल□र , श्री. अरविंद सावंत , श्री. अ□□ल परब , श्री. विलास अवचट , डॉ. दिप□ सावंत , श्री. अ□□ल तरे : स-मा-न-नीय मुज्य मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज्रतील ज्राय :-

(1) मुंबई महा-ज्रपालिज्रेची शास-ाज्रडे ज्राही ज्रोटी रुपयांची थज्रबाजी आहे हे ज्रारे आहे ज्राय,

(2) असल्यास, साधारजत: अंदाजे ज्रिती ज्रोटी रुपयांची थज्रबाजी शास-ा मुंबई महा-ज्रपालिज्रेला देजे आहे,

(3) असल्यास, सदर थज्रबाजी ही शास-ाज्रडू-ा मुंबई महा-ज्रपालिज्रेला मिळजारी विविध अ-ुदा-ो व ज्रर या स्वरुपातील आहे हे ज्रारे आहे ज्राय,

(4) असल्यास, सदर ज्रोट्यावधी रुपयांची थज्रबाजी मुंबई महा-ज्रपालिज्रेला माज्रजी ज्ररु-ाही -ा देज्याची ज्रारजे ज्राय आहेत व सदर रक्ज्रम ज्रिती ज्रालावधीत मुंबई महा-ज्रपालिज्रेला देज्यात येजार आहे ?

श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमु□ यांचेकरिता: (1) होय.

(2) राज्यशास-ाच्या विविध विभाजांज्रडू-ा मुंबई महा-ज्रपालिज्रेस एज्रूज रु.578.45 ज्रोटी इतजी रक्ज्रम येजे बाजी आहे.

(3) होय.

(4) सदर रक्ज्रम मुंबई महा-ज्रपालिज्रेस लवज्रात लवज्रर अदा ज्ररज्याच्या दृक्ष्ट-ो संबंधित विभाजां-ा पत्र पाठविज्यात आले आहे.

श्री.अरविंद सावंत : माझे दोन प्रश्न आहेत. मुंबई महानगरपालिकेची एकूण 578.45 कोटी इतकी थकबाकी आहे. ही थकबाकी कोणत्या कालावधीपर्यन्तची आहे, तसेच विविध खात्यांची थकबाकी किती आहे आणि किती तारखेपर्यन्त ती देणार आहात ?

श्री.राजेश टोपे : एकूण 12 खात्यांची 578.45 कोटी इतकी जानेवारी 2005 पर्यन्त थकबाकी आहे. या संबंधात सर्व खातेप्रमुखांना मुख्य सचिवांनी सूचना दिलेल्या आहेत. महानगरपालिकांची थकबाकी ही शासनाने दिली पाहिजे, ही वस्तुस्थिती आहे. मुंबई महानरपालिका ही स्वत:चे मोठे उत्पन्न निर्माण करते, त्यामुळे सधन अशी महानगरपालिका आहे. या पुढे जाऊन मला असे म्हणायचे आहे की, शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांची थकबाकी राहू नये म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.4513 (पुढे चालू...

श्री.राजेश टोपे (पुढे चालू....

मुख्य सचिवांच्या स्तरावर वर्षातून किमान दोन बैठका घेऊन ही रक्कम त्यांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने प्रयत्न होईल.

श्री.दिवाकर रावते : मंत्री महोदयांनी सांगितले की, ही थकबाकी सहा महिन्यात देण्यात येईल. परंतु अर्थमंत्री महोदयांनी अर्थसंकल्पावर उत्तर देताना सांगितले की, कोणत्याही खात्याला वित्त विभागाकडे पुन्हा जावे लागणार नाही. म्हणून या अर्थसंकल्पामध्ये हे पैसे देण्याची तरतूद केलेली आहे काय ? नाही तर पुन्हा सहा महिने पेसे देण्यासाठी जातील.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी सांगितले की, मुख्य सचिवांच्या स्तरावर या संबंधाने वर्षातून दोन बैठका घेऊन, जी काही महानगरपालिकांची थकबाकी आहे ती देण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाईल.

--

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ MAP/ SBT/ ८

ठा□ जिल्ह्यातील चार महापालि□ांच्या □त्रातील अ□धि□ृत बांध□ामे दंड आ□ार□ी □रु□ अधि□ृत □र□ याबाबत

(8) * 4281 प्रा. जो□द्र □वाडे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ , डॉ. वसंत पवार , श्री. राजेंद्र जै□, श्री. वसंतराव चव्हा□, श्री. ज□ाथ शेवाळे : स-मा-ा-ीय मुज्य मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) ठाजे जिल्ह्यातील चार महापालिज ांच्या जेत्रातील सर्व प्रज ारची अ-ाधिज़ृत बांधज ामे दंड आज ारजी ज रु-ा सदर बांधज ामे अधिज़ृत ज रज्यात येजार आहेत, हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, उक्त प्रश-ी मा.मुज्यमंत्री यांचेज डे जा-ेवारी, 2005 मध्ये वेळोवेळी स्था-िज लोज प्रति-िधीं-ी -िवेद-ाद्वारे माज जी ज ेली आहे तसेच दि-ांज 22 डिसेंबर, 2004 रोजी वा त्या सुमारास मा.पालज मंत्री, ठाजे जिल्हा यां-ीही चार महापालिज ांच्या आयुक्तां-ा अहवाल सादर ज रज्याचे आदेश दिले आहेत, हे ही जरे आहे ज ाय,

(3) असल्यास, सदर प्रज रजी पुढे ज ोजती ज ार्यवाही ज ेली वा ज रज्यात येत आहे ?

श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमु□ यांचेकरिता : (1) -ाही.

(2) मा.पालज मंत्री, ठाजे यां-ी महापालिज ा आयुक्तांच्या बैठज ीच्या वेळी अ-ाधिज़ृत बांधज ामाचा आढावा घेज्यास सांज ितले.

(3) संबंधित महापालिज ांज डू-ा याबाबत ज ार्यवाही ज रज्यात येत आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यात चार महानगरपालिका आहेत. कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका, मिरा-भाईंदर महानगरपालिका या ठिकाणी अनधिकृत बांधकामे केली जातात, त्यानंतर त्यावर दंड आकारून ती बांधकामे अधिकृत करण्याचा सतत प्रयत्न होतो. अनधिकृत बांधकामे, इमारती उभ्या केल्या जातात आणि नंतर वेगवेगळया प्रकारचा दबाव आणून अधिकृत मंजूरी मिळवून द्यायची असे प्रकार सातत्याने होत आहेत. हा प्रकार थांबविण्यासाठी शासन गंभीरपणाने ठोस अशाप्रकारची कारवाई करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, अनधिकृत बांधकामांच्या संबंधात ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिकांकडून माहिती घेतली. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे होतात. ती अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई करण्यासाठी महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये काही त्रुटी आहेत. त्याचबरोबर पोलिसांचा फोर्स पाहिजे, तो देखील कमी पडतो. या सगळ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र.4281 (पुढे चालू...

श्री.राजेश टोपे (पुढे चालू...

गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. खरे तर अनधिकृत बांधकामे अधिकृत करणे ही गोष्ट आता अशक्य आहे. तरी देखील मा.मुख्यमंत्री महोदयांबरोबर बैठक घेऊन, हा विषय समजून घेऊन धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. या प्रकरणामध्ये कोर्ट देखील सातत्याने स्टे देत असते. त्यामुळे या संदर्भाने नवीन कोर्ट देण्याच्यादृष्टीने काय करता येईल, यासगळ्या गोष्टींबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन कायद्यातील त्रुटी कशा दूर करता येतील, याचाही निश्चितपणे निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आधीचा प्रश्न मढच्या संदर्भात होता आणि आताचा हा प्रश्न, या प्रश्नांचा विचार केला तर हा अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, यामध्ये स्टे मिळतो. त्या ठिकाणी एक मजल्यावर स्टे मिळतो. एक मजल्यावर स्टे घेऊन तेथील प्रशासनाचे अधिकारी, महापालिका प्रशासनाचे अधिकारी, बिल्डर हे संगनमताने 9-9 मजले बांधतात. एका मजल्यावर स्टे घ्यावयाचा आणि स्टे आहे असे दाखवून 9-9 मजले उभे करावयाचे असे काम होते. स्टे एका मजल्यावर असतो. त्या ठिकाणी एका मजल्यावर एकही भिंत किंवा एकही वीट उभी राहता कामा नये. या सहा महानगरपालिकांमध्ये 60 ते 70 टक्के बांधकामे अनधिकृत आहेत. याचा गांभीर्याने विचार केला तर या लोकांवर कायम टांगती तलवार असते. त्यांना कलम 268 च्या नोटिसेस जातात. ही बांधकामे रेग्युलराईज करुन त्या 60 टक्के लोकांना रिलिफ देणार काय ? त्या इमारती पडतात. त्यामध्ये 35-35 लोक मृत्युमुखी पडतात. ते जर नियमित केले तर त्यांना रिलिफ मिळेल. शासन ते करणार काय ? तसेच महापालिका अधिकारी आणि बिल्डर हे संगनमताने एक मजल्यावर स्टे घेऊन 9-9 मजले उभे करतात. असे मजले उभे करणाऱ्या, या अनधिकृत बांधकाम करणाऱ्या बिल्डरवर आणि त्यात गुंतलेल्या अधिकाऱ्यांवर आपण कोणत्या प्रकारची कारवाई करणार ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, काल पोटमाळयाच्या संदर्भात एक प्रश्न विचारण्यात आला होता. त्यासंदर्भात प्रिमियम घेऊन ते रेग्युलराईज करण्याचा निर्णय शासन लवकर करील असे उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. आव्हाड साहेबांनी जी सूचना केली की, त्यामध्ये प्रिमियम घेऊन रेग्युलराईज करता येईल काय ? मी पहिल्या उत्तरात सांगितले की, या सगळयाच दृष्टीकोनातून, ही सगळी धोरणे ठरविण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर या सगळयाच धोरणात्मक बाबींवर जरुर लवकरात लवकर चर्चा करण्यात येईल आणि त्याबाबतचा योग्य तो निर्णय घेण्यात येईल. या पध्दतीने एक मजल्यावर स्टे घेऊन वर बांधकाम करण्यात येते अशा लोकांवर कारवाई करण्यात येईल. जे अधिकारी त्यामध्ये गुंतलेले आहेत त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल. त्यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्न नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे एका गंभीर प्रश्नाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. विधानसभेचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख हे आज खाली तळ मजल्यावर उपोषणाला बसलेले आहे. त्या ठिकाणी उपोषणाला बसत असतांना त्यांच्या मनामध्ये एक विचार घेऊन ते उपोषणाला बसलेले आहेत. या राज्यामध्ये दोन तीन वर्षे दुष्काळी परिस्थिती होती. विशेषत: पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा भागामध्ये दुष्काळी परिस्थिती होती. त्यावर मात करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केला. यावेळी विदर्भ, मराठवाडा या भागामध्ये अत्यंत गंभीर दुष्काळी परिस्थिती आहे. म्हणून या प्रश्नावर या ठिकाणी व्यापक चर्चा व्हावी आणि राज्य शासनाचे लक्ष या निमित्ताने वेधावे या हेतूने सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख उपोषणाला बसलेले आहेत. आपण या सभागृहामध्ये एक वेळ ठरवावी आणि या विषयावर या ठिकाणी चर्चा करण्यासाठी आपण वेळ द्यावा अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे आपल्याला करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केला तो योग्य आहे याबद्दल वाद नाही परंतु या सदनाने या अधिवेशनात कामकाजाची सुरुवात करतानाच सर्वात प्रथम महाराष्ट्रामध्ये पडलेल्या भीषण दुष्काळाची चर्चा आपण घेतलेली आहे. अडीच तास चर्चा असताना साडेपाच तास चर्चा झाली. त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य हे सत्ताधारी पक्षाचे सदस्य आहेत. शासनाने त्याबाबत जे उत्तर दिलेले आहे त्यासंदर्भात कार्यवाही करावी. या विषयावर या ठिकाणी आपण चर्चा केलेली आहे. सर्वात पहिली चर्चा आपण दुष्काळाची केलेली आहे. आपण याबाबतीत न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, विधानसभेचे ज्येष्ठ सदस्य श्री.गणपतराव देशमुख आणि अन्य काही विधानसभा सदस्य उपोषणाला बसलेले आहेत आणि त्यामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती कांताताई नलावडे या आपल्या एका भगिनीचीही सही मी बघितली आहे. शासनाचे लक्ष वेधावे यादृष्टीने ते तेथे धरणे धरुन बसलेले आहेत. त्यांचा विषय मी वाचला आहे त्यानुसार महाराष्ट्रातील 87 तालुके अवर्षणप्रवण आहेत. सातत्याने दुष्काळाने ते भरडलेले आहेत, स्थलांतराची भयानक टांगती तलवार आहे, त्यांचा विकास व्हावा याकडे शासनाचे लक्ष वेधणे या अनुषंगाने ते उपोषणाला बसले आहेत. त्यांना आपल्या सभागृहाची पूर्ण सहानुभूती आहे आणि तुम्ही सगळे मा.सदस्य त्यांच्या पाठीशी आहात. मराठवाडयातील, पश्चिम महाराष्ट्रातील किंवा अन्य ठिकाणचे दुष्काळग्रस्त 87 तालुके आहेत त्यामध्ये नंतर वाढच

झालेली आहे, त्या अनुषंगाने आपल्याला या सभागृहात अल्पकालीन चर्चा करावयाची असेल तर त्यासाठी सदनातील सत्तारुढ आणि विरोधी पक्ष यांच्याबरोबर चर्चा करुन मी वेळ देण्याचा प्रयत्न करीन. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी आणि मा.सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आता जे विचार मांडले आहेत त्यासंबंधी आपण जरुर निर्णय घेऊ.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला एका विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे.

सभापती : आपण सभागृहामध्ये दिवसाला एखाद दुसरा औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी परवानगी देत असतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्राच्या कॉलम आठमध्ये आपले एक शासकीय अधिकारी श्री.विनय मोहन लाल यांना शंकरन समितीने प्लॉट स्कॅण्डलबद्दल दोषी धरल्याची मोठी बातमी आलेली आहे. यासंबंधी मा.मुख्यमंत्र्यांचे काही वक्तव्य आलेले आहे. खरोखरच असा अहवाल आलेला आहे काय ? आला असल्यास त्याविषयी मा.मुख्यमंत्र्यांनी काही प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे त्याची माहिती सदनाला दिली तर बरे होईल. इंडियन एक्सप्रेस सारख्या वर्तमानपत्राच्या फ्रंट पेजवरील आठ कॉलमवर ही बातमी आलेली आहे.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यासंबंधीची माहिती घेऊन सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगतो. मला जे समजले ते असे आहे की, अशासकीय चर्चेच्या निमित्ताने काल खाली काही तरी बोलले गेले, त्यामुळे तेथे धोरणात्मक स्वरुपाचे एखादे निवेदन केले असेल तर तसेच निवेदन येथेही केले पाहिजे. त्यांनी फक्त असे सांगितले पाहिजे होते की, काल अशाप्रकारचे निवेदन झालेले नाही.

3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.धर्मरावबाबा अत्राम (महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन 1997-98, 1998-99, 1999-2000 व 2000-01 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज काही नियम 93 अन्वये सूचना आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 5.4.2005 रोजी जुन:दुर्खी, ता.भिवंडी येथे एका आदिवासी बालकाचा कुपोषणाने झालेला मृत्यू" यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नाही. सबब, शासनाने यासंबंधी निवेदन करावे असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व इतर वि.प.स.यांनी "राज्य परिवहन महामंडळाच्या सांगली विभागात दि.26 व 27 जुलै, 2004 रोजी चालक व मॅकॅनिक या पदांसाठी उमेदवारांच्या निवडीत झालेला गैरव्यवहार" यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नाही. सबब, शासनाने यासंबंधी निवेदन करावे असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत व इतर वि.प.स. यांनी "दि.3.4.2005 रोजी सेनगाव, जि.हिंगोली येथील माधव ढाकणे व बाळापूर, जि.नाशिक येथील सर्जेराव शिरसाट या शेतक-यांनी कर्जाच्या बोजामुळे केलेली आत्महत्या" यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नाही. सबब, शासनाने यासंबंधी निवेदन करावे असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख व इतर वि.प.स. यांनी "दि.18 मार्च, 2005 रोजी मा.मुख्यमंत्र्यांनी सभागृहात अमरावती शहर एकात्मिक रस्ते विकास योजनेसाठी 15 दिवसात निधीची तरतूद करण्यात येईल असे आश्वासन दिले असताना अद्यापही निधी उपलब्ध करुन न देणे" यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नाही. सबब, शासनाने यासंबंधी निवेदन करावे असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते व इतर वि.प.स.यांनी "अनुकंपा तत्वावर नेमणूक झालेल्या शिक्षकेतरांना शासन मान्यता न मिळणे" यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नाही. सबब, शासनाने यासंबंधी निवेदन करावे असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

मा.सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी "कळमेश्वर-गोंडखैरी, जि.नागपूर येथील रस्ता प्रकल्पासाठी सिकॉमने गुरुदत्त इन्फ्रास्ट्रक्चर, नागपूर या कंपनीस 2 कोटी रुपयांचे कर्ज वितरित केल्यानंतर या कंपनीचा प्रवर्तक फरार झाल्याने प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असणे" यासंबंधी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा विषय नियम 93 चा होत नाही. सबब, शासनाने यासंबंधी निवेदन करावे असे निदेश देऊन मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मा. सभापती पुढे सुरु...)

यानंतर मा.सदस्य डॉ. नीलम गो-हे व मा.सदस्य श्री. संजय दत्त यांनी "दिनांक 4.4.2005 रोजी परभणी रेल्वे स्थानकावर मुलींची परराज्यात विक्री करणारी टोळी पकडण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93चा विषय होत नाही. या विषयावर लक्षवेधी सूचना प्राप्त झालेली आहे. ती मी दोन-तीन दिवसात लावण्याची व्यवस्था करतो. मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

श्री. अनंत तरे : मी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे.

सभापती : मा.सदस्यांनी मला दालनात येऊन भेटावे. अन्य ज्या 93च्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्यांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे. ते विषय अन्य कोणत्या आयुधाने उपस्थित होऊ शकतील ते मी पाहीन. आता 93च्या सूचनेवरील पहिले निवेदन घेण्यात येईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील ह.भ.प.भीमसिंह महाराज वसतिगृहातील विद्यार्थी कु. दत्ता राठोड याचा केलेला खून

मु.शी : बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील ह.भ.प.भीमसिंह महाराज वसतिगृहातील विद्यार्थी कु. दत्ता राठोड याचा केलेला खून याबाबत श्री अनंत तरे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, विलास अवचट, डॉ. अनिल परब, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. रामनाथ मोते व डॉ.अशोक मोडक वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, विलास अवचट, डॉ. अनिल परब, श्रीमती संजीवनी रायकर, श्री रामनाथ मोते व डॉ. अशोक मोडक, वि.प.स. यांनी "बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील ह.भ.प. भीमसिंह महाराज वसतिगृहातील विद्यार्थी कु. दत्ता राठोड याचा केलेला खून" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : हा अतिशय गंभीर प्रकार आहे. कु. दत्ता राठोड हा बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील ह.भ.प.भीमसिंह महाराज मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थी. याने निकृष्ट जेवणाबद्दल तक्रार केली म्हणून अधीक्षकाने त्याचा खून केला. त्याचे प्रेत संडासाच्या टाकीत टाकले. या खुनामध्ये एकच व्यक्ती सामील नाही तर आणखीन काही लोक आहेत. म्हणून अशा प्रकारच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी आपण ही संपूर्ण तपासणी सीआयडीकडे सोपविणार आहात काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : या प्रकरणी अधीक्षकाला अटक केलेली आहे. त्याच्या सोबत आणखी एक व्यक्ती इल्वास शेख यासही अटक झालेली आहे. अन्य दोन आरोपी पठाण व गफूर हे फरार झालेले आहेत. त्यांना अटक करण्याचे प्रयत्न पोलिसांनी सुरु केलेले आहेत. ते अटक सत्रामध्ये येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे.

श्री. अनंत तरे : हे प्रकरण सीआयडीकडे सोपविणार काय...

डॉ. अशोक मोडक : मा.सदस्य श्री. तरे यांनी सांगितल्या प्रमाणे हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. याप्रकरणी अधीक्षक गुन्हेगार आहे हे सरळ सरळ दिसत आहे. त्याच्यावर कोणते कलम लावलेले आहे हे सांगितलेले नाही ? मला ते जाणून घ्यावयाचे आहे. दोघे हा प्रकार करु शकतात काय ?म्हणून या प्रकरणी मंत्री महोदयांनी सविस्तर माहिती द्यावी.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : कलमाच्या संदर्भात माझ्याकडे माहिती नाही. त्याना अटक झालेली आहे. त्यांच्यावर कारवाई झालेली आहे. एमसीआर मिळालेला आहे.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, हे निवेदन राखून ठेवावे अशी माझी आपणास विनंती आहे. मंत्री महोदयांना सर्व माहिती घेऊन येण्यास सांगावे.

सभापती : ही अत्यंत गंभीर बाब आहे. दुर्दैवाने वसतिगृहातील अत्यंत छोट्या, अज्ञान मुलाचा मृत्यू झालेला आहे. गुन्हेगाराला कोणत्या कलमाखाली अटक केली हे सांगणे गरजेचे आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : भा.द.वि. 62/2005 302, 301 खाली गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : राठोड हा 16 मार्चला बेपत्ता झाला. 17 तारखेला अधीक्षकाने याबाबत माहिती दिली. मृतदेह 25 तारखेला आढळून आला. मधल्या दिवसामध्ये राठोड कुठे होता? या अधीक्षकाने मारुन त्याला संडासामध्ये टाकले असेल किंवा कोंडून ठेवले असेल तर या कृत्यामध्ये अधीक्षकाबरोबर अन्य कोणकोण सामील आहेत याचा तपास शासन करणार आहे काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम : याप्रकरणाची पुन्हा पूर्णपणे चौकशी करु. या प्रकरणातील तीन आरोपीपैकी दोन आरोपींना पकडले आहे. 2 आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरु आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. तरे आणि सन्माननीय सदस्य श्री.मेटे यांनी या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल काय अशा प्रकारची मागणी केलेली आहे. त्यांच्या मागणी प्रमाणे या प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यास कोणतीही हरकत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, एका मागासवर्गीय वसतिगृहातील एका विद्यार्थ्याचा खून करुन त्याचा मृतदेह एका टँकमध्ये टाकून देण्यात आलेला आहे. मुळात हा प्रश्न गृह विभागाचा आहे. आपला प्रश्न फक्त वसतीगृहापूरता मर्यादित आहे. या वसतीगृहाची मान्यता ठेवणे न ठेवणे एवढयापूरते आपल्या विभागाचे काम आहे. या ठिकाणी विद्यार्थ्याचा खून करण्यात आलेला असल्यामुळे या प्रश्नाचे उत्तर गृह विभागाने दिले पाहिजे. आज आम्ही कितीही आग्रह धरला तरी या प्रश्नास आम्हाला न्याय मिळणार नाही. या गुन्हयाचे आरोपी सापडले काय ? त्या आरोपींना कोणकोणती कलमे लावण्यात आली ? या आरोपींना रिमांड दिला जाईल काय ? या संदर्भात प्रयत्न केले जाणार आहेत काय ? आरोपपत्र कधी सादर करणार ? जे आरोपी मिळाले नाहीत त्यांचा शोध कधी घेणार ? या प्रश्नांची उत्तरे गृह विभागच देऊ शकेल. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना अशा प्रकारचे प्रश्न विचारले तर ते आम्हाला या प्रश्नांची उत्तरे देऊ शकणार नाहीत. कारण त्यांच्याकडे गृह विभाग नाही. हा गृह विभागाशी संबंधित प्रश्न असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी विनंती आहे. या वसतीगृहात 24 विद्यार्थी होते. या वसतीगृहाची मान्यता रद्द केली त्याबद्दल धन्यवाद देतो. हा एक मृत विद्यार्थी सोडला तर इतर 23 विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची व रहाण्याची व्यवस्था शासनाने कुठे केलेली आहे ?

सभापती : या प्रश्नाचे उत्तर तुम्ही द्या त्यास कोणाची हरकत नाही. परंतु या प्रकरणाची सखोल माहिती घ्यावयाची असेल तर ती गृह खात्याकडूनच उपलब्ध होण्याची शक्यता आहे. मला असे वाटते की, या प्रश्नाचे उत्तर तुम्ही पूर्ण केलेले आहे. वसतिगृहात जी घटना घडली ती अतिशय गंभीर आहे. वसतिगृहातील मुलाचा खून करण्यात आलेला आहे. पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, त्या मुलाच्या कवटीला सुध्दा मार लागलेला आहे. प्रेत डिकंपोझ आहे. त्या मुलाचे प्रेत 15-20 दिवस दडवून ठेवलेले आहे.त्या मुलाचे प्रेत पाण्याच्या टाकीत टाकलेले आहे. अशा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मा.सभापती...

पध्दतीने हे प्रकरण असल्यामुळे हे निवेदन मी राखून ठेवतो. आदिवासी विकास विभाग म्हणून तुमचे उत्तर पूर्ण झालेले आहे. गृह विभागाकडून याबाबतीतील सविस्तर उत्तर मिळावे म्हणून येत्या शुक्रवारी पुन्हा हे निवेदन सभागृहासमोर ठेवण्यात यावे अशा पध्दतीने मी निदेश देतो.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : श्रीमती प्रिया केंद्रे (रा.कुशेडे,ता.माणगाव,जि.रायगड) या गर्भवती महिलेचा चुकीच्या उपचारामुळे झालेला मृत्यू.

मु. शी. : श्रीमती प्रिया केंद्रे (रा.कुशेडे,ता.माणगाव,जि.रायगड) या गर्भवती महिलेचा चुकीच्या उपचारामुळे झालेला मृत्यू याबाबत सन्माननीय सदस्य श्रीमती कांता नलावडे,श्री. मधुकर चव्हाण,श्री.विनोद तावडे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती कांता नलावडे,श्री.मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे यांनी "श्रीमती प्रिया केंद्रे (रा.कुशेड,ता.माणगाव,जि.रायगड) या गर्भवती महिलेचा चुकीच्या उपचारामुळे झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, ही अत्यंत गंभीर घटना आहे. श्रीमती.प्रिया शांताराम केंद्रे ही माणगाव तालुक्यात कुशेड येथे माहेरी बाळांतपणासाठी आली होती. दिनांक 18 फेब्रुवारी,2005 रोजी तिला त्रास होऊ लागला म्हणून तिला दासगाव येथील डॉ. मोहन मेथा यांच्याकडे ती तपासणीसाठी व औषधोपचार आली होती. त्यावेळेला डॉक्टर मेथा यांनी श्रीमती केंद्रे यांना औषधोपचार दिला आणि घरी पाठविले. श्रीमती केंद्रे घरी गेल्यानंतर तिला पुन्हा त्रास होऊ लागला म्हणून पुन्हा ती डॉक्टरांकडे आली. त्या ठिकाणी आल्यानंतर या डॉक्टरांनी तिचा कृत्रिम रित्या गर्भपात केलेला आहे. या डॉक्टरची पदवी एल.सी.ई.एच.अशी आहे. सदर डॉक्टर हा स्त्रीरोग तज्ञ नाही, प्रसुतीतज्ञ नाही, असे असताना त्या महिलेचा त्यांनी कृत्रिमरित्या गर्भपात कसा काय केला ? या ठिकाणी सर्रासपणे असा कारभार चालतो आहे काय यासंबंधीची तपासणी होणे गरजेचे आहे. त्याचे कारण असे सदर डॉक्टर हा स्त्रीरोग तज्ञ नव्हता तर त्याने श्रीमती केंद्रे यांना तात्काळ दुसरीकडे पाठवावयास पाहिजे होते. तिची 21 तारखेस प्रकृती बिघडली आणि ती परत ती त्या डॉक्टरांकडे आली त्यांनतर त्यांच्या लक्षात आले की, काही तरी गडबड घोटाळा आहे. या महिलेच्या प्रकृतीला धोका आहे असे लक्षात आल्यानंतर त्या डॉक्टराने सांगितले की, या महिलेस मुंबईस उपचारासाठी पाठवा. या डॉक्टरांने या महिलेस स्त्रीरोग तज्ञाकडे का पाठविले नाही ? सदर डॉक्टर हा स्त्रीरोग तज्ञ,प्रसतीतज्ञ नसताना त्या महिलेस ट्रीटमेंट कशी काय दिली ? मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगनन्सी ॲक्ट,1971 च्या तरतुदी तपासून सदर डॉक्टरवर कारवाई करण्याच्या सूचना करण्यात येणार आहे. ही गोष्ट सर्रास चुकीची आहे. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे श्रीमती प्रिया केंद्र या महिलेचा मृत्यू झालेला आहे. त्या बोगस डॉक्टर विरुध्द तातडीने कारवाई केली जाईल काय ?

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 14:20

नियम 93 अन्वये निवेदन..

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, काल 3.00 वा. हे निवेदन डिपार्टमेंटकडे आले त्यानंतर मी रिपोर्ट मागवून घेतला. या रिपोर्टवरुन असे दिसून येते की, ही महिला डॉ. मेहता यांच्याकडे गेली होती. या बाईच्या पोटात दुखते म्हणून काही ॲन्टीबायोटीक्स देऊन डॉक्टरांनी तिला घरी पाठविले. ही महिला पुन्हा 20 तारखेला डॉ. मेहता यांच्याकडे गेली तेव्हा डॉ. मेहता यांनी प्री मॅच्युअर्ड डिलीव्हरी ऑन दि स्पॉट केली. त्यानंतर ती घरी गेली. 21 तारखेला परत डॉ. मेहता यांच्याकडे गेल्यावर त्यांनी सांगितले की कस्तुरबा हॉस्पीटलमध्ये जाऊन इलाज करुन घ्या. 25 तारखेला ती गेली. त्याच्या अगोदर अलिबाग येथील सिव्हील हॉस्पीटलमध्ये ही महिला ॲडमिट होती आणि तेथे दोन दिवस राहून इलाज केला होता. 23 तारखेला ती हॉस्पीटलमध्ये ॲडमिट झाली आणि कोणालाही न सांगता 25 तारखेला घरी निघून गेली. सभापती महोदय, यामध्ये दोन महत्वाच्या गोष्टी दिसून येतात. डॉ. मेहता हे होमिओपॅथीक प्रॅक्टीस करणारे डॉक्टर आहेत. कायद्यानुसार ॲलोपॅथीक ट्रीटमेंट देण्याचा त्यांना कोणताही अधिकार नाही अशी ट्रीटमेंट दिली तर तो गुन्हा ठरतो. दुसरे म्हणजे प्रि मॅच्युअर डिलीव्हरी होती की गर्भपात होता हे पाहिले पाहिजे. कारण तिच्या नव-याने पोलिसांकडे 14 तारखेला तक्रार केली आणि 18 तारखेला परत स्टॅम्प पेपरवर ॲफेडेव्हीट करुन मी चुकीची तक्रार केली आहे ती मी परत घेत आहे असे सांगितले. यामध्ये संशय वाटतो. सभापती महोदय, रिपोर्ट एक्झामीन करण्यासाठी वेळ मिळाला नाही. 100 रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर ॲफेडेव्हीट देतो की मी चुकीची तक्रार केली ही बाब संपूर्णपणे तपासून घ्यावी लागेल. आमच्या खात्याच्या उपसचिवांना मी सांगितले आहे की 7 दिवसाच्या आत प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पोलीस अधिका-यांना बरोबर घेऊन या प्रकरणाची चौकशी करावी आणि मला अहवाल सादर करावा. 7 दिवसात रिपोर्ट आल्यावर मी तो सभागृहाच्या माहितीसाठी पटलावर ठेवीन.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आम्हांला यासंदर्भात दिलेले निवेदन आणि आता प्रत्यक्ष केलेले वक्तव्य याचा ताळमेळ लागत नाही. मंत्रीमहोदयांनी प्रांजळपणे कबूल केले की मृत महिलेच्या नव-याने सुरुवातीला तक्रार केली आणि मागाहून ती तक्रार परत घेतली. याचा उल्लेख या निवेदनामध्ये नाही. एका महिलेच्या मृत्यूचा हा विषय आहे. सुरुवातीलाच मंत्रीमहोदयांनी उभे राहून आम्हांला का सांगितले नाही ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 14:20

नियम 93 अन्वये निवेदन..

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला मी स्पष्टीकरण दिलेले आहे. माझ्यासमोर जी माहिती आली ती मी सभागृहाला सांगितली आहे.

यानंतर श्री. गायकवाड

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक :सभापती महोदय,या नियम 93 च्या सूचनेच्या निवेदनावरील प्रश्नोत्तराला जेव्हा सुरुवात झाली होती तेव्हा " छापल्याप्रमाणे"असे माननीय मंत्रिमहोदयांनी सागितले होते. परंतु हे उत्तर छापल्याप्रमाणे नाही.जे उत्तर छापलेले आहे त्याप्रमाणेच उत्तर असले पाहिजे अशी आमची किमान अपेक्षा असणार. परंतु स्टिरिओटाईप, हॅकनेड उत्तर देऊन माननीय मंत्रीमहोदय मोकळे झालेले आहेत.

सभापती :माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

डॉ.अशोक मोडक : माझा असा प्रश्न आहे की, चर्चेला सुरुवात झाली त्यावेळी " छापल्याप्रमाणे " असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले परंतु प्रत्यक्षात मात्र हे उत्तर छापल्याप्रमाणे नव्हते तर त्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी जो खुलासा केला होता त्याप्रमाणे उत्तर होते.या दोन्ही उत्तरामध्ये विसंगती आहे हे माननीय मंत्रीमहोदय मान्य करतील काय ?

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, ज्यावेळी विधानमंडळ सचिवालयाकडे प्रश्न येतो त्यावेळी तो आमच्याकडे पाठविला जातो. त्यानंतर त्या संदर्भात फोनवरुन वा लेखी स्वरुपात माहिती मागवली जाते आणि त्या आधारे उत्तर तयार केले जाते. त्यानंतर जेव्हा संबंधित विभागाचे अधिकारी ब्रिफींगसाठी येतात तेव्हा समोरासमोर बसून त्यांना काही प्रश्न विचारुन आणखी माहिती त्यांच्याकडून घेण्यात येत असते.

सभापती :सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांचे एवढेच म्हणणे आहे की, जी माहिती सकाळी आपल्याला मिळाली होती ती माहिती सुरुवातीलाच सांगावयास पाहिजे होती.

श्री.सुरेश शेट्टी : त्यात दुरुस्ती करण्यात येईल.

डॉ.अशोक मोडक : मला असे विचारावयाचे आहे की, डॉ.मेहता यांनी त्यांच्या अधिकारात त्या महिलेचा गर्भपात केला अशी तक्रार श्री.मंगेश शांताराम केन्द्रे यांनी केली आहे. या बाबतीत कदाचित आज अधिक माहिती मिळाली असेल परंतु याचा छापील उत्तरात खुलासा हवा होता असे मला वाटते. जर ही चर्चा झालीच नसती तर याबाबतीत पुरेसा खुलासा झाला नसता.म्हणून मला असे विचारावयाचे आहे की, या संबंधी चौकशी करुन सात दिवसानंतर जी माहिती देण्यात येणार तेव्हा नवीन निवेदन घेऊन माननीय मंत्रीमहोदय येथे येणार आहेत काय ?

सभापती : सात दिवसानंतर जी माहिती देण्यात येणार आहे ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावी.त्याकरता पुन्हा दुसरे निवेदन करण्याची गरज नाही.

श्री.सुरेश शेट्टी : होय 2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : निवेदनात डॉ. मेथा म्हटलेले आहे आणि माननीय मंत्रिमहोदयांनी डॉ. मेहता असे म्हटलेले आहे तेव्हा हे दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत काय ?

श्री.सुरेश शेट्टी : दोन्ही नावे एकच आहे.

श्री.विनोद तावडे : देवनागरीतून लिहितांना व्यवस्थित लिहावयास पाहिजे होते असे मला माननीय मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे.17 फेब्रुवारीला घटना घडली असून 25 फेब्रुवारीला तक्रार करण्यात आली होती. आज एप्रिल महिन्यातील 6 तारीख आहे. परंतु या कालावधीमध्ये जिल्हयाच्या अधिका-याकडे यासबंधीची माहिती आली होती की नव्हती.? की आपण आता त्यांच्याकडे माहिती मागितली म्हणून त्यांनी ही माहिती दिली आहे. ? त्या महिलेचा गर्भपात झाला होता की प्री मॅच्युअर डिलीव्हरी झाली होती यासंबंधीची माहिती त्यांना का मिळाली नाही ? ज्यावेळी सन्माननीय सदस्य या ठिकाणी लक्षवेधी सूचना देतील किंवा नियम 93 ची सूचना देतील त्याचवेळी त्यासबंधीची माहिती घेऊन येथे यावयाचे तोपर्यन्त त्या ठिकाणी जे काही चालू आहे ते चालूच द्यावयाचे असे आपल्याला वाटते काय ?एखादी घटना घडल्यानंतर त्याची माहिती त्या जिल्हयाच्या वैद्यकीय अधिका-यांनी माहिती होती काय ? आपल्या विभागाच्या अधिका-यांनी ही माहिती घेतलेली नसेल तर गृह विभागाच्या अधिका-यांनी माहिती घेतली होती काय ?गेल्या एक दोन महिन्यात ही माहिती आपल्याकडे उपलब्ध होती की नव्हती?

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, या महिलेचा मृत्यू घरी झाला होता. त्यानंतर तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले होते .त्या महिलेचा पोस्ट मार्टेम करण्यात आला नव्हता त्यामुळे त्याचा रिपोर्ट आलेला नाही. तसेच याबाबतीत पोलीस स्टेशनला सुध्दा काही कळविण्यात आलेले नव्हते.जेव्हा 14 तारखेला पोलीस स्टेशनला तक्रार आली तेव्हा पोलिसांना असे कळले की , अशा प्रकारची घटना घडलेली आहे. त्यानंतर तेथील सिव्हील सर्जन यांनी दोन मेडिकल ऑफिसर्सना चौकशी करण्यासाठी नेमलेले आहे . त्यानंतर एस.पी. यांना हा रिपोर्ट सादर करावयाचा आहे.या व्यतिरिक्त आम्ही असा निर्णय घेतला आहे की, आमच्या विभागातील उप सचिवांना पाठवून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे.

श्रीमती संजीवनी रायकर: माननीय मंत्रिमहोदयांनी सागितले की या महिलेचे पोट दुखावयास लागल्यामुळे तिला ॲन्टीबायोटिक्स देण्यात आले होते. तेव्हा ॲन्टीबायोटिक्सच्या रिॲक्शनमुळे तिला मृत्यू आला आहे काय ?याबाबतीत चौकशी करण्यात येणार आहे काय?

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : या महिलेला ॲन्टीबायोटिक्स दिले किंवा अन्य काही औषधे दिली असतील तर प्रिस्क्रीप्शनमध्ये त्याची काहीही नोंद करण्यात आलेली नाही.बॉडीचा पोस्ट मार्टेम करण्यात आलेला नाही त्यामुळे या महिलेला कोणते ओषध दिले गेले हे माहीत होणार नाही. तसेच औषधाच्या बाबतीत डॉक्टरांकडे काहीही रेकॉर्ड नाही..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : एकतर्फी प्रेमातून अल्पवयीन विद्यार्थिनीला ॲसिड फेकून विद्रूप करणे.

मु.शी. : एकतर्फी प्रेमातून अल्पवयीन विद्यार्थिनीला ॲसिड फेकून विद्रूप करणे याबाबत श्रीमती कांता नलावडे, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.विनोद तावडे, श्री.मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, श्रीमती संजीवनी रायकर, श्री.विनोद तावडे, श्री.मधुकर चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "एकतर्फी प्रेमातून अल्पवयीन विद्यार्थिनीला ॲसिड फेकून विद्रूप करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेसे : कृपया सोबतचे निवेदन येथे छापण्यात यावे.)

..... ओओ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 खाली मा. गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ....)

श्रीमती कांता नलावडे : अध्यक्ष महाराज, एकतर्फी प्रेमातून अशा अनेक दुर्घटना घडलेल्या आहेत, खूनदेखील झाले आहेत. आज देखील या मुंबईमध्ये अशीच एक घटना घडल्याची बातमी वृत्तपत्रातून आलेली आहे की, एका माणसाने एका महिलेच्या घरी जाऊन तिच्या माहेरच्या लोकांना जखमी केलेले आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी चेंबूरच्या शाळेतील ही ाटना आहे आणि त्यातील जो मुख्य आरोपी आहे तो त्या शाळेतच कँटीन चालवित आहे याची माहिती निवेदनामध्ये आलेली नाही. ज्याला ॲसिड त्या मुलीच्या अंगावर फेकण्यास सांगितले होते त्याला पकडल्यानंतर त्याने दिलेल्या माहितीवरून या प्रकरणातील मुख्य आरोपीला पकडण्यात आले आहे असे या निवेदनात म्हटले आहे. तेव्हा त्याचे बाबतीत अधिक चौकशी करून जर त्याचे कँटीन सदर शाळेत असेल तर ते त्वरित बंद करणार काय ? तसेच या निवेदनामध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, '...शाळेच्या वेळेत सर्व शाळेजवळ बीट अंमलदार, मोबाईल वाहने तसेच साध्या गणवेषा मधील अंमलदारांची गस्त वाढविण्यात आली आहे.' पण अशी एखादी दुर्घटना घडली की लगेच तुम्ही जागे होता आणि पोलीस यंत्रणा कामाला लावली जाते, गाड्या वगैरे येतात आणि एखादा महिना हे असेच चालू राहते आणि पुन्हा सारे थंड होते. तेव्हा एकतर्फी प्रेमातून मुलींच्या हत्या होतात हे लक्षात घेऊन कायम स्वरूपात अशा प्रकारे सर्वच शाळांच्या बाहेर आपण व्यवस्था करणार काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, या प्रकरणातील मुख्य आरोपी सदर शाळेत कँटीन चालवित असेल तर त्याबाबत चौकशी करून त्याचा परवाना रद्द करण्यात येईल आणि सन्माननीय सदस्यांनी म्हटले की, सगळीकडे असे प्रकार घडत असताना, प्रकरण घडल्यावर जागे होऊन अशी व्यवस्था केली जाते. तर या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाची दखल घेऊन कायम स्वरूपातच अशी व्यवस्था सर्वत्र करण्यात येईल.

श्रीमती संजीवनी रायकर : अध्यक्ष महाराज, या बाबतीतील पहिले प्रकरण हे रिंकू पाटीलचे घडले होते आणि त्यावेळेस सभागृहाचे इतर कामकाज थांबवून त्यावर चर्चा घडवून आणली गेली होती. आताही अशा प्रत्येक प्रकरणावर सभागृहामध्ये अशा प्रकारे चर्चा करावयाची म्हटली तर सभागृहाचे कामकाज कायमच थांबवून ठेवून आपल्याला अशा घटनांवर चर्चा करावी लागेल. अध्यक्ष महाराज, एकतर्फी प्रेमातून अशा घटना घडतात. रिंकू पाटील बाबतची दुर्दैवी घटना ही परीक्षा

..... ओओ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हॉलमध्येच झाली होती. तेव्हा लहान वयातील या मुली आहेत त्यांच्या बाबतीत खरोखरी काळजी घेण्याची अत्यंत आवश्यकता सध्या निर्माण झालेली आहे. म्हणून जेथे जेथे शाळा आहेत, विशेषत: को-एज्युकेशनच्या शाळा आहेत तेथे तेथे अशी कायम स्वरूपी व्यवस्था आपण करणार का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : अध्यक्ष महाराज, या प्रश्नाचे उत्तर मी आताच दिलेले आहे.

****

..... ओओ 4 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मेळघाट वन विभागातील शेकडो हेक्टर वनाला लागलेली आग.

मु.शी. : मेळघाट वन विभागातील शेकडो हेक्टर वनाला लागलेली आग याबाबत श्री.अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट, ॲड.अनिल परब, श्री.अनंत तरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बबनराव पाचपुते (वनमंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट, ॲड.अनिल परब, श्री.अनंत तरे यांनी "मेळघाट वन विभागातील शेकडो हेक्टर वनाला लागलेली आग " याबाबत नियम 93 अन्वये दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्यामुळे मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे.)

..... ओओ 5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 अन्वये मा.वन मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. अरविंद सावंत : अध्यक्ष महाराज, माननीय वनमंत्र्यांनी जे निवेदन येथे दिलेले आहे ते पाहता खात्यातील अधिकारी किती बेपर्वा वागतात याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे कळून येते. या ठिकाणी 480 हेक्टर क्षेत्र जळाले आहे आणि हे क्षेत्र एकूण वनजमिनीपैक्री केवळ 1.35 टक्के आहे असे दाखवून ही फार छोटी घटना घडलेली आहे असे दाखविण्याचा प्रयत्न यातून केलेला आहे. दुसरे असे की, ही आग 2 एप्रिलला लागली आणि 3 एप्रिलला विझली असे यात सांगितले आहे म्हणजेच साडेसतरा तास ही आग चालू होती आणि तरीही धाडसाने येथे नमूद करण्यात आले आहे की, त्यामध्ये कोठलेही वन्य प्राणी मेलेले नाहीत. अध्यक्ष महाराज, पुढे असेही म्हटलेले आहे की, मोहाफुले, तेंदू व चांगले गवत उगविण्याच्या दृष्टीने व इतर अनेक कारणांनी स्थानिक लोकांकडून जंगलात किंवा त्यांच्या खाजगी भागात आगी लावल्या जातात. हे सगळ्यांना अध्यक्ष महाराज, ठावूक आहे. पण त्या ठिकाणी जे आपले वन विभागाचे कर्मचारी आहेत त्यांचेकडे किती क्षेत्राची जबाबदारी दिली जाते आणि आपण 15 फेब्रुवारीला जाळरेषा कापण्याचे काम केलेले आहे असे म्हटले आहे कारण आग लागलीच तर ती अधिक पसरू नये म्हणून. पण मला तरी ते काम केल्याबद्दल शंका वाटते आहे. कारण 15 फेब्रुवारीला हे काम आपण पूर्ण केले आहे आणि 2 एप्रिलला ही आग लागली आहे म्हणून निश्चितच ही जाळरेषा झालेली नव्हती असे माझे मत आहे. तेव्हा याबाबत आपण खुलासा करावा.

(यानंतर श्री.जागडे ...पीपी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : माननीय सदस्यांनी चार-पाच प्रश्न विचारले आहेत, तेव्हा मला विस्ताराने उत्तर द्यावे लागणार आहे. मेळघाटचा एरिया मोठा आहे आणि मी स्वत: जाऊन आलो आहे. त्या ठिकाणी जाळरेषेचे काम झाले होते. मेळघाटमध्ये दोन विभाग आहेत. त्यामध्ये 68 गावे आहेत. या ठिकाणी जे उत्तर अधिका-यांनी दिले आहे, ते बरोबर आहे. कारण पाच वर्षापूर्वी ज्या अनेक घटना घडलेल्या आहेत, त्या मोठ्या प्रमाणात घडलेल्या आहेत. असे प्रकार या ठिकाणी घडत आहेत, म्हणून वेगवेगळे ग्रुप तयार केलेले आहेत. त्यामुळेच ही आग आटोक्यात आली आहे. हे वन पर्णगळीचे आहे. या दिवसात पाने गळून जातात. मोठ्या पध्दतीने वाळलेला चारा त्या ठिकाणी तयार होत असतो. त्यामुळे या ठिकाणी आग लागण्याची शक्यता आहे, म्हणून वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे. ही आग आटोक्यात आणण्यासाठी त्या ठिकाणचे प्रमुख अधिका-यासह सर्वांनी मेहनत घेतली आहे. यापूर्वी अशा प्रकारे लागलेल्या आगी लवकरात लवकर आटोक्यात आल्या नाहीत, म्हणूनच हा उल्लेख करण्यात आला आहे. या ठिकाणी एकूण 405 कर्मचारी आहेत. हंगामी 250 कर्मचारी या ठिकाणी ठेवण्यात आले आहेत. सभापती महोदय, हा अनुभव आताचा नाही. पूर्वीपासून ज्या पाच-सहा आगी लागलेल्या आहेत, त्याची सर्व माहिती माझ्याकडे आहे. 2001 मध्ये 3333 हेक्टर, 2003 मध्ये 6195 हेक्टर, 2004 मध्ये 10566, 2005 मध्ये 2768 हेक्टर वन जळाले आहे. याचा विचार केला तर या ठिकाणी सतत आग लागत आहे. आता या वर्षी खास लोकांना या ठिकाणी नियुक्त केल्यामुळे आग लवकर आटोक्यात आली आहे. तसेच यामध्ये वन्यजीवांचे प्राण गेलेले नाही. आता या ठिकाणी आग लागल्यानंतर या ठिकाणी जे थोडेफार प्राणी होते, त्यांना बाजुला सारण्यात आले. या ठिकाणी जाळरेषेचे पूर्ण काम झाले होते. सभापती महोदय, वारा आणि इतर गोष्टीमुळे इकडेतिकडे पाला झाला होता. या ठिकाणी अर्ध्या फुटापर्यन्त पाला जमा झाला होता. म्हणून ही आग लागल्यानंतर ताबडतोब आटोक्यात आणली आहे. आता अशा प्रकारची आग पुन्हा लागू नये, म्हणून त्या परिसरात सगळीकडे प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली आहे. 21 ते 31 तारखेमध्ये आम्ही वन अभियानाचा कार्यक्रम केला होता. या कालावधीत गावागावामध्ये जाऊन समित्या स्थापन केलेल्या आहेत. त्याप्रमाणे योग्य प्रकारची उपाययोजना केली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, निवेदनात " आगीचा हंगाम " असा शब्दप्रयोग करण्यात आला आहे. हे योग्य नाही. हंगाम पिकांचे असतात. त्याप्रमाणे आगीचाही हंगाम येतो असे माननीय मंत्रिमहोदयांना म्हणावयाचे आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्या भागात यावे, म्हणजे त्यांच्या लक्षात ही बाब येईल. उन्हाळ्यात आगी लागत असतात. त्यामुळे तसे शब्द वापरले आहेत.

श्री. अरविंद सावंत : " आगीच्या प्रादुर्भावाचा कालावधी " असे आपण म्हणू शकता. मी यापूर्वी एसओएस संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते की, माझी सूचना विचारात घेण्यात येईल. परदेशात वनवा पेटला किंवा मोठी आग लागली की, हेलिकॉप्टरच्या माध्यमातून कार्बन डाय ऑक्साईडची फवारणी केली जाते. त्याप्रमाणे हे शासन करणार आहे ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या आगीमध्ये किती सागांचे नुकसान झाले आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही परवा घडलेली घटना आहे. त्यामुळे या ठिकाणी पंचनामा करावा लागेल. या बाबत आपण बिनतारी यंत्रणk त्या ठिकाणी उभारली आहे. वनाला आग लागल्यानंतर ती त्वरीत विझविण्यासाठी सर्व तयारी आम्ही केली आहे. येथून पुढे मोठ्या प्रमाणात आग लागू नये, म्हणून आम्ही सतर्क आहोत.

-

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1 संबंधी

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविलेली लक्षवेधी सूचना क्र. 1 मी पुढे ढकलली आहे. ही लक्षवेधी सूचना शुक्रवार, दि. 8.4.2005 रोजी घेण्यात येईल. ही लक्षवेधी सूचना गृहनिर्माण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच विधी व न्याय विभागाशी संबंधीत आहे. खरे पाहता विधी व न्याय विभागाने या लक्षवेधी सूचनेला उत्तर द्यावे, अशी मा. सदस्यांची इच्छा आहे. त्या दृष्टीने मी या बाबत चर्चा करीन. नंतर त्या विभागाला सूचना देईन व 8 तारखेला ही लक्षवेधी सूचना घेतली जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उद्या ही लक्षवेधी सूचना घ्यावी.

सभापती : माननीय सदस्यांनी मला माझ्या दालनात भेटावे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: रत्नागिरी शहरातील कापड व्यापारी मदन ओसवाल यांच्या मुलीचे होत असलेले लैगिक शोषण

मु.शी.: रत्नागिरी शहरातील कापड व्यापारी मदन ओसवाल यांच्या मुलीचे होत असलेले लैगिक शोषण यासंबंधी श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, डॉ. वसंत पवार, प्रा. जोजेंद्र ज वाडे, सर्वश्री जज्नाथ शेवाळे, राजेंद्र जै□, वसंतराव चव्हाज, संजय दत्त, □तिजोद्दि□ जतिब, ध□ाजी साठे, सुधाज र ज्जज्जे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ □ियम 101 अ□ये पुढील तातडीच्या व सार्वजनि□ज महत्वाच्या बाबीज डे स□ाा□ीय उप मुख्यमंत्र्यांचे लज वेधू इच्छिते आजि त्याबाबत त्यां□ी नि□वेद□ ज रावे, अशी वि□ती ज रते.

"रत□ाजिरी शहरातील ज पड व्यापारी मद□ ओसवाल यांच्या मुलीचे लैंजिज शोषज ज रु□ सुमारे 75 लाज रुपयांची संज□मता□ चोरी जे ल्याची उघडज ीस आलेली धक्ज दायज माहिती,यामधील आरोपी ओसवाल ज ुटूंबियां□ा धमज ावत असून जिवितास नि□र्माज झालेला धोज ा व चोरीस जेलेले व पोलिसां□ी पज डलेले सुमारे 15 ज िलो सो□याच्या दाजि□यांपैजी 7 ज िलो सो□ व सुमारे 12 लाज रुपये ओसवाल ज ुटूंबियां□ा देज्यास तसेच सेक्स स्ज ँडलच्या चौज शीमध्ये पोलीसांज डू□ होत असलेली टाळाटाळ, ब्लॅज मेलींज ज रु□ झालेल्या सेक्स स्ज ँडलची चौज शी व लजावधी रुपयांचा चोरी जे लेला ऐवज परत मिळज्याप्रज रजी होत असलेली दिरंजाई, या प्रज रजी सजोल चौज शी ज रु□ संबंधित दोषिविरुध्द ज डज ज ारवाई ज रज्याची पोलिस महासंचालज यांचेज डे अलिज डील ज ाळात श्री. ओसवाल, स्था□िज लोज प्रति□िधी तसेच सामाजिज संस्थां□ी जे लेली माजजी, याज डे शास□ाचे होत असलेले दुर्लज, परिजामी परिसरातील व्यापारी तसेच ज□तेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच असुरजिततेचे वातावरज, तीव्र आंदोल□ाचा दिलेला इशारा, सदर प्रज रजातील आरोपींज डू□ पिडीत ज ुटुंबियांच्या जिवितास धोज ा नि□र्माज झाला असल्या□ यासर्वच जैरप्रज राची उच्चस्तरीय सजोल चौज शी होऊ□ संबंधित दोषींविरुध्द ज ारवाई होज्याची अत्यावश्यज ता, याप्रज रजी तातडी□ ज रावयाची ज ारवाई आजि शास□ाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे(गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सूपर्ण महाराष्ट्राला लाजवेल अशा एका घटनेकडे मी या सभागृहाच्या माध्यमातून लक्ष वेधू इच्छिते. एखाद्या मुलीवर अत्याचार झाल्यानंतर ती सर्वांसमोर येऊन माहिती देत असेल व त्या बाबत तक्रार करीत असेल तर त्याचा शासनाने गंभीरपणे विचार केला पाहिजे. तिने कोकण परिमंडळचे पोलीस सहआयुक्त श्री. सत्यपालसिंह यांच्याकडे दिनांक 24.8.2004 रोजी तक्रार नोंदविली होती.. त्या मुलीवर मानसिक, लैगिक व आर्थिक अत्याचार करुन तिचा छळवाद केल्यानंतर सुध्दा संबंधित आरोपींना पाठीशी घातले जात आहे. पोलीस निरीक्षक श्री. सातर्डेकर व श्री. संजय मोहिते यांनी ही केस दाबण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यात अशा घटना घडल्यानंतर माझ्यावर अत्याचार व लैगिक शोषण झाले आहे अशा प्रकारे किती मुली पुढे येऊन सांगत आहेत? सभापती महोदय, हे फार मोठे रॅकेट आहे. हे रॅकेट उघडकीस आणून या प्रकरणात जे आरोपी सहभागी असतील त्यांना भर चौकात फोडून काढले पाहिजे व त्यांना धुरी दिली पाहिजे. हे प्रकरण उघडकीस आणले तर लैगिक शोषणाचे फार मोठे रॅकेट आपल्याला मिळेल. माझा प्रश्न असा आहे की, श्री. ओसवाल यांची जप्त केलेली मालमत्ता त्यांना परत मिळावी यासाठी त्यांनी मागणी केली असता तुम्ही पहिल्यांदा केस मागे घ्या तरच तुमची मालमत्ता परत करतो अशी पोलिसांनी त्यांना धमकी दिली आहे. . माझा पहिला प्रश्न असा आहे की, पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेण्यास उशीर कां लावला? उर्वरित माल हस्तगत करण्याची कारवाई चालू आहे म्हणजे नेमकी कोणती कारवाई चालू आहे? निवेदनात "आरोपींविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आलेली आहे" असे म्हटले आहे. म्हणजे नेमकी कोणती कारवाई करण्यात आली आहे? ज्या कॅसेटचा आधार घेऊन हे दोन आरोपी त्या मुलीला ब्लॅकमेल करीत होते, त्या कॅसेटचे पुढे काय झाले? त्या बाबत आरोपींवर कोणती कारवाई करण्यात आली? तसेच, अशाप्रकारची घटना घडल्यानंतर स्वत:हून तक्रार करण्यास कुणी पुढे येत असेल तर त्यांच्यासाठी शासन काय कडक उपाय योजना करणार आहे?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या मुलीवर 2001 पासून 2004 पर्यंत सतत साडे तीन वर्षे अत्याचार चालू होता. त्या बाबत संबंधित तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, या प्रकरणामध्ये श्री. ओसवाल यांच्या घरामध्ये चोरी झाली त्याबाबत गुन्हा नोंदविण्यात आला व संबंधित आरोपींना अटक करण्यात आली. त्या तीन आरोपींना न्यायालयाने जामीन मंजूर केला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे....

माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे या प्रकरणी जर कुणी चुकीच्या पध्दतीने तपास करीत असेल तर त्या बाबत निश्चितपणे चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी सांगितल्या प्रमाणे संपूर्ण महाराष्ट्राला लाजवेल अशी घटना आहे. एका 14 वर्षाच्या मुलीचे 2001 ते 2004 पर्यंत लैगिक शोषण होते हे कोणत्या माणुसकीचे लक्षण आहे? याचा सभागृहाने विचार केला पाहिजे. अशा परिस्थितीत ती मुलगी श्री. सत्यपालसिंह साहेबांना भेटून सांगते की, अशा प्रकारे माझ यावर बलात्कार करण्यात आला आहे. व त्यामध्ये सहा आरोपींची नावे देण्यात आली आहेत.तरीसुध्दा पोलीस कोणत्याही पध्दतीने तपास करीत नाहीत याला काय म्हणायचे? पोलीस त्या फिर्यादीला बोलावितात, धमकावितात आणि तक्रार मागे घेण्यास सांगतात, हा काय प्रकार आहे?

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

तुम्ही आरोपींना का लपवित आहात ? ती अल्पवयीन मुलगी आहे आणि ती स्वत:हून नावे देत आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर असताना याबाबतीत "तपास पुढे चालू आहे" एवढेच आपण सांगणार आहात का ? याबाबतीत संबंधितांवर कोणती कडक कारवाई करणार आहात ? चोरीला गेलेला माल कसा परत मिळविणार आहात ? हा प्रश्न आहे. उत्तरात म्हटलेले आहे की, हे घडलेले आहे. त्या मुलीचे गेल्या चार वर्षापासून शोषण सुरु आहे. तिने पोलिसांना सांगितले की, यामध्ये आणखी सात मुली सामील होत्या. पण त्यांचा आवाज गप्प करण्यात आला. तेव्हा या मुलीने दिलेल्या निवेदनाच्या आधारावर पोलिसांनी आजपर्यंत कोणती कारवाई केली आहे?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्या मुलीने दिलेल्या निवेदनाच्या आधारावर पोलिसांनी काय-काय कारवाई केली, ते मी मघाशीच सांगितलेले आहे. त्या मुलीने जी तीन नावे दिली होती, त्यांना अटक करण्यात आली होती. पण न्यायालयाने त्यांना जामीन दिला आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे . . . .

सभापती : या प्रश्नाचे उत्तर अचूक काढण्यासाठी आपली जी भावना आहे, तशी याबाबतीत माझीही तीच भावना आहे. फक्त अगोदर माननीय मंत्री महोदयांना पूर्ण देऊ द्या. या निवेदनावरील चर्चा दोन मिनिटात संपणार नाही. सन्माननीय सदस्यांना मी नंतर संधी देईन.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये संबंधितांवर काय कारवाई केली असा प्रश्न विचारला असता, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, संबंधितांना अटक केली आणि ते नंतर जामिनावर सुटले. माननीय मंत्री महोदय सातत्याने सांगत आहेत की, कायदेशीर कारवाई सुरु आहे. पण हे असे सुरु असताना तुमची केस कोर्टात उभी राहणार आहे का ? त्या मुलीला पोलीस खात्याकडून सांगितले जात आहे की, ही केस मागे घे. तेव्हा कोणत्याही परिस्थितीत त्या मुलीवर अशा प्रकारचा दबाव येता कामा नये, तिला संरक्षण मिळाले पाहिजे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, संबंधित मुलीवर कोणत्याही परिस्थितीत दबाव येणार नाही आणि कोणी दबाव आणण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनाच्या पान क्र.2 वरील

. . . .2 आर-2

श्रीमती कांता नलावडे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुस-या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे की, "सदर मुलीला कॅसेटची भीती दाखवून तिच्या मदतीने श्री.ओसवाल यांच्या जुन्या घरातील तिजोरीतील रकमेची चोरी करण्यात आली." माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे आहे की, चोरीच्या प्रकरणातील आरोपी वेगळे आहेत आणि या मुलीवर सातत्याने बलात्कार करणारे आरोपी वेगळे आहेत. म्हणजे कॅसेटची भीती दाखवून तिच्या मदतीने चोरी करणारे आरोपी वेगळे आहेत का ? की, कॅसेटची भीती दाखवून चोरी करणारे आरोपी आणि तिच्यावर बलात्कार करणारे आरोपी एकच आहेत की वेगवेगळे आहेत ? यापूर्वी पुणे येथील एका हॉस्टेलमध्ये घडलेले प्रकरण उजेडात आले आहे. त्यामध्ये हॉस्टेलमध्ये छुपे कॅमेरे ठेवले असल्याचे दिसून आले आहे. तेव्हा याबाबतीत महाराष्ट्र शासन काही कारवाई करीत आहे का ? तेव्हा चोरी करणारे आणि बलात्कार करणारे आरोपी एकच आहेत का ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सुरुवातीला दरोडयाची, घरफोडीची तक्रार देण्यात आली. त्यातील मुख्य आरोपी राजेश मयेकर असून, तो त्यामधीलही आरोपी आहे म्हणजे हा आरोपी दोन्ही ठिकाणी आहे. त्यामुळे त्याला न्यायालयात हजर केल्यावर, त्याला जामीन दिला आहे. पोलिसांनी आपल्या विभागामार्फत हा जामीन रद्द करण्यात यावा म्हणून वरच्या कोर्टाला विनंती केली. पण कोर्टाने ते मान्य केले नाही. मग याबाबतीत हाय कोर्टात अर्ज केला असून अजून त्याबाबतचा निर्णय यावयाचा आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपल्या राज्यातील पोलीस खात्याला अत्यंत कलंकित करणारी ही बाब आहे. यामध्ये रत्नागिरी पोलीस स्टेशनचे फौजदार श्री.सातर्डेकर आणि आरोपी यांचे संगनमत असल्याचे दिसत आहे. सदर मुलीच्या वडिलांनी जी फिर्याद केली आहे, त्या मध्ये स्पष्टपणे लिहीलेले आहे की, "माझ्या मुलीने पोलीस निरीक्षक, श्री.सातर्डेकरसाहेब यांना 12-13 कि.सोन्याचे दागिने आणि 70-80 लाख रुपयांची चोरी झाल्याचे सांगितले. पण सातर्डेकरसाहेब आणि त्यांच्या अधिका-यांनी मुलीची तक्रार लिहून घेतली नाही आणि माझ्या अल्पवयीन मुलीला दोन-तीन वेळा मारहाणही केली."

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे चालू....

ज्या मुलीवर पाच-सहा सैतानांनी बलात्कार केला, तिला ब्लकमेलिंग केले. त्या आरोपींना दांडक्यांनी मारुन त्यांच्या तंगड्या तोडण्याची आवश्यकता होती. पकडलेले 12 किलो सोन्याच्या ऐवजी 7 किलो सोन्याचे दागिने दिले. त्या अल्पवयीन मुलीला मारहाण केलेली आहे. केवळ पोलीस खात्याचे अधिकारी श्री.सातर्डे यांना वाचविण्याचे काम गृह विभाग करीत आहे. असे होत असेल तर....

(सभापतीस्थानी मा.उपसभापती)

राज्याची पोलीस खात्याची प्रतिमा मलीन झाल्याशिवाय रहाणार नाही, याबद्दल शासन काय कारवाई करणार आहे ?

अनेक सनमाननीय सदस्य : त्या अधिकाऱ्याला सस्पेंड करा .

श्री.विनायक मेटे : इन्स्पेक्टर श्री.सातर्डे यांना निलंबित करणार आहात काय ?

श्रीमती सुधा जोशी : दुर्दैवाने बलात्काराचे प्रकार मोठ्याप्रमाणात वाढायला लागलेले आहेत. या प्रकरणामध्ये अल्पवयीन मुलीवर बलात्कार केलेला आहे, ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. हे बलात्काराचे प्रकार थांबविण्याच्यादृष्टीने कायमस्वरुपामध्ये शासन कोणती कारवाई करणार आहे ? तसेच ही शाळकरी मुलगी लहान असून कोवळी आहे, या कोवळ्या वयामध्ये तिच्यावर बलात्कार झालेला आहे. तिच्यावर बलात्कार केला, त्यावेळेला त्या मुलीचे वय काय होते ? ज्या पालीस अधिकाऱ्यांनी एकंदरीत लैगिक अत्याचार केला, त्यास निलंबित करणार आहात काय, त्यांना निलंबित करावे अशाप्रकारची आमची मागणी आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : निलंबित करुन, या प्रकरणाची सीआयडी चौकशी झाली पाहिजे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : ही घटना अत्यंत गंभीर आहे. घा घटनेच्याबाबतीत सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता,संबंधित अधिकाऱ्याला निलंबित केले जाईल आणि चौकशीसाठी सी.आय.डी.कडे प्रकरण दिले जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : मंत्री महोदयांनी संबंधितांना निलंबित करण्यात येईल असे सांगितले. परंतु यामध्ये तीन अधिकाऱ्यांची नावे लिहिलेली आहेत. त्यामध्ये श्री.कश्यप, श्री.सत्यपाल सिंग. आणि श्री.सातर्डे हे आहेत. म्हणजे नेमके कोणत्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात येणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : पोलीस इन्स्पेक्टर जे आहेत, त्यांना निलंबित करण्यात येईल.

उपसभापती : मी या खुर्चीवर बसल्यानंतर काय होते ते पहा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई शहरात अंमली पदार्थाची कोट्यावधी रुपयांची होत असलेली उलाढाल.

मु. शी : "मुंबई शहरात अंमली पदार्थाची कोट्यावधी रुपयांची होत असलेली उलाढाल" यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" चुनाभट्टी येथे दिनांक 17 मार्च 2005 रोजी वा त्या सुमारास मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने राजस्थान आणि मध्यप्रदेश येथून 12 कोटींचे ब्राऊनशुगर घेऊन येणाऱ्या दोघा जणांना केलेली अटक, यापूर्वीही मुंबई पोलिसांनी नरीमन पॉईंट येथे सागर किनाऱ्यावर असलेल्या धूप प्रतिबंधक खडकांमध्ये गर्द, ब्राऊन शुगरसारख्या अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या लोकांना केलेली अटक, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात गर्द, ब्राऊन शुगर सारख्या अंमली पदार्थांची कोट्यावधी रुपयांची दररोज होत असलेली उलाढाल, या प्रकरणी मुंबई पोलिसांनी कसून चौकशी करुन यातील प्रमुख आरोपींना पकडून त्यांचेवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई, याबाबत शासनाच्या प्रतिक्रिया. "

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या अगोदरचा जसा विषय गंभीर होता तसाच हा विषय तरूण पिढीला बरबाद करणारा आहे. सोमय्या हॉस्पिटलच्या दरवाजाजवळ हे आरोपी पकडले. त्यांच्याकडून गर्द हस्तगत करण्यात आली. त्या गर्दची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये 12 कोटी रुपये आहे. निवेदन स्वयंस्पष्ट आहे, खरे तर पहिल्यांदा याबाबत मंत्री महोदयांना धन्यवाद दिले पाहिजेत. आजपर्यन्त या व्यतिरिक्त किती गर्दचे गुन्ह्ये पकडले ?

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

त्यांच्याकडून एकूण किती गर्द ताब्यात घेतले ? निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "मुंबई शहराची शान असलेल्या नरीमन पॉइन्ट सागर किनाऱ्यावर धुपप्रतिबंधक खडकामध्ये तपासणी केली असता अंमली पदार्थाचे सेवन करणारे कोणीही इसम मिळून आले नाहीत त्यामुळे अटकेची कारवाई करण्यात आली नाही." यामध्ये केव्हा तरी एखादी तपासणी केली असेल. आपण माझ्याबरोबर चलावे, मी आपल्याला दाखवून देतो. रेल्वे रुळाच्या शेजारी तुम्हाला पाहिजे तेवढे गर्दुल्ले मिळतील. काल परवा मी या शहरातील गुंफांचा ठेवा जतन करण्याबाबत सांगितले होते की, त्यामध्ये मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला सांगितले की, महाकाली गुंफेच्या शेजारी सर्व गर्दुल्ले बसतात. त्या गर्दुल्ल्यांना पकडले तर ते गर्द त्यांना कोठून मिळते हे कळेल. म्हणून त्या गर्दुल्ल्यांना पकडून याचा छडा लावणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, मुंबई विभागामध्ये आतापर्यन्त किती गर्द पकडले असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. आतापर्यन्त 283 गुन्हे दाखल केले आणि 825 लोकांना अटक करण्यात आली. जप्त केलेला माल 701 किलो असून भारतीय किंमतीप्रमाणे त्यांची किंमत 1 कोटी 35 लाख 72 हजार 915 रुपये आहे. गर्दचे व्यसन करणारे कोठे कोठे बसतात, त्यांचे काय चाळे चालतात याची माहिती दिली. त्यासंबंधीची सर्व माहिती पोलिसांना देण्यात येईल आणि त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/ KGS/ MHM/

पृ. शी. : राज्यात दूध व्यवसायाची होत आलेली पिछेहाट.

मु. शी. : राज्यात दूध व्यवसायाची होत आलेली पिछहाट यासंबंधी श्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री रणजिसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, प्रा. फौजिया खान, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात दूध व्यवसायाची होत आलेली पिछेहाट, दुग्ध व्यवसायासाठी आवश्यज असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव, शासजीय यंत्रजेचे होत असलेले दुर्लज, पशुजाद्याचे वाढजारे भाव, तसेच दूध संज्ल-ात होत असलेली वाढ व त्याचबरोबर परराज्यातू-ा येजारे दूध यावर शास-ाचे पूर्ज दुर्लज होजे, राज्यातील दूध सहज्ारी संघाचे व प्राथमिज दूध संस्थांचे प्रशासजीय जर्च -ा वाढविजे, स-ा 2001 पासू-ा दूध जरेदीच्या दरात वाढ -ा होजे, त्यामुळे दूध उत्पादज्ां-ा सोसावा लाज्जारा त्रास, डिझेलच्या वाढत्या दराबरोबर राज्यातील सहज्ारी दूध संघा-ा वाहतुज दर -ा वाढविजे, त्याचबरोबर शासजीय दूध योज-ेतू-ा दुधाचे पेमेंट वेळेवर -ा होजे, त्यामुळे दूध उत्पादज व व्यावसायीज्ांमध्ये पसरलेले चिंतेचे व अकस्थरतेचे वातावरज, या प्रज्रजी त्वरित उपाययोज-ा ज्रज्याची आवश्यज्ता, याबाबत शास-ा-े ज्ेलेली वा ज्रावयाची ज्ार्यवाही उपाययोज-ा आजि शास-ाची प्रतिज्रिया."

श्री. हसन मुश्रीफ (दुग्धविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/ KGS/ MHM

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यामध्ये "दुधाचा महापूर" ही योजना राबविण्याचे ठरविले आणि राज्यातील शेतकऱ्यांनी सुध्दा त्या योजनेला अतिशय चांगला प्रतिसाद दिला. शेतकऱ्यांच्या आणि विशेषत: दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या ज्या अडचणी होत्या, राज्यामध्ये सातत्याने पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती बरोबर नाही. काही ठिकाणी वीज आहे तर पाणी नाही आणि पाणी आहे तर वीज नाही अशा प्रकारच्या परिस्थितीमध्ये दुधाचा धंदा हा दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचा तारणहार ठरणारा धंदा ठरलेला आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी कर्ज काढून गाई-म्हशी घेतल्या आणि हा व्यवसाय सुरु केला. परंतु आज चिंतेची बाब अशी आहे की, त्यांचे दूध शिल्लक राहते, काही दूध घेतले जात नाही आणि काही दुधाला दर मिळत नाही. दुष्काळी परिस्थितीमध्ये अतिशय पूरक असलेला व्यवसाय अतिशय अडचणीत आलेला आहे. विशेषत: महिलांसाठी हा व्यवसाय अतिशय उपकारक व्यवसाय आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. शेतकरी शेतामध्ये काम करतो आणि महिला दुधाचा व्यवसाय करतात आणि त्यातून जे उत्पन्न मिळेल त्यावर आपला चरितार्थ चालवित असतात. सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, या राज्यामध्ये सातत्याने तीन वर्षात, पाच वर्षात दुष्काळ पडतो आणि त्या दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्याला दुधाच्या धंद्याशिवाय दुसरा पर्याय नाही अशी परिस्थिती आहे. काही ठिकाणी चारा नाही. अशा परिस्थितीमध्ये राज्य शासनाचे या धंद्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे असे म्हणावेसे वाटते. दराच्या बाबतीत सांगावयाचे तर शासन जे दर ठरविते ते दर आपण मान्य करतो. मी मघाशी सांगितले की, दूध घेतले जात नाही. रस्त्यावर दूध ओतण्याची पाळी या दूध उत्पादकांवर आलेली आहे आणि तशी वेळ येतच राहणार आहे. अशा परिस्थितीमध्ये आणखी मोठी अडचण किंवा संकट म्हटले तरी हरकत नाही पण परराज्यातील येणाऱ्या दुधामुळे फार मोठी समस्या निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून या परिस्थितीत सहकारी संस्थांनी फार मोठी कामगिरी या राज्यामध्ये केलेली आहे. हे करीत असताना शासनाने काही बाबींचा विचार केला पाहिजे, त्या बाबींचा विचार होत नाही म्हणून खेदाने म्हणावेसे वाटते. माझी मा.मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, दरवाढीसाठी शासन मदत करु शकते परंतु काही मदतीचा विचार होण्याची गरज आहे, त्यासंबंधी शासन निश्चितपणे निर्णय घेऊ शकते. प्रामुख्याने सहकारी संस्थांबाबत प्रशासकीय खर्चासंबंधी जो काही निकष आहे त्यामध्ये जो दर दिला जातो. शासनाकडून 27.12.2000 पासून दूध खरेदी केले जाते त्यानुसार प्राथमिक दूध संस्थांना 40 पैसे प्रति लिटर, सहकारी संघांना 90 पैसे प्रति लिटर प्रशासकीय खर्च मिळत आहे. त्यांना लाईटचा खर्च येतो, वाहतुकीच्या खर्चामध्ये स्पेअर पार्टस आहेत, डिझेलचा खर्च आहे, पगारवाढ आहे, नोकर पगारवाढ आहे, स्टेशनरी आहे, टेलिफोन इतर खर्च आहे हा परवडत नाही म्हणून त्यामुळे प्रशासकीय खर्चात वाढ करणे आवश्यक आहे. म्हणून विदर्भ पॅकेजप्रमाणे दुष्काळी जिल्हयातील दूध उत्पादकांना सुध्दा मदत मिळाली पाहिजे. प्राथमिक दूध संस्थांना 40 पैसे कमिशन मिळते ते परवडत नसल्यामुळे ते 50 पैसे दर होण्याची आवश्यकता आहे. अंतर्गत वाहतुकीसाठी 50 पैसे लिटर आहे ते डिझेलच्या दरवाढीमुळे 1 रुपया करणे आवश्यक आहे. तसेच कॅनचा खर्च, व्यवस्थापकीय खर्च, शीतकरण, प्रक्रिया, प्रशासकीय कमिशन या गोष्टींचा विचार केला तर यामध्ये दरवाढ होणे आवश्यक आहे. दूध खरेदी दरामध्ये सुध्दा वाढ होण्याची गरज आहे. राज्याच्या दूध खरेदीचा दर दोन टप्प्यात आहे, पहिल्या सहा महिन्यासाठी एक दर व दुस-या सहा महिन्यासाठी एक दर अशी तफावत कशासाठी ठेवली आहे ? हिवाळयामध्ये एक दर व उन्हाळयामध्ये एक दर आहे. सरप्लस सीझन व लीन सीझन हा प्रकार म्हणजे दूध उत्पादकांवर अन्याय करणार आहे. हा फरक का केला जातो हे समजत नाही. यामध्ये सुध्दा एकसारखा दर ठेवण्याची आवश्यकता आहे.

उप सभापती : मा.सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील : माझा प्रश्न असा आहे की, डिझेलची दरवाढ झालेली आहे, दुधाचे पेमेंट वेळेवर मिळत नाहीत, जिल्हा अंतर्गत वाहतुकीच्या दरामध्ये वाढ होत नाही, परराज्यातून येणा-या दुधावर नियंत्रण नाही, त्यांच्यावर कर आकारणी केली जात नाही, यामध्ये शासन काय कार्यवाही करणार आहे आणि दुधामध्ये दरवाढ देणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये एक छोटीशी दुरुस्ती करावयाची होती. या निवेदनामध्ये "पुष्ठ काळात 10.80 पैसे म्हटले आहे त्याऐवजी 9.60 पैसे आणि कृष काळात 9.60 पैसे म्हटले आहे त्याऐवजी 10.80 पैसे असे वाचावे." मा.सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी या लक्षवेधीद्वारे या राज्यामध्ये दुधाच्या व्यवसायाबाबत अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. हे खरे आहे की, सातत्याने जनावराच्या, चा-याच्या खरेदीत, जनावराच्या किंमतीमध्ये आणि त्या अनुषंगाने श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकरसाहेबांच्या नेतृत्वाखाली समिती नेमली होती त्याप्रमाणे दर ठरविले होते. दुधाचे दर वाढण्यासाठी टँकरच्या डिझेलचे दर वाढतात त्यावेळी डिझेलच्या दरात वाढ केली जाते. म्हणून सोसायटीला कमिशन देणे आणि कृष व पुष्ठ काळात फरक यासाठी आहे की, पृष्ठ काळात दूध मोठया प्रमाणात येते आणि मुंबई ही बाजारपेठ आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हसन मुश्रीफ पुढे सुरु...)

मुंबई मार्केटमध्ये अमूल, मदर डेअरी, गोकूळ, वारणा असे दूधसंघ दुधाची विक्री करतात. महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले असे राज्य आहे की, राज्यात उत्पादन झालेल्या दुधाचा थेंब न थेंब खरेदी करते. त्यामुळे शासनाला पहिल्यापासून 3000 कोटी रु.चा संचित तोटा असताना सुध्दा दुधाला दर ठरवून देण्याचे काम शासनाने केलेले आहे. ज्या वेळी दुधाच्या दरामध्ये वाढ करण्यासारखी परिस्थिती निर्माण होते अशा वेळी शासन निश्चितपणे त्याबाबतीत विचार करुन कारवाई करीत असते.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : राज्यामध्ये 40 हजार जनावरांमागे एक दवाखाना आहे. तेव्हा ही दवाखान्याची संख्या शासन वाढविणार आहे काय ? मागे बाहेरुन येणा-या दुधावर टॅक्स बसविण्याचे आश्वासन दिलेले होते. त्या आश्वासनाची पूर्तता शासन करणार आहे काय ? परराज्यातून 22 लाख लिटर दूध आपल्या राज्यामध्ये येते आणि आपल्या राज्यात 18 लाख लिटर दूध उत्पादित होते. राज्यातील दुधावर कर बसविला आणि त्या पटीत परराज्यातून येणा-या दुधावर कर बसविला तर शासनाच्या महसुलामध्ये देखील वाढ होईल. दुसरे असे की, खाजगी दूध उत्पादकांचे जे दूध बाजारामध्ये विक्रीला येते त्या दुधावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. ज्या प्रमाणे शासकीय दुधाची तपासणी होते तशी खाजगी दूध उत्पादकांच्या दुधाची तपासणी होत नाही. तेव्हा त्यांच्या दुधाची तपासणी करण्यासाठी शासन कोणती व्यवस्था करणार आहे ? बाजारामध्ये टोण्ड, होल, स्टॅण्डर्ड, गायीचे आणि म्हशीचे असे पाच प्रकारचे दूध येते. टोण्ड, गाईचे आणि म्हशीचे असे तीन प्रकारचे दूध बाजारात आणता येऊ शकेल. तेव्हा त्यादृष्टीने कारवाई व्हावी. शालेय पोषण आहारामध्ये जशी अंडी आणि अन्य पदार्थ दिले जातात त्याप्रमाणे दूध देखील दिले जाईल काय ?

श्री. हसन मुश्रीफ : जनावरांच्या संख्येत वाढ झालेली असल्यामुळे जनावरांचे दवाखाने वाढविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. परराज्यातून येणा-या दुधावर लिटरमागे 1 रुपया प्रवेश कर लावण्याचा प्रस्ताव होता परंतु त्यास केन्द्राने परवानगी दिली नाही. तशी परवानगी मिळाली तर लिटर मागे 1 रुपया प्रवेश कर लावण्यात येईल. टोण्ड आणि डबल टोण्ड दूध हे गाईच्या आणि म्हशीच्या दुधापासून केले जाते. ते बंद करण्याचा आज तरी शासनाचा विचार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : या लक्षवेधीच्या माध्यमातून राज्यातील दूध व्यवसायाचे विदारक चित्र येथे उभे राहिलेले आहे. जे दूध उत्पादक शासकीय दूध योजनांना आपले दूध देतात त्यांना वेळेवर पेमेंट मिळत नाही. शासनाने दूध-उत्पादकांचे सर्व दूध खरेदी करण्याची हमी घेतलेली आहे. शासकीय दूध योजनांना जे दूधसंघ दूध पुरवितात त्यांना अदा करावयाची रक्कम पतपत्राला मंजुरी मिळाल्यानंतर दिली जाते. यामध्ये बराच कालावधी जातो. तेव्हा जे दूधसंघ अशा प्रकारे दूध पुरवितात त्यांना वेळेवर पेमेंट होण्यासाठी आणि त्यांना मानसिक त्रास सहन करावा लागू नये यासाठी पेमेंटकरिता सोपी पध्दत शासन वापरणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : शासन जे दूध खरेदी करते त्याचे पतपत्रावर बिल होते. काही वेळा यामध्ये विलंब होतो, लोकांना त्रास होतो हे खरे आहे. याबाबतीत पीएलअे अकौन्टची मागणी केलेली होती. परंतु या योजनेमध्ये तोटा असल्यामुळे पीएलअे अकौन्ट काढण्यास बंदी आहे. मा.सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी पेमेंट वेळेवर मिळण्याबाबत सूचना केलेली आहे. त्याबाबतीत शासन अवश्य विचार करील.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख : सन्माननीय सदस्य प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी अत्यंत महत्वाची दूध व्यवसायाविषयीची लक्षवेधी सूचना या सभागृहात मांडलेली आहे. महाराष्ट्रामध्ये दूध धंद्यास संरक्षण राज्य सरकारने दिले म्हणून सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. राज्यात निर्माण होणारे सर्व दूध शासन खरेदी करीत असते. परंतु राज्य शासनाला एक गोष्ट माहिती असेल की, दूध धंदा महाराष्ट्रात वाढलेला आहे. त्यामुळे हजारो सुक्षिक्षित तरुण, हजारो गरीब लोक हा धंदा करीत आहे. सधन शेतक-यांच्या हातातून हा धंदा निसटलेला आहे. या दूध धंद्यासाठी पुढील पाच वर्षासाठी शासनाने काही प्लॅनिंग केलेले आहे काय ? राज्यात दूधाचे प्रमाण दिवसें दिवस वाढते आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, 1950 साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशातील दुधाचे उत्पादन 170 लाख टन होते. आज राज्यात दुधाचे उत्पादन 750 लाख टन एवढे झालेले आहे. या देशातील शेतक-यांनी दुधाच्या धंद्यात प्रचंड क्रांती केलेली आहे. नार्वे सारखा देश 265 कोटी रुपयांची निर्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची करतो आणि भारत देश फक्त 35 कोटी रुपये निर्यात करीत आहेत. नार्वे सारखा लहानसा देश 265 कोटी रुपयांची दुग्धजन्य पदार्थांची निर्यात करतो. महाराष्ट्रामध्ये दुधाचा धंदा वाढीस लागलेला आहे. महाराष्ट्रात अशा पध्दतीने निर्माण होणारे दुध त्यापासून निर्माण करण्यात येणारे दुग्धजन्य पदार्थ, त्याची निर्यात आणि दूध उत्पादकाला चांगला भाव या दृष्टीने पुढच्या पाच वर्षात शासनाने काही प्लॅनिंग केलेले आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, महाराष्ट्रात दुध धंदा प्रथम क्रमांकावर आलेला आहे. निसर्गाच्या बेभरवशाच्या पावसावर शेती करणा-या शेतक-याचा आधार देणारा दुध व्यवसाय आहे. विशेषत: पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुधाचा धंदा बळकट झालेला आहे. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ असून सुध्दा शेतक-यांनी आत्महत्त्या केल्या नाहीत त्याचे कारण दुधाचा धंदा हे आहे. सन्माननीय सदस्य श्री. गडाख यांनी सूचना केली की, नार्वेसारखा लहानसा देश 235 कोटी रुपयांची निर्यात करतो. भारत देश फक्त 35 कोटी रुपयांची निर्यात करीत आहे. यासाठी एक चांगली योजना आखणे आणि दूरदृष्टी ठेवून दुग्धजन्य पदार्थांची जास्तीत निर्यात कशी करता येईल यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्न करील.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगन्नाथ शेवाळे : मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये दुधाच्या धंद्यांचे महत्व काय आहे याबाबतची माहिती या ठिकाणी सांगितली. त्यांनी हेही मान्य केले की, दुष्काळग्रस्त परिस्थितीमध्ये शेतक-याला ख-या अर्थाने तारणारा दुग्ध व्यवसाय हा उद्योग आहे. तो उद्योग वाढीच्या दृष्टीने येत्या पाच वर्षात प्रयत्न करणार आहोत असेही त्यांनी यावेळी सांगितले. सभागृहात अनेक वेळा आश्वासने दिली जातात. परंतु त्यांची अंमलबजावणी होतेच असे नाही. समितीच्या शिफारशी प्रमाणे डिझेलच्या दरामध्ये वाढ होईल. त्या त्या पध्दतीने प्रपोशनेटली वाहतूकीच्या दरामध्ये वाढ करुन दिली जाईल. दूध संस्थांना परवडेल अशा पध्दतीचे कमिशन दिले जाईल. दूध संस्थांना आणि शेतक-यांना परवडेल अशा प्रकारच्या सुविधा दिल्या जातील. अशा प्रकारची आश्वासने दिली गेली. परंतु ती अंमलात आणली गेलेली दिसत नाहीत. दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, दुष्काळाला तारणारा हा धंदा आहे. दुष्काळात तेरावा महिना अशी म्हण आहे. परंतु दुष्काळात तेरावा महिना हा धंदा ठरु नये याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. माझा प्रश्न असा आहे की, ही सर्व धोरणे अंमलात आणण्याच्या दृष्टीने शासन काही वेगळी यंत्रणा उभी करणार आहे काय ? दूध उत्पादक शेतक-यांना सुविधा देण्याचा प्रश्न दूर राहिला. दुध संकलन करणा-या संस्थांचे आपण गुणप्रत तपासणीच्या नावाखाली लाखो रुपये कापून घेतलेले आहे. ते पैसे त्या त्या संकलन केंद्रांना तातडीने परत करण्यात येतील काय ?

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4 पुढे सुरु..

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, वैयक्तिक दूध तपासणी करण्यासाठी जिल्हा संस्था,तालुका संस्था या कमिशन कापून घेतात. दुधाची प्रत चांगली रहावी याची जबाबदारी त्या त्या वैयक्तिक संस्थावर आहे. या कमिशनच्या बाबतीत अनेक संस्थांनी निवेदन दिलेले आहे आणि त्याबाबत शासन जरुर आवश्यक तो विचार करील. पुढील 5 वर्षामध्ये दूध धंद्याच्या वाढीच्या दृष्टीने शासन दुधाचा थेंब अन् थेंब घेत आहे. या देशाचे कृषीमंत्री मा.श्री. शरद पवार साहेब यांच्याकडे हे खाते असल्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यामध्ये दूध धंदा अधिक बळकट करण्याचा आम्ही आवश्यक तो प्रयत्न करु.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी.: दौंड (जि.पुणे) तालुक्यातील यवत गावामध्ये निराधार महिलेवर झालेला अत्याचार.

मु.शी.: दौंड(जि.पुणे) तालुक्यातील यवत गावामध्ये निराधार महिलेवर झालेला अत्याचार याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा.सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कुमार नितीन,कु,सुप्रिया व कुमार सौरभ झुरंगे व त्यांची आई श्रीमती जनाबाई झुरंगे , रा. येवत, ता. दौड (पो.स्टे.येवत), जि. पुणे येथील रहिवाशी असून श्रीमती जनाबाई झुरंगे यांना त्यांचे पती श्री. भाऊ सो. यांनी घराबाहेर हाकलून दिल्यानंतर त्या आपल्या मुलांसह, मुलांचे नावे असलेल्या 90 आर. शेतीवर मागील 1990 सालापासून राहात आहे. कायदेशीर ताब्यात असलेल्या शेतजमिनीवर राहून त्या आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करीत आहेत.

श्री. भाऊ सो सखाराम झुरंगे हे आपल्या गुंडासह श्री नितीन व त्यांच्या परीवाराच्या ताब्यात असलेल्या शेतावर जावून या परिवारास सतत मारहाण करतात. आपल्या गुंडांच्या मदतीने दि. 2 जानेवारी, 2005 रोजी असाच हल्ला करुन त्यांच्या शेतातील दहाबारा खोल्यातील भाडेकरुंना धमकावून पळवून लावले. पिठाची गिरणी, वजनकाटा, बोअरवेल आदी उध्वस्त करुन या निराधार परिवाराला भयभीत केल आहे.

येवत, पो.स्टेशनमध्ये मदत मागायला गेले असता श्रीमती जनाबाई व त्यांच्या मुलांची तक्रार ऐकली नाही उलट पो.नि. श्री. राजेंन्द्र मोकाशी याने या पिडीत परिवारास मोक्का मध्ये अटक करण्याची धमकी दिली. अतिशय भयभीत झालेले हे कुटूंब दहशतीमुळे इकडे तिकडे राहत आहे. पो.नि. मोकाशी हे हल्लेखोराच्या बैठकीतील आहेत.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 15:15

विशेष उल्लेख..

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

"सदरक्षणाय खलनिग्रहणाय" या पोलीस ब्रिदाचा विसर पडलेल्या या पोलीस अधिका-याविरुध्द कठोर कारवाई व्हावी. अधिकृत शेतजमिनीवर राहण्याचा अधिकार श्री . नितीन (अपंग आहे) व त्याच्या परिवारास मिळावा, गुंडगिरीकरुन या परीवारास मारहाण करणा-या श्री. भाऊसाहेब झुरंगे यांचेवर कारवाई करुन या पिडित परिवारास संरक्षण देण्यात यावे यासाठी उक्त बाब विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात सादर करीत आहे.

सभापती महोदय, या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून निराधार महिला आणि तिच्या मुलांवर जो अमानुष आणि अनन्वित अत्याचार झाला आहे आणि तो तिच्या पतीकडून पोलिसांच्या संगनमताने केला जात आहे याकडे शासनाचे लक्ष वेधावे आणि तिला मदत करावी असा माझा प्रयत्न आहे. सभापती महोदय, पुणे जिल्हयाच्या दौंड तालुक्यामध्ये यवत नावाचे गाव आहे. पोलीस स्टेशनही यवत हे आहे. या गावात श्री. भाऊसाहेब सखाराम झुरंगे हे माळी समाजाचे कुटुंब आहे. श्री. भाऊसाहेब झुरंगे यांची पत्नी जनाबाई हिला नितीन,सुप्रिया आणि सौरभ अशी तीन मुले आहेत. त्यानंतर श्रीमती जनाबाई झुरंगे यांनी पतीने घराबाहेर काढल्यानंतर श्रीमती जनाबाई या आपल्या मुलांच्या नावे 90 आर असलेल्या शेतीवर 1990 सालापासून रहात आहेत. श्री. भाऊसाहेब झुरंगे हे 90 आर जमीन ताब्यात घेण्यासाठी आपल्यासोबत गुंडांना घेऊन जातात आणि त्या महिलेला मारहाण करतात. गुंडांच्या मदतीने 2 जानेवारी 05 रोजी या महिलेच्या घरावर सशस्त्र हल्ला केला आणि शेतात असलेल्या 10-12 भाडेकरुंना हुसकावून लावले. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. आज श्रीमती जनाबाई झुरंगे या जीव वाचविण्यासाठी भटकत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची वारंवार तक्रार पोलीस स्टेशन येवत येथे जनाबाई आणि त्यांच्या मुलांनी केली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड

प्रा जोगेन्द्र कवाडे ....

परंतु त्या पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.मोकाशी आणि पोलीस रायटर श्री.जगताप हे श्री.भाऊसाहेब झुरंगे यांच्या खास मर्जीतील आणि खास बैठकीतील असल्यामुळे तसेच श्री.भाऊसाहेब झुरंगे हे पैसेवाले असल्यामुळे ते असे म्हणतात की, संपूर्ण पोलीस स्टेशन माझ्या खिश्यामध्ये आहे.याच कारणास्तव या पीडित कुटूंबाला संरक्षण देण्या ऐवजी त्यांना मदत करण्या ऐवजी पोलीस इन्सपेक्टर श्री.मोकाशी हे त्या परिवाराला मोक्का खाली अटक करु अशी धमकी देतात. तसेच खोटी कारवाई करुन जीवन जगणे कठीण करुन टाकू अशी धमकी देतात "सदरक्षणाय आणि खलनिग्रणाय" हे पोलीस खात्याचे ब्रीद आहे परंतु यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.मोकाशी आणि इतर पोलीस अधिका-यांना त्याचा विसर पडलेला दिसतो. सभ्ांपती महोदय, या कुटुंबाला संरक्षण देण्यात यावे आणि श्री.भाऊसाहेब झुरंगे यांच्या कारवाईला आळा घालण्यात यावा म्हणून एक सविस्तर पत्र पुण्याचे डी.वाय.एस.पी. श्री. भुजंगराव मोहिते यांना दिले होते परंतु श्री.मोहिते आणि पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.मोकाशी यांचे साटेलोटे असल्यामुळे वा नातेवाईक असल्यामुळे ते श्री.मोकशी यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करीत नाही. तसेच त्या कुटुंबाला संरक्षण देत नाही.श्री.भाऊसाहेब झुरंगे यांच्या पैशावर नाचणारी मंडळी या कुटुंबाला त्रास देत आहेत .सभापती महोदय, या कुटूंबाला पोलीस खात्यापासून संरक्षण मिळाले पाहिजे तसेच श्रीमती जनाबाई यांचे जे पती आहेत त्यांच्या गुंडगिरीपासून या कुटुंबाला संरक्षण मिळावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : व्हॅट लागू केल्यामुळे मच्छिमारांना डिझेलवर सवलत न मिळणे
म मु.शी : व्हॅट लागू केल्यामुळे मच्छिमारांना डिझेलवर सवलत न मिळणे
याबाबत श्री.गुरुनाथ कुलकर्णी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र राज्यात लागू केलेल्या व्हॅटमुळे मच्छिमारांना मिळणा-या विविध सवलतीवर टाच आली असून मच्छिमारांना सरकारकडून डिझेल खरेदीवर बाजारभावात 35 टक्के सवलत असून मच्छिमार दरवर्षी किमान 2000 कोटी रुपयांचे डिझेल खरेदी करतात. त्यावर सुमारे 159 कोटीची सवलत मिळते. या व्यतिरिक्त मासेमारीच्या साधनांच्या खरेदीवरही सवलती दिल्या जातात परंतु या सर्व सवलती व्हॅट लागू केल्याने मच्छिमारांना न मिळणे, परिणामी मच्छिमारांना केन्द्र व राज्यसरकार जोपर्यन्त पूर्वी प्रमाणे सवलती सुरु करीत नाही तोपर्यन्त राज्यातील मासेमारी बंद ठेवण्याचा मच्छिमारांनी घेतलेला निर्णय परिणामी राज्यात मच्छिमारांची निर्माण झालेली टंचाईची परिस्थिती याबाबत शासनाची प्रतिक्रिया "

सभापती महोदय, कोकणाला 720 किलोमिटर्स लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे.या किनारपट्टीवर मच्छिमारी मोठया प्रमाणावर चालते. या मच्छिमारांना मदत करण्याच्या दृष्टीने डिझेल आणि रॉकेलवर सबसिडी देण्यात येत होती.त्यांचे उत्पन्न तसेच त्याना लागणारे डिझेल आणि त्यांना मिळणारी सबसिडी यांचा कोठेही मेळ बसत नसतांना हे मच्छिमार मच्छिमारीचा व्यवसाय करीत होते. दिनांक 1 एप्रिल 2005 पासून राज्यात व्हॅटचा कायदा लागू करण्यात आला आणि या मच्छिमारांना डिझेलमध्ये जी सबसिडी मिळत होती ती सबसिडी मिळणे बंद झालेले आहे.या मच्छिमारांनी व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे तेव्हा या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष याकडे वेधू इच्छितो व ज्या सवलती या मच्छिमारांना यापूर्वी मिळत होत्या त्याच सवलती त्यांना यापुढेही दिल्या जाव्यात अशी विनंती मी शासनाला करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : अहमदनगर जिल्हयात पडलेले दरोडे

मु.शी : अहमदनगर जिल्हयात पडलेले दरोडे याबाबत श्री.यशवंतराव गडाख,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था):महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :

"ज्या अर्थी, अहमदनगर जिल्हयामध्ये दरोडेखोर व चोरांनी धुमाकूळ घालणे. आरडा ओरडा करीत " काली माता की जय " असे म्हणत नेवासे तालुक्यातील भानसहिवरा गावामध्ये प्रवेश करुन श्री.अंबिलवादे यांचे घरावर सशस्त्र दरोडा टाक्ला. स्त्रीयांसहित घरातील अकरा लहान मोठया माणसांना अमानुष,बेदम मारहाण केली. रस्त्यावर बाहेर झोपलेल्यांना बेछूट मारहाण केली व मोठा ऐवज चोरुन नेला. गावाजवळ परभणी पासींगची बेवारस मोटार सायकल सापडली असून 10 किलोमिटर्सचे अंतरावर पोलीस स्टेशन असूनही वेळीच मदत मिळाली नाही.

ज्या अर्थी, अहमदनगर जिल्हयात गेल्या वर्षभरात या व अशा 50 ते 55 घटना घडल्या असून कोणत्याच गुन्हयाचा तपास लागलेला नाही. नागरीक त्रस्त व भयभीत झाले असून काहींवर गाव सोडून जाण्याची पाळी आली आहे. या चो-या व दरोडयांच्या सत्रातून बॅन्काही सुटल्या नाहीत

ज्या अर्थी, अशा घटनांना आळा घालण्यास पोलीस यंत्रणा असमर्थ ठरली असून गुन्हेगारांवर पोलिसांची जरब राहिलेली नाही कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली असून जनतेमध्ये अस्थिरतेचे व भीतीचे वातावरण पसरलेआहे. प्रत्येक बाबीमध्ये पोलिसांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

त्या अर्थी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे ."

सभापती महोदय, अहमदनगर जिल्हयात गेल्या दोन तीन वर्षात मोठया प्रमाणावर दरोडे पडलेले आहेत.परवा त्यासंबंधी सभागृहात चर्चा झाली होती. नेवासे तालुक्यातील भानसहिवरा येथे मोठा दरोडा पडला होता .घरातील महिला, लहान मुले अशा दहा बारा व्यक्तींना मारहाण करण्यात आली होती व मोठा ऐवज चोरुन नेण्यात आला होता .10 किलोमिटर्स अंतरावर पोलीस स्टेशन असतांनासुध्दा त्यांना पोलिसांची मदत मिळाली नाही. संगमनेर मध्ये श्री.मालपाणी नावाचे मोठे उद्योगपती आहेत यांच्या घरावर दरोडा पडला होता. त्याचाही अजून तपास लागलेला नाही

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडाख ....

आणि आमच्या ज्या जिल्हा बँका आहेत त्याच्या 4-5 शाखांमध्ये गॅस कटरचा उपयोग करून तेथील तिजोऱ्या फोडल्या आहेत आणि त्यातील रकमा चोरीला गेल्या आहेत पण त्याचाही तपास लागलेला नाही. म्हणून तेथील सारे वातावरण भयभीत झालेले आहे. तेव्हा माझी विनंती आहे की, गेल्या दोन वर्षामध्ये जे जे गुन्हे घडले आहेत, जबरी चोऱ्यांची प्रकरणे, दरोड्याची प्रकरणे घडली आहेत त्यांचा तपास तातडीने करण्यात यावा. यासाठी मी हा 'विशेष उल्लेख' करीत आहे.

*****

..... झेडझेड 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वैतरणा जलाशयातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार होण्याबाबत.

मु.शी. : वैतरणा जलाशयातील अतिरिक्त पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासंदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार होण्याबाबत श्री.अरविंद सावंत यांनी दिलेली 'विशेष उल्लेख'ची सूचना.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी 'विशेष उल्लेख'ची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पुढील 'विशेष उल्लेख' करतो -

" वैतरणा जलाशयातील अतिरिक्त (ओव्हर फ्लो) पाणी पूर्ववाहिनीद्वारे नजिकच्या मुकणे धरणात आणून गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा निर्णय शासनाने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाला परिपत्रकांद्वारे दिनांक 28.3.2005 च्या सुमारास कळविण्यात आले. वास्तविक पाहता वैतरणा जलाशयात गेल्या 20 वर्षामध्ये कधीही ओव्हर फ्लो झालेला नाही असे सरकारी आकडेवारी असणे., असे असूनही घेण्यात आलेला हा निर्णय म्हणजे ओव्हर फ्लो पाण्याच्या नावाखाली भविष्यात मुंबईकरांच्या सध्याच्या हक्काच्या पाण्यावर दरोडा घालण्याचा रचलेला डाव., यामुळे जलकर देऊनही मुंबईकरांचे पाण्यापासून होणारे हाल, याबाबत शासनाने फेरविचार करून निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने निवेदन करावे."

अध्यक्ष महाराज, माझे भाग्य आहे की, मी या ठिकाणी जलसंपदा खात्याच्या संदर्भात विशेष उल्लेख करीत आहे आणि नेमक्या याच वेळी सन्माननीय जलसंपदा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे ते या विषयी निश्चितपणे लक्ष घालतील अशी मी खात्री व्यक्त करतो. अध्यक्ष महाराज, मुंबई शहराला वैतरणा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. मध्यंतरीच्या काळात मुकणे धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेतला गेला. 1980 साली या मुकणे धरणासाठी प्रशासकीय मंजुरी दिली होती आणि हे धरण बांधल्यानंतर तेथील इगतपुरी तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांची जमीन त्याखाली जाणार होती म्हणून त्या लोकांनी या धरणाला विरोध केला. 1993 साली या

.... झेडझेड 3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत ...

धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला आणि त्यानंतर त्या विरोधात इगतपुरी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या धरणाखाली जाणार आहेत त्यांनी आंदोलन सुरू केले. त्याची दखल घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी एकाच तालुक्यातील किती लोकांना कायमचे छळणार असे म्हणून या लोकांसोबत, तेथील लोकप्रतिनिधींसोबत पाटबंधारे विभागातील लोकांची एक बैठक घेतली आणि 2001 साली कायम स्वरूपी या मुकणे धरणाची उंची वाढविण्यास स्थगिती दिली. नंतर त्या संदर्भात मध्यंतरी माजी आमदार श्री. कोल्हे यांनी एक बैठक घेतली आणि ही स्थगिती उठविण्याचा शासनाने निर्णय घेतला. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी वैतरणा धरणाखाली गेल्या होत्या त्याच शेतकऱ्यांची जमिनी.. जवळपास 600 हेक्टर जमीन मुकणे धरणाची उंची वाढविण्यामुळे जाणार आहे. अध्यक्ष महाराज, या मुकणे धरणाचे क्षेत्र 4935 द.घ.फूट आहे आणि त्याची उंची वाढविण्याचे त्याची क्षमता 3.65 मीटरने उंची वाढली जाणार आहे व त्यामुळे त्याची साठवण क्षमता 2600 द.ल.घ.फूट इतकी वाढणार आहे. अध्यक्ष महाराज, मूळ उंचीचे वैतरणा धरण कधीच पूर्ण भरत नाही आणि आता उंची वाढविल्यामुळे तर ते भरेल हा प्रश्नच येत नाही. असे असतानाही हे धरण ओव्हर फ्लो होणार आहे हे गृहीत धरून ते पाणी वाहून जाण्यासाठी वैतरणा धरणाला उजवी जलवाहिनी काढली जाणार आहे आणि ते पाणी या मुकणे धरणामध्ये आणले जाणर आहे व तेथून ते नगर जिल्हयात न्यावयाचे आहे असा प्रस्ताव आहे. अध्यक्ष महाराज, गेल्या 20 वर्षामध्ये वैतरणा धरण केव्हाही ओव्हर फ्लो झालेले नाही, केवळ मागील वर्षी ते पूर्ण भरले होते. असे असताही ते धरण ओव्हर फ्लो होईल हे गृहीत धरून त्यातील पाणी मुकणे धरणामध्ये, की ज्यामध्ये आधीच पूर्ण क्षमतेमध्ये कधीही पाणी भरत नाही त्यात टाकावयाचे. म्हणजे एक प्रकारे मुंबईच्या पाण्यावर दरोडा टाकण्याचाच हा कट आहे आणि त्याला विरोधी करण्यासाठीच मी हा विशेष उल्लेख येथे करीत आहे. अध्यक्ष महाराज, शासनाच्या या निर्णयाविरोधात इगतपुरीतील सर्व शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले आहे आणि त्यामध्ये मुंबई शहरातील नागरिकांनादेखील उतरावे लागेल. म्हणूनच मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना, शासनाला विनंती करतो की, कृपया आपण हा प्रस्ताव आणू नये. आपल्याच नेत्यांनी, माननीय श्री. शरद पवार यांनी मुकणे धरणाची उंची वाढविण्याला स्थगिती दिली होती हे आपण लक्षात घ्यावे

..... झेडझेड 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत ...

आणि वैतरणा धरणाचे पाणी अशा प्रकारे काढून घेण्यास लोकांचाही विरोध आहे हे सारे लक्षात घेऊन शासनाने याबाबत लक्ष घालावे अशी विनंती मी या 'विशेष उल्लेख'च्या माध्यमातून करीत आहे.

****

(यानंतर श्री.जागडे .... 3ए 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: माध्यमिक शालांत परीक्षेचची आदर्श उत्तरे मराठी माध्यमाच्या शिक्षकांना इंग्रजीमध्ये दिल्याबाबत.

मु.शी.: माध्यमिक शालांत परीक्षेचची आदर्श उत्तरे मराठी माध्यमाच्या शिक्षकांना इंग्रजीमध्ये दिल्याबाबत या विषयावर श्रीमती संजीवनी रायकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई विभाग शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" माध्यमिक शालांत परीक्षेची आदर्श उत्तरे मराठी माध्यमाच्या शिक्षकांसाठी इंग्रजीमध्ये दिलेली असतात, ती अन्य माध्यमाच्या उत्तर पत्रिकांप्रमाणे मातृभाषेत देण्यात यावीत. सदर विषय महत्वाचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाद्वारे मांडू इच्छिते."

सभापती महोदय, स्वातंत्र्य मिळून 55 वर्षे पूर्ण झाली असतानाही अद्याप एस.एस.सी., एच. एस. सी बोर्डातील मॉडेल आदर्श उत्तरे शिक्षकांना पेपर तपासणीसाठी देताना त्या मात्र इंग्रजीमध्ये असतात. याप्रमाणे सर्व भाषिकांना देण्यात येत नाही. उर्दू, कन्नड भाषिकांना मात्र त्यांच्या भाषेत आदर्श उत्तरे मिळतात. परंतु मराठी भाषिकांना आदर्श उत्तरे मराठीत न देता इंग्रजीत दिलेली असतात. त्यामुळे मराठी भाषिकांवर अन्याय होत आहे. यावर्षी मात्र पेपर तपासावयाला शिक्षकांनी सुरुवात केली आहे. त्यामुळे आता त्वरीत बदल करणे शक्य होणार नाही. तेव्हा निदान पुढील परीक्षेसाठी तरी ही सुधारणा करावी, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या द्वारे शासनास करीत आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक.

मु.शी.: सन 2003 चे वि. प. वि. क्र. 19 - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री) सभापती महोदय, सन सन 2003 चे वि. प. वि. क्र. 19 - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त मी आपल्या अनुमतीने सादर करतो.

सभापती महोदय, दि. 21 जानेवारी 2004 रोजी तत्कालिन जलसंपदा मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या समितीची पहिली बैठक झाली होती. त्यानंतर विधानसभेच्या निवडणूका झाल्या. नवीन विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर जलसंपदा मंत्री म्हणून माझ्याकडे ह्या विधेयकाची जबागबदारी आली. या विधेयकाबाबत 17 माननीय सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली. या क्षेत्रामधील जास्त माहिती ज्या सदस्यांना होती, त्या सदस्यांना या समितीमध्ये घेण्यात आले. समित्यांच्या बैठकींमध्ये सर्व माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचा सहभाग घेतला होता. नागपूरचे अधिवेशन संपल्यानंतर जानेवारी, फेब्रुवारी आणि मार्च या तीन महिन्याच्या कालावधीत समितीच्या 12 बैठका झाल्या. दि. 30 मार्च 2005 रोजी झालेल्या बैठकीत समितीचा अहवाल तयार करण्यात आला. समितीच्या 12 बैठकींमध्ये समितीच्या सर्व माननीय सदस्यांनी सखोल अशी चर्चा केली. ग्रामीण भागातील शेतक-यांना कोणत्या अडचणी येणार आहेत, या बाबतची सखोल चर्चा झाली. सर्व माननीय सदस्यांनी चर्चेत भाग घेऊन आपापले विचार मांडले आहेत. महाराष्ट्र विधानमंडळाचे प्रधान सचिव, सचिव व इतर अधिकारी, तसेच जलसंपदा व लाभक्षेत्र विकासाचे सचिव व त्यांच्या अधिका-यांनी समितीला सर्वतोपरी मदत केली आहे. या समितीमध्ये असलेल्या सदस्यांव्यतिरिक्त दोन्ही सदनातील सर्व सदस्यांकडून तसेच जनतेकडून सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्या सर्व सूचनांचा समितीच्या बैठकींमध्ये विचार करण्यात येऊन अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला.

(यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

आणि आता संयुक्त समितीचा अहवाल सन 2005 च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधीमंडळापुढे आपल्या परवानगीने सादर करीत आहे. त्यामध्ये सर्वसाधारणपणे प्राधिकरणाची ठळक वैशिष्टये मी सभागृहाला सांगू इच्छितो. अध्यक्ष धरुन 3 सदस्य व धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यास सहाय्य करण्यासाठी प्रत्येक नदीखोऱ्यातून एक या प्रमाणे 5 विशेष निमंत्रित या प्राधिकरणाने ठेवले आहेत. प्राधिकरणाची कार्यवाही अर्धन्यायिक स्वरुपाची ठेवली आहे. माननीय सदस्यांनी वेगवेगळी भूमिका मांडली असली तरी मुख्यालय मुंबई येथे ठेवण्याचे समितीने ठरविले आहे. त्याचप्रमाणे प्राधिकरणाचे अधिकार व प्रमुख जबाबदाऱ्या ठरविल्या आहेत. त्यामध्ये प्राधिकरण ही एक स्वायत्त संस्था असेल. त्यामध्ये भूपृष्ठीय व पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील भूगर्भीय पाण्याच्या वापराचे नियमन करण्याकरिता प्राधिकरण पाण्याची हक्कदारी ठरवेल. त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात पाण्याचे समन्यायी वाटप होण्यासाठी जमिनीच्या प्रमाणात लाभक्षेत्रातील प्रत्येक जमीनधारकास पाण्याचा कोटा देण्याचे निकष प्राधिकरण ठरवेल. यामध्ये पाण्याचे समन्यायी वाटप करणे ही फार मोठी व महत्वाची भूमिका या विधेयकामध्ये अंतर्भूत करण्याचा प्रयत्न केला आहे. उपभोक्त्यांच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर, विविध प्रकारच्या पाण्याच्या वापरासाठी प्राधिकरण दर प्रणाली ठरविल, ही तरतूद त्या ठिकाणी आवर्जून घातली आहे. तसेच, राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करावयाच्या राज्य जल परिषदेने मान्य केलेल्या एकात्मिक राज्य जलसंपत्ती आराखडयाची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने होत आहे यावर प्राधिकरण देखरेख ठेवणार आहे. नवीन प्रकल्प हाती घेताना तो राज्य आराखडयाशी सुसंगत असल्याबाबत प्राधिकरणाकडून मान्यता घेणे बंधनकारक राहील. या संदर्भात विभागीय अनुशेष निर्मूलनार्थ माननीय राज्यपालांनी दिलेल्या आदेशांचे पालन होत आहे याची खातरजमा प्राधिकरण करील. साधारणपणे समितीने विचार करीत असतांना मधल्या काळात राज्याच्या काही भागात अनुशेष वाढला. आणि त्यामधून नवीन समस्या निर्माण झाल्या त्या परिस्थितीला राज्याच्या काही भागांना सामोरे जावे लागले आहे. तसा प्रकार पुन्हा घडू नये याची देखील खातरजमा या विधेयकात करुन घेतली गेली आहे. राज्यामध्ये अशा प्रकारची दुष्काळी परिस्थिती निर्माण होते . राज्याची भौगोलिक परिस्थिती बघितली तर तीन ते पाच वर्षाच्या कालावधीत एकदा तरी दुष्काळी, टंचाईची परिस्थिती राज्यामध्ये येते हे आपण नेहमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

अनुभवीत आहोत. अशा परिस्थितीत टंचाईच्या काळात पाणी वाटपाच्या बाबतीत शासनाने दिलेल्या आदेशाप्रमाणे प्राधिकरण पाणी वाटपाचे निकष ठरविल या प्रमाणे प्रथम प्राधान्य पिण्यासाठी देतो. याचा समितीने आवर्जून विचार केला आहे. नदीखोऱ्यातील पाण्याची तूट समप्रमाणात विभागली जावी यासाठी खोऱ्यातील पाणी साठे पावसाळयाअखेरीस नियंत्रित केले जातील. असणाऱ्या पाण्याच्या साठयातील पाणी जे लाभार्थी असतील त्यांना समान प्रमाणात दिले जाईल. म्हणजे एखाद्या साठयामध्ये 60 टक्के पाणी असेल आणि पावसाळा संपलेला आहे अशा वेळी असणाऱ्या सर्व लाभार्थींना सम प्रमाणात 60 टक्के पाणी मिळेल. यापूर्वी असे व्हायचे की, सुरुवातीचा माणूस 100 टक्के पाणी घ्यायचा आणि टेलच्या माणसाला जबरदस्त किंमत मोजावी लागायची. असे पुन्हा घडू नये यासाठी समितीने आवर्जून विचार केला आहे. त्याचबरोबर टंचाईच्या काळात किमान एक एकर जमिनीसाठी पुरेसे ठरेल इतका पाणी वापराचा कोटा प्रत्येक जमीन धारकास दिला जाईल. म्हणजे टंचाईची परिस्थिती असेल आणि एखादा लाभार्थी चार एकरवाला असेल, आणि एखादा लाभार्थी एक एकरवाला असेल तर प्रत्येकाला किमान एक एकर जमिनीला पाणी मिळाले पाहिजे. सगळयांना उपलब्ध असलेल्या त्या पाण्यामध्ये आपली शेती करता आली पाहिजे. हा देखील विचार यामध्ये केलेला आहे. भविष्य काळात निर्धारीत केला जाईल अशा दिनांकापासून बारमाही पिकांना ठिबक सिंचन, तुषार सिंचन इत्यादी पाण्याची बचत करणारे तंत्र वापरण्याखेरीज कालव्यातून पाणी दिले जाणार नाही. हे केल्याशिवाय आज तरणोपाय राहिलेला नाही. कालव्यातून पाणी देत असतांना त्यामध्ये बऱ्याचदा गैरवापर होतो. तसेच, बऱ्याचदा कालव्यातून पाणी शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पोहोचण्यापूर्वी वेगवेगळया प्रकारच्या लिकेजेसमधून ते पाणी मुरण्याचे काम होते. म्हणून कमी पाण्यात जास्तीचे क्षेत्र ओलिताखाली आणण्याकरिता याही गोष्टीचा विचार समितीने केलेला आहे. पाण्याची हक्कदारी, कोटा व पाणी न मिळणे इत्यादीबाबतचे विवाद सोडविण्यासाठी प्राधिकरणाकडे दाद मागता येईल. उद्या जर काही अडचण आली तर कुठे ना कुठे त्याला दाद मागता आली पाहिजे. अशाप्रकारचा विचार यामध्ये करण्यात आलेला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

"राज्यातील पाण्याच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील राहील. असे करताना प्रदूषण करणा-यांनी किंमत चुकवावी हे तत्व वापरण्यात येईल." कारण ब-याच वेळेला सगळे पाणी वापरतात. परंतु खूप मोठया प्रमाणावर प्रदूषण होते आणि ते चांगले पाणी एवढे खराब केले जाते की, ते पाणी शेतीसाठी, पिण्यासाठी सुध्दा वापरता येत नाही अशा प्रकारची परिस्थिती गेल्या 50-55 वर्षाच्या एकंदरीत जीवनामध्ये आपण सर्वांनी पाहिलेली आहे. तशा प्रकारच्या घटना पुढे घडू नयेत म्हणून यामध्ये आपण असे प्रदूषण करणा-यांना त्याची काही किंमत मोजावी लागेल अशा प्रकारचे तत्व यामध्ये ठरविण्यात आलेले आहे. यानंतर "पाटबंधारे प्रकल्प लाभक्षेत्रामध्ये टेल टू हेड हे इरिगेशन तत्व राबवले जाईल याची खातरजमा प्राधिकरण करेल." याचाही आपण यामध्ये समावेश केलेला आहे. "प्राधिकरणाचे कार्य सुरुवातीला कृष्णा खो-यामध्ये सुरु करण्यात येईल व त्यानंतर टप्प्याटप्प्याने राज्यातील सर्व नदी खो-यांमध्ये लागू करण्यात येईल." कारण नाही म्हटले तरी कृष्णा खो-यामध्ये पहिल्यांदा साधारणपणे शेतीला कशा प्रकारचे पाणी वापरावयाचे, ते फार पूर्वीपासून सुरु झालेले असल्यामुळे तशा प्रकारचा विचार करण्यात आला. परंतु ते कृष्णा खो-या पुरते मर्यादित न ठेवता नंतर मात्र सर्व नद्यांच्या खो-यामध्ये या संदर्भातील जे कार्य असेल, ते टप्प्याटप्प्याने तेथे लागू करण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल. अशा प्रकारे खूप विचार करुन, अतिशय मनापासून सर्व सन्माननीय सदस्यांनी या कामामध्ये सहभाग दाखवून, अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये चर्चा करताना, कधी-कधी काहींनी स्वत:ची भूमिका मांडत असताना, एखाद-दुस-या मुद्याच्या बाबतीत समितीत एकमत झाले नाही. परंतु बहुतांशी ठिकाणी आम्ही एकमत करण्याचा प्रयत्न 12 बैठकांमधील चर्चेच्या निमित्ताने केलेला आहे. एवढा सगळा विचार करुन, सर्व तज्ञ सहका-यांचे मार्गदर्शन आणि सल्ला घेऊन, तसेच अधिका-यांनी देखील त्यांच्या आजपर्यंतच्या अनुभवाच्या आधारे यामध्ये चांगल्या प्रकारचे योगदान केलेले आहे. अशा प्रकारे या शासकीय विधेयकाच्या संबंधातील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करण्यासाठी मी आपली अनुमती मागतो आणि या समितीचे प्रतिवृत्त मी सभागृहासमोर ठेऊ इच्छितो.

उपसभापती : सन 2003 चे वि.प.वि.क्रमांक 19 - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक, यावरील दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

. . . .3 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा करावयाची आहे. पण त्यापूर्वी आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन्हा भरेल.

(3.43 ते 4.00 मध्यंतर)

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा.उपसभापती)

पृ.शी. : राज्यातील शेतीमालाला मिळणारे अपुरे भाव.

मु.शी. : "राज्यातील शेतीमालाला मिळणारे अपुरे भाव" या संबंधी माननीय सदस्य सर्वश्री यशवंतराव गडाख, उल्हास पवार, कमलकिशोर कदम, दिवाकर रावते, जयंत पाटील, अरविंद सावंत, प्रकाश शेंडगे, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री संजय दत्त, जगन्नाथ शेवाळे, विलासराव शिंदे, प्रा.शरद पाटील, सर्वश्री नतिकोद्दीन ख्वातिब, रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.वसंत पवार, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.सदाशिवराव पोळ यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उपसभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी अडीच तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे मा.सदस्य श्री.यशवंतराव गडाख हे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील शेतीमालाला मिळणारे अपुरे भाव, त्यामुळे शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची दैन्यावस्था होत असणे, शेतकरी व शेती उत्पादनावर आधारित उत्पादन प्रक्रिया करणारे व्यवसाय तसेच राज्यातील शेती प्रक्रिया संस्था, उदा. सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या इ.कडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील शेतकरी तसेच शेती प्रक्रिया संस्था उध्वस्त होण्याची निर्माण झालेली परिस्थिती, या व्यवसायाला चालना व प्रोत्साहन देऊन रोजगार निर्मिती वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक लूट थांबविण्यासाठी करावयाची सर्वंकष उपाययोजना, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी किफायतशीर व्याज दरात कर्ज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शेती व शेती प्रक्रिया संस्था यांना बेसुमार व्याज आकारण्यात येणे, परिणामी शेतकरी कर्जाच्या ओझ्यामुळे डबघाईस येणे, शेती व्यवसायास व्याजात सूट देऊन सवलतीच्या दराने व्याज आकारण्याची व दंडात्मक व्याज न लावण्याची आवश्यकता, एकंदरीतच शेती व्यवसायाला उर्जितावस्था प्राप्त करून देण्यासाठी "शेतकरी" हा केंद्रबिंदू धरून शासनाने यासाठी अथक प्रयत्न करण्याची निकड व या अनुषंगाने शासनाने करावयाची सर्वंकष उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KGS/ MHM/ MAP/

श्री.यशवंतराव गडाख (पुढे चालू...

सभापती महोदय, या सदनामध्ये शेतकऱ्यांच्या संबंधाने जी चर्चा मी उपस्थित करीत आहे, त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे एकंदर आज महाराष्ट्रातील आणि देशातील शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे. शेतीमालाचा पडलेला दर याबाबतचे आजचे चित्र पाहिले तर शेतकऱ्यांनी पिकविलेल्या मालाला व्यवस्थित भाव नाही, ही गोष्ट सत्य आहे. म्हणून दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती यामध्ये सापडलेला शेतकरी पिकवत असलेल्या धान्याला, पिकवत असलेल्या पालेभाजीला उत्पादनावर आधारित भाव मिळत नाही त्यामुळे त्याची झालेली अवघड अवस्था या सगळ्या दुष्टचक्रामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी सापडलेला आहे. शेतीमालावर आधारित ज्या संस्था आहेत, -त्यामध्ये साखरकारखाने, सूत गिरण्या, सेवा सोसायट्या, जिल्हा बँका एम.एस.सी. बँक या सगळ्यांवर याचा परिणाम झालेला आहे. मला आज खेदाने म्हणावेसे वाटते की, आपण हे शेतकऱ्यांचे सरकार आहे असेम्हणतो. पण आज त्या शेतकऱ्यांची अवस्था विचारात घ्यायला कोण तयार नाही, अशी परिस्थिती महाराष्ट्रामध्ये, देशामध्ये दिसत आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, ब्रिटिश राजवटीमध्ये 1900 ते 1947 सालापर्यन्त शेतीचा विकास ठप्प झालेला होता. शेतीचा विकासाचा दर 0.3 टक्के होता. ब्रिटिशांनी शेतकऱ्यांना दाबून टाकलेले होते. त्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळत नव्हती, सबसिडी मिळत नव्हती. त्यामुळे शेती व्यवसाय ठप्प झालेला होता. शेतकऱ्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढलेला होता. खाजगी लोकांकडून जादा दराच्या व्याजाने शेतकऱ्यांनी कर्जे घेतलेली होती. त्या शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्जाचे ऋण झालेले होते. अशा अवस्थेमध्ये दुष्काळामध्ये लाखो लोक मेले त्यामुळे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. महात्मा फुले यांच्या "शेतकऱ्यांचे आसूड" या ग्रंथामध्ये त्या काळातील शेतकऱ्यांची अवस्था आणि दु:ख काय होते, त्यांची परिस्थिती काय होती म्हणून तत्कालीन सरकारने काय मदत केली पाहिजे या संबंधीचे विवेचन पहायला मिळते.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ....

त्यानंतरचा 50 वर्षाचा काळ म्हणजे स्वातंत्र्यानंतरचा 50 वर्षाचा काळ पाहिला तर या काळामध्ये आपल्या देशामध्ये 8 पंचवार्षिक योजना झाल्या. या काळामध्ये चांगले काम झाले. धरणे बांधली गेली. वीज निर्माण केली गेली. शेतकऱ्यांना मदत केली गेली. सहकारी संस्था निर्माण केल्या. पतसंस्था निर्माण केल्या. बँका निर्माण केल्या. मार्केट कमिटया निर्माण केल्या. या सगळया प्रक्रियेमधून या देशातील शेतीधंदा वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाला, त्यादृष्टीने काम झाले हे नाकारुन चालणार नाही. हे आपल्याला मान्यच करावे लागेल. परंतु या देशातील शेतकऱ्यांनी सुध्दा त्याला प्रचंड असा प्रतिसाद दिलेला आहे.

सभापती महोदय, अन्नधान्याच्या बाबतीत आपला देश दुसऱ्या देशांवर अवलंबून होता. तुम्ही आम्ही त्या पिढीतील लोक आहोत. 1972 साली दुष्काळ पडला त्यावेळी अमेरिकेहून मिलो आणावा लागला. या देशाच्या माननीय पंतप्रधानाला अमेरिकेमध्ये जाऊन भिकेची झोळी पसरवावी लागली आणि आमच्या देशाला धान्य द्या असे सांगावे लागले. ही परिस्थिती आपण पाहिलेली आहे. तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर अन्नधान्य मिळविण्यासाठी त्या ठिकाणी वेगळया राजकीय अटी सुध्दा मान्य करण्याची पाळी आली होती हेही आपल्याला माहीत आहे. त्यानंतर श्रीमती इंदिरा गांधी देशामध्ये आल्या आणि त्यांनी देशामध्ये झंझावाती दोरा केला. आपल्याला आठवत असेल की, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी शनिवारवाडयामध्ये अशी घोषणा केली होती की, पुढच्या दोन तीन वर्षामध्ये जर महाराष्ट्र स्वयंपूर्ण झाला नाही तर मला शनिवारवाड्यामध्ये फाशी द्या. श्री. वसंतराव नाईक यांचे हे उद्‌गार आम्ही कोणीही विसरु शकणार नाही. अशा सगळया परिस्थितीमध्ये आजचे चित्र पाहिले तर या देशातील शेतकऱ्यांनी, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी मोठी क्रांती केलेली आहे. जो देश धान्य आयात करीत होता त्या देशातील शेतकऱ्यांनी एवढया प्रचंड धान्याचे उत्पादन केले की आज देशातील धान्याची गोदामे भरलेली आहेत. धान्याची चिंता नाही. 100 कोटी जनतेला पुरून उरेल एवढे धान्य या देशातील शेतकरी आज पिकवितो. गोदामे भरलेली आहेत. एवढेच नव्हे तर निर्यात सुध्दा करतो. एकेकाळी धान्य आयात करणारा देश 100 कोटी जनतेला धान्य पुरवून धान्य निर्यात करतो. ही परिस्थिती आपल्या देशातील शेतकऱ्यांनी बदलून टाकलेली आहे. मी सांगू इच्छितो की, स्वातंत्र्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ....

मिळाल्यानंतर फक्त 150 लाख टन दूध देशामध्ये तयार होत होते परंतु आज 750 लाख टन दूध या देशातील शेतकरी दूध धंद्याच्या निमित्ताने निर्माण करतात. पूर्वीचा काळ असा होता की, खेडेगावामध्ये चहाला दूध मिळत नव्हते. परंतु आज अशी परिस्थिती आहे की, अमेरिकेला मागे टाकेल अशा प्रकारचे दूध आपल्या देशामध्ये आज निर्माण होते. दूध उत्पादन करण्यामध्ये आपला देश संपूर्ण जगामध्ये एक नंबरवर गणला जातो. साखरेच्या बाबतीत 20-25 वर्षापूर्वीचे चित्र पाहिले तर या देशामध्ये साखर मिळणे दुरापास्त होते. परंतु सहकार क्षेत्राच्या माध्यमातून साखर कारखाने निघाले, शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड केली आणि आज जगातील साखर उत्पादनामध्ये 15 टक्के हिस्सा हा या देशातील साखर कारखानदारीचा आहे. जगामध्ये जेवढी साखर निर्माण होते त्याच्या 15 टक्के एवढी साखर आज आपला देश तयार करतो. साखर उत्पादनाच्या बाबतीत आपला देश जगामध्ये क्रमांक एक वर आहे. साखर उत्पादनाच्या बाबतीत एक नंबर, दुधाच्या बाबतीत एक नंबर एवढी प्रचंड क्रांती या देशातील शेतकऱ्यांनी करुन दाखविलेली आहे. ही परिस्थिती आपल्याला नाकारुन चालणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख...

परंतु आज चित्र जर पाहिले तर ते अत्यंत विदारक असे आहे. आज शेती मालाचे उत्पादन वाढलेले आहे. आपल्या देशात मुक्त अर्थव्यवस्था आहे, त्यासंबंधी शासनाने निर्णय घेतलेला आहे. या सगळया अवस्थेमध्ये संपूर्ण देशातील शेतक-यांनी निर्माण केलेला माल, प्रत्येक देशाची व्यवस्था, आयातनिर्यातीचा कर, या देशाला मिळालेला अधिकार या सगळया परिस्थितीतून आज जे चित्र आहे ते असे की, अमेरिकन देशातील शेतकरी असो की, युरोपियन देशातील शेतकरी असो. जो 100 किलो वजनाचा आहे आणि जो 25 किलो वजनाचा आहे त्याला आखाडयामध्ये उतरवून सांगता की त्याच्याशी कुस्ती कर. आज प्रचंड प्रमाणामध्ये बाहेरुन माल येत आहे, मग भाजीपाला असेल, फळफळावळ असेल, धान्य येत आहे, साखर येत आहे. त्या देशांमध्ये शेतक-यांना प्रचंड सबसिडी दिली जाते. मी आपल्या माहितीसाठी आकडेवारी सादर करु इच्छितो. युरोपियन देशामध्ये लोणी व लोण्याच्या उत्पादनावर 2169 डॉलर्सची सबसिडी दिली जाते. भरड धान्यावर 47 डॉलर्सची, साखरेवर 470 डॉलर्स सबसिडी दिली जाते, युरोपियन देशात साखर निर्यात करण्यासाठी 265 टक्के सबसिडी आहे, ब्राझिलमध्ये 7 टक्के, पाकिस्तानमध्ये 3 टक्के आणि भारतामध्ये शून्य टक्के सबसिडी देतो. या सगळया अवस्थेमध्ये शेतक-याच्या मालाला भाव मिळत नाही अशी परिस्थिती आहे. साखरेच्या संदर्भातील मी माहिती सांगू इच्छितो की, संपूर्ण जगामध्ये स्वस्त साखर मिळणारा आपला देश आहे. इतर देशातील साखरेची किंमत पाहिली तर कोठे 30 रुपये, 40 रुपये, 50 रुपये तर कोठे 60 रुपये आणि जपानमध्ये तर 90 रुपये किलो असा भाव आहे. म्हणून त्या ठिकाणची सरकारे त्या धंद्याला मोठया प्रमाणावर प्रॉडक्शन्स देतात. आज येथे 14 रुपये, 15 रुपये किलोच्या दरामध्ये साखर विकली जात होती, आता थोडेफार भाव वाढले आहेत, 50 पैसे 1 रुपया भाव वाढविला तर सगळया वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने भरुन जातात, साखरेचे दर वाढले आहेत ते परवडणारे नाहीत अशा बातम्या येतात. मी या सभागृहामध्ये मागे बोललो होतो की, ऊस पिकविणा-या शेतक-याकडे गुन्हेगार शेतकरी आहे यादृष्टीकोनातून पाहिले जाते. परंतु त्याची आकडेवारी काढून अभ्यास केला तर 2 एकरवाले, 3 एकरवाले शेतकरी जवळजवळ 80 ते 90 टक्के आहेत. 5 एकरवाले, 10 , 20 एकरवाले 5 ते 7 टक्के शेतकरी आहेत बाकी संपूर्ण चित्र पाहिले तर या पध्दतीचे आहे. आपल्याकडील उत्पादन खर्च 1400 ते 1500 रुपये येतो.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती जोशी)

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. यशवंतराव गडाख पुढे सुरु...)

मी या सभागृहामध्ये जाहीरपणे सांगू इच्छितो की, जर कमीत कमी 20रुपये किलोने साखर विकली गेली तरच ती शेतक-याला परवडेल आणि ती जर तशी विकली गेली नाही तर मोठ्या प्रमाणात या पिकाचे डायव्हर्शन होईल आणि कोट्यवधी रुपयाची साखर देशाला पुन्हा आयात करावी लागेल. म्हणून शेतक-याला परवडतील असे दर शेतमालाला द्यावयास पाहिजेत. आज शेतक-याच्या कोणत्याही मालाला भाव मिळत नाही. मागे 22 जानेवारीच्या इकॉनॉमिक टाईम्समध्ये एक लेख आला होता. त्यामध्ये अमेरिका आणि भारत या देशांमध्ये शेतमालाचे दर कसे आहेत याची आकडेवारी दिलेली होती. टोमॅटोचा दर अमेरिकेमध्ये 290 रु. तर भारतात तो 10 ते 40 रु.आहे. अमेरिकेत बटाट्याचा दर 39 रु. आहे तर भारतात तो दर 4 ते 15 रु. आहे. कांद्याचा भाव अमेरिकेत 73 रु. आणि भारतात 18 रु. आहे. दुधाचा दर अमेरिकेत 39 रु. तर भारतात तो 21 रु. आहे. वनस्पती तेलाचा दर अमेरिकेत 161 रु. आहे आणि भारतात तो दर 50-55 रु. आहे. आपण या दरामध्ये जरी वाहतूक धरली तरी देखील अमेरिकेपेक्षा स्वस्त दराने या वस्तू आपण देऊ शकतो. अमेरिकेतील शेतक-या बरोबर आपला शेतकरी स्पर्धा करु शकतो. म्हणून हे सर्व चित्र पाहिल्यानंतर आपल्या राज्यातील शेतक-यांना शेतमालासाठी मोठया प्रमाणावर सबसिडी देण्याची आवश्यकता आहे. दुधाच्या बाबतीत ऑस्ट्रेलियामध्ये 23 टक्के, अमेरिकेत 47 टक्के युरोपीयन देशामध्ये 56 टक्के, कॅनडामध्ये 59 टक्के, जपानमध्ये 82 टक्के अनुदान दिले जाते आणि आपल्याकडे शून्य अनुदान दिले जाते. या अनुदानाला अन्य देशांमध्ये उत्पादक अनुदान म्हटले जाते. त्या देशांमध्ये शेतक-यांना जी मदत दिली जाते किंवा जे अनुदान दिले जाते ते उत्पादक अनुदान म्हणून दिले जाते. म्हणून त्या देशातील शेतकरी आंतर्राष्ट्रीय पातळीवर टिकू शकतो. एकदा अमेरिकेमध्ये गव्हाचे प्रचंड प्रमाणावर उत्पादन झाले. गव्हाच्या आंतर्राष्ट्रीय किंमती घसरल्या. त्यावेळी अमेरिकेने निर्णय घेतला आणि शेतक-यांना पैसे देऊन गहू खरेदी केला आणि जहाजातून तो गहू समुद्रात ओतला, ही घटना आपणा सर्वांना देखील माहीत आहे. असे सर्व असताना शेतक-यांच्या बाबतीत शासनाची दिसून येणारी उदासीनता फार मोठी भयानक आहे. म्हणून मी सुरुवातीलाच असे सांगितले होते की, स्वातंत्र्यापूर्वी या देशातील शेतक-यांची जी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. यशवंतराव गडाख पुढे सुरु...)

अवस्था होती त्या अवस्थेमध्ये काही प्रमाणात बदल झाला असला तरी या वर्गावर सातत्याने अन्याय झालेला आहे. जागतिक व्यापारी परिषदेमध्ये भारताने जी आकडेवारी सादर केलेली आहे ती आकडेवारी माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, भारतीय शेतक-यांना उणे 86 टक्के सबसिडी मिळते आणि बाहेरच्या देशातील शेतक-यांना 22 पासून 53 टक्क्या पर्यन्त सबसिडी मिळते. आपला शेतकरी कसा जगणार आणि कसा टिकणार ? हा प्रश्न आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख...

आपल्या राज्यातील शेतकरी कसा सुखी रहाणार ? महाराष्ट्रातील शेतकरी कसा टिकणार ? त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, परदेशातील शेतक-याच्या एका शेतमालाची किंमत जर 100 रुपये होत असेल तर शासन त्याला 122 ते 156 रुपये मिळवून देते. भारतातल्या शेतक-याच्या एका शेतीमालाची किंमत 100 रुपये असेल तर या 100 रुपये किमतीच्या शेतीमालाला 13 रुपये 47 पैसे एवढी किंमत मिळते. 100 रुपयांचा शेतमाल निर्माण केल्यानंतर शेतक-याला 13 रुपये किंमत मिळत असेल तर हा शेतकरी कसा जगणार ? घेतलेले कर्ज तो कसे फेडणार ? त्याच्या व्याजाचा दर,इतर खर्च हा वेगळाच मुद्दा आहे. शेतीमालास भाव देण्याचे जे धोरण आहे यावर सातत्याने अन्याय झालेला आहे. ब्रिटीशांनी त्यावेळी यासंदर्भात अन्याय केला. त्यानंतरच्या काळामध्ये सगळया पक्षाच्या राज्यकर्त्यांनी याबाबतीत अन्याय केलेला आहे हे सांगण्यास मला काही वाटणार नाही. सगळया पक्षाच्या सरकारांनी या संदर्भात अन्याय केला. शेतकरी हा अखंड कर्जामध्ये बुडूनच राहिला पाहिजे. आज शेतक-यांवर जे कर्ज आहे ते का थकले आहे ? शेतकरी कर्ज का थकवितो आहे? याचा विचार केला पाहिजे. आज शेतकरी मार्केटमध्ये उभाच राहू शकत नाही. त्याच्या शेतमालास जर 13 रुपये भाव मिळत असेल, त्यास उत्पादन खर्च मिळत नसेल, तर त्याची काय अवस्था होत असेल याची आपणच कल्पना करा. ग्रामीण भागात आपण गेलात तर तेथील शेतकरी वांगे,प्लॉवर इत्यादि वेगवेगळा भाजीपाला पिकविताना दिसतात. वेगवेगळी पिके घेताना दिसतात, परंतु आज त्यांनी पिकविलेल्या मालास योग्य भाव मिळत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. आज गव्हाचे उत्पादन झालेले आहे. आज राज्यात 600 रुपये भावाने गहू विकला जात आहे. 400 रुपयास युरियाची गोणी मिळते. 600 रुपयाने त्या शेतक-याने गहू विकणे त्याला परवडते काय ? यामध्ये त्याची मशागत, मेहनत हिशोबात नाही. 600 रुपये भावाने शेतक-यास गहू विकणे परवडतच नाही. त्याने घेतलेले कर्ज तसेच रहाणार आहे. अशी अवस्था या राज्यातील शेतक-याची असेल तर जाहीरपणाने सगळया पक्षाच्या पुढा-यांनी आणि कार्यकर्त्यांनी म्हणण्याचे धाडस केले पाहिजे की, शेतक-यांना आतापर्यन्त जे कर्ज दिलेले आहे, जे कर्ज तो कधीही फेडू शकला नाही, ते अनैतिक कर्ज आहे, या कर्जामध्ये नितिमत्ता नाही. राज्यातील शेतक-यांना कोणता तरी दर्जा देण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. सर्वांनी एकत्र येऊन शेतक-याला कोणता दर्जा द्यावा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख...

यावर विचार विनिमय केला पाहिजे. गावातील ग्रामसेवक, शिक्षक, ग्राम सचिवालयामध्ये काम करणारा क्लर्क, हेड क्लर्क, त्यांना मिळणारे वेतन, त्याला मिळणा-या सुटी, त्यांना मिळणारा बोनस, आपण त्यांना देतो. तुम्हाला त्या शेतक-यांना तेवढे देता येणार नाही. ठीक आहे. शिपायाचा तरी दर्जा त्याला द्या. त्याला शिपाई म्हणा. जो शेतकरी राना-वनामध्ये रहातो, शेतात रहातो, शेती करतो, काबाडकष्ट करतो. सभापती महोदय, ग्रामीण भागात म्हण आहे. त्याला सुटी नाही. त्याला सणवार नाही, त्याला बोनस नाही, त्याला आजारीपणाची रजा नाही. त्याला आपण काहीच देत नाही. पाऊस पडला आणि शेतात वापसा झाला व त्या शेतक-याच्या घरात एखादी मयत झाली तर तो शेतकरी ती मयत झाकून ठेवतो आणि आपल्या शेतात पेरणी करतो आणि सायंकाळी त्या मयताची विल्हेवाट लावतो..

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ....

शेतक-याची ही परिस्थिती आहे. या शेतक-याला वर्षानुवर्षे कर्जामध्ये बुडवून टाकण्याचे काम या देशातील सरकारांनी केलेले आहे. या परिस्थितीमध्ये त्याला कोठे तरी दर्जा ठेवण्याचे काम केले पाहिजे आणि त्याला मिनिमम तरी दिले गेले पाहिजे. आज परिस्थिती अशी आहे की, स्तर बदलला आहे. शेतक-यांच्या प्रश्नावरती आता बोलणे आणि निर्णय घेणे याच्यामध्ये फार मोठी तफावत सुरु झालेली आहे. ग्रामीण भागामध्ये आम्ही नेहमी भाषणे करतो आणि शेतक-यांचे राज्य आहे असे म्हणतो. परंतु आमचा स्तर बदलला आहे. पाटील असतील,देशमुख असतील,पवार असतील,मोहिते असतील या सगळी मंडळी आहेत. आमचा स्तर बदलला आहे. आम्ही सत्तेमध्ये आहोत. ग्रामीण भागातील शेतकरी,शेतमजूर,लहान लहान शेतकरी या सर्वांचे जे उपेक्षित प्रश्न आहेत ते प्रश्न सत्तेमध्ये येऊन सुटलेले नाहीत. सत्ता ही भांडवलदार आणि नोकरशहांच्या ताब्यात आहे. छोटीशी पॉलीसी बदलावयाची असली तरी ती बदलू शकत नाही. माजी केंद्रीय कृषीमंत्री अण्णासाहेब शिंदे यांनी मला सांगितले होते की गव्हाला त्यांना वाढीव भाव द्यावयाचा होता परंतु त्यावेळी एवढे मोठे लॉबिंग झाले की या देशाच्या शेती मंत्र्यांची इच्छा असूनही गव्हाला पाहिजे त्या प्रमाणात भाव वाढवून देता आला नाही. ही शोकांतिका आहे. या सगळया परिस्थितीमध्ये या शेतक-याचे कर्ज अनैतिक मानण्याचे धाडस या देशातील शेतक-यांच्या लोकप्रतिनिधींनी,नेत्यांनी,पक्षाच्या पुढा-यांनी केले पाहिजे आणि हे निश्चितपणाने थांबविले पाहिजे. शेती धंद्यावर आधरित संस्था आहेत त्यामध्ये सेवा सोसायटया आहेत,बँका आहेत. आज कर्ज थकलेले आहे. वसूली होत नाही. सरकार दुष्काळ जाहीर करते त्यावेळी बँकांकडून वसूली होत नाही. बँकांचे तोटे वाढले आणि अनिष्ट प्रवृत्ती आल्या. जिल्हा बँकांचे आणि स्टेट को-ऑप बँकेचे चित्र पाहिले तर ॲव्हरेज वसूली झालेली आहे. 30-35 टक्के वसूली झालेली आहे. शेती कर्जाची वसूली त्यापेक्षाही खाली आहे. ती 8 टक्के आहे. ही परिस्थिती आहे. या सगळया गोष्टीमध्ये अडकलेला शेतकरी आहे त्याला मदत करणा-या सेवा सोसायटया असतील,बँका असतील हे सर्व उद्योग आज मृतावस्थेत झालेले आहेत. त्यांना मदत करण्याकरिता राज्य सरकार काय करणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. राज्य सरकार काय उत्तर देणार हे मला माहीत आहे. सबसिडी देऊ असे सांगतील. सबसिडी ही वरवरची मलमपट्टी केलेली आहे ती करुन वेळ निभावून नेत आहात. परंतु याच्या मुळाशी जाऊन आपले शेतीविषयक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ...

धोरण अभ्यास करुन तयार करावे लागेल. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये हा शेतकरी कसा टिकेल,तो आपला माल कसा निर्यात करु शकेल,त्याला किती सबसिडी द्यावी लागेल,देशातील पोटेंशिअल तो वापरणार आहे किंवा नाही ? याचा विचार करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. गायकवाड ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख..

सभापती महोदया, मला हे सांगावयाचे आहे की, शेतक-यावर जे काही कर्ज आहे त्या बाबतीत आणि त्या कर्जावरील व्याजाच्या बाबतीत राज्य सरकारने निर्णय घेण्याची गरज आहे. शेतक-यांकडे जे काही कर्ज आहे त्याची दोन वर्षापूर्वीची आकडेवारी मी देत आहे.संपूर्ण देशातील शेतक-याकडे एकूण 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे आणि त्यापैकी फक्त 7 हजार कोटी रुपयांचे कर्ज थकलेले आहे.देशातील राष्ट्रीयकृत बॅन्कांनी उद्योगपतींना एकूण 52 हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले होते. त्यापैकी 27 हजार कोटी रुपयांचे कर्ज थकलेले आहे .देशातील सात भांडवलदारांकडे हे कर्ज थकलेले आहे. मला हे सांगावयाचे आहे की, शेतक-यांकडे 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज असून त्यापैकी फक्त 7 हजार कोटी रुपयांचे कर्ज थकलेले आहे . ही आकडेवारी काय सांगत आहे ? या देशातील सरकार आणि या देशातील राष्ट्रीयकृत बॅन्का काय करीत आहेत ? लोकसभेमध्ये जेव्हा ही आकडेवारी सादर केली होती तेव्हा श्री.जसवंत सिंह हे वित्त मंत्री होते. विरोधी पक्षातील सदस्यांनी त्यांच्याकडे थकबाकीदार असलेल्या भांडवलदारांची आकडेवारी विचारली होती. त्यावेळी त्यांनी अशी टिप्पणी केली होती की, देशातील भांडवलदार व उद्योगपती या बॅन्कांना लुटतात. मार्डिया ग्रुपकडे 1450 कोटी रुपयांचे कर्ज आहे.लाईटस ग्रुपकडे 1 हजार 12 कोटी रुपयांचे कर्ज आहे. उषा इस्पात कंपनीकडे 9 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. मार्डिया केमिकल्सने 1400 कोटी रुपये उचलले त्यापैकी त्यांनी एक रुपयासुध्दा परत केलेला नाही.कायद्याचा आधार घेऊन हे मोठे लोक कोर्टात जातात,कायद्यातील पळवाटा शोधून काढतात आणि आपला ग्रुप दिवाळखोरीत काढतात व पैसे बुडवतात .मात्र या कंपन्या कर्ज परत करीत नाहीत. मी सभागृहाला हे विचारु इच्छितो की,या देशातील एका तरी शेतक-याने दिवाळखोरी काढली आहे काय ? कोटयावधी शेतक-यापैकी एकाही शेतक-याने दिवाळखोरी काढली नाही .हे शेतकरी दिवाळखोरी काढत नाहीत तर ते आत्महत्या करतात.देशातील मोठ मोठया कंपन्यांनी राष्ट्रीयकृत बॅन्कांना मोठया प्रमाणावर लुटलेले आहे.ही लूट इतक्या मोठया प्रमाणावर आहे की, या बॅन्का एन.पी.ए.मध्ये गेल्या व या बॅन्का तोटयात गेल्या. या बॅन्कांना झालेले तोटे क्लिअर करण्यासाठी तसेच त्यांचे बॅलन्सशीट क्लीअर करण्यासाठी या देशाच्या खजिन्यातून केन्द्र सरकारने सुरुवातीला त्यांना सोळा हजार कोटी रुपये दिले आणि नंतर 62 हजार कोटी रुपये दिले

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख..

होते.अशा प्रकारे देशातील लोकांचा पैसा केन्द्र सरकारने या बॅन्कांना दिला होता.मोठ मोठया कंपन्यांनी राष्ट्रीयकृत बॅन्कांना लुटावयाचे आणि या बॅन्का नीट चालल्या पाहिजेत म्हणून केन्द्र सरकारने त्यांना पैसे द्यावयाचे हे बरोबर नाही. आम्ही त्यावेळी जाहीरपणे असे सांगितले होते की, राष्ट्रीयकृत बॅन्कांचे बॅलन्सशील क्लीअर करण्यासाठी हे पैसे दिलेले आहेत. हे ठीक आहे परंतु सहकार बॅन्का शेतक-यांना फायनान्स करतात . त्या एक प्रकारे जुगार खेळत असतात पाऊस पडला तरच त्या शेतक-याचे पीक येईल आणि त्यानंतर हा शेतकरी कर्ज परत करील. परंतु ज्या सहकारी बॅन्कांनी शेतक-यांना कर्ज दिले होते त्या ....

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडाख ....

बँकाही तोट्यात गेल्या, दिवाळखोरीमध्ये गेल्यानंतर ज्याप्रमाणे केंद्र सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांना मदत केली तशी मदत सहकार क्षेत्रातील सेवासोसायट्या, बँकां ज्या शेतीसाठी कर्जे देतात त्यांनाही दिली पाहिजे ही मागणी आम्ही केली तेव्हा आम्हाला असे उत्तर देण्यात आले की, सहकारी बँका या केंद्र सरकारच्या ताब्यामध्ये नाहीत. त्या राज्य सरकारच्या अखत्यारीत येतात तेव्हा राज्य सरकारने याबाबत निर्णय घ्यावयाचा आहे. मग राज्य सरकारने यामध्ये काय पुढाकार घेतला ? अध्यक्ष महाराज, राज्य सरकार आणि केंद्र सरकारने एकत्रितपणे येऊन अशा प्रकारे महाराष्ट्रातील या सहकारी बँकांना, सेवासोसायट्यांना मदत करण्यासाठी काय केले आहे वा करीत आहे हाही महत्त्वाचा प्रश्न आहे. या सगळ्या परिस्थितीत शेतीधंद्यातील हे चित्र निश्चितपणे आपल्याला दिसते. म्हणून या ठिकाणी मला जाहीरपणे सांगावेसे वाटते की, काही प्रश्नांचा विचार हा राजकारण विरहित केला गेला पाहिजे. पुढील दशकात जे शेतीधंद्याचे उभे राहील, त्या सगळ्या पार्श्वभूमीवर या देशतील शेतकरी इतका सक्षम आहे, या संस्था बळकट आहेत पण मंदीच्या लाटेमध्ये जेव्हा त्या येतात तेव्हा त्यांना सावरण्याचे काम सरकारने केले पाहिजे, नव्हे ते सरकारचे कर्तव्यच आहे असे मी मानतो. अध्यक्ष महाराज, साखर धंदा सुरू झाल्या पासून 50 हजार कोटी रुपयांचा कर आम्ही केंद्र सरकारला दिलेला आहे आणि त्यातील मोठ्ठा वाटा राज्य सरकारला देखील मिळाला आहे. दरवर्षी 1700 कोटी रुपये आम्ही तुम्हाला करातून देतो. मग जेव्हा मंदीची लाट येते आणि हा धंदा, शेती धंदा संकटात येतो त्यावेळेस त्याला मदत केली पाहिजे. तशी आपल्याला मदत केलेली आहे, नाही असे नाही, केंद्रामध्ये सन्माननीय श्री.शरद पवार आहेत, काही प्रमाणात त्यांनी मदत करण्याचा प्रयत्न केला पण त्यालाही मर्यादा आहेत हेही मला माहीत आहे. परंतु ज्या प्रमाणात हे सगळे सावरून धरले पाहिजे तसे धरले गेले नाही म्हणून आज बँका तोट्यात गेल्या आहेत, सेवा-सोसायट्या तोट्यात गेलेल्या आहेत. या दृष्टचक्रामध्ये महाराष्ट्रातील शेतीधंदा आणि या बँका सापडलेल्या आहेत. अशा वेळी या क्षेत्राला उभे करण्याचे काम, त्यांचे व्याजाचे दर उभे करण्याचे काम... आज शेतकऱ्याला 8 टक्के व्याज दर असला पाहिजे. राज्य सरकारने मनात आणले तर नाबार्डला बोलावून ते सांगू शकते की, त्यांनी शेतकऱ्यांना 5 टक्के दराने कर्ज दिले पाहिजे. एमएससी बँकेला सांगू शकते. सेवासोसायट्यांना सांगू शकते. नाही तरी आपण त्रिस्तरीय पध्दती मान्य केलेली आहे. सेवासोसायट्या 4 टक्के जास्त घेतात, जिल्हा बँका

.....3के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडाख ....

1-2 टक्के घेतात आणि या सगळ्या कर्जावर, त्या शेतकऱ्याच्या कर्जावरील व्याजावर तर आमच्या गाड्या-घोडे, बंगले आदी उभे राहतात. तेव्हा ते दर तुम्ही का कमी करीत नाही ? ते तुम्ही कमी करू शकता. जिल्हा बँकांचा जो प्रशासकीय खर्च आहे, तेथील जी उधळपट्टी आहे ती तुम्ही आवरू शकता, कमी करू शकता. राज्य सरकार त्यासाठी सहभाग देऊ शकते. नाबार्डला तुम्ही सांगू शकता की, शेतकऱ्याला 8-9 टक्के दराने शेती कर्ज दिले पाहिजे. त्या दृष्टीने सरकारने प्रयत्न केले पाहिजेत अशी माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे. म्हणून या ठिकाणी माझ्या भाषणाचा समारोप करीत असताना मी जाहीरपणे सांगू इच्छितो की, आज मुक्त अर्थव्यवस्थेमध्ये परत एकदा भारतातील शेती व्यवसाय दुष्ट चक्रामध्ये अडकलेला आहे, त्याच्यापुढे आव्हाने उभी राहिली आहेत, त्यावर मात करण्यासाठी, ती सोडविण्यासाठी जे बसले आहेत त्यांना मर्यादा आहेत, त्यांचे स्तर बदलले आहेत, प्रश्नांची तीव्रता कमी झालेली आहे म्हणून जो खालचा शेतकरी आहे, अल्पभूधारक, कष्टकरी शेतकरी आहे ....

(यानंतर श्री. जागडे .... 3एल 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडाख....

त्यांच्या संघटना जेव्हा पुढे येतील, तेव्हाच या प्रश्नाला गती येईल. आपण सर्वजण शेतक-यांचे लोकप्रतिनिधी समजत आहोत. तेव्हा आपण सर्वांनी आजच जागे व्हा. शेतक-यासमोर येत्या पाच-दहा वर्षात येणा-या आव्हानाचा विचार करावा. देशातील आणि राज्यातील शेतकरी टिकला पाहिजे, तो जगला पाहिजे, याचा सर्वांनी विचार करण्याची गरज आहे. एवढेच या निमित्ताने बोलून मी माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : या प्रस्तावावर मतदान होणार नाही. केवळ चर्चा होईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, या चर्चेत सहभागी होताना मला एक विनंती करावयाची आहे. मी चार दिवसापूर्वी माननीय सभापतींना भेटण्यासाठी गेलो होतो. तेव्हा माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख हे त्या ठिकाणी बसले होते. मी त्यावेळी माननीय सभापतींना असे सांगितले होते की, अनेक विषयावर सभागृहात चर्चा होते. परंतु शेतीच्या विषयावर चर्चा होत नाही. तेव्हा शेतीच्या विषयावर चर्चा घ्यावी. माननीय सभापतींनी माझी विनंती मान्य केली. त्याप्रमाणे माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी ही अल्पकालीन चर्चा सदनात उपस्थित केली आहे. त्याबद्दल मी मा. सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांना धन्यवाद देत आहे. माझ्या माहितीप्रमाणे शेतीवर पहिल्यांदाच या सभागृहात चर्चा होत आहे. अनुशेषाबाबत तसेच इतर विषयांबाबत अनेक तास चर्चा होत असते. त्यामुळे या चर्चेला सुध्दा माननीय सभापतींनी वेळ द्यावा. कृपया वेळेचे बंधन घालू नये.

तालिका सभापती : अनेक माननीय सदस्य या चर्चेत भाग घेऊ इच्छितात. साडेंसहा वाजेपर्यन्त या चर्चेसाठी वेळ देण्यात आला आहे. त्या दृष्टीने माननीय सदस्यांनी थोडक्यात बोलावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, शेतकरी दिवाळखोरीत जात नाहीत, तर आत्महत्या करतात, असा मुद्दा माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी मांडला आहे. तो धागा पकडून मी माझे विचार या ठिकाणी मांडीत आहे. माझ्या हातात वर्तमानपत्र आहे. त्यामध्ये शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येबाबतची माहिती दिली. येवलामधील श्री. सर्जेराव शिरसाट यांनी स्वत:च्या अंगावर रॉकेल ओतून स्वत:ला पेटवून आत्मदहन केले आहे. तसेच हिंगोलीचे श्री. महादेवराव साखडे यांनी विष पिऊन आत्महत्या केली आहे.

(यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

महाराष्ट्रातील शेतकऱ्याची दैन्यावस्था सांगत असतांना हे सरकार शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कबरस्तानावर विराजमान झाले आहे असे अधिकृतरित्या, जाहीररित्या म्हणतो. हे सरकार गेली पाच वर्षे होते. या पाच वर्षात 454 आत्महत्या झाल्या. या सदनामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना मदत करावी म्हणून विरोधी पक्षाकडून टाहो फोडला गेला. सदनातील काही सक्षम संवेदनशील सदस्य सत्ताधारी पक्षात बसले आहेत त्यांनीही सांगितले परंतु काही अनेक कारणे देऊन त्यावर चर्चा करता येणार नाही असे सांगून सर्वांना मदत करण्याचे सरकारने टाळले. आणि या शेतकऱ्यांच्या आत्महत्तेच्या रक्ताने माखलेले सरकार पुन्हा आरुढ झाल्यानंतरही या सरकारला शहाणपण सुचले नाही. हे सरकार पुन्हा सत्तेवर आल्यानंतर शेतीची झालेली विदारक अवस्थ व शेतकऱ्याचा सरकारवर विश्वास नसावा अशी परिस्थिती निर्माण झाली. नोव्हेंबरमध्ये 19 आत्महत्या झाल्या, डिसेंबरमध्ये 29 आत्महत्या झाल्या, जानेवारीमध्ये 11 आत्महत्या झाल्या, फेब्रुवारीमध्ये 16 आत्महत्या झाल्या, मार्चमध्ये 26 आत्महत्या झाल्या, एप्रिल मध्ये एक अधिक दोन मिळून अशा तीन आत्महत्या झाल्या. अशाप्रकारे हे सरकार नव्याने आल्यानंतर 105 आत्महत्या झाल्या. त्याची पूर्ण नावानिशी यादी माझ्याजवळ आहे. याबाबत मी माननीय शेतकी मंत्र्यांना प्रश्न विचारतो की हे कां होत आहे? आपण आपले खाते चालवीत असतांना, सरकारच्या कॅबिनेटमध्ये बसतांना कोणते विषय मांडता? किती तडफेने, किती आत्मियतेने शेतकऱ्यांसाठी आपण विषय मांडता. शेतकऱ्यांकरिता काय मिळविता याकडे आम्ही चातकासारखे पहात असतो. ज्यावेळी सभागृहामध्ये अर्थसंकल्प मांडण्यात येतो त्यावेळी त्या मध्ये डोकावतांना आपले कर्तृत्व दिसत नाही. तिकडे कोण अडवून धरतो, कोण मारतो, कशासाठी मारतो याचा आपण शोध या चर्चेमधून घेतला पहिजे या प्रामाणिक भावनेतून मी बोलत आहे. या सरकारने गेल्या अर्थसंकल्पामध्ये जे केले ते यावेळेला आम्हाला दिसले पाहिजे. गेल्या वेळेला माननीय अर्थमंत्र्यांनी ज्या घोषणा आपल्या पुस्तिकेतून केल्या या वेळी त्यांचा मागमूस नाही. असेल तर मंत्रिमहोदयांनी त्या बाबतचा उल्लेख करावा. म्हणून मी केले नाही असे म्हटले आहे. आणि केले असेल तर मी माझी चूक निश्चित मान्य करीन. परंतु माझ्या माहिती प्रमाणे आपण जी घोषणा केली आहे ती केली नाही. परिच्छेद 22.5 मध्ये त्यांनी असे म्हटले होते की, " नव्याने अस्तित्वात येत असलेले बायो टेक्नॉलॉजिकल व टिश्यू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

कल्चर यासारखे आधुनिक विज्ञान व त्याचे भविष्यातील महत्व लक्षात घेऊन या उपक्रमाचे बळकटीकरण करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहूरी येथे राज्य स्तरीय बायो टेक्नॉलॉजी सेंटर स्थापन करुन 2004-05 या करिता 4 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे" त्या पैकी किती वापरली हे आपण सांगावे?. आपला कर्तृत्वाचा उंचावलेला आलेख बघायला मला खूप आवडेल. सहकारी साखर कारखान्यांच्या आर्थिक सहाय्याबद्दल मागील अर्थमंत्र्यांनी असे घोषित केले होते की " राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने 51 सहकारी साखर कारखान्यांचा गाळप हंगाम 2003-04 या वर्षासाठी रु.39.57 कोटी इतक्या पूर्वहंगामी कर्जास शासनाने थकहमी दिली आहे. अर्थात आर्थिक दृष्टया 31 सहकारी साखर कारखान्यांना रु.786.50 कोटी खेळत्या भांडवलाच्या कर्जास शासनाने थकहमी दिली आहे. यामुळे 5 लाख शेतकऱ्यांचे व 60 लाख मे.टन ऊसाचे गाळप होऊ शकेल व त्या पोटी शेतक-यांना अंदाजे 480 कोटी उपलब्ध होतील" असे म्हटले आहे परंतु अर्थसंकल्पामध्ये सांगताना व गेल्या चार सहा महिन्यात सांगताना या महाराष्ट्रातील 182 साखर कारखान्यांपैकी फक्त 22 साखर कारखाने चालू आहेत. बाकीचे बंद आहेत व 12 ते 13 साखर कारखाने अवसायनात आणले आहेत. अर्थसंकल्पामध्ये साखर कारखान्यांचे बळकटीकरण करीत असतांना व ऊस उत्पादक शेतकऱ्याला फार मोठा आधार देत असतांना एवढया मोठया रकमेची तरतूद झाली असे आपण छातीवर हात ठेऊन सांगितले असतांना महाराष्ट्रातील एवढे साखर कारखाने उध्वस्त अवस्थेत कां दिसत आहेत? आणि आमच्या माननीय श्री. यशवंतराव गडाख यांना त्यांच्या साखरेच्या गोड आठवणी कां सांगाव्याश्या वाटत आहेत? हे मला कळले नाही. या साखर उत्पादनामधून केंद्र सरकारला व राज्य सरकारला 50 हजार कोटी रुपये मिळाले असतील तर या साखर उत्पादनाची दुर्दशा का निर्माण झाली? याला कोण जबाबदार आहे हे आम्हाला कळले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

या तुमच्या घोषणा आहेत. त्याचवेळेला सन्माननीय सदस्य श्री.गडाखसाहेबांनी जाता-जाता जो उल्लेख केला. त्याबाबतीत मी उत्सुकतेने पहात होतो. कारण आकडेवारी देण्यामध्ये आणि ती व्यवस्थित देण्यामध्ये आपला हातखंडा आहे. म्हणून मी तुमचे भाषण काळजीपूर्वक ऐकत होतो, कारण ते मार्गदर्शक होते. जसे विद्यार्थ्याने शिक्षकाचे ऐकावे इतक्या चांगल्या पध्दतीने आपण विषय मांडत होतात. पण हे सर्व मांडत असताना, अगदी केंद्रामध्ये उद्योगपतींनी लुबाडलेली परिस्थिती आणि शेतक-यांच्या हतबलतेला या सरकारने ठोकलेला बांबू याबाबतीत देखील आपण विचार मांडले. म्हणजे 76 हजार कोटीपैकी, फक्त थकीत कर्ज असलेले 7000 शेतकरी आज आत्महत्येपर्यंत जातो आणि दोषी ठरतो आणि कोटयावधी रुपये बुडविणारे कारखानदार मात्र या देशामध्ये आमदार आणि खासदार देखील बनतात. आपण जेव्हा ही परिस्थिती मांडली, त्यावेळेला जाता-जाता आपण एक गोष्ट म्हणालात की, आमच्या महाराष्ट्राचे सुपूत्र केंद्र सरकारमध्ये कृषी मंत्री आहेत. ते अत्यंत पराकाष्टा करीत आहेत. साखर उद्योग वाचावा अशी त्यांची तळमळ आहे आणि काही ना काही आपल्याला त्याचा फायदा होत आहे. पण नक्की किती फायदा आला याची आकडेवारी आपल्याकडून आली नाही. म्हणून काही मिळाले का? याकडे मी उत्सुकतेने पहात होतो. हे सरकार आल्यानंतर काही मिळाले का ? त्यांनी काही दिले का ? मला माहिती नाही. पण मी एक अभ्यासक म्हणून पहात होतो. पण मी माननीय कृषी मंत्र्यांना आपल्या माध्यमातून मी आवाहन करीत आहे की, हे सरकार आल्यानंतर आणि या महाराष्ट्राचे जे सुपूत्र आहेत ते लोकसभेमध्ये माननीय कृषी मंत्री झाल्यानंतर जो डांगोरा पिटला गेला, ढोल बडवले गेले की, आता या राज्यातील शेतक-यांना सुखाचे दिवस येणार आहेत आणि तसे सुखाचे दिवस येण्याकरता गेल्या सहा महिन्यामध्ये माननीय कृषी मंत्र्यांनी किती उपकृत केले ? कोणत्या मार्गाने उपकृत केले आणि कोणकोणत्या माध्यमातून कसे-कसे पैसे उपलब्ध करुन दिले ? याचे जर या चर्चेच्या निमित्ताने दिग्दर्शन झाले तर या महाराष्ट्रातील सुपुत्राचा सन्मान फार मोठा वाढेल. शेतक-यांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास येईल की, होय, आमचा कुणीतरी सुपुत्र आज दिल्लीमध्ये आमच्यासाठी बसलेला आहे. तर ती माहिती आपण सांगाल का ? हे या माध्यमातून आपल्याला विचारीत आहे. केवळ आपण उल्लेख केला म्हणून.

सभापती महोदया, पुस्तकाच्या पान नं.10 वर असे म्हटलेले आहे की, "कृषीमध्ये

. . . .3 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

औद्योगिक संस्था, बियाणे, खते इ.उत्पादन करणा-या संशोधन संस्था, शेतक-यांची संघटना व शेतकरी यांचाही सहभाग असेल." मी यासंदर्भात पुढे बोलणार आहे आणि त्यावेळी यामध्ये होणारा जो भ्रष्टाचार आहे, त्याबाबतीत नक्की मांडणार आहे आणि सरकारची डोळेझाक प्रवृत्ती सुध्दा मांडणार आहे. याठिकाणी सभागृहात माजी कृषी मंत्री माननीय श्री.गोविंदराव आदिक बसलेले आहेत याचा मला आनंद आहे. त्यांच्याशी आम्ही सुख-दु:खाचे बोलत होतो. कृषीनिष्ठ कसे असावे हे मला त्यांच्याबरोबर खाजगी स्वरुपामध्ये केलेल्या संभाषणावरुन समजत असे. सध्याचे माननीय कृषी मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्याशी आमची तशी गप्पा मारण्यासारखी भेट झाली नाही. हेही धोरण मांडले होते की, "राज्य शासनाच्या सुधारीत पीक विमा योजनेकरता प्रारुप आराखडा केंद्र शासनाकडे विचारार्थ सादर केलेला आहे. सुधारीत प्रस्ताव केंद्र शासनाकडून मान्य होताच, "तसा तो झाला आहे का ? ते पहावे. हे गेल्या वर्षीचे आहे. राज्यातील गरीब शेतक-यांना विशेषत: कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या कोरडवाहू विभागातील शेतक-यांना त्याचा निश्चित फायदा होईल असे आपण 2004-2005 मध्ये मांडले होते. यावेळेस 2005-2006 चा अर्थसंकल्प सादर झाला आहे. गेल्या वर्षभरामध्ये यासंदर्भातील आपण जो अर्थसंकल्प मांडलेला आहे आणि त्यातून शेतक-यांना जो विश्वास दिलेला आहे. त्यानुसार आपला किती आलेख ऊंचावलेला आहे हेही मला या निमित्ताने समजावे अशी मी नम्र अपेक्षा आपल्याकडून करीत आहे. त्याचवेळेला हेही मांडले होते. याठिकाणी दुष्काळाच्या संदर्भात म्हटलेले आहे की, रोजगार हमी योजनेशी निगडित उत्पादन विकास कार्यक्रमात सहभागी झालेल्या शेतक-यांची रुपये 162 कोटींची कर्जे माफ करण्यात आली आहेत. ऊस पिकावर लोकरी मावा व किडीचा प्रादूर्भाव झाल्याने नुकसान भरपाईचे 45.50 कोटी रुपये दुष्काळी भागातील नापेर क्षेत्रातील 34 कोटी व धान उत्पादन क्षेत्रातील 20 कोटी रुपयांचा परतावा आम्ही केलेला आहे. मला नम्रपणे येथे नमूद करावयाचे आहे की, कर्जमाफीच्या बाबतीत काय झाले ? ते सांगणे आवश्यकच आहे आणि आमचा दावा आहे की, तुम्ही जाहीर केलेली कर्ज माफी मिळालेली नसावी. माननीय मंत्री महोदयांच्या मागे माननीय सहकार राज्यमंत्री बसलेले आहेत. मी त्यांच्याकडे आशेने पहात आहे. ते फार भावनात्मक आहेत. एखादी गोष्ट झाली नाही तर सरळ सांगतात की, जर माझ्या शेतक-याला हे मिळणार नसेल तर मी राजीनामा देईन. मला त्यांच्या धैर्याबद्दल फार कौतुक वाटते. आता कापूस उत्पादकाला पैसे मिळाले नाहीत म्हणून काही

. . . .3 एन-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

राजीनामा देण्याचा प्रश्न उत्पन्न झालेला नाही. कर्ज माफी मिळाली नसेल तर दांडेगावकरसाहेब, आपला तो बाणेदारपणा दाखवा आणि शेतकरी निष्ठा दाखवून या सभागृहातून जाताना सन्मानाने राजीनामा जाहीर करुन जावे. जर कर्ज माफी मिळाली असेल तर आम्ही तुमचा आदर करु आणि सन्मान केल्याशिवाय राहणार नाही.

एक सन्माननीय सदस्य(खाली बसून) : ते कापसापुरते बोलले होते.

श्री.दिवाकर रावते : आता बोला असे सांगत आहे. कापसापुरते बोलले हे मलाही माहिती आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे चालू....

शेती मालाच्याभावाच्या संदर्भामध्ये काही गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक आहे. 2001-2002, 2004-2005 या कालावधीतील संपूर्ण शेंतकऱ्यांच्या उत्पन्नाचा आलेख पाहिला तर... माझ्या उत्पादित केलेल्या मालाला 100 रुपये मिळत असतील, तर महागाई वाढलेला निर्देशांक, रुपयाचे मूल्य, अवमूल्य या सगळ्या गोष्टी पहाता, किमान 110 रुपये तरी मिळाले पाहिजेत. शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च तर वाढलेलाच आहे,तो नाकारता येत नाही. अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्र सरकारने शिफारस केलेल्या आणि केंद्र सरकारने जाहीर केलेल्या विक्री हंगाम या पिकांची किमान आधारभूत किंमत शासनाने जाहीर केलेली आहे, ती मी मुद्दाम वाचून दाखवितो. मी थोडा सदनाचा वेळ घेणार आहे परंतु ते शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळणारे आहे, म्हणून मला ते वाचणे भाग आहे.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेबांनी या ठिकाणी गव्हाचा उल्लेख केला. गव्हाचा क्विंटलचा भाव 600 रुपये आहे. सभापती महोदया, 2000-2001 मध्ये राज्य सरकारने शिफारस केलेला भाव 1193.1 इतका होता. आता त्याच गव्हाला 1166.83 भाव दाखविलेला आहे. म्हणजे कमी भाव दाखविलेला आहे. उत्पादक क्षमतेमधील भावाची कमतरता का आली ? हे नुसते गव्हाच्याच बाबतीत झालेले आहे असे नाही तर हरभऱ्याच्या बाबतीतही तेव्हा 2036 इतका भाव होता, तोच 2004-2005 मध्ये 1908.41 भाव दिलेला आहे. पुन्हा यामध्ये भाव कमी झालेला आहे. सभापती महोदया, कापसाच्या बाबतीत तर गंमतच आहे. या गमती-जमतीमध्ये आपण 2500, 2600, 2700 हा भाव देण्याच्या भांडणामध्ये अडकून 2250 च्या वर भाव चांगल्या लांब धाग्याच्या कापसाला एक रुपयाही आपण दिलेला नाही. राज्य शासनाने बन्नी आणि अेके-6 ची 2000-2001 साली 3,107 भाव दिलेला आहे. आता त्याच कापसाला 2909 इतका भाव दिलेला आहे. राज्य शासनाला पटत असेल की, लांब धाग्याच्या नंबर 1 च्या कापसाची उत्पादक किंमत 2901 आहे ती 2000 पेक्षाही कमी दाखविलेली आहे, आपण 2500, 2600 भाव देता हा न्याय भाव नाही. हा त्यांच्यावर अन्याय करणारा भाव आहे. तरी देखील मिशीला तूप लावून आम्ही पैसे दिल्याचे अभिनंदनाचे ठराव आमच्यासाठी करा, असे आमचे उपमुख्यमंत्री मैदान मारुन आल्यासारखे सांगतात. हे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. आज उत्पादक किंमत कापूस उत्पादकाला मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून त्या भागामध्ये वेळेवर पैसे दिले तर त्याचे कोठे तरी व्याज जाते, त्याची उत्पादक किंमत न मिळाल्यामुळे पुन्हा मात्र त्याच्या घरामधील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

श्री.दिवाकर रावते (पुढे चालू....

दिवा जळणार नाही ही सत्य परिस्थिती आहे.सन्माननीय मंत्री श्री.दांडेगावकर साहेब हे सत्य आहे की नाही ते आपण सांगा. कारण आपण त्या भागामधील अहात, आपल्या आजूबाजूला ही मंडळी बसलेली असतात. त्यामुळे आपल्याला माहिती आहे. मग कापसाच्याबाबतीमधील हीच पूर्ण मालिका खालपर्यन्त आहे म्हणजे एचके 44 ला आहे, 5166 या जातीला आहे. हे सगळे करत असतांना भूईमुगाचे उन्हाळी पीक आहे, रब्बीचे पीक आहे. भुईमुग पिकाच्याबाबतीत तिकडील शेतकरी कॅश क्रॉप म्हणून अवलंबून असतो. सभापती महोदय, भूईमुगाच्या पिकाच्याबाबतीतही राज्य शासनाने 2000-2001 मध्ये 2433 उत्पादित किंमत म्हटली होती, ती आज 2076 म्हणजे 300 रुपयांनी कमी दाखविलेली आहे. असे काय घडलेले आहे की, शेतकऱ्यांच्या उत्पादित किंमतीमध्ये कमतरता असावी ? तेच उडीद पिकाची आहे तेच तूरीच्या, भुईमुगाच्या पिकांच्याबाबतीत आहे. ही कॅश क्रॉप पिके आहेत. यावरच शेतकऱ्याचे भवितव्य अवलंबून असते. ज्वारी, बाजरीवर पोटापाण्यापुरते गुजराण करुन उरले तर बाजारामध्ये विकावे असा शेतकऱ्यांचा विचार असतो. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेब आपण पिकांच्या किंमती सांगत होता. पण किंमतीची घसरण इकडे ज्यावेळेला दिसते, त्यावेळेला अशी परिस्थिती का निर्माण झाली आणि 2000 साली उत्पादक किंमत होती ती आज कमी का झाली, याबाबतीत काय प्रगती झाली, आपल्याकडून अशी कोणती सबसिडी मिळाली ? याबाबतचा विचार होणे आवश्यक आहे. सन्माननीय श्री. गडाख साहेबांनी जागतिक बाजारपेठेच्या संदर्भाने सांगितले. त्यावेळेला माझ्या असे लक्षात आले की, जपान, अमेरिकेपासून ते युरोपच्या देशामध्ये सबसिडी हा अविभाज्य भाग धरुन आपला शेतकरी जगविणे हा त्यांनी शेतीच्या अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा ठेवलेला आहे. पण आपल्या भारतामध्ये मात्र त्याबाबतचा काही विचार होत नाही. मला नमूद केले पाहिजे की, गॅट कराराअंतर्गत ज्यावेळेला आम्ही विचार करतो, जागतिक बाजारपेठेच्या दृष्टीने परदेशातील मंडळी येतात. ते फार मोठे तज्ज्ञ असतात अशातला भाग नाही, ही मंडळी आपल्यापेक्षाही श्रेष्ठ आहेत अशातलाही भाग नाही, या मंडळींना आपल्यापेक्षा शेतीमधील जास्त कळते अशातलाही भग नाही. मी हे अधिकृतरित्या एवढ्याकरिता म्हणतो आहे की, माझ्याकडे एक अहवाल आहे..

यानंतर श्री.बरवड.....

अशासकीय प्रत / अशासकीयसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

त्या अहवालामध्ये ब्रिटिशांच्या वेळचे एक वाक्य आहे. सन 1881 मध्ये इंग्रज सरकारने त्यांच्याकडील एक शास्त्रज्ञ व प्रगत शेतकरी भारतभर फिरुन भारतास शेती विषयक काय सल्ला देता येईल हे पाहण्याकरिता पाठविला. इंग्लंडच्या राणीने त्याला पाठविले. येथील शेतकरी कसे आहेत ते बघण्यासाठी पाठविले. त्यांनी 1888 साली जो अहवाल प्रसिध्द केला त्याचा सारांश असा आहे की, "भारतातील शेतकरी युरोपापेक्षा प्रगत असून काही भागात तर प्रती एकरी युरोपाच्या अडीचपटीने उत्पादन घेतात. मद्राससारख्या प्रांतातील एका छोटयाशा विभागात शेतकरी भाताच्या शेकडो जाती हवामान, जमीन व हंगाम यानुसार योग्य त्या अचूकपणे लावतात त्यामुळे इंग्लंडकडे भारतातील शेती व शेतकऱ्यांना शिकविण्यासारखे काहीच नाही, उलट शिकण्यासारखेच भरपूर आहे." असा अहवाल 1888 साली ब्रिटनमधील शेती तज्ञांनी भारतातील शेतक-यांबद्दल दिला होता. मला खेदाने म्हणावे लागते की, जागतिक बँकेची मंडळी या ठिकाणी येतात आणि तुम्हाला पहिला सल्ला देतात की, तुम्हाला जर पैसे हवे असतील तर पहिल्यांदा सबसिडी बंद करा. विदर्भ, मराठवाडा, खानदेश भागातील शेतकऱ्यांना प्रचंड उत्पन्न आले म्हणून कापसाचे दुर्दैव पहावे लागले. अमेरिकेमध्ये वर्ल्ड ट्रेडकडे खटला दाखल झाला. त्यांनी आपल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना 14 हजार कोटी डॉलर सबसिडी दिल्यामुळे जागतिक बाजारात कापसाचे भाव धडाधड कोसळले आणि आपले शेतकरी अडचणीत आले. अप्रगत देशातील शेतकऱ्यांना अडचणीत आणून प्रगत देशातील शेतकऱ्यांना टिकविण्याची राजनीती आंतरराष्ट्रीय स्तरावर आखली जाते तेव्हा आपल्या देशातील शेतीतज्ञ काय करतात ? असा प्रश्न माझ्या सारख्या सर्वसामान्य, अज्ञानी माणसाला नेहमी पडतो. पण त्याबाबत कोठे मार्गदर्शन होत नाही याबाबतीत खंत वाटते. आम्ही शेतकऱ्यांमध्ये जातो, राजकारणाकरिता भाषणे करतो, राजकारणाकरिता बोलतो, मतांकरिता बोलतो. परंतु त्यांचे अश्रू पुसण्याकरिता आमच्याकडे किती वेळ आहे आणि आमच्याकडे किती हृदय आहे हा प्रश्न आहे. शेतकऱ्यांची अशी परिस्थिती आज निर्माण झालेली आहे. हे सर्व सांगत असताना मला अत्यंत नम्रपणे नमूद करावेसे वाटते की, आम्ही तिकडे गेलो, नियोजन आयोगाकडे बसलो, असे भांडलो, तसे भांडलो, हे मागितले, ते मागितले असे माननीय अर्थमंत्री सांगतात. असा लढवय्या अर्थमंत्री पाहिल्यानंतर कौतुकही वाटते. आपल्या नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ MAP/ KGS/ SBT/

श्री. दिवाकर रावते ....

नियोजन आयोगाकडे वेळेवर नोट न पाठविल्यामुळे त्यांना नियोजन आयोगाकडे वेळ न मिळाल्याची खंत वाटून आमचे अधिकारी आमच्या सरकारची किती नाचक्की करतात त्याबद्दल आम्ही तीव्र संतापही व्यक्त करतो. सभापती महोदया, आज माझ्याकडे जी आकडेवारी आहे ती अत्यंत दुर्दैवी आहे. महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर कृषी आणि संलग्न क्षेत्रासाठीच्या तरतुदी रोज घटत आहेत त्यांचा माझ्याकडे आलेख आहे. तिसऱ्या योजनेमध्ये या क्षेत्रासाठी 30.87 टक्के इतकी तरतूद होती. चौथ्या योजनेमध्ये ती 22.07 टक्के इतकी कमी झाली. पाचव्या योजनेमध्ये 22.91 टक्के तरतूद झाली. सहाव्या योजनेमध्ये 6.1 टक्के झाली. सातव्या योजनेमध्ये 5.56 टक्के तरतूद झाली. आठव्या योजनेमध्ये 5.71 टक्के तरतूद झाली. नवव्या योजनेमध्ये 4.98 टक्के तरतूद झाली. त्यानंतरच्या दहाव्या आणि अकराव्या अशा दोन योजनांमधील परिस्थिती काय आहे त्याबाबत आपण आम्हाला मार्गदर्शन करावे. म्हणजे आपला खुजेपणा किती आहे, आपल्या शेती क्षेत्रातील तरतूद किती कमी होते याबाबतीत मार्गदर्शन होईल. महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांबद्दल ही अवस्था असेल, आमच्या शेती संदर्भातील योजनेमधील खर्च दिवसेंदिवस कमी होत असेल तर आपण कोठला शेतकरी जगविणार आहात आणि कोणती राजनीती आणि रणनीती शेतकऱ्यांच्या बाबतीत आखत आहात ? हा प्रश्न निर्माण होतो. सभापती महोदया, महाराष्ट्रातील एकूण वार्षिक योजनांतर्गत तरतुदी आणि त्यातील कृषी व संलग्न क्षेत्रातील वाटा आपण शोधावा. त्याबाबतची परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आहे. सभापती महोदया, 1997-98 मध्ये आपली वार्षिक योजना 6325 कोटी रुपयांची होती त्यामध्ये कृषीसाठी 133.66 कोटी रुपये होते. 1998-99 मध्ये 11600.73 कोटीची योजना होती. आताचा आपला प्लॅन 11 हजार कोटीचा आहे. त्यापेक्षा त्यावेळची योजना 600 कोटीने जास्त होती. या 11600.73 कोटीपैकी कृषीसाठी 153.67 कोटी रुपये तरतूद होती. 1999-2000 मध्ये 12161.66 कोटी रुपयांची वार्षिक योजना होती. त्यामध्ये कृषीकरिता 177.66 कोटी रुपये एवढी तरतूद होती. 2000-2001 मध्ये 12330 कोटी रुपयांची वार्षिक योजना होती. त्यापैकी कृषीकरिता 188.86 कोटी रुपये तरतूद होती.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सन 2001-2002 मध्ये 11720 कोटीची योजना होती त्यात कृषीचा वाटा होता 199.74 कोटी, 2002-2003 मध्ये 11315.37 कोटीची योजना होती, त्यात कृषीचा वाटा होता 222.7 कोटी, 2003-2004 मध्ये 12652 कोटीची योजना होती, त्याच्यामध्ये कृषीचा वाटा 331.93 कोटी याचा अर्थ शेतीकडे पाहण्याचा अर्थखात्याचा कोणता दृष्टीकोन आहे हे या आकडेवारीवरुन स्पष्ट होत आहे. परंतु केंद्राकडून राज्याला उपलब्ध होणा-या संसाधनात महाराष्ट्राची आकडेवारी आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यांची तुलना करता आपल्याला कमी मिळते. त्याचे कारण मी सांगितले की, आपण प्रगत असल्यामुळे मिळत नाही. दुर्दशा वाढवा म्हणजे आपला वाटा वाढेल. येथेच सल्ला आम्हाला दिला आहे. म्हणजे आपली दुर्दशा वाढल्याशिवाय कोणी तुमच्याकडे बघणार नाही. पण आम्ही हक्काने तसा निधी तुम्हाला उपलबध करुन देतो. आमच्याकडून तुम्हाला अर्थसंकल्पातून जास्त निधी जातो. केंद्राच्या निधीत महाराष्ट्रातून 33 टक्के वाटा जात असेल तर त्या प्रमाणात किमान आमच्याकडे पहावे हे आम्ही हक्काने सांगू शकतो. परंतु आमचा बिहार होऊ द्या, अमूक होऊ द्या, तमूक होऊ द्या असे म्हटले जाते. पण बिहारची टिंगल टवाळी करण्याची क्षमता तुमच्यामध्ये नाही. बिहारचे नाव घेण्याचा सुध्दा आपल्याला अधिकार नाही. कारण माझ्याकडे उपलब्ध असलेल्या आकडेवारीनुसार आपल्या देशामध्ये महाराष्ट्राची परिस्थिती फार वाईट आहे. श्री.लालूप्रसाद यांना चारा चोर म्हटले जाते. त्या राज्यामध्ये 600 कोटीचा चारा येतो याचा अर्थ तो चारा शेतीकरिता असणार ? सभापती महोदया, माझ्याकडे विविध राज्यांच्या जीडीपीची आकडेवारी आहे. कृषी उत्पन्नाच्या टक्केवारीनुसार त्या तुलनेमध्ये महाराष्ट्राचा कितवा नंबर लागतो ? मी त्याबाबतची आकडेवारी धक्कादायक आहे. प्रगत राज्याला ही आकडेवारी शरमेने मान खाली घालावयास लावणारी आहे. देशात कृषी उत्पन्नात पंजाब पहिल्या क्रमांकावर आहे, दुसरा क्रमांक आहे बिहारचा, त्यानंतर आसाम, उत्तर प्रदेश, हरयाणा, हिमाचल प्रदेश, राजस्थान, आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश, केरळ, गुजराथ, त्यानंतर पंधरावा नंबर महाराष्ट्राचा लागतो. कृषी क्षेत्रासंबंधी काय वैभव आहे तुमचे ? महाराष्ट्राचा नंबर पंधरावा आणि बिहारचा दुसरा. मग बिहार बिहार करीत बसलो तरी आपण

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते.....

कृषीबाबत बिहारपेक्षा मागासलेले आहोत हे मान्य केले पाहिजे. ही वस्तुस्थिती असताना सुध्दा कृषी क्षेत्राबाबत केंद्राकडून राज्याला जी मदत उपलब्ध झाली पाहिजे ती होत नाही. ही व्यथा कशी व कोणी सांगावयाची हा प्रश्न आहे. सहज एखाद्या विभागाकडे पहावे आणि बोलावे अशी आपल्या राज्याची स्थिती आहे. आपल्याकडे विभागनिहाय नियोजन आहे, विभागाप्रमाणे हवामान आहे, पाऊस विभागनिहाय आहे आणि सिंचनाचा अनुशेष देखील विभागनिहायच आहे. मराठवाड्यातील 63 लाख हेक्टरपैकी 38 लाख हेक्टरवर खरीप आणि 19 लाख हेक्टरवर रब्बी घेतले जाते असे एकूण 57 लाख हेक्टर क्षेत्र लागवडीलायक आहे. तेथे कापूस 10 लाख हेक्टरवर आहे, सोयाबीन 4.5 लाख हेक्टरवर, मका 1.7 लाख हेक्टरवर, ज्वारी 7 लाख हेक्टरवर, ऊस 60 ते 70 हजार हेक्टरवर आहे म्हणून मराठवाडयातील सगळेच्या सगळे कारखाने बंदच असतात. त्यानंतर बाजरी 4 लाख हेक्टरवर आहे, कडधान्य 8 लाख हेक्टरवर यामध्ये सर्व कडधान्याचा समावेश आहे. तेलबिया 7 लाख हेक्टरवर, फळबाग 2.22 हेक्टरवर यामध्ये मोसंबी, आंबा हे सगळे आले. सभापती महोदया, आमच्या महाराष्ट्र सरकारचे कृषी धोरण कसे आहे ते मी सांगतो. मी त्यावेळी मंत्रिमंडळामध्ये नव्हतो. परंतु मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष म्हणून एका बैठकीला मला बोलविले होते. मी तत्कालीन कृषीमंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या बाजूला बसला होतो. विषय निघाल्यानंतर मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष या नात्याने कृषीविषयी मी सांगितले.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु....)

नागपूरची जशी संत्री प्रसिध्दी आहेत तशी मराठवाड्याची मोसंबी प्रसिध्द आहेत. म्हणून मोसंबीची बाजारपेठ नागपूरहून जालन्याला आणली. मोसंबीची 350 कोटीपर्यन्त उलाढाल होते. मोसंबी मराठवाड्यात पिकतात तर मग बाजारपेठ नागपूरला कशासाठी ? नंतर मी जे सांगितले ते विदारक सत्य होते. मराठवाड्यामध्ये मोसंबीला 30 ते 35 रु. भाव होता आणि त्याला लागून असलेल्या नगरामध्ये 20 रु. भाव होता. त्यावेळचे केन्द्रीय मंत्री श्री. विखे-पाटील हे त्या भागात आले असताना त्यांनी हा किंमतीमध्ये इतका फरक कसा अशी विचारणा केली आणि भावामध्ये समानता आणून देण्याचे कबूल केले. त्याबाबतीत नंतर काय निर्णय झाला हे मला माहीत नाही. सांगण्याचा उद्देश हा आहे की, हा इतका फरक मोसंबीच्या भावामध्ये होता. प्रत्येक विभागामध्ये प्रत्येक मालाच्या किंमतीमध्ये अशा प्रकारे विषमता राहाणे योग्य नाही. उसाला देखील सर्वच कारखाने सारखाच भाव देतात असे नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये उसाला वेगळे भाव मिळतात तर मराठवाडयामध्ये वेगळे भाव मिळतात. ..(अडथळा)... पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांच्या हुशारीबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. उलट मला त्यांचे कौतुक करावेसे वाटते. मी आमच्या मराठवाड्यातील लोकांना स्पष्ट शब्दात सांगतो की, आपण कपाळकरंटे म्हणून डोके आपटून घेऊ नका तर आपल्या कर्तृत्वावर मोठे व्हा, लढायला शिका. सा-या हिन्दुस्थानामध्ये नंबर एकची हळद ही मराठवाड्यातील हिंगोलीमध्ये होते. स्व. वसंतदादा पाटील हे दूरदृष्टीचे नेते होते. पुन्हा वसंतदादासारखा नेता होणे नाही. ते मुख्यमंत्री असताना मराठवाड्यातील त्या भागात गेले. त्यांनी पाहिले की, हळदीसाठी मराठवाड्यामध्ये सहकारी संस्था नाही. मग त्यांनी सांगलीमध्ये हळदीसाठी सहकारी संस्था काढली. आम्ही कपाळकरंटे म्हणून तसेच राहिलो. अशी ही मराठवाड्यातील परिस्थिती आहे. अशा सर्व परिस्थितीमध्ये मी माझ्यापरीने प्रयत्न करीत होतो. मी आयुष्यामध्ये कधी रडत राहिलो नाही तर सारखा लढत राहिलो. मराठवाड्याच्या शेतीच्या क्षेत्राचा विकास करण्याच्यादृष्टीने काय करता येईल यासाठी मी सारखा धडपडत होतो. मला वैधनिक विकास मंडळाने सामर्थ्य दिले होते. त्याचा मला फायदा झाला होता. मराठवाड्यामध्ये मी खूप फिरलो आणि तेथील भौगोलिक परिस्थितीचा मी अभ्यास केला. हा अभ्यास करीत असताना माझ्या असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते पुढे सुरु....)

लक्षात आले की, मातीचे परीक्षण करण्यासाठी मराठवाडयमध्ये एकही प्रयोगशाळा नाही. त्यावेळी या मातीच्या परीक्षणासाठी प्रयोगशाळा असावी म्हणून मी तगादा लावला, प्रस्ताव दिला. परंतु आमच्या लालफितीमधून तो प्रस्ताव काही पास होऊन आला नाही. मी प्रयोगशाळेसाठी जमीन देखील संपादित केली होती, वैधानिक विकास मंडळामधून निधी देखील उपलब्ध करुन घेतलेला होता. मी तत्कालीन कृषीमंत्री श्री.गोविंदराव आदिक यांना धन्यवाद देतो. हा विषय मी त्यांच्याकडे सतत लावून धरीत असे. त्यांना सांगत असे की, मातीचे परीक्षण झाले नाही तर शेतक-याला कृषी क्षेत्रामध्ये कसे काय यश मिळू शकेल ? शेतकरी कसा जगू शकेल ? म्हणून जिल्हा पातळीवर मातीच्या परीक्षणाची सोय झाल्या बद्दल मी आघाडी सरकारला आणि विशेषत: तत्कालीन मंत्रीमहोदय श्री. गोविंदराव आदिक यांना धन्यवाद देतो. शेतीनिष्ठा ही अशा प्रकारे प्रगट झाली पाहिजे. कोणत्या पिकाला कोणते हवामान पोषक आहे. विभागा विभागामध्ये कशा प्रकारचे हवामान असते, किती पर्जन्यमान असते याचा देखील अभ्यास होणे अत्यंत आवश्यक आहे. आज बीजगुणन केन्द्रामध्ये एखादे नळकांडे ठेवून त्यामध्ये पर्जन्यमान किती झाले ते मोजले जाते. आज हवामानाच्या संदर्भात अभ्यास करण्यासाठी कृषी विद्यापीठामध्ये फक्त 15 यंत्रे आहेत. आपल्याला जर हवामानाचा अभ्यास नसेल तर आपण शेतक-याला कसे काय मार्गदर्शन करणार ? कोणता पेरा घ्यायचा, कोणता पेरा बदलायचा याचे मागदर्शन शेतक-याला व्हायला पाहिजे. परंतु आपणाकडे यंत्रणा नसल्यामुळे कृषी खात्याच्या माध्यमातून शेतक-यांना मार्गदर्शन करणे दुरापास्त होते. हवामानानुसार शेतक-यांना मागदर्शन करणे ही अत्यंत आवश्यक बाब आहे. ही व्यवस्था कृषी खात्याच्या माध्यमातूनच होते. ही व्यवस्था थोड्या प्रमाणात का होईना पण ती आता मराठवाड्यामध्ये झालेली आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

सभापती महोदया, मी कृषी अवजारांच्या बाबतीत बोलणार आहे. मला सांगताना दु:ख होते की, राज्यात सर्वात जास्त पशुधन मराठवाडयात आहे. त्यानंतर विदर्भात पशुधन आहे. याचा अर्थ राज्यातील इतर विभागात पशुधन नाही काय ? इतर विभागातील पशुधन गेले आणि तेथे यंत्रे आली. म्हणून तेथील पशुधन कमी झाले. आम्ही कसला गौरव बाळगावयाचा ? मराठवाडयात नंबर एकचे पशुधन आहे त्याचा आम्ही गौरव बाळगावयाचा काय ? सर्वात जास्त कसाई खान्यात पशुधन पुरविणार मराठवाडा विभाग आहे असे आम्ही सांगावयाचे काय ? त्यानंतर विदर्भ कसाई खान्यात पशुधन पुरविते असे आम्ही सांगावयाचे काय ? हा काही कौतूकाचा भाग आहे काय ? याचे कारण या मागासलेल्या भागामध्ये कृषी अवजाराने करण्याचे सामर्थ्य निर्माण करणारे नेतृत्वच उभे राहिलेले नाही. कृषी विभागाकडून शेतक-यांसाठी कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला गेलेला नाही. शेतक-यांचे कृषी उत्पन्न जास्तीत जास्त वाढावे म्हणून आधुनिक अवजारे घेण्यासाठी शेतक-यांना जास्तीत जास्त सबसिडी देऊन किंवा माफक दरात कर्ज देऊन किंवा माफक कर्ज देऊन त्यांना उभे करण्याचे सामर्थ्य या भागामध्ये दाखविले गेले नाही. खरे तर हा अनुशेषाचा भाग आहे. एक वेळ पाणी कमी द्या. कमी पाण्यावर चांगली मशागत केली तर शेतकरी जास्त उत्पादन काढू शकतो अशा प्रकारचे सामर्थ्य तुम्हाला देता आले असते. परंतु ते सामर्थ्य तुम्ही दिले नाही. मी जास्त बोलणार नाही. माझ्याकडे सगळी आकडेवारी उपलब्ध आहे. परंतु सगळी आकडेवारी मी सांगू इच्छित नाही. या ठिकाणी आपण तू-तू, मी-मी करण्यासाठी आलेलो नाही. राज्यातील शेतक-याला अडचणीतून बाहेर कसे काढता येईल, त्यास सदन कसे करता येईल असे या चर्चेचे उद्दिष्ट असले पाहिजे अशी माझी भूमिका आहे. आपण ठिबक सिंचन, तुषार सिंचन यावर आपण संपूर्ण महाराष्ट्रात 362 कोटी रुपये खर्च केले. यातील किती निधी कोणत्या भागात किती दिला गेला याचा अभ्यास केला, यासंदर्भा ज्या भागात जास्त कार्यक्षमता दाखविली तेथे जास्त निधी दिला गेला आहे. तेथे निधी ओरबाडून नेला आहे असे मी म्हणणार नाही. मी यासंदर्भात चार पत्रे लिहिली आहेत की, अमरावती विभागामध्ये ठिबक सिंचनाचे पैसे घेतले, अवजारेच खरेदी केली गेली नाहीत आणि मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. त्यासंदर्भात तुम्ही काय करणार आहात ? जसे देशात देशद्राही मंडळी आहे तशी शेतद्रोही मंडळी या राज्यात मोठया प्रमाणात

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

निर्माण झालेली आहेत. यांना वेळीच वठणीवर आणले नाही तर शेतीमध्ये भविष्यात उन्नती होणार नाही. अशा प्रकारे मिळणा-या अनुदानाचे चोरी करणा-या चोरांचा सुळसुळाट निर्माण होईल आणि शेतीनिष्ठ शेतकरी टाचा घासून आत्महत्त्येकडे झोकावेल अशी परिस्थिती येईल. राज्यात मोठया प्रमाणात शेतद्रोही मंडळी निर्माण झालेली आहे.या शेतद्रोहीवर आळा घालण्यासाठी तुम्ही कायद्यात कोणती कठोर शिक्षा ठेवणार आहात ? सभापती महोदया, ठिबक सिंचनासाठी आपण 362 कोटी रुपये खर्च केले. त्यातील 20 टक्के द्राक्ष पिकासाठी दिले, 23 टक्के केळी पिकासाठी दिले, 14 टक्के उसाला दिले. आपण पाणी वाटपाचा जो कायदा मांडला आहे तो फार महत्वाचा आहे. त्यावर या सभागृहात खूप चर्चा झाली पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. महाराष्ट्र सरकारला आणि केंद्र सरकारला 50 कोटी रुपये मिळवून देणारा साखर उद्योग आहे हे मी मान्य करतो. परंतु उपलब्ध पाण्याच्या 70 टक्के पाणी ऊसाच्या पिकाला जाते आणि उर्वरित 30 टक्के पाणी इतर पिकांना मिळते आहे ही विषमता तुम्ही कशी दूर करणार आहात हा खरा प्रश्न आहे. ही विषमता दूर करण्यात आली पाहिजे. ठराविक एक भाग, ठराविक एक वर्ग त्या पाण्यावर सधन होत असेल तर इतर दुर्बलांनी काय करावे हा प्रश्न आमच्या समोर उभा रहातो आहे ? त्यांच्या सधनतेबद्दल आमची तक्रार नाही. परंतु दुर्बलांना मोठे करण्यासाठी शेतीसंबंधी तुम्ही कोणती मोठी योजना आखणार आहात याचा खुलासा या ठिकाणी आपण केला पाहिजे. पाण्याच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर काल मी या सभागृहात बोललो. वैनगंगेचे 500 टी.एम.सी. पाणी वाहून जात आहे. त्यातील गोसीखूर्द प्रकल्पासाठी 60 टी.एम.सी.पाणी मिळावे म्हणून सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे या सभागृहात सातत्याने मागणी करीत आहे. ही मागणी मान्य व्हावी म्हणून त्यांनी आपले संसदपटूत्व पणाला लावलेले आहे. 500 टी.एम.सी. पाणी पुढच्या राज्यात निघून जात आहे. छत्तीसगड हे नवीन राज्य निर्माण झालेले आहे. त्या राज्याची आर्थिक क्षमता पाहिली तर ते 100 वर्षे पाणी अडवू शकत नाही. 300 टी.एम.सी. पाणी अडवा. कुठलाही प्रकल्प 100 वर्षापेक्षा जास्त टिकू शकत नाही. जास्तीत 60 ते 70 वर्ष त्या प्रकल्पांचे आयुष्यमान असते. त्या राज्याची आर्थिक क्षमता वाढेल त्यावेळी आपले प्रकल्प बाद झालेले असतील. पण येणा-या 50 वर्षामध्ये 300 टी.एम.सी. मधील 90 टी.एम.सी. पाणी मराठवाडा आणि व खानदेशाकरिता---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

देण्यात येणार आहे. मराठवाडयास 60 टी.एम.सी. आणि खानदेशास 30 टक्के पाणी देण्यात येणार आहे. चितळे समितीच्या अहवालामध्ये दिलेला हा प्रकल्प आहे. हा अहवाल माझा नाही. राहिलेले 210 टी.एम.सी. पाणी अडविले जाईल. ते पाणी वर्धा, अमरावती, यवतमाळ, या तीन जिल्हयात 210 टी.एम.सी. पाणी उपलब्ध झाले तर सिंचनाचा अनुशेष हा विषयच शिल्लक रहाणार नाही. यासाठी दूरगामी लढाई सुध्दा करावी लागणार नाही...

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

जर आपण भीमा-कृष्णा योजनेच्या सबळीकरणाकरिता 12 हजार कोटी रुपयांची योजना राबविता आणि राज्यपालांचे निदेश ठोकरुन तुम्ही हे काम करीत आहात.सांगली,सातारा,पुणे करिता हे संपूर्ण पाणी पुन्हा येत आहे आणि बारमाही येते आहे. जवळजवळ 54 हजार हेक्टर जमीन ही बारमाहीखाली आणणार आहात आणि 110 कि.मी.टनेलच्या माध्यमातून हे पाणी येणार आहे. टेक्नॉलॉजी वापरुन पाणी आणण्याचे कौतुक आहे. 80 कि.मी.वेगाने पाणी धबधब येणार आहे. हे पाणी आणून आपल्या भागामध्ये म्हणजे दुष्काळी भाग आहे आणि अवर्षणप्रवण भाग आहेत त्यांना पाणी देत नाही आपल्या भागातील शेती वाढविता कौतुक आहे. 12 हजार कोटी रुपये राज्यपालांचे निदेश ठोकरुन खर्च करता तर हा गोसीखुर्द प्रकल्प जो 4000 कोटी रुपयांचा आहे तो प्रकल्प राबविला तर विदर्भ आणि मराठवाडयातील पाण्याचे भांडण मिटेल. शेतक-याला सुखी करण्याकरिता हे शासन कटिबध्द आहे असे बोलण्यासाठी आधार तरी मिळेल. म्हणून हे सर्व करीत असताना 2/3 महत्वाच्या गोष्टी मांडू इच्छितो. सभापती महोदया,मराठवाडा आणि विदर्भामध्ये 200 कोटी रुपयांची पेस्टीसाईड वापरली गेली. शेतीची औषधे आणली ती खोटी आणि बनावट असतात ती शेतक-यांना लुबाडतात. मारल्यानंतर रोग जात नाही कीड मरत नाही. मी कृषी अधिका-यांना दोष देणार नाही त्यांच्याकडे तक्रार केल्यानंतर ती टेस्टींगसाठी पाठवितात माझ्याकडे पुरावे आहेत. त्या त्या भागातील सॅम्पलचे पुरावे आहेत. या औषधाचे जर आपल्या महाराष्ट्रातील प्रयोगशाळांनी हे पुरावे अयोग्य आहेत असे जर प्रमाणपत्र दिले तर आपले कृषी खाते त्याच्यावर खटला भरते. ताबडतोब हे सॅम्पल दिल्लीला घेऊन जातात. दिल्लीची प्रयोगशाळा औषध योग्य आहे असे सांगते आणि तो त्या खटल्यातून सुटून जातो. महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे माझ्याकडे नांवानिशी दिल्लीची आणि येथील प्रमाणपत्रे आहेत जी आपण नापास केलेली आहेत आणि दिल्लीने मंजूर केलेली आहेत. आतापर्यंत चुकीची औषधे,बनावट औषधे शेतक-याला पुरविणा-या एकाही व्यापा-यावर खटला पारित झालेला नाही. शेतकरी मात्र नागविला गेला. वर्षाला 200 कोटी रुपये आपल्या घामातून शेती वाचविण्याकरिता तो औषध खरेदीसाठी घालवितो. तो फसविला जातो तेव्हा त्याला कोणताही कायदा वाचवू शकत नाही तेव्हा शासन कायद्यामध्ये बदल करणार आहे काय ? मला माहीत आहे की,केंद्राकडे सगळे कायदे आहेत. परंतु कुठेतरी आणि कसेतरी केंद्राने प्रमाणपत्र दिले आणि नामंजूर असेल आणि तो कोर्टातून सुटणार असेल तर होय या प्रयोगशाळांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MAP/ KGS/ 17:20

श्री. दिवाकर रावते..

सर्टिफाय केलेले ग्राहय धरले पाहिजे आणि त्याप्रमाणे खटल्याचा निकाल लागला पाहिजे अशा प्रकारची तरतूद जशी बी-बियाण्याच्या कायद्यामध्ये आहे अशी आपण करणार आहात काय ? कारण बियाणे कायद्यामध्ये शेतक-याला नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. सभापती महोदया, भ्रष्टाचार जोपर्यंत छोटे छोटे वाटतात तोपर्यंत ते महाराष्ट्राच्या कानाकोप-यामध्ये छोटया पध्दतीने बनावट रीतीने होत असतात. शेतक-यांचे नुकसान मात्र मोठे होते. एखाद दुस-या ठिकाणी शेतकरी शेवटपर्यंत त्याला चेन माहीत असेल तर प्रकरण लावून धरणारा असतो. न्याय मिळवून घेतो. सर्वसाधारण शेतकरी हतबल होऊन जातो. त्याला काहीही करता येत नाही. सभापती महोदया, सकाळी येथे दुधाची चांगली चर्चा झाली. काका-पुतणे आणि श्री. गडाख साहेबांनी काही प्रश्न विचारले.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते ..

सभापती महोदया,मी माझ्या भाषणात नेहमी असे म्हणावयाचो की, दुष्काळ पडल्यानंतर मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्या करतात परंतु पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत त्याचे कारण असे आहे की, त्या ठिकाणी दुष्काळात योजना राबविण्याचे सामर्थ्य शासनाने दाखवले होते. परंतु आज माननीय मंत्रिमहोदयांनी जे वाक्य उच्चारले आहे ते मी आपल्याला वाचून दाखवतो. माननीय मंत्रिमहोदयांनी असे सांगितले की," दुष्काळामध्ये तेथे एकही आत्महत्या झाली नाही कारण दूध व्यवसायामुळे तेथील शेतकरी तरला गेला आहे.मराठवाडयातील दूध व्यवसायातील एक भ्रष्टाचार मी या सभागृहात मांडला होता.मारुती मिल्क प्रॉडक्ट यांनी तो भ्रष्टचार केला होता त्यांनी 20 लाख रुपयांची सबसिडी कशी घेतली होती यासंबंधीची माहिती मी सांगितली होती.दिनांक 1 जून 2004 रोजी मी या सबंधीची लक्षवेधी सूचना मांडली होती .त्यावेळी झ ालेल्या चर्चेचे प्रोसिडिंग्ज माझ्याकडे आहे .परंतु वेळेचे बंधन असल्यामुळे ते सगळे मी वाचत नाही.मी फक्त एवढेच सांगतो की, श्री.रमेश नामदेव बिरासदार,विशाल नगर, लातूर यांनी मारुती मिल्क प्रॉडक्टस इंडिया लिमिटेड नावाची दूध खरेदी विक्री करणारी एक कंपनी सुरु करण्यासाठी लातूर उस्मानाबाद येथील गरीब शेतक-यांना खोटी प्रलोभने दाखवून भाग भांडवलापोटी कोटयावधी रुपये जमा करणे आणि त्यांनतर ही कंपनी बंद करणे यां सबंधी मी लक्षवेधी सूचना मांडली होती. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर झालेली प्रश्नोत्तरे आपण वाचा.ती वाचल्यानंतर आपल्या असे लक्षात येईल की, या कंपनीविरुध्द शेतक-यानी तक्रार दिली होती त्या प्रकरणात शेतक-यांची फसवणूक झाल्याचे सिध्द झाले होते. कारखाना बंद असतांनासुध्दा 20 कोटी रुपयांची सबसिडी त्यांना देण्यात आली होती. ही रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात येईल व त्याच्याविरुध्द खटला भरण्यात येईल असे माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते. परंतु आजपर्यन्त ही रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात आली नाही. त्यामुळे संबंधित शेतक-यांना न्याय मिळालेला नाही .अशी जर शासनाची प्रवृत्ती असेल तर ती बरोबर नाही.या शेतक-यांना असे वाटत असेल की ,या प्रकरणात आम्ही लुटलो गेलो आहोत परंतु आम्हाला न्याय मिळत नाही.आणि ज्याने फसवणूक केलेली आहे ती व्यक्ती मोठया गाडीतून रुबाबात फिरत असेल तर कोणतेही कृषी धोरण या शेतक-याला आधार देणार नाही.या प्रकरणांचा आपण निचरा करणार आहात काय ?त्याबाबतीत मांननीय मंत्रीमहोदय मनावर घेऊन काही बोलणार आहेत काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते ..

सभापती महोदया, भ्रष्टाचाराचे हे एकच उदहारण आहे असे नाही. भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे आहेत आणि ही सर्व उदाहरणे मी कशी मांडू असा माझ्यासमोर प्रश्न आहे.इतक्या मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार आहे की, या उदाहरणाला " आईस बर्ग "सुध्दा म्हणता येणार नाही तर ते आईस बर्गचे एक लहानसे टोक आहे असे म्हणता येईल. महाराष्ट्रामध्ये कृषी अधिकारी सगळीकडे मोठया प्रमाणावर पसरलेले आहेत आणि त्यांना मोठया प्रमाणावर अधिकार दिलेले आहेत.बजेटमध्ये पैसे नाहीत परंतु कोटयावधी रुपये कमविण्याची ताकद त्यांच्यामध्ये आहे.मी या सभागृहामध्ये विशेष उल्लेखाच्या माध्यमातून एक प्रश्न मांडला होता .परंतु त्या बाबतीत कोणतीही कारवाई झालेली नाही. श्री.अंकूश दामोदर मोरे हा त्यावेळी तंत्र व गुण नियंत्रण निरीक्षक होता व आता औसा येथे तालुका कृषी अधिकारी आहे. तो एक राजपत्रित अधिकारी आहे.त्याने केलेल्या भ्रष्टाचारासंबंधीची यादी मी स्वत: श्री.ए.के. अगरवाल, महासंचालक ॲन्टी करप्शन ब्युरो यांना पाठवली होती.एक सामान्य अधिका-याची प्रॉपर्टी किती आहे याची यादी मी आपल्याला वाचून दाखवतो.तुम्हालासुध्दा त्याचा हेवा वाटेल की, आपण एवढी वर्षे आमदार म्हणून आहोत किंवा मंत्री म्हणून आहेत परंतु आपल्याला जे जमलेले नाही ते या कृषी अधिका-याला जमले आहे.सभापती महोदया, मेसर्स दामोदर मोरे या नावाने कळंब, जिल्हा उस्मानाबाद येथे त्यांचे चार हजार फुटाचे दुकान आहे. शेतकरी कृषी सेवा केन्द्र या नावाने कळंब, जिल्हा उस्मानाबाद येथे 800 चौरस फुटाचे स्वत:च्या मालकीचे खत विक्रीचे दुकान आहे,ॲन्टी एजन्सी या नावाने आंबाजोगाई रोड,ता. कळंब ,जिल्हा उस्मानाबाद येथे स्वत:चे दुकान आहे,मेसर्स शंभुराजे शुगर इन्डस्ट्रीज,आवरगाव,कळंब या कंपनीत ते संचालक असून 25 लाख रुपयाचे भाग भांडवल त्यांच्या पत्नीच्या व भावाच्या नावाने ठेवले होते, पाच सहा वर्षात 25 एकर जमिनीची त्यांनी खरेदी केली होती.व संपूर्ण कुटुंबांच्या नावावर एकूण 150 एकर जमिनीची खरेदी केली होती,ही जमीन लातूर आणि केज या ठिकाणी घेतलेली आहे.या जमिनीमध्ये काय आहे ? पाच एकर मोसंबीची बाग,सात एकर बदाम आणि काजूची बाग,25 एकर आंब्याची बाग असून त्या जमिनीत एक विहीर, तीन बोअर वेल्स असून तळयातून शेतीपर्यन्त तीन हजार फूट पाईप लाईन टाकण्यात आली होती.सन्माननीय मंत्री महोदय श्री.बाळासाहेब थोरात यांना मी सांगू इच्छितो की ,एवढी मोठी पाईप लाईन तुमच्या शेतामध्ये सुध्दा नसेल.या व्यक्तीने बाजवी, तालुका केज येथे बारा एकर इनामी जमीन विकत घेतली असून त्या जमिनीसबंधी कोर्टात

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते ..

भांडण सुरु आहे.इनामी जमीन असल्यामुळे हा वाद सुरु आहे. त्याचा नांदेड येथे अद्ययावत बंगला आहे.अंबाजोगाई,जिल्हा बीड येथे बस स्टॅन्डला लागून त्यांचा 4000 स्केअर फूटचा प्लॉट आहे तसेच भालगाव, ता.केज येथे मोठे घरसुध्दा आहे, लातूर येथील पद्मानगर भागात "चार्वाक" नावाचा चार हजार स्केअर फूटाचा सर्व सुख सोयींनी युक्त असा बंगला आहे.सन्माननीय सदस्य श्री.दिलीप देशमुख यांच्या बंगल्याच्या बाजूलाच हा बंगला आहे.या ठिकाणी मी हे का वाचत आहे हे आपल्याला कळले असेल...

नंतर श्री.सुंबरे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

लातूर येथे कळंब रोडवर अनेक खुले प्लॉटस् स्वत:च्या मालकीचे., विरेंद्र मोटर्सच्या नावाने ढोकी ता.कळंब, जिल्हा उस्मानाबाद येथे गाड्यांची सबडिलर्सशीप - त्यात 10 लाखांची गुंवणूक, रमेश नामदेव याचे सोबत प्लॉटस्च्या धंद्यात, बालगाव, तालुका केज, जिल्हा बीड येथे अनधिकृत सावकारीचा व्यवसाय.. हे खरोखरी आहे की नाही ते तुम्ही वाटल्यास पोलिसांच्या माध्यमातून शोधून काढा. अध्यक्ष महाराज, हे सारे या सभागृहामध्ये मांडून झाले आहे आणि पुन्हा एकदा सांगतो आहे. ही जर छोटी छोटी माणसे चिरडली नाहीत तर तुमच्या कृषी क्षेत्रात कृषी धोरणाला कोठे वाव मिळणार नाही. अध्यक्ष महाराज, राज्यामध्ये हे जे काही चालले आहे ते आम्ही या सभागृहामध्ये सांगत असतो, पण अहंगंडातून पछाडलेल्या, मला काही मिळालेले नाही म्हणून मग सारे काही उध्वस्त करावयाचे असा हा प्रकार आहे. अध्यक्ष महाराज, या महाराष्ट्रात कृषी विद्यापीठे निर्माण झाली. कृषी विद्यापीठे ही शेतकऱ्यांच्या भवितव्याचा श्वास आहे असे माझे मत आहे कारण शेती क्षेत्रातील सगळी संशोधने ही तेथेच होत असतात. मराठवाड्याचे कृषी विद्यापीठ तर संघर्ष केल्यानंतर मिळाले आहे. पायाभूत बियाणे कृषी विद्यापीठच तयार करते आणि ते बियाणे महामंडळाला देते. आता तर बियाणे महामंडळ त्याचे फाऊंडेशन तयार करते, सर्टिफाईड बियाणे तयार करते, प्रासेस करते आणि शेतकऱ्यांना देते. आपल्याकडे बियाणे महामंडळ आहे तरीदेखील खाजगी बियाणे देखील मोठ्या प्रमाणात बाजारात चालूच असते. अध्यक्ष महाराज, बीटी जीन्स 1600 रुपये बॅग, साधी 25-30-500 रुपये सुद्धा आहे, जास्तीत जास्त 200 रुपये आहे. तेव्हा यामध्ये जर भेसळ केली तर ती कळणार कसे ? आमच्याकडे जे बीटी जीन्स आहे ते सर्टिफाईड करण्याची पध्दतच नाही. सरकारने त्यादृष्टीने कोणती यंत्रणाच उभी केलेली नाही. बी-बियाणे सर्टिफाईड करून मगच ते शेतकऱ्यापर्यंत जाते की नाही हे पाहिले गेले पाहिजे. त्यासाठी केवळ बियाणे ॲक्ट करून चालणार नाही तर ती बियाणे कृषी खात्याच्याच माध्यमातून निर्माण झाली पाहिजेत. कारण या बियाणांमध्ये भेसळ झाली तर ते ओळखण्याची कोणतीही मात्रा नाही. बीटी जीन्सच्या भावातील तफावत पाहिली तर ती फारच भयंकर आहे आणि त्यात फसविण्याचा भाग मोठा आहे हे निश्चितच लक्षात येते. आपल्याकडे बियाणे तक्रार समिती आहे. त्यात कृषी विकास अधिकारी असतो, बियाणे महामंडळाचा प्रतिनिधी असतो, विद्यापीठातील एक शास्त्रज्ञ असतो आणि जिल्हा परिषदेचा एक सदस्य देखील असतो, पण तो त्याला वेळ मिळेल त्याप्रमाणे त्या समितीच्या

..... 3व्ही 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

बैठकीला जात असतो. मात्र त्या समितीमध्ये शेतकऱ्यांचा कोणीही प्रतिनिधी नाही. खरे तर त्या समितीमध्ये शेतकऱ्याचा देखील प्रतिनिधी असला पाहिजे. आपण तज्ज्ञ शेतकरी, कृषी भूषण शेतकरी, शेतीनिष्ठ शेतकरी अशी बक्षिसे-पदव्या देत असतो याचा अर्थ त्यांना शेतीतील जाण चांगली असते. ते शेतीमध्ये प्रयोग करीत असतात आणि आपल्या शेतामध्ये वेगवेगळ्या पध्दतीने, पारंपारिक पध्दती बाजूला ठेवून, पिके घेत असतात. अशा प्रकारे ते प्रयोगशील शेतकरी असल्यानेच आपण त्यांना प्रोत्साहन देतो, त्यांना बक्षिसे वगैरे देतो. अशा शेतकऱ्यांना या मंडळावर वा समितीवर नेमणे अत्यंत आवश्यक आहे, त्यातून तो चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करू शकेल. तरी माझ्या या सुचनेचा आपण विचार करावा. कारण शेवटी बियाणापासूनच शेतीचा विचार आणि शेतकऱ्याचे जीवन हे सुरू होत असते. अध्यक्ष महाराज, सांगली जिल्ह्यामध्ये जी घटना सोयाबीन च्या संदर्भात घडली. बी पेरले पण उगवलेच नाही. तोच प्रकार अकोल्यामध्येही झाला, अमरावती मध्ये देखील झाला. याबाबतीत बियाणे तक्रार समितीमध्ये तक्रार करूनही समितीने दाद दिली नाही. कोणी त्यांचे हात ओले केले ? कशामुळे ते थांबले ? शेवटी दिल्लीपर्यंत जाऊन त्यांना न्याय मिळवावा लागला. म्हणजे या राज्यामध्ये शेतकऱ्याला बियाणे तक्रार समितीमध्ये जाऊनही न्याय मिळत नसेल तर ती समिती ताबडतोब बरखास्त झाली पाहिजे. सहा महिन्यापूर्वी आपल्या भागातील सारी वर्तमानपत्रे या सांगलीतील प्रकरणाने गाजलेली आहेत. अध्यक्ष महाराज, सांगली जिह्यामध्ये जे घडले आणि त्याबाबत सांगली जिल्ह्यातील बियाणे तक्रार समितीने दाद घेतली नाही आणि संबंधिताना दिल्लीमध्ये जाऊन न्याय मिळवावा लागत असेल तर अशा समितीला ताबडतोब बरखास्त केले पाहिजे या मताचा मी आहे. कारण शेवटी शेतकऱ्याला न्याय देणे हेच त्यांचे प्रमुख काम आहे. त्यासाठीच या समित्या नेमल्या गेल्या आहेत. अध्यक्ष महाराज, मी येथे हे एकच उदाहरण दिले. अशी 25 उदाहरणे माझ्याकडे आहेत पण ती सारी सांगून मी आपला वेळ घेणार नाही. अध्यक्ष महाराज, काल या सभागृहामध्ये एक दुर्दैवी प्रकार घडला म्हणून त्याबाबत उल्लेख करून मी थांबणार आहे. मंत्री महोदय, मी अत्यंत प्रामाणिकपणे आपल्याला सांगण्याचा प्रयत्न येथे करीत आहे. आपण मला कितीही सांगितले तरी मी आपल्याला सांगेन की, मी तेथे दीड वर्षे काम केले आहे. माझा तेथे संबंध आलेला आहे. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी आलेल्या लक्षवेधी सुचनेमध्ये असे म्हटले होते की, तेथे संशोधनच होत नाही. म्हणून मी सहज माहिती मागवून

..... 3व्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतली. माझ्या माहितीप्रमाणे 2000 सालापासून ते आतापर्यंत काय काय झाले याची यादीच आहे. ती वाचावयास मला वेळ नाही पण जवळपास 53 संशोधने वेगवेगळी तेथे केली आहेत. अगदी त्यात बालकांच्या कुपोषणामध्ये त्यांना कोणते अन्न द्यावे येथपासून अनेक गोष्टींबाबत संशोधने केली आहेत. एखाद्या माणसाच्या आकसाने आपण विद्यापीठासंबंधातील गोष्टी जेव्हा आपण येथे मांडता त्यामुळे तेथे संशोधन करणाऱ्या त्या वैज्ञानिक प्राध्यापकाचा अवमान होत असतो हे मी येथे जाणीवपूर्वक सांगतो. तेथे असे काय घडले होते ? करोडो रुपयांचे कंपौंड घातले हा आरोप बाजूला राहिला, खरे तर त्यासाठी ही लक्षवेधी सूचना होती. पण हे आरोप का केले गेले ? कशासाठी केले गेले ? अध्यक्ष महाराज, मी एखादी गोष्ट सांगितली आणि ती ऐकली नाही तर मग मी त्याला धडा शिकवीन. होय, मी तेथे एक कार्यकारी सदस्य म्हणून उभा राहिलो आणि त्या सगळ्या संकटाला तोंडावर घेतले पण विद्यापीठाला एकटे पडू दिले नाही. ...

(यानंतर श्री. जागडे .... 3डब्ल्यू 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आपल्या मागे सभागृहाचे सामर्थ्य आहे. आपल्याला आमदार म्हणून अधिकार मिळाले आहेत. स्थानिक पुढा-यांनी कुंपन तोडून जमीन बळकावयाची आणि ती पेरायची. आता कुलगुरुंनी त्यांचे कर्तव्य म्हणून त्याला विरोध केला तर त्यांच्या विरुध्द पत्रकार परिषद घ्यावयाची. आता ते तर आमदार झाले आहेत. मी या ठिकाणी कोणाचेही नाव घेणार नाही. ते आमदार आहेत. त्यांच्या चिकूच्या बागेत कर्मचा-यांनी काम केले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. परंतु तेथील कर्मचा-यांनी ते काम नाकारले. ते आमदार त्या कर्मचा-यांच्या विरोधात गेले. त्यावेळचे कृषीमंत्री श्री. गोविंदराव आदिक यांनी संभाजीनगरमध्ये एक बैठक लावली होती. त्यावेळी त्यांनी सगळ्या शेतक-यांना बोलाविले आणि सांगितले की, तुमच्या जमिनी मला तुम्हाला द्यावयाच्या आहेत. मी त्यावेळी असे सांगितले की, कोर्टात या बाबतचा निर्णय झालेला आहे. असे असताना आपण ही बाब कशी काय जाहीर करता ? त्यावेळी तेथील सर्व पुढारी आक्रमक झाले. मी त्यावेळी सांगितले की, मला हे जमणार नाही. मी त्या बैठकीमधून सभात्याग केला. सभापती महोदय, आता गेले सात-आठ महिने मी त्या ठिकाणी नाही. म्हणून माझा आता काही संबंध येत नाही. त्या विद्यापीठामध्ये भरती झाली होती. त्या भरतीवरुन या ठिकाणी गदारोळ उठला होता. आता त्या ठिकाणी जर काही भ्रष्टाचार झाला असेल तर तो शासनाने शोधून काढावा. मला त्यामध्ये काही देणेघेणे नाही. माननीय श्री.रोहिदास पाटील त्यावेळी का रागावले होते ? कारण श्री. रोहिदास पाटील यांना कृषी शाळा पाहिजे होती. तसा त्यांचा अर्ज होता. त्याचवेळी आदरणीय श्री. बाळासाहेब भारदे यांनी शाळा मागितली होती. आता दोघांपैकी शाळा कोणाला द्यावयाची ? तर आम्ही शाळा मा. बाळासाहेब भारदेंना दिली. त्यावेळी त्यांना शाळा मिळाली नाही. त्यांची माणसे लावली नाहीत, म्हणून ते कुलगुरुंच्या विरोधात गेले. मी ते पत्र श्री. गोविंदराव आदिक यांना वाचून दाखविले होते. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांची पत्रे माझ्याकडे आहेत. त्यांनी कुलगुरुंना लिहिलेली पत्रे माझ्याकडे आहेत. महमद इय्यास महमद उस्मान यांना असिस्टंट प्रोफेसर म्हणून नोकरीवर घ्या. अब्दुल सफी अब्दुल रशीद यांना कृषी सहाय्यक म्हणून कामावर घ्या. अन्सारी अब्दूल अजीज यांना कामावर लावून घ्या. अशी अनेक पत्रे त्यांनी कुलगुरुंना लिहिली आहेत. परंतु त्यांना काही नोक-या लागल्या नाहीत. या रागापोटी त्यांनी कुलगुरुंना जबाबदार धरले आहे. या ठिकाणी व्यक्तिचा प्रश्न नाही तर संस्था बदनाम होत आहे. सभापती महोदय, कृषी विद्यापीठे त्या त्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

भागात आदराचे स्थान घेऊन राहिलेली आहेत. हजारो शेतकरी कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन पाहण्यासाठी जात असतात. त्या त्या भागातील कृषी संशोधक लोकांना मार्गदर्शन करीत असतात. त्यांची मोरॅलिटी डाऊन होईल, असे पाऊल कृपया शासनाने उचलू नये. असे शेकडो आरोप येत असतात. जैन अहवाल आला, सावंत अहवाल आला. त्यामुळे कोणावरही राग धरु नका. सभापती महोदय, आपण या कृषी विद्यापीठाला डाग लावलात, कृषी विद्यापीठावरील शेतक-यांचा विश्वास उडाला तर त्या भागातील प्रगतीला खिळ बसेल. सभापती महोदया, आपण मला बोलावयाला जी संधी दिली आहे, त्याबद्दल आपले आभार मानतो. फक्त या ठिकाणी शेवटचे एकच वाक्य वाचतो. सरकारचे धोरण या पुढच्या काळामध्ये शेतीच्या विकासासाठी व पाण्याच्या नियोजनाचे असले पाहिजे. त्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाला कृषी निवास, कृषी विद्यापीठे, कृषी संशोधन केंद्रे, सिंचन विभाग या सर्व घटकांच्या योग्य समन्वयातून नवा दृष्टीकोन निर्माण करावा लागेल व तो परिणामकारक रित्या शेतक-यामध्ये रुजवावा लागेल. तरच 21 व्या शतकामध्ये आणि परदेशातून येणा-या शेतीतंज्ञाला तोंड देण्याचे सामर्थ्य महाराष्ट्रातील शेतक-यांमध्ये निर्माण होईल. मा. सभापती महोदया, आपण मला दिलेल्या संधीबद्दल मी मनपूर्वक आपले आभार मानीत आहे.

जय हिंद । जय महाराष्ट्र ।

(यानंतर श्री. सरफरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी एक अत्यंत चांगली चर्चा या सभागृहामध्ये घडवून आणली आहे. मागे कुणी काय केले? त्यांचा काय दोष याबाबत मी चर्चा करणार नाही. परंतु आता पुढे काय केले पाहिजे आणि असलेल्या यंत्रणेमध्ये आपण आपला शेती व्यवसाय कसा वाढवू शकू, त्याला योग्य भाव कसा देवू शकू या बाबत या चर्चेच्या माध्यमातून या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये संदेश गेला पाहिजे अशी आपली मागणी आहे. माननीय श्री. यशवंतराव गडाख यांचेबरोबर मला अनेक संस्थांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. या विषयावर अधिकारवाणीने बोलणारे ते या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. मला वाटते या विषयावर त्यांना बोलण्याकरिता फार कमी वेळ मिळाला. त्यांना सभागृहाने अधिक वेळ द्यावयास पाहिजे होता. या सभागृहामध्ये दूधाच्या विषयावरील लक्षवेधी सूचनेच्या वेळी माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी आपले विचार मांडले. दूधाच्या चळवळीमध्ये, त्या व्यवसायामध्ये एक अभ्यासू नेता म्हणून ते काम करतात. या राज्यातील रस्त्यांच्या विकासासाठी नाबार्डमार्फत जी ग्रँट येते ती शेती व्यवसाय वाढविण्याच्या दृष्टीकोनातून येते. त्या ग्रँटचा वापर करुन शेती उत्पादीत माल बाजारपेठेमध्ये आणण्याच्या दृष्टीने दळणवळणाची सोय कशी प्रभावीपणे करु शकतो आणि जलद गतीने करु शकतो याचा विचार करुन त्या दृष्टीने अंमलबजावणी केली पाहिजे अशी या चर्चेच्या निमित्ताने मी मागणी करतो. नाबार्डच्या अनुदानाने शहरामध्ये रस्ते बांधायचे, ज्या ठिकाणी शेती उत्पादन होत नाही त्या ठिकाणी बांधायचे कां? ज्या ठिकाणी शेती उत्पादन होते त्या ठिकाणी ते पैसे खर्च केले पाहिजेत. त्या दृष्टीने त्याचे नियोजन केले पाहिजे. तेव्हा हे रस्ते कुठे बांधायचे याची आपण चर्चा करीत बसलो तर त्या मधून अनेक प्रश्न निर्माण होतील. दूधाच्या व्यवसायावरील लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी स्वीडन व नॉर्वेचा उल्लेख केला. एक-दोन वर्षापूर्वी स्वीडन, नॉर्वे या देशामध्ये जावून तेथील दूधाचा व्यवसाय मी बघितला आहे. त्या देशामध्ये 12 हजार सोसायटयांचे जाळे पसरले आहे. माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी कालच्या चर्चेमध्ये दूधाच्या भावाबाबत मागणी केली. आपण जर नॉर्वेमध्ये जाऊन पाहिले तर त्या ठिकाणी जास्त दुधाचे उत्पादन होते त्या काळात शेतकऱ्यांना सरकार सबसिडी देते, आणि दूधाचे भाव बारा महिने एकच असतात. त्या देशामध्ये दुधाचे प्रकल्प अद्ययावत आहेत. माझ्या समवेत पणनमंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

श्री. हर्षवर्धन पाटील होते. त्यांच्याबरोबर अनेक दूध प्रकल्पांना भेटी दिल्या. मी दूध उत्पादन क्षेत्रामध्ये काम करणारा शेतकरी नाही. परंतु मार्केटींग चळवळीमध्ये काम करणारा, सहकारी चळवळीमध्ये काम करणारा कार्यकर्ता आहे. जगामध्ये पहिल्यांदा कोऑपरेटिव्ह कंझ्युमर स्टोअर काढण्याचा मान स्वीडनने 100 वर्षापूर्वी घेतला होता. त्या ठिकाणी उत्पादित झालेले दूध शहरामध्ये, प्लॅटमध्ये आणण्यासाठी सहा पदरी रस्ते बांधण्यात आले आहेत. दूध उत्पादन ताबडतोब बाजारात कसे येईल हे पहाण्याचे काम त्यांचे सरकार करते. युती सरकारच्या काळात मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे बांधण्यात आला. आपण पुण्याला जातांना दूधाचे ट्रक सहा-सहा, बारा-बारा तास अडकलेले पहातो. आज दळणवळणाची सोय झाल्यामुळे नगर, सांगलीहून निघालेला ट्रक चार तासात मुंबईच्या मार्केटमध्ये येतो. कृषी उत्पादनाचा माल जलद गतीने मार्केटमध्ये आणण्यासाठी दळणवळणाची सोय आपल्याला अधिक चांगल्या प्रकारे करणे आवश्यक आहे. ज्यावेळी शेतकऱ्याचा माल बाजारात येतो त्यावेळी त्यावरील वहातूक खर्च सुध्दा कमी कसा होईल हे पहाण्याचे काम सरकारने केले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

आपल्या राज्यात बाजार समित्या आहेत. शेतक-यांना योग्य भाव मिळाला पाहिजे. व्यापा-यांनी, दलालांनी त्यांची पिळवणूक, छळवणूक करता कामा नये म्हणून कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना केली. पण आज दुर्दैवाने या बाजार समित्या दलालांच्या आणि व्यापा-यांच्या ताब्यात गेल्याचे दिसत आहे. मी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये जातो, तेव्हा तेथे शेतकरी दिसत नाही, तर दलाल दिसतात. मी मार्केट कमिटीमध्ये काम केलेले आहे. मी या मार्केट कमिटयांचे नेतृत्व करतो, त्या चालवितो पण मला त्यात समाधान वाटत नाही. मार्केट कमिटीमध्ये शेतक-यांना ख-या अर्थाने न्याय मिळतो का ? तर मिळत नाही अशी प्रामुख्याने परिस्थिती आहे. आजच्या या चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, शेतक-यांच्या मालाला योग्य भाव देण्याच्या दृष्टीने या मार्केट कमिटया कशा प्रकारे प्रभावी होतील हे पाहण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे युती शासनाच्या काळामध्ये पणन मंत्री होते. मार्केट कमिटीचा ॲक्ट हा दुधारी आहे. या कायद्यातील जी कलमे आहेत, त्याच्या एका अर्थातून दोन-तीन अर्थ निघू शकतात. त्यामुळे त्यात पूर्णपणे बदल केला पाहिजे. त्यामुळे छोटया शेतक-यांना संरक्षण न मिळता दलाल, व्यापा-यांना संरक्षण मिळत आहे. अशा वेळी शेतक-यांनी उत्पादन केलेल्या मालाला योग्य प्रकारे भाव मिळावयाचा असेल तर या सर्व संस्था सक्षम आणि कार्यक्षम बनविल्या पाहिजेत. पणन खात्यामार्फत दरवर्षी परदेशात दौरे केले जातात. आताचे जे माननीय कृषी मंत्री आहे, त्यांना अजून परदेशी जाण्याची संधी मिळाली नसेल. परंतु माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील हे एका वर्षामध्ये चार-पाच वेळा परदेशात जाऊन अभ्यास करुन आले. मात्र प्रत्यक्षात आपला माल परदेशात जात नाही. माझ्या कोकणामध्ये आंबा पिकतो आणि आंबा हे फळ सुध्दा द्राक्षाप्रमाणे नाशिवंत आहे आणि आंब्याला आखाती देशात जास्त मागणी आहे. अशा वेळी हा आंबा आखाती देशामध्ये काही तासात कसा पोहोचेल यादृष्टीने कार्यक्षम यंत्रणा उभी केली पाहिजे. जर पोर्ट मध्येच आंबा चार-पाच दिवस पडून राहीला तर तो खराब होणार आहे. डायरेक्टर ऑफ मार्केटींग आणि पणन खात्याकडे भरपूर पैसे आहेत.पण त्याचे योग्य प्रकारे नियोजन होत नाही. या विभागामध्ये पूर्वी श्री.बी.डी.पवार होते आणि 15 दिवसात माल परदेशात पाठविण्याची योजना होती, पण ही योजना कागदावर राहीली, प्रत्यक्षात काहीही झालेले नाही. मी याठिकाणी अत्यंत पोटतिडकीने आणि आत्मियतेने बोलत आहे. प्रत्यक्ष काम करताना मला जे अनुभव आले आहेत, त्यावरुन मी बोलत आहे.तेव्हा

. . . .3 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

अशा प्रकारची यंत्रणा उभी करावयास पाहिजे. मागे काय झाले ते मी बोलत नाही. कोणी किती इस्टेट केली ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी म्हटल्याप्रमाणे कोणी किती खाल्ले ? याची चर्चा न करता सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी याठिकाणी जी चर्चा उपस्थित केली आहे, त्याबाबतीत बोलत असताना मला सांगावयाचे आहे की, प्रत्यक्षात आज शेतकरी हतबल झालेला आहे, निराश झालेला आहे. त्याला या चर्चेच्या निमित्ताने कुठेतरी आशेचा किरण दिसला पाहिजे असे मला वाटते. कृषी मालाला आधारभूत किंमत देण्याचे अधिकार केंद्र शासनाकडे आहेत. शेती मालाला आधारभूत किंमत किती द्यावयाची हे केंद्र शासन जाहीर करते. त्यामुळे केंद्र शासनाने भाव ठरविलेला आहे, मग आम्ही काय करणार ? असे राज्य शासनाकडून सांगितले जाते. पण राज्य शासनाने आता यामध्ये बदल केला पाहिजे आणि राज्य शासनाने आपले स्वतंत्र धोरण ठरविले पाहिजे. मी याठिकाणी भाताच्या उत्पन्नाच्या बाबतीत उदाहरण देतो. भात पिकाच्या बाबतीत कोकणातील तीन जिल्हयांमध्ये वेगवेगळी परिस्थिती आहे आणि विदर्भात वेगळी परिस्थिती आहे. माझ्या रायगड जिल्हयामध्ये भाताचे उत्पादन होते आणि रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये देखील होते. पण रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये 5 मण, 10 मण भात पिकतो, तर रायगडजिल्हयामध्ये तीन एकर,चार एकर उत्पादन होते.त्यासाठी येणारा उत्पादन खर्च पाहिला तर

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे चालू....

विदर्भातील शेतकरी भातशेती पिकवून पुन्हा इतर वेळामध्ये बाकीचे पीक घेऊ शकतो, पण कोकणामधील शेतकरी ते घेऊ शकत नाही. प्रत्येक ठिकाणची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. त्या परिस्थितीचा विचार करुन,शेती उत्पादनाची किंमत ठरविली जात नाही, तोपर्यन्त शेतकरी खऱ्या अर्थाने उभा राहू शकत नाही, असे मला वाटते. माझ्या जिल्ह्यामधील खारे-पाटणमधील शेतकरी जेवढे भातशेतीचे उत्पादन करतात, तेवढे महाड आणि पोलादपूरमधील शेतकरी उत्पादन करू शकत नाहीत. या सगळ्या बाबींचा अभ्यास शासनाच्या कृषी शाळेमार्फत, कृषी विद्यापीठामार्फत प्रत्यक्ष कोठेतरी विचार करुन झाला पाहिजे. आधारभूत किंमत ठरवत असतांना, केंद्र सरकारला आपले म्हणणे सांगितले पाहिजे. आज कोलम भात 16 ते 17 रु. किलो या दराने मिळतो. परंतु प्रत्यक्षात ते भात आमच्याकडून 500 रुपये क्विंटलनी खरेदी केले जाते. 70 टक्के उतारा धरला तर प्रत्यक्षात 1100 रुपये भाव होतो. या 1100 रुपयामधील दलाल किती पैसे घेतो? जवळजवळ 600 रुपये दलाल घेतो. या दलालीला कोठेतरी नियंत्रण शासनामार्फत खऱ्याअर्थाने घातले पाहिजे. त्या दृष्टीकोनातून शेतीमालाला योग्य भाव कसा दिला जाईल, हे पाहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी बोलतांना, या संदर्भाने अनेक भ्रष्टाचाराची उदाहरणे सांगितली. पण आपली कृषी विद्यापीठे आहेत कृषी संशोधन केंद्रे आहेत ती सक्षम आणि अधिक मार्गदर्शक कशी होतील, ते पहाण्याची कामगिरी खऱ्याअर्थाने यंत्रेणेकडून झाली पाहिजे. आजचे कृषी मंत्री मा.बाळासाहेब थोरात आहेत. त्यांच्या वडीलांबरोबर मला काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या काही आठवणी माझ्या भाषणातून मी सांगत असतो. मध्यवर्ती सहाकरी बँकेमध्ये काम करत असतांना, शेतकऱ्यांना कमी व्याजाने कर्ज मिळाले पाहिजे, म्हणून भाऊसाहेब थोरात यांनी अनेकवेळा सांगूनही हे काम का होत नाही, म्हणून मला बँकेमध्ये काम करण्याची इच्छा नाही, असे म्हणून अधिकाऱ्यांबरोबर ते भांडले, पेपरवेट फेकला. श्री.भाऊसाहेबांचा करारीपणा, त्यांची धमक ही मंत्री महोदय आपल्यामध्ये दिसली पाहिजे. त्यांची जी आत्मियता आहे, प्रत्येक बैठकीमध्ये त्यांनी सांगितलेले आहे. मला वाटते, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख साहेबही त्यांच्या तालमीत तयार झालेले आहेत. शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दराने कर्ज मिळाले पाहिजे म्हणून ते झगडले. अशाप्रकारे आपण कार्यक्षम बँका बनविल्या, संस्था बनविल्या तर तसे आपण करुन दाखवू शकतो. सभापती महोदया, मी माझ्या जिल्ह्यामध्ये हा प्रयोग करून दाखविलेला आहे. शेतीच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे चालू...

उत्पादन खर्चासाठी 4 टक्के दराने कर्ज पुरवठा केलेला आहे. बँकेचा सगळा प्रशासकीय खर्च कमी केला. नॉन ॲग्रीकल्चरल फायनान्समधून होणारा फायदा शेतकऱ्यांपर्यन्त पोहोचविण्याची कामगिरी आम्ही केली. माझ्याकडे सुदैवाने किंवा दुर्दैवाने शेतीला फायनान्स कमी आहे. पण प्रयोग म्हणून त्या ठिकाणी सूत्र स्वीकारले. आपण यासाठी विचार केला पाहिजे. आपल्याला हे करण्याची मनापासून इच्छा असली तर ते आपण करू शकतो. मी सांगेन की, मी आणि सन्माननीय सदस्य श्री.रावतेसाहेब आणि इतर सन्माननीय सदस्यांनी पुढील आढवड्यात बँकांच्या कर्जपुरवठ्याच्या संबंधात येथे चर्चा करण्याची अनुमती मागितलेली आहे. त्यावेळेस मी या विषयावर बोलेन. बँकांचा, संस्थांचा आणि सोसायट्यांचा प्रशासकीय खर्च गंभीरपणाने कमी केला पाहिजे. केवळ मते मागण्यासाठी सोसायट्या वाढवायच्या हे सूत्र प्रामुख्याने बंद करायला पाहिजे, ते मी करुन दाखविलेले आहे. 550 सस्थांच्या फक्त 125 सोसायट्या केलेल्या आहेत. हिंदुस्थानामध्ये एकाच जिल्ह्यामध्ये अशाप्रकारचे काम झालेले आहे. या संदर्भात नाबार्डने मला बोलावून घेतले आणि तुम्ही कसे शक्य केले, अशी विचारणा केली. नाबार्डने प्रयोग म्हणून काल आम्हाला बोलावून घेऊन सांगितले की, ते कसे शक्य केले ते सांगा. रायगड बँकचे मॉडेल म्हणून विविध संस्थांचे एकत्रिककरण का करतो हे सांगितले. आमची त्यामुळे मते कमी झाली. पण आम्ही मतांकडे पाहिले नाही तर प्रत्येक संस्थां ही व्हायबल झाली पाहिजे, स्वत:च्या पायावर उभी राहिली पाहिजे तिचा इम्बॅलन्स कमी झाला पाहिजे, तरच शेती पुरवठा खऱ्याअर्थाने कमी होईल. शेतकऱ्यांना कमी दराने कर्ज मिळेल, ते आपल्या हातामध्येच आहे, ते आपण करु शकतो असे मला वाटते. या ठिकाणी अनेक मुद्दे मांडावयाचे आहेत, परंतु वेळेचे बंधन आहे, याची मला जाणीव आहे. पण हा जो विषय आहे, त्या विषयाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत, त्या मुद्यांचा ऊहापोह या ठिकाणी झाला पाहिजे. याचा गांभीर्याने आणि गंभीरपणे विचार केला पाहिजे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

याबाबत या ठिकाणी गांभीर्याने विचार केला पाहिजे. मी माननीय राज्यमंत्र्यांच्या मतदारसंघात गेलो होतो. माझ्या माहितीप्रमाणे माजी सहकार मंत्र्यांचा तो मतदारसंघ आहे. त्या ठिकाणी हळदीचे पीक घेतले जाते. ती हळद प्रोसेसिंग करण्यासाठी सांगलीला जाते. हे काम त्याच ठिकाणी व्हावयास पाहिजे. मी यामध्ये पश्चिम महाराष्ट्राला दोष देत नाही. परंतु याबाबतीत विचार केला पाहिजे. आमच्या कोकणामध्ये आम्ही हे करतो. जागतिकीकरणाचे परिणाम, उदारीकरणाचे परिणाम आपण भोगत आहोत. त्यावर कशी मात करावयाची याबाबत निश्चितपणे आपल्याला गांभीर्याने विचार करावा लागेल. शेती उत्पादनासाठी दळणवळणाची सोय कशी होईल, उत्कृष्ट बियाणे आणि खत कसे दिले जाईल हे पाहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले ते बरोबर आहे. तुमच्या जिल्हयात बियाणे पेरल्यानंतर ते उगवले नाही तर त्याबाबतीत कडक कारवाई केली पाहिजे. अधिकारी घाबरले पाहिजेत. शेतकऱ्यानी खरेदी केलेले बियाणे जर असे निघाले तर अधिकाऱ्याला शिक्षा होते असे या राज्यामध्ये झाले पाहिजे. त्यामुळे मोठया प्रमाणावर फरक पडेल. या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यासाठी, योग्य बाजारपेठ मिळण्यासाठी आणि कमी दराने कर्ज पुरवठा कसा होईल हे पाहण्याचे काम शासनाने करावे. तोपर्यन्त व्याजामध्ये सुध्दा सबसिडी देण्याची तरतूद बजेटमध्ये करण्याची मागणी मी या चर्चेच्या निमित्ताने करतो. सभापती महोदया, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी ही जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेच्या निमित्ताने जो विषय सभागृहासमोर आलेला आहे तो या राज्याच्या दृष्टीने आणि देशाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा विषय आहे. याचे कारण असे की, हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. हिंदुस्थानातील जवळपास 70 ते 75 टक्के जनता शेतीवर विसंबून आहे आणि शेती करणारी आहे. मी या विषयाचे तीन भाग करतो. एक म्हणजे सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या शेती मालाला योग्य भाव मिळण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. दुसरा भाग म्हणजे त्या शेतकऱ्यांच्या शेतीमालावर प्रक्रिया करणारी जी कारखानदारी आहे ती संकटात आलेली आहे आणि त्या कारखानदारीला मदत करण्याबाबतचा भाग आहे. तिसरा भाग म्हणजे शेतकऱ्याला आपली शेती पिकविण्यासाठी जे कर्ज काढावे लागते त्या कर्जावरील व्याजाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. शेतीचा प्रश्न हा या देशातील महत्वाचा प्रश्न आहे. जर शेतकऱ्याने शेती पिकविली नाही तर या देशातील माणूस जगू शकत नाही. शेतकऱ्याने जर आपल्या शेतातून उत्पादन काढले नाही, अन्नधान्य उत्पादित केले नाही तर सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी सांगितल्याप्रमाणे 1972 च्या दुष्काळामध्ये रोजगार हमीच्या कामावर जाणाऱ्या मजुरांना मिलोची ज्वारी खावी लागली. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी इंग्रजांच्या काळापासूनचे वर्णन केले. ते मी ऐकत होतो. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक काळ असा होता की, या देशातील सरकारला ज्वारीसाठी, गव्हासाठी, कापसासाठी परराष्ट्रांवर अवलंबून राहावे लागत होते. आमच्या देशातील परराष्ट्रमंत्री, आमच्या देशातील वाणिज्य मंत्री परदेशात जाऊन आम्हाला अन्नधान्य द्या, आम्हाला कापूस द्या अशी भिकेची झोळी घेऊन जात होते. 1972 नंतर या राज्यामध्ये श्री. वसंतराव नाईक यांच्यासारखे मुख्यमंत्री आले आणि त्यांनी या देशातील शेतकऱ्यांना अधिक उत्पादन वाढवा असे आवाहन केले. त्या आवाहनाला या राज्यातील शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिला आणि मग त्याचवेळी हायब्रिड ज्वारीचे बियाणे या राज्यामध्ये आले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ....

राज्यातील धान्याचे उत्पादन प्रचंड प्रमाणामध्ये वाढविण्यात आले आणि राज्याच्या मुख्यमंत्र्यांना शेतक-यांनी प्रतिसाद दिला, त्यामुळे शेती उत्पादन वाढले, धान्याचे उत्पादन वाढले, कापसाचे उत्पादन वाढले, महाराष्ट्राला किंबहूना, देशाला स्वयंपूर्ण करण्याचे काम या देशाच्या आणि या राज्याच्या शेतक-यांनी केले. जो देश धान्यासाठी परदेशामध्ये भीक मागत होता त्या देशाला स्वयंपूर्ण करण्याची कामगिरी शेतक-यांनी केली आहे, त्याचे श्रेय सरकार घेत असेल परंतु हे काम शेतक-यांनी केलेले आहे हे नाकारुन चालणार नाही. शेतीचे उत्पादन वाढले पण शेतीमालाचे भाव वाढले काय ? या देशाला स्वातंत्र्य मिळून 58 वर्षे झाली, आपण सुवर्ण महोत्सव साजरा केला होता. स्वातंत्र्यानंतर या देशामध्ये महात्मा गांधीजींनी सांगितले होते हा देश कृषी प्रधान देश आहे, या देशातील शेतकरी हा या देशाच्या पाठीचा कणा आहे, हा अन्नदाता आहे, जगाला जगविणारा तारणहार आहे, काबाडकष्ट करुन घाम गाळतो, तो आपले रक्त आटवितो आणि आपल्या काळया आईतून धान्य पिकवितो त्या शेतक-याच्या खेडयाला प्राधान्य द्या. जर हिंदुस्थानचा विकास करावयाचा असेल तर खेडयाचा विकास झाला पाहिजे. ज्यादिवशी खेडयाचा विकास होईल त्यादिवशी हिंदुस्थानचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून शेती उद्योगाला प्राधान्य द्या. शेतीला प्रमुख उद्योगाचा दर्जा द्या, परंतु महात्मा गांधीजींचे विचार कोणी उचलले नाहीत, नियोजनाची दिशा उलट फिरविली गेली. शेती हा प्रमुख उद्योग मानला असता तर त्याच्या अनुषंगाने कापूस, लोखंड या व्यवसायाची भरभराट झाली असते. देशाचे शेती उत्पादन वाढले परंतु शेतीला दुय्यम दर्जा दिला गेला. त्यामुळे शेतक-यांच्या शेतीला पाणी मिळाले नाही, वीज मिळाली नाही, उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाले नाही आणि म्हणून उत्पादन खर्च व मिळालेला भाव याचा मेळ बसला नाही. म्हणून तो तोटयात शेती करु लागला, ज्या शेतीवर तो उपजीविका करीत होता त्यावेळी जर उत्पादन खर्च व भाव याचा मेळ बसविला असता तर आज त्याची ही दुर्दशा झाली नसती. माझ्या गावामध्ये हिंदुस्थान लिव्हर हा कारखाना आहे. मी कोरडवाहू शेतक-याच्या घरामध्ये जन्माला आलेलो आहे. मी त्या कंपनीच्या एम.डी.ला भेटण्यासाठी गेलो होतो. मी त्यांना विचारले की, तुमच्या लाईफबॉय या साबणाची किंमत कोण

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

ठरवितो ? तुमच्या प्रॉडक्शनची किंमत ठरविण्यासाठी एखादा आयोग आहे काय ? त्यांनी मला सांगितले की, आयोग वगैरे काही नाही. आमच्या उत्पादनाची किंमत आम्हीच ठरवितो. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, या कारखान्यामध्ये साबणाचा कच्चा माल येतो त्याची किंमत त्यात समाविष्ट केली जाते, मशिनरीची घसारा किंमत, वीज बिल, कामगारांचे वेतन, साबण तयार झाल्यावर पॅकिंगवर जो खर्च येतो तो, विक्रीकर आणि एम.डी.ची पत्नी त्या कारखान्याची डायरेक्टर असेल आणि ती मुंबईहून अकोला-खामगाव असा प्रवास करुन आली असेल तर तिच्या विमानाचा व गाडीचा खर्च त्या साबण्याच्या किंमतीमध्ये समाविष्ट केला जातो. शेतक-यांबाबत गेल्या 50 वर्षामध्ये असे घडले नाही, शेतक-यांच्या खतांची किंमत मोजली जात नाही, बियाण्यांवरील खर्च मोजला जात नाही, नांगरट, वखरणीची किंमत मोजली जात नाही, शेतक-याची बायको शेतामध्ये भाकरी घेऊन जाते तिच्या मजुरीची किंमत मोजली जात नाही, त्यानुसार भाव ठरत नाही. सभापती महोदय, आमच्या शेतक-यांची शेंडी कोणाच्या हातामध्ये आहे ? आपल्या देशात कृषीमूल्य आयोग नावाचा एक आयोग आहे.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

सभापती महोदय, 1989मध्ये मी खासदार झालो. खासदार झाल्यानंतर माझ्या मनात शेतमालाच्या किंमती कोण ठरविते हे जाणून घेण्याबाबत कुतूहल निर्माण झाले. शेतकरी आपल्या शेतामध्ये बैलासारखा राबराब राबतो, घाम गाळतो, आपल्या काळ्या आईची सेवा करतो आणि जे अन्नधान्य निर्माण करतो त्याची किंमत कोण ठरवितो असा प्रश्न मला पडत होता. म्हणून शेतीबद्दल प्रेम असणारे असे खासदार आम्ही एकत्र जमलो आणि कृषिमूल्य आयोगाचे ऑफिस पाहण्यासाठी गेलो. सभापती महोदय, झोपडीमध्ये राहून शेतात काबडकष्ट करुन, घाम गाळून शेतकरी जो माल आपल्या शेतात पिकवितो त्या शेतमालाचा भाव हा पंचतारांकित अशा इमारतीमधील 10 मजल्यावरील वातानुकुलित ऑफीसमध्ये ठरविला जात असेल तर या देशातील शेतक-याला कसा काय न्याय मिळेल ? मग आम्ही कृषिमूल्य आयोगाच्या रचनेसंबंधी विचारणा केली. त्या आयोगामध्ये कृषीमंत्री, कृषी राज्यमंत्री, कृषी खात्याचे सचिव, वित्त खात्याचे सचिव अशी मंत्री आणि सचिव पातळीवरची माणसे होती. त्या आयोगामध्ये शेतक-याचा एक तरी प्रतिनिधी आहे काय अशी विचारणा आम्ही केली असता आम्हाला "नाही" असे उत्तर मिळाले. ही 1989मधील घटना आहे. त्यावेळी देवीलाल हे देशाचे उप पंतप्रधान होते. त्यांच्या समोर हे सारे वास्तव आम्ही मांडले. त्यांना अतिशय दु:ख झाले. करोडो शेतक-यांच्या शेतमालाचा भाव जेथे ठरविला जातो त्या ठिकाणी शेतक-याचा एकही प्रतिनिधी नसेल तर शेतक-याला कसा काय न्याय मिळेल, शेतक-याच्या मालाचा भाव ते कसे काय ठरविणार? असे असंख्य प्रश्न माझ्या समोर उभे राहिले. आम्ही याबाबतीत पाठपुरावा केल्यानंतर शेतक-यांचे दोन प्रतिनिधी कृषिमूल्य आयोगावर घेण्यात आले. आपल्या देशातील शेतक-याच्या मालाचे भाव हे कृषिमूल्य आयोग ठरविते. आपल्या राज्य सरकारचा देखील आयोग आहे. परंतु त्या आयोगाला फक्त शिफारस करण्याचा अधिकार आहे. या राज्याच्या आयोगाची वर्षातून एकदा कधी तरी मिटींग होते. त्यामध्ये शेतक-याचा उत्पादन खर्च कसा काढतात हे मला तरी अजून समजलेले नाही. कृषिमूल्य आयोगाला आपले राज्य केवळ शिफारस करु शकते. गेल्या 50 वर्षामध्ये या देशातील शेतक-याच्या शेतीसंबंधी सर्वंकष असे धोरण ठरविले गेले नाही. ते आपण ठरविणार आहात की नाही हा माझा मंत्री महोदयांना सवाल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

आहे. मा.सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी अतिशय महत्वपूर्ण, राज्यातील शेतक-यांच्या जिव्हाळयाची अशी चर्चा या सदनामध्ये उपस्थित केलेली आहे. ख-या अर्थाने जगातील शेतकरी आज 21व्या शतकामध्ये गेलेला आहे आणि हिन्दुस्थानातील शेतकरी मात्र गेली 50 वर्षे आहे तेथेच आहे. मी सांगितले की, मी शेतक-याच्या पोटी जन्माला आलो. वडिलांचे कष्ट आणि त्यांचा घाम मी बघितलेला आहे. त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला जेव्हा भाव मिळत नव्हता त्यावेळचे त्यांचे दु:ख देखील मी पाहिलेले आहे. जेव्हा शेतक-यांचा प्रश्न येथे मांडला जातो त्यावेळी शेतक-याची हीच करुण कहाणी आहे काय असा प्रश्न पडतो. या शेतक-यासाठी तुटपुंज्या योजना केल्या जातात. ठिबक सिंचन योजना, सामूदायिक विहीर योजना, जवाहर विहीर योजना अशा योजना केलेल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात या योजनांचा लाभ किती शेतक-यांना मिळतो हा देखील प्रश्न आहे. मा.सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी याठिकाणी आकडेवारी सांगितली. मी आकडेवारीच्या खोलात जात नाही. 1997 पासून दरवर्षी जे बजेट मांडले जाते त्यामध्ये कृषी क्षेत्रासाठी फक्त दहा-दहा कोटींनी वाढ केली जाते. आपल्या राज्यातील शेतक-यांबद्दल किती प्रेम आहे हे यावरुन दिसून येते. हे राज्य शेतक-यांचे आणि शेतक-यांसाठी चालविले जाते असे आपण येथे सांगता. परंतु गेल्या 58 वर्षात शेतीला उद्योगाचे स्थान मात्र दिले गेले नाही. शेतक-याला सवलती दिल्या गेल्या नाहीत. त्याला शेतीसाठी पाणी दिले जात नाही, वीज दिली जात नाही. एखाद्या शेतक-याने जर वीज पंपासाठी कनेक्शन मागितले तर त्याला ते दोन-दोन वर्षे मिळत नाही. परंतु जर एखादा उद्योजक इंडस्ट्रीयल एरियामध्ये उद्योग उभा करायला लागला तर त्याला 8 दिवसामध्ये वीज दिली जाते. उद्योग आणि शेती यामध्ये ही तफावत आहे. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे उद्योजक हा स्वत: आपल्या मालाचा भाव ठरवितो. परंतु शेतक-याने उत्पादित केलेल्या शेतमालाचा भाव मात्र शेतक-याला ठरविता येत नाही. शेतमालाचे भाव कधी फेडरेशन ठरविते तर कधी राज्य सरकार ठरविते. मी फेडरेशनचा अध्यक्ष असताना हे सर्व चित्र पाहिलेले आहे. शेतकरी काळ्या आईची सेवा करुन कापूस पिकवितो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदया, आपण कापसाची शेती पाहिली असेल. कापसाच्या झाडावरील एक एक बोंड शेतकरी गोळा करीत असतो. ती सर्व बोंडे तो शेतकरी एकत्र करीत असतो. त्या बोंडातील कापूस काढून तो विकण्यासाठी मार्केटमध्ये आणतो त्यावेळी तो शेतकरी चोरा सारखा आपल्या गाडीच्या बाजूला उभा राहतो. त्या मार्केटमध्ये त्या शेतक-याच्या कापसाचा मालक हा ग्रेडर बनत असतो. शेतकरी ग्रेडरला विनंती करीत असतो की, माझा कापूस चांगला आहे. ग्रेडर हा शेतक-याकडून पैसे घेतल्या शिवाय त्या शेतक-याच्या कापसाचे ग्रेडींग करीत नाही. त्या शेतक-याला ग्रेडर कडूनच योग्य भाव शेतक-याला मिळत नाही. चोरा सारखा कापूस ग्रेडरच्या हवाली करुन शेतकरी आपल्या घरी येतो. त्याचा कापूस खरेदी केल्यानंतर त्या शेतक-यास तुम्ही वेळेवर पैसे देत नाहीत. या ठिकाणी आपण शेतक-यांची उन्नती करण्याच्या गोष्टी आपण करतो, परंतु शेतक-यांना दोन-दोन, तीन-तीन महिने पैसे दिले जात नाहीत. शेतक-यांचा कापूस तुम्ही उधारीवर घेता. त्या शेतक-यांना कधी उधारीत खत मिळत नाही, उधारीत बीयाणे मिळत नाही, त्याला मजूर उधारीवर मिळत नाहीत. कापूस उत्पादक शेतक-याच्या शेतात कापूस वेचणारी महिला असेल तिला तो शेतकरी सांगू शकत नाही की, तुझी मजुरी तीन महिन्यानंतर देऊ. एक हप्ता सहा महिन्याने देऊ असे तो बीयाण्याच्या मालकास सांगू शकत नाही. एखाद्या मजुराची मजुरी 100 रुपये झाली व त्या शेतक-याने मजुरास सांगितले की, 50 रुपये आता घे. 25 रुपये तुला जून मध्ये देईन, आणि उर्वरित 25 रुपये पुढच्या दिवाळीत देऊ. असे त्याने मजुरांना सांगितले तर त्याच्या शेतात काम करण्यास मजूर येतील काय ? शेतक-याला खताचे, बीयाण्याचे पैसे नगदी द्यावे लागते. इन्सेक्टीसाईडच्या नगदी पैसा द्यावा लागतो. मी भ्रष्टाचारा संदर्भात बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी त्यासंबंधी बराच उल्लेख केलेला आहे. पण आज एन्ड्रीनचा भाव काय

आहे ? एन्ड्रीनचा भाव 10 हजार रुपये लिटर एवढा आहे. सभापती महोदया, आपल्याला आश्चर्य वाटेल. शेतक-याला आपल्या पिकावरील रोगराई वाचविण्यासाठी नाईलाजाने 10 हजार रुपये लिटरचे एन्ड्रीन त्याला विकत घ्यावे लागते. कापसावर तीन ते चार वेळा एन्ड्रीनची फवारणी केल्या शिवाय त्या शेतक-याचा कापूस निघत नाही. शेतक-याचा शेती पिकाचा खर्च प्रचंड प्रमाणात वाढत गेलेला आहे. उत्पादन खर्चा एवढा त्याच्या उत्पादन मालाचा भाव वाढलेला नाही. उत्पन्न आणि खर्च याचा मेळच कुठे बसत नाही. शेतक-याचे कर्जबाजारी होण्याचे खरे कारण हे आहे. उत्पादन

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

खर्च आणि त्याचा उत्पादित केलेल्या मालाला मिळणार भाव याचा तुम्ही मेळ घातला असता तर राज्यातील शेतकरी वर्ग सुखी राहिला असता. सभापती महोदया, कारखान्यात निर्माण होणा-या वस्तुच्या किंमतीची तुलना आणि शेतक-याच्या शेतात निर्माण होणा-या मालाची किंमतीची तुलना यांचा मेळ बसविला असता तर आज सन्माननीय सदस्य श्री. गडाख यांना हा ठराव या सभागृहात आणण्याची वेळ आली नसती. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केला की, शासनाने 2900 रुपये लांब धाग्याच्या कापसाचा भाव देण्याची शिफारस केलेली आहे. यासंबंधी कृषी मुल्य आयोगाने काय दखल घेतली ? मी सांगितले त्या पध्दतीने तर त्या कापसाला 4 हजार रुपये भाव मिळाला असता. शेतक-याच्या बायकोची मजुरी त्यात तुम्ही लावली नाही. शेतक-याची स्वत:ची मजुरी तुम्ही त्यात लावली नाही. जी बैलजोडी त्याच्या शेतात काम करीत आहे त्यांची मजुरी तुम्ही लावली नाही. ही सर्व मजुरी लावली तर या कापसाचा भाव 4 हजार रुपयांपर्यन्त जाईल. परंतु कापून 2900 रुपयांची शिफारस केली. त्याची 2000 ते 2200 रुपयांपर्यन्त केंद्र शासनाने दखल घेतलेली आहे. राज्यातील शेतकरी कसा उभा रहाणार ? मी काही बारीक गोष्टीत जाणार नाही. शेतक-यांच्या बाबतीत सर्वंकष असे धोरण ठरविले गेले पाहिजे. शेतक-यांच्या मालाला भाव मिळाला नाही, त्यामुळे शेतकरी कर्ज बाजारी झाले. या राज्यात जवळपास 450 शेतक-यांना आत्महत्त्या कराव्या लागल्या ही या प्रगतशील राज्याची शोकांतिका आहे.या राज्यातील अन्नदात्या आणि कष्टकरी शेतक-याला आत्महत्त्या कराव्या लागत असतील तर हे प्रगत राष्ट्र आहे असे म्हणावे की नाही असा प्रकारचा प्रश्न या ठिकाणी निर्माण होतो. राज्यातील शेतक-यांनी आत्महत्त्या केल्या, त्यासाठी राज्य सरकारने काय केले आहे ? शेतक-याला प्रोत्साहन देणा-या योजना आणतो असे जाहीरपणे सांगता. राज्यात 450 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. त्यातील किती शेतक-यांना ख-या अर्थाने आपण आर्थिक स्वरुपात मदत दिलेली आहे. त्याच्या कुटुंबाचा आक्रोश तुम्ही ऐकला आहे काय ? त्या शेतक-यांचे कुटुंब उध्वस्त झालेले तुम्ही तुमच्या डोळयांनी पाहिलेले आहे काय ? 58 वर्षे या देशात स्वातंत्र्य मिळून झालेले असताना या प्रगतशील राज्यात 450 शेतकरी आत्महत्त्या करतात ही अतिशय दुर्देवाची गोष्ट आहे. शेतक-यांचा प्रश्न हा राजकारण करण्याचा मुळीच नाही असे मी सर्वांना सांगू इच्छितो. विदर्भातील अनेक शेतक-यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. त्यातील काही शेतक-यांच्या कुटुंबियांना मी भेटून आलेलो आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

शेतक-यानी आत्महत्त्या केलेली असताना तुमच्या तहसिलदारांनी खोटे ठरविण्याचे प्रयत्न केले. तो शेतकरी दारु घेत होता, तो व्यसनाधीन झाला होता अशा पध्दतीचे सर्टिफिकेट तहसिलदारांनी या आत्महत्त्या केलेल्या शेतक-यांच्या बाबतीत जोडले आणि शेतक-यांच्या आत्महत्त्याची प्रकरणे दाबण्याचा प्रयत्न केला गेला. अशाने राज्यातील शेतकरी उभा रहाणार नाही. शेतक-यांना काय प्रोत्साहन तुम्ही देणार आहात ? तुम्ही शेतक-यांना कापसाचे पीक घेऊ नका अशा प्रकारचे प्रोत्साहन देणार आहात काय ? मी माननीय श्री. बाळासाहेब थोरात आणि सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव चव्हाण यांना विचारु इच्छितो की, ऊसाचे पीक घेऊ नका अशा प्रकारचा पश्चिम महाराष्ट्रातील शेतक-यांना सल्ला दिला तर तुम्हाला कसे वाटेल. तेथील शेतक-यांना सांगितले की, साखर कारखाने तोटयात चाललेले आहेत, तुम्ही ऊसाची पेरणी करणे सोडून द्या, त्या ऐवजी तुम्ही सोयाबीन किंवा कापसाची लागवड करा असा सल्ला तेथील शेतक-यांना दिला तर तो सल्ला तुम्हाला आवडेल काय ?

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ..

तुम्ही सल्ला देता कापूस पेरा सोडा आणि सोयाबिनचा पेरा करा. त्याला आम्ही प्रोत्साहन देऊ. कापूस पेरणा-या शेतक-याला आपण परावृत्त करु नका. या राज्यामध्ये कापूस हे नगदी पीक आहे. त्याला पाहिजे तर वेगळया पध्दतीने प्रोत्साहन द्या. पण तुम्ही जर कापूस पेरु नका अशा प्रकारचा सल्ला देणार असाल तर या महाराष्ट्रातील कापूस पिकविणारा विदर्भ,मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी आपल्याला माफ करणार नाही. हवामानानुसार पीक घेतले पाहिजे. वेगवेगळया भागामध्ये शेतीचा पोत वेगळा आहे. त्या पध्दतीने त्या त्या भागातील पिकाचे नियोजन होत असते. म्हणून किमान असा सल्ला तरी देऊ नका. सभापती महोदया, दुसरा विषय यामध्ये आहे तो असा की, शेतीच्या कच्च्या मालावर पक्रिया करणारे कारखाने उभे करणे. कारखाने उभे केले पण ते पश्चिम महाराष्ट्रात उभे केले. ऊस पिकविता तेव्हा साखर कारखाने पश्चिम महाराष्ट्रात उभे केले. आपण कमजोर आहोत याबद्दल दु:ख व्यक्त केले. आपण सांगितले आम्ही कर्तृत्व दाखवू शकलो नाही. कापूस पिकतो विदर्भात,मराठवाडयात आणि उत्तर महाराष्ट्रात आणि सूत गिरण्या मात्र कोल्हापूर,सोलापूर आणि इचलकरंजीला. सभापती महोदया, मी फेडरेशनचा अध्यक्ष झाल्यावर चौकशी केली. कापूस खरेदी केंद्रे कोल्हापूर,सोलापूर आणि इचलकरंजी येथे नाहीत. कोणताही ग्रेडर नाही. कापूस पिकतो विदर्भात आणि कारखाने मात्र पश्चिम महाराष्ट्रात. हळदीची तीच अवस्था आहे. हळद होते हिंगोलीमध्ये आणि कारखाना मात्र सांगलीला. असे असेल तर कशी पक्रिया होणार ? ज्या भागात जे पीक होते त्याच भागात त्या पिकावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे राहिले पाहिजेत.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अनंत तरे)

श्री. यशवंतराव मोहिते यांनी ख-या अर्थाने एक स्वप्न पाहिले होते. 1972 साली कापूस एकाधिकार योजना त्यांनी ज्यावेळी मांडली त्यावेळी त्यांनी स्वप्न पाहिले होते की, कापसापासून कापडापर्यंतच्या पक्रियेचा मालक ख-या अर्थाने शेतकरी असेल. जिनिंग त्याचे असेल,प्रेसिंग त्याचे असेल,कापूस गिरण्या त्याच्या असतील आणि अंतिम नफा त्याच्या खिशात घालीन असे स्वप्न त्यांनी पाहिले होते. ते आपण पूर्ण करु शकलो नाही. जिनिंग आणि प्रेसिंग आपण करु शकलो. कपडयापर्यंत सोडाच गाठीपर्यंत सुध्दा आपण गेलो नाही. आमच्या भागात ज्वारी खूप होते. कृषी विद्यापीठाने मध्यंतरी शोध लावला होता की ज्वारीपासून चांगल्या प्रकारची बिअर तयार होऊ शकते. परंतु आमच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

भागात ज्वारीवर प्रक्रिया करणारे कारखाने नाहीत. कपाशीपासून कार्डबोर्डचा कारखाना उभा राहू शकतो. सूत गिरण्या उभ्या राहू शकतात पण त्याला मान्यता मिळत नाही. सूत गिरण्या रजिस्टर होतात सरकारी दरबारी पाठविल्या जातात परंतु मान्यता मिळत नाही. आज अनेक गिरण्या अर्धवट स्थितीमध्ये आहेत. त्याला शासन पैसा देत नाही. अनेक सूत गिरण्या बंद आहेत. सूत गिरण्यांना फार पैसा लागत नाही. साखर कारखान्यांइतका पैसा लागत नाही. परंतु तो हक्काचा पैसामिळत नाही. संजय गांधी सूत गिरणीचा इतिहास मी सांगू इच्छितो. केंद्र सरकारने या गिरणीसाठी मार्जिन मनी म्हणून दीड कोटी रुपये मंजूर केले. युती शासनाच्या काळात 50 टक्के रक्कम सूत गिरणीसाठी केंद्र शासनाकडून मिळाली. परंतु राज्य सरकारचा वाटा 1995 पासून मिळाला नाही. 3 वर्षे गिरणी बंद राहिली. पैसा मिळाला नाही म्हणून संस्थेला चालवायला दिली. निळकंठ सूत गिरणी,अकोला ही सुध्दा संस्थेला चालविण्यासाठी दिली गेली.

यानंतर श्री. गायकवाड

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

कारण त्या संस्था या सूत गिरण्या चालवू शकत नाहीत. या गिरण्यांना जी मदत पाहिजे असते ती मदत दिली जात नाही.मदत देण्याच्या बाबतीत रात्री 12.00 वाजता यादी तयार केली जाते.त्यावेळी मी स्वत:उपस्थित होतो. त्याचप्रमाणे माझ्याबरोबर कॉंग्रेसचे एक आमदार सुध्दा उपस्थित होते. संबंधित मंत्र्यांच्या नावाचा उल्लेख मी या ठिकाणी करु इच्छित नाही. परंतु त्या दिवशी रात्री 12.00वाजेपर्यन्त आम्हाला मंत्रिमहोदयांनी बसवले होते . त्या दिवशी रात्री मार्जिन मनीची रक्कम कोणत्या सूत गिरण्यांना द्यावयाची याची एक यादी तयार करण्यात आली होती आणि त्या यादीत या गिरण्यांची नावे टाकण्यात आली होती . रात्री बारा वाजता ही यादी माननीय मुख्यमंत्र्यांकडे पाठवतो असे आम्हाला सांगण्यात आले होते .सकाळी 6.00 वाजता मला असा फोन आला होता की, या यादीतून तुम्हा दोघांची नावे वगळण्यात आली आहेत. असे तुम्ही का करीत आहात ?या ठरावावर बोलत असतांना राजकारण विरहीत चर्चा झाली पाहिजे असे माझेही मत आहे.परंतु मुलभूत प्रश्न असा आहे की शेतक-यांच्या संदर्भात जर खरोखर शासनाला कळवळा असेल तर शेतक-यांच्या बाबतीत कोणीही कोठेही राजकारण आणता कामा नये.शेतकरी जर सुखी झाला तरच आपण सर्वजण सुखी होणार आहोत.आज शेतक-यांची युनियन नाही, त्यांची संघटना नाही. कामगारांच्या युनियनने एक दिवसाचा जरी संप केला तरी सर्व कामगारांचा पगार व बोनस वाढवून दिला जातो.त्यांना इन्क्रीमेन्ट वाढवून दिले जाते.परंतु शेतक-यांची युनियन नाही त्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते .असेच जर चालू राहिले तर शेतकरी संघटीत झाल्या शिवाय राहणार नाही असा मी या निमित्ताने माननीय कृषी मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांना इशारा देऊ इच्छितो.ही परिस्थिती शेतकरी आता जास्त दिवस सहन करु शकणार नाही. एक दिवस असा आला आणि या शेतक-यांनी असे ठरविले की,आपली शेती पिकवावयाची नाही. आपल्या कुटूंबाची गरज भागेल इतकीच शेती पिकवावयाची बाकीची शेती पिकवावाची नाही . अशा प्रकारे जर

शेतक-यांनी असहकाराचे धोरण स्वीकारले तर काय होईल ? याचा विचार शासनाने केला पाहिजे. शेतक-यांनी जर असे असहकाराचे धोरण स्वीकारले तर राज्याची आणि देशाची काय अवस्था होईल ? याचा कोणीही विचार करीत नाही.ज्या संस्था उभ्या राहिलेल्या आहेत त्या शेतक-यांच्या घामावर उभ्या राहिल्या आहेत.साखर कारखाने,सहकारी सूत गिरण्या,तेल बियांवर प्रक्रिया करणारे कारखाने इत्यादी सर्व संस्था शेतक-यांच्या घामावर उभ्या राहिल्या आहेत.या सर्व संस्था जगल्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

पाहिजेत, त्यांना मुक्त हस्ताने शासनाने मदत केली पाहिजे. त्यांना उभे केले पाहिजे आणि त्यांना चालवले पाहिजे.शेतकरी हेच या संस्थांचे मालक आहेत. त्यामुळे या संस्थांना भरीव अर्थसहाय्य दिले पाहिजे. सभापती महोदय, यानंतर मला शेतक-यांच्या कर्जासंबंधी आणि त्यावरील व्याजासंबंधी एक मुद्दा मांडावयाचा आहे.याबाबत बोलत असतांना मला असे सांगावयाचे आहे की,शेतक-यांचे उत्पन्न आणि खर्च याचा मेळ घातला गेला पाहिजे.तसेच शेतक-यांना आपले उत्पन्न काढण्यासाठी जो पैसा लागतो तो कमी व्याज दरात मिळाला पाहिजे. शेतक-यांना कमी व्याज दरात कधी पैसे उपलब्ध होतील.? एका उद्योगपतीला सात ते नऊ टक्क्यापर्यन्त व्याज दराने कर्ज उपलब्ध होत असते. परंतु कष्ट करणा-या शेतक-याला मात्र 16 ते 18 टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध होत असते. एखाद्या वर्षी जर शेतक-यांचे कर्ज थकले तर सरचार्ज , प्रोसेसिंग फी त्याच्याकडून वसूल केली जाते. रिकव्हरी ऑफिसरकडून सर्व दंडात्मक कारवाई केली जाते.त्यामुळे शेतक-यांवरील कर्ज वाढत जाते.राष्ट्रीयकृत बॅन्कांनी वन टाईम सेटलमेन्ट सुरु केलेले आहे. त्याचा थोडा फार रिलीफ शेतक-यांना मिळू शकतो. तेव्हा शेतक-यांसाठीसुध्दा वन टाईम सेटलमेन्टची पध्दत आपण सुरु करणार आहात काय ?सहकारी बॅन्कांकडून शेतक-यांनी जे कर्ज घेतलेले असते त्यावर अव्वाच्या सव्वा व्याज आकारले जाते.एका शेतक-याने 15 हजार रुपये कर्ज काढले होते व आठ वर्षामध्ये 15 हजार रुपयांचे 92 हजार रुपये कर्ज झाले होते.कर्जाची रक्कम वाढल्यामुळे आत्महत्या करण्याशिवाय त्याच्याकडे दुसरा कोणताही पर्याय राहत नाही.व्याजाचा दर आठ टक्यापर्यन्त आलेला आहे असे माननीय सदस्य श्री.गडाख यांनी सांगितलेले आहे. मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या राज्याचे कृषी मंत्री माननीय श्री शरद पवार यांनी केलेले स्टेटमेन्ट माझ्या वाचनात आले होते.या राज्यातील शेतक-यांना 6 टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध झाले पाहिजे अशा प्रकारचे धोरण आम्ही आखणार आहोत.ज्यावेळी अशा प्रकारचे धोरण स्वीकारले जाईल त्यावेळी मी अत्यंत खुल्या मनाने या देशातील कृषी मंत्र्यांचे अभिनंदन करीन. अनेक गोष्टी बोलल्या जातात परंतु प्रत्यक्षात व्याजाचे दर काही कमी केले जात नाही. त्यामुळे जिल्हा बॅन्का आणि सोसायटया डबघाईला आल्या आहेत.या सोसायटया आणि जिल्हा बॅन्का नीट चालत नाहीत.आपल्याकडे कर्जाची थ्री टायर सिस्टीम आहे त्या ऐवजी टू टायर सिस्टीम सुरु करण्यात आली पाहिजे.थ्री टायर सिस्टीममध्ये तीन चार टक्के व्याज दर वाढतो.तेव्हा

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

श्री टायर सिस्टीम बंद करुन टू टायर सिस्टीम सुरु करुन शेतक-यांना डायरेक्ट कर्ज देता येते काय ? याचाही विचार करण्यात आला पाहिजे.शेतक-याला कर्जाच्या अजगरी विळख्यातून आपण बाहेर काढले पाहिजे. शासनाने कितीही घोषणा केल्या आणि कितीही शेतक-यांसाठी प्रोत्साहन देणा-या बाबी ठरविल्या तरी प्रत्यक्षात त्या अंमलात आणल्या नाही तर तो शेतकरी कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडू शकणार नाही.असा माझा दावा आहे. त्यामुळे एका बाजूला शेतक-याचे उत्पन्न आणि खर्च याचा मेळ घातला गेला पाहिजे.दुस-या बाजूला त्या शेतक-याच्या शेत मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी चांगली उभी राहिली पाहिज आणि तिस-या बाजूला त्या शेतक-यांना कमी व्याज दरात कर्ज पुरवठा झाला पाहिजे. या तीनही गोष्टी केल्या पाहिजेत त्याचबरोबर या राज्यातील कृषी संबंधी सर्वंकष धोरण जाहीर करणार आहात काय एवढेच माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात सांगावे एवढी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विलासराव शिंदे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : अध्यक्ष महाराज, शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी ही चर्चा सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी येथे घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्या संबंधात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि श्री.पांडुरंग फुंडकर आणि स्वत: सन्माननीय श्री.गडाख यांनी आपली मते मांडत असताना जे मांडले त्यात सर्वात महत्त्वाचा भाग असा आहे की, शेतकऱ्यांसाठी केंद्रा पासून राज्य सरकारपर्यंत ताबडतोबने काही धोरण आखून, शेतकऱ्यांच्यादृष्टीने धोरणात्मक निर्णय होणार आहे काय ? माझ्या मते त्या दृष्टीनेच आजची ही चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, शेतीवरील खर्च आणि त्यासाठी शेतकऱ्याने घेतलेले कर्ज. हे कर्ज त्याला सहकार खात्याकडून, सहकाराच्या माध्यमातून, सहकारी बँकेमार्फत दिले जाते. आजही राष्ट्रीयीकृत बँका शेतीसाठी कर्ज उपलब्ध करून देतो असे सांगत आहेत. परंतु तरीही जवळ जवळ 91 ते 92 टक्के कर्ज पुरवठा हा सहकारी बँकांच्या माध्यमातूनच शेतकऱ्यांना होत असतो. तेव्हा उत्पादन खर्चाशी निगडित असा एका बाजूला भाग आहे आणि त्या दृष्टीने मार्केटिंग वगैरे ज्या गोष्टी सांगितल्या गेल्या त्यांचा जरूर विचार व्हावा पण मुख्यत्वे करून शेती व्यवसायासाठी कमी व्याजदरामध्ये शेतकऱ्याला कर्ज उपलब्ध झाले पाहिजे. यातील काही गोष्टी धोरणात्मक स्वीकारून शासनाने त्याबाबत राज्य पातळीवर निर्णय घेतला पाहिजे. त्यातीलच काही गोष्टींचा उल्लेख मी आता करणार आहे. अध्यक्ष महाराज, सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे गाव पातळीवरील आमच्या ज्या सेवा सोसायट्या आहेत त्यांच्या मार्फतच आम्ही हे कर्ज वितरित करतो. दुर्दैवाने यातील एक गोष्ट सांगाविशी वाटते की, शासन गाव पातळीवरील कोतवालालासुद्धा शासकीय पगार देते पण या सेवा सोसायट्यांचा जो सेक्रेटरी आहे तो कोणाचा नोकर आहे हे गेल्या 50 वर्षामध्ये शासन ठरवू शकलेले नाही. म्हणजे हे अपत्य कोणाचे आहे हेही महाराष्ट्र सरकार आजवर सांगू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या सोसायट्यांच्या सेक्रेटरीचा पगार हा शेतकऱ्याला दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या व्याजातून दिला जातो हे एक महत्त्वाचे कारण यामध्ये आहे. 2 टक्के किंवा पगाराच्या सव्वापट रक्कम या सोसायट्यांकडून शेतकऱ्याच्या कर्जावरील व्याजातून घेतली जाते. आज शेतकऱ्याला जे कर्ज दिले जाते ते पीक कर्ज तसेच त्यासाठी जी साधने लागतात त्याकरिता जे कर्ज दिले जाते ते सर्व कर्ज हे सेवासोसायट्यांमार्फतच दिले जाते आणि त्यावेळेस साडेतीन ते

.....4जी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिंदे .....

चार टक्के पर्यंत मार्जिन ठेवावे लागते. त्याशिवाय या सोसायट्या चालतच नाहीत ही वस्तुस्थिती आहे. म्हणून माझी सहकार खात्याला पहिली विनंती राहील की, या संपूर्ण सिस्टीममध्ये बदल केला पाहिजे. आज नाबार्डकडून कर्ज मिळत असताना नाबार्डला देखील या गोष्टीचा विचार करावयास लावणे आवश्यक आहे. ....

(यानंतर श्री.जागडे ...4एच 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे....

या बाबत मी एक उदाहरण देणार आहे. नाबार्ड शेतक-यांना विहिरीकरिता 15 टक्के दराने कर्ज पुरवठा करीत असते. 52 हजार रुपयात विहीर होत नसताना नाबार्ड फक्त 52 हजार रुपयाचे कर्ज देत आहे. याचा कोठेतरी विचार करण्याची आवश्यकता आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले आहे की, तीन हजार फुटापर्यन्त जाऊन लिफ्ट इरिगेशन योजना तयार करण्यात आल्या आहेत. मला त्यांना असे सांगावयाचे आहे की, आमच्या भागात 8-8 किलोमिटरच्या लिफ्ट योजना शेतक-यांनी स्वत:च्या पैशातून केलेल्या आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात शेतक-यांनी डोंगरावर पाणी नेले आहे. यासाठी शासनाने त्या शेतक-यांना कोणत्याही प्रकारची मदत केलेली नाही. शासनाने एकही पैसाही त्या भागातील शेतक-यांना दिला नाही. म्हणून शेतक-यांना कमी व्याजाच्या दराने कर्ज कसे उपलब्ध होईल, हे शासनाने पाहिले पाहिजे. कमी व्याजाच्या दराने शेतक-यांना कर्ज उपलब्ध होण्यासाठी सहकार खात्याकडून त्वरीत निर्णय होणे आवश्यक आहे. सहकार खात्याकडून सहकारी बँका, सोसायट्या यांना योग्य ते आदेश दिले पाहिजेत.

सभापती महोदय, माननीय श्री. यशवंतराव गडाख यांनी सांगितल्याप्रमाणे एकरकमी परतफेड योजना लागू करण्यात आली आहे. सभापती महोदय, या बाबत सहकारी बँकांनी जे धोरण स्वीकारले आहे ते वेगळे आहे आणि राष्ट्रीयीकृत बँकानी जे धोरण स्वीकारले आहे ते वेगळे आहे. राष्ट्रीयीकृत बँकांकडून 100 रुपयाचे कर्ज घेतले असेल आणि त्यावर व्याज धरुन जर 200 रुपयांची परतफेड करावयाची असेल तर या बाबत राष्ट्रीयीकृत बँका वाटाघाटी करतात आणि ही रक्कम कमी करतात. शेतक-यांना त्याच्या व्याजात सूट देतात. मुद्दल मात्र 100 रुपये भरावयाला सांगतात. अशा प्रकारची सूट मात्र सहकारी बँकांकडून दिली जात नाही. सहकारी बँका शेतक-यांनी घेतलेल्या कर्जावर व्याज तसेच दंडही आकारतात. 25 टक्के रक्कम प्रथम भरा आणि राहिलेली रक्कम एक वर्षाच्या कालावधीत भरा, असे सहकारी बँका सांगतात. शेतक-यांची आर्थिक स्थिती पाहता एक वर्षाच्या कालावधीत ही रक्कम शेतकरी फेडू शकत नाहीत. त्यामुळे एकरकमी परतफेड योजनेचा शेतक-यांना काहीच फायदा होत नाही. दामदुपटीने शेतक-यांकडून रक्कम वसूल केली जाते. कर्जाची रक्कम दुपटीपेक्षा घ्यावयाची नाही, अशी जरी घोषणा करण्यात आली असली तरी मात्र तसे होत नाही. दामदुपटीने शेतक-यांकडून कर्जाची वसुली होत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे.....

सभापती महोदय, शेतक-यांना पीक कर्ज सोडून इतरही कर्जे घ्यावी लागतात. शेतक-यांना अवजारांसाठी, खतांसाठी तसेच औषधांसाठी कर्ज घ्यावे लागते. म्हणून कर्जाची वसूली दामदुपटीने होणार नाही, अशी घोषणा झाली असली तरी प्रत्यक्षात तसे होत नाही.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलासराव शिंदे...

आज काही ठिकाणी आपल्याला 3 हजाराचे 30 हजार रुपये झाल्याची उदाहरणे पहायला मिळतील. त्यामुळे बँकेला काही करता येत नाही म्हणून बँकेने लिलाव काढला. बँक चालविणारे लोक म्हणतात की आम्ही काही करु शकत नाही, आम्ही बॅकेमध्ये काम करतो. म्हणून माझी पहिली मागणी अशी आहे की, शेतकऱ्याला कमी व्याज दरामध्ये पैसे उपलब्ध होण्यासाठी शासनाने ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. सोसायटीमध्ये त्रिस्तरीय, व्दिस्तरीय की प्रथम स्तरीय सिस्टीम असावी हे आपण बघावे. आणि त्या सिस्टीममधून त्याला सहा ते सात टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध झाले पाहिजे. शेतकऱ्याकडून दुपटीपेक्षा अधिक पैसा घेता कामा नये. आणि दुपटीपेक्षा जास्त असलेले व्याज कमी करण्याची तरतूद बँकेमध्ये झाली पाहिजे. त्यादृष्टीने आपण निर्णय घ्यावा. याबाबत सहकार खात्याने एकत्रित सर्व बाजूंनी विचार करुन निर्णय घ्यावा. मार्केटींगच्या बाबतीत सर्व माननीय सदस्यांनी आपली मते मांडली आहेत. त्या बाबतीत सर्वांचे एकमत आहे. किराणा मालाच्या दुकानातील जिऱ्याचा दर हा दुकानदार ठरवितो. शेतकऱ्याने पिकविलेला गहू कोणत्या भावाने व्यापारी विकतो हे याठिकाणी सांगण्यात आले. त्या सर्वांशी मी सहमत आहे. त्याबाबत शासनाने विचार करुन निर्णय घ्यावा एवढे बोलून मी रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये नियम 97 अन्वये या सदनाचे माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर चर्चा उपस्थित केली आहे. त्यामध्ये माझे मत मांडण्यासाठी मी उभी राहिली आहे. अनेक माननीय सदस्यांच्या मनामध्ये प्रश्न निर्माण झाला असेल की, माझा आणि शेतीचा संबंध काय? मी सुध्दा एका शेतकऱ्याची मुलगी आहे, माझी सातारा जिहयात शेती आहे. त्यामुळे या विषयावर बोलण्याचा मला अधिकार आहे. आपण पाहिले तर जानेवारी व फेब्रुवारी महिन्यामध्ये महाशिवरात्रीच्या दरम्यान अवेळी पाऊस महाराष्ट्रामध्ये पडला. त्या पावसामुळे द्राक्ष, आंबा, गहू, ज्वारी या पिकांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले. पावसाच्या बाबतीत पूर्वापार एक म्हण आहे की,

"पावसाने झोडपले, नवऱ्याने मारले तर तक्रार कुणाकडे करायची"?

परंतु आता लोकांना कायद्याने संरक्षण मिळाले आहे. तरीही शेतकरी मोठया आशेने सरकारकडे पहात असतो. पाऊस हा पिकाच्या वाढीसाठी आवश्यक असला पाहिजे. परंतु अवेळी पाऊस पडून काही उपयोग नाही. कागदोपत्री पुरेसा पाऊस आहे, परंतु प्रत्यक्षात पाहिले तर पिके वाहून जातात, ती पिवळी पडतात, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते याचा कृषी विद्यापीठांनी अभ्यास केला पाहिजे. आपल्याकडे पाणी आहे तर वीज नाही, वीज आहे तर पाणी नाही. आणि दोन्ही आहे तर शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव नाही. सर्वसामान्य शेतकऱ्यांनी कोणते पिक घ्यावे हे त्याला कळते, तो अडाणी नाही. यामध्ये खरीप भागावरील पिक कोणते घ्यावे, डोंगर माथ्यावर कोणते पिक घ्यावे, कोरडवाहू जमिनीमध्ये कोणती शेती करावी हे त्याला समजते. त्या प्रमाणे तो त्या ठिकाणी डाळींब, कापूस, सूर्यफूल इत्यादी पिके घेतो. या बाबत त्या शेतकऱ्याला माहिती सांगण्याची गरज नाही. तसे पाहिलेतर लहान शेतकरी ऊसाचे उत्पादन घेणार नाही आणि मोठा शेतकरी चवळीची भाजी लावणार नाही. तरी सुध्दा शेतकरी आत्महत्या कां करतो? त्यासाठी आपल्याला सुरक्षित योजना करता येणार नाही काय? असा प्रश्न माझ्या मनामध्ये येतो. मुळात पिकांची आणेवारी कोण ठरवितो? शेतकऱ्याचा कायम संपर्क सतत कुणाबरोबर असतो? तलाठी हा सरकारचा प्रतिनिधी असतो, तलाठी आणेवारी ठरवितो. खरे म्हणजे तलाठयाने शेतावर, बांधावर गेले पाहिजे. त्या ठिकाणी जाऊन तो आणेवारी करीत नाही, तो कार्यालयामध्ये बसून आणेवारी करतो.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे पिकाची ज्यापध्दतीने नोंद व्हावयास पाहिजे, तशी ती होत नाही. याकडे देखील लक्ष देण्याची गरज आहे. तालुकावार शेतकरी मंडळे स्थापन होणेही गरजेचे आहे. आता भाऊसाहेब कुलकर्णी यांनी सांगितले की, आता शेतकरी देखील संघटित होणार आहे. अशा वेळी या प्रश्नाच्या संदर्भात गावागावातून शेतकरी मंडळे स्थापन झाली पाहिजेत. जेणेकरुन पीक पध्दती योजनेची माहिती शेतक-यांना देण्यासाठी या मंडळांचा उपयोग होऊ शकेल. कृषी विद्यापीठे आणि कृतीशील शेतकरी यांचा समन्वय सुध्दा साधता आला पाहिजे. खरे म्हणजे आपण कृषी विद्यापीठावर दरवर्षी कोटयावधी रुपये खर्च करतो. पण तेथे होणारे संशोधन शेतक-यांच्या घराच्या उंबरठयापर्यंत किंवा शेतक-यांच्या शेताच्या बांधापर्यंत पोहोचते का ? हे पाहण्याची गरज आहे. तसेच शेतक-यांच्या शेती मालाला मिळणारा भाव हा सुध्दा इतर वस्तूंच्या तुलनेत शेतक-यांना परवडणारा नसतो. शेती चुकीच्या मार्गाने आणि कर्ज घेऊन केल्यामुळे त्याला आपल्या कुटुंबाला देखील नीट सांभाळता येत नाही आणि मग आत्महत्या होतात. त्यामुळे सरकारने शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांना मदत केली पाहिजे. पण प्रत्यक्षात आपण ही स्थिती बिघडण्याच्या दृष्टीने तर जात नाही ना? हे देखील पाहिले पाहिजे. आज शेतीमालाची किंमत सर्वच शेतक-यांना परवडणारी नाही. जी किंमत मिळते, ती फार कमी असते आणि शेतीसाठी लागणारी औषधे, खते यांचे दर मात्र वेगाने वाढत असतात. त्यामुळे शेतीतून मिळणारे उत्पन्न आणि त्यासाठी येणारा खर्च यामध्ये जी मोठी तफावत निर्माण होते, त्यामध्ये शेतकरी भरडला जात आहे. ज्यावर्षी शेती माल भरपूर प्रमाणात उत्पादित होतो, तेव्हा भाव भरमसाठ खाली येतात. मी सातारा येथील उदाहरण देईन. त्याठिकाणी एका वर्षी टामॅटोला भरपूर भाव आला. त्यामुळे शेतक-यांना वाटले की, आपण जर टोमॅटोचे उत्पादन घेतले तर आपल्याला भाव चांगला मिळेल आणि भरपूर पैसे मिळतील. म्हणून त्याने पुढच्या वर्षी टामॅटोचे पीक घेतले. सभापती महोदय, टोमॅटोचे पीक घेणे सोपे नाही, त्यासाठी खूप कष्ट करावे लागतात. त्यानुसार तेथील शेतक-यांनी पुढील वर्षी टामॅटोचे पीक घेतले, पण त्यावर्षी भाव खाली आले. त्यावेळेला टोमॅटोचे पीक मोठया प्रमाणात आले आणि त्याला योग्य भाव न मिळाल्याने मग ते जनावरांना घालावे लागते अशी स्थिती निर्माण होते. आज काही सहकारी बँका चांगले काम करीत आहेत.पण काही बँकांच्या ठिकाणी दलाल असतात. मला क-हाड तालुक्यातील काही शेतकरी भेटले. त्यांनी मला सांगितले की, हे दलाल शेतक-यांना दहा हजार रुपयांचे कर्ज

. . . .4 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे . . . .

मिळवून देतात. पण शेतक-यांची 20-25 टक्के रक्कम कर्ज मिळविण्यासाठी खिरापत वाटण्यात खर्च होते. परतफेड करीत असताना 15 टक्के व्याजाने म्हणजे 11,500 रुपये घेऊन, शेवटी शेतक-यांच्या हातात आठ हजार मिळतात. यामध्ये जवळजवळ 3500 रुपये शेतक-यांना व्याज द्यावे लागते. जे शेतकरी हे व्याज देऊ शकत नाहीत, ते सांगतात की, पुढच्या वर्षी व्याज देऊ आणि पुढच्या वर्षीही तो व्याज देऊ शकत नाही आणि अशा प्रकारे तो एका दुष्टचक्रामध्ये अडकत जातो. अशा परिस्थितीत त्याच्या घरामध्ये काही घरगुती कार्यक्रम असतात. मग त्यासाठी पुन्हा त्याला कर्ज घ्यावे लागते. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाखसाहेब, आता सदनात उपस्थित नाहीत. पण ते सामूहिक विवाह घडवून आणतात. अशा प्रकारे ग्रामीण भागात सामूहिक विवाह घडवून आणले पाहिजेत. युती शासनाने शेतक-यांसाठी "एक खिडकी" योजना आणली होती. त्यावेळी त्या योजनेचे खरे म्हणजे सर्वत्र स्वागत झाले होते. मला असे वाटते की, ही योजना पुन्हा सुरु करण्यास हरकत नाही. मध्यंतरी मी एक लेख वाचला होता. माननीय श्री.मोहन धारिया स्वत: एक कृषी विषयक धोरण घेऊन आपल्याकडे आले होते. ते धोरण येथे राबविले पाहिजे, पण त्याला हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही. केंद्र शासनाकडून पाणलोट क्षेत्र विकासासाठी अनुदान मिळते. हा कार्यक्रम पूर्ण देशभर चांगल्या प्रकारे सुरु आहे. मग महाराष्ट्र राज्य याबाबतीत उदासीन का आहे? यामध्ये केंद्र शासन 75 टक्के अनुदान देते आणि राज्य शासनाला 25 टक्के खर्च करावे लागतात. याकडेही लक्ष देणे गरजेचे आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्रीमती कांता नलावडे (पुढे चालू...

मुरबाड जमीन, माळरान जमीन आहे, त्या ठिकाणी अखाद्य तेलबियांची लागवड झाली पाहिजे. महाराष्ट्रात माळरान, मुरबाड जमीन पडून आहे, त्या ठिकाणी फक्त काटेरी झाडे आहेत. त्या ठिकाणी जर अखाद्य तेलबियांची लागवड केली तर त्यापासून आपण बायो डिझेल उत्पादन करू शकतो.. अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडलेले आहेत, तेच ते पुन्हा मुद्दे मी मांडत नाही. शेतकऱ्यांना 8 टक्के व्याजाने कर्ज मिळावे, मुळामध्ये शेतकऱ्यांचे संरक्षण केले पाहिजे. ही भावना परदेशामध्ये आहे, परंतु ती आपल्याकडे भावना नाही. आपण शेतकऱ्यांचे संरक्षण केले पाहिजे. जोपर्यन्त त्यांचे उत्तरदायित्व स्वीकारत नाही, तो पर्यन्त शेतकऱ्याची परिस्थिती सुधारेल असे वाटत नाही. अनेक मुद्दे येऊन गेल्यामुळे पुन्हा ते मला मांडावेसे वाटत नाहीत. या सगळया गोष्टींचा गांभीर्याने विचार कराल अशी अपेक्षा बाळगून, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल सभापती महोदय आपणास धन्यवाद देते आणि माझे दोन शब्द संपविते.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री,यशवंतराव गडाख यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नावर चर्चा उपस्थित करुन एका महत्वाच्या प्रश्नाला तोंड फोडले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात सांगितले. मला वाटते, या विधिमंडळाच्या कारकिर्दीमध्ये कदाचित इतरही सन्माननीय सदस्यांच्या कारकिर्दीमध्ये शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अशी चर्चा घडवून आणण्याची ही पहिलीच वेळ असावी. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांची शेती असावी, ती नसेल तर त्यांच्या वडिलोपार्जित शेती आहे. परंतु आमची एक इंचभरही शेती नाही, आम्ही कामगारांची मुले आहोत. परंतु चळवळीच्या निमित्ताने, कार्यकर्ते म्हणून राज्याच्या ग्रामीण भागामध्ये, देशाच्या ग्रामीण भागामध्ये जेव्हा फिरतो त्यावेळेस शेतकरी, शेतमजूरांच्या सोबत बसतो, त्यांच्याही झोपड्यांमध्ये, त्यांच्या शेतीवरील खोपडीमध्ये जाऊन त्यांच्या गोधडीवर जेव्हा बसतो, त्यांच्या मोडक्या-तोडक्या खाटेवर जेव्हा बसतो आणि सहन करीत असलेल्या दु:खाची चर्चा आमच्या कानावर पडते, तेव्हा असे वाटते की, आपल्या देशातील शेतकरी खरोखरच दुर्दैवी आहेत.. आमच्या धोरणाच्या अर्थव्यवस्थेचा पाया शेती आणि शेतकरी आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नामध्ये 60 ते 70 टक्के वाटा शेती आणि शेतकऱ्यांचा आहे. असे असतांना आमचा शेतकरी उपेक्षित असावा, आमच्या शेतकऱ्यांचे शोषण व्हावे, आमच्या शेतकऱ्यांची दैन्यावस्था व्हावी, आमच्या शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागावी, यापेक्षा दुर्दैवाची गोष्ट दुसरी कोणती असेल असे वाटत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळ किंवा स्वातंत्र्यानंतरचा काळ असो, शेतकऱ्यांच्या समस्या या बऱ्याच आहेत, हजाराच्यावर शेतीच्या समस्या आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संबंधातील विषय कॉलेजमध्ये शिकवत असताना शेतकऱ्यांच्या अनेक समस्यांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत होतो. दिवसेंदिवस आमच्या शेतीची एकंदरीत ढासळत जाणारी अवस्था, आर्थिकदृष्ट्या कमकुवत जाणारा आमचा शेतकरी, शेतकऱ्यांच्या भल्यासाठी अनेक संस्था आहेत. आमच्या राज्याचा कृषी मूल्य आयोग आहे.....

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

कृषी अनुसंधान संस्था असतील, कृषी विद्यापीठे असतील, कृषी महाविद्यालये असतील, कृषी शाळा असतील त्या सर्व दृष्टीकोनातून आमचा शेतकरी सक्षम झाला पाहिजे, सबळ झाला पाहिजे, यंत्रज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन या सर्व क्षेत्रामध्ये तो सामर्थ्यवान बनला पाहिजे ही दृष्टी आमच्या शेतकऱ्यांमध्ये येणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या कुटुंब व्यवस्थेचे, आपल्या समाज व्यवस्थेचे आमच्या शेतीवर कसे परिणाम होतात हे आपल्याला माहीत आहे. जाती व्यवस्थेचे कसे परिणाम होतात, समाज व्यवस्थेचे कसे परिणाम होतात, कुटुंब व्यवस्थेचे कसे परिणाम होतात आणि उपलब्ध असलेल्या कायद्यामुळे देखील आमच्या शेतीवर कसा विपरित परिणाम होतो याचे एक उदाहरण द्यावयाचे झाले तर आमच्या शेतीचे झालेले सबडिव्हीजन्स आणि फ्रॅग्मेंटेशनच्या बाबतीत देता येईल. शेतीचे विभाजन आणि अपखंड म्हणजे एका परिवारामध्ये जर दहा एकर शेती असेल, 20 एकर शेती असेल आणि एक तुकडा या बाजूला असेल, दुसरा तुकडा 10 फूट अंतरावर असेल आणि जर चार भाऊ असतील तर चारही भावांना प्रत्येक तुकडयामध्ये हिस्सा पाहिजे असतो. दहा एकरांमध्ये एका तुकडयामध्ये चार भावांचा हिस्सा, दुसऱ्या तुकडयामध्ये चार भावाचा हिस्सा हे जे फ्रॅग्मेंटेशन आहे अशा अनेक प्रकारच्या समस्या शेतीशी निगडित आहेत. असे जरी असले तरी आमचे शेतकरी हे निसर्गावर अवलंबून आहेत. या ठिकाणी शेती आणि शेतकऱ्यांबद्दल ज्या भावना सर्व सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या आहेत त्या सर्वांशी मी सहमत आहे. माननीय श्री. बाळासाहेब थोरात हे कृषी मंत्री आहेत. त्यांच्यासारखा प्रामाणिक माणूस कृषी मंत्री म्हणून लाभला. आपल्या सर्वांच्या भावना लक्षात घेता राज्यतील शेती आणि शेतकऱ्यांची अवस्था, त्यांची विपन्नावस्था, त्यांची दैनावस्था लक्षात घेता येणाऱ्या भविष्य काळामध्ये, भूतकाळात ज्या चुका झाल्या, जे आपण करु शकलो नाही, शेतकऱ्यांना त्यांच्या पायावर उभे करु शकलो नाही, त्यांना सन्मान देऊ शकलो नाही परंतु श्री. बाळासाहेब थोरात यांच्यासारखे संवेदनशील कृषी मंत्री लाभले आहेत, एक सज्जन माणूस, संत प्रवृत्तीचा माणूस लाभला आहे त्यांच्या माध्यमातून भविष्य काळामध्ये आमच्या शेतकऱ्यांचे भविष्य उज्ज्वल व्हावे अशी अपेक्षा आम्ही व्यक्त केली तर वावगे होणार नाही. शेतकरी अस्मानी आणि सुलतानी अशा दोन प्रकारच्या अडचणींमध्ये सापडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गडाख साहेबांनी साखर कारखान्यांच्या बाबतीत सांगितले. सरकार साखर कारखान्यांना, ऊस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ...

पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करते त्याबद्दल आम्हाला असूया वाटत नाही. त्याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. परंतु ऊस उत्पादक शेतकरी, ऊसावर प्रक्रिया करुन साखर उत्पादन करणारे कारखाने आणि साखर कारखान्यांमध्ये जे बायप्रॉडक्ट तयार होतात मग त्यामध्ये अल्कोहोल तयार होत असेल, असे उद्योग जेव्हा संकटात सापडतात तेव्हा सरकार त्यांना सर्व प्रकारची मदत करते. हे पाहून आनंद वाटतो, अभिमान वाटतो. आमचा हा साखर उद्योग, आमचा ऊस पिकविणारा शेतकरी जेव्हा संकटामध्ये सापडतो तेव्हा आमचे सरकार, मग या राज्याचे सरकार असेल किंवा दिल्लीचे सरकार असेल, त्यांच्या मदतीसाठी धावून जाते आणि ते उद्योग सक्षमपणे कसे टिकतील असा प्रयत्न करते, त्याचा मला आनंद वाटतो. आम्हाला त्याबाबत असुया वाटत नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

परंतु ज्यावेळी कापूस संकटामध्ये असतो गोंदिया, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, हा भाग ज्याला आपण धानाचा कटोरा म्हणतो तेव्हा तेथे कोणी धाऊन जात नाही वाईट त्याचे वाटते.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, साखर कारखाने असे कोठेही उच्चारलेले नाही. मी महाराष्ट्रातील, देशातील शेतकरी हा केंद्रबिंदू घेऊन भाषण केलेले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील देश शेतक-यांना कशी मदत करतात आणि आपला देश मदत करीत नाही हे मी सांगितले आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपण बोलताना असे वक्तव्य केले, परंतु त्याबाबत हरकत नाही. ऊस पिकविणा-या शेतक-याकडे गुन्हेगारांच्या दृष्टीकोनातून पाहिले जाते असे आपले वक्तव्य होते. त्याची मी नोंद घेतलेली आहे. प्रादेशिक वादाचा मुद्दा वेगळा आहे, विदर्भाचे राज्य मिळवावयाचे तेव्हा मिळवू तो नंतरचा भाग आहे. परंतु राज्यातील शेतक-यांसंबंधी बोलतो तेव्हा कोणत्याही प्रकारचा भेदभाव होता कामा नये. मग विदर्भातील शेतकरी असेल, पश्चिम महाराष्ट्रातील असेल, खानदेशातील असेल, कोकणातील शेतकरी असेल, आमच्या मराठवाडयातील शेतकरी असेल जेव्हा जेव्हा तो संकटामध्ये सापडतो तेव्हा राज्य सरकार आणि केंद्र सरकार त्यांच्या मदतीला धाऊन गेले आहे, त्याच्यासाठी धावले आणि यांच्यासाठी झोपले असे होता कामा नये. हा शेतकरी अस्मानी सुलतानी अशा कात्रीमध्ये सापडला आहे. आपल्या भारताची शेती ही पावसाच्या तालावर, निसर्गाच्या लहरीवर नाचते असे म्हटले जाते. ही अवस्था जर बदलावयाची असेल तर वॉटर मॅनेजमेंट, इरिगेशन मॅनेजमेंटसंबंधी शासनाने गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. सध्या आपल्याच पानावर लोणी ओढण्याचा हा प्रकार होत आहे. औद्योगिक विकास समतोल तर नाहीच, शेतीच्या विकासाचा समतोल साधला जाणार नाही तर मग कृषी व उद्योग ही विकासाची दोन चाके आहेत ती सारख्याच गतीने चालली नाहीत तर राज्याचा आणि देशाचा समतोल विकास होणार कसा ? विकासाचा गाडा पुढे जाणार कसा ? स्वातंत्र्यानंतर नियोजनाचे युग आले, नियोजन पध्दती आपण स्वीकारली. या नियोजनाच्या युगामध्ये मघाशी मा.सदस्य श्री.भाऊसाहेब फुंडकर म्हणाले त्याप्रमाणे देशाची पहिली पंचवार्षिक योजना ही

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

कृषीप्रधान होती. एक जमाना असा होता की, आपल्या देशात अन्नधान्याची टंचाई होती, ती दूर करण्यासाठी आपल्याला विदेशाकडे हात पसरावे लागत होते, या गोष्टीचा सभागृहात वारंवार उल्लेख झाला आहे. परंतु आपल्या देशात अधिक उत्पादन देणारे बियाणे वापरल्यामुळे एक हरित क्रांती निर्माण झाली. तिच्या माध्यमातून देशातील अन्नधान्याचे उत्पादन वाढले. आपला देश अन्नधान्याच्याबाबत स्वयंपूर्ण झाला. एवढेच नव्हे तर आपण आपले अन्नधान्य परदेशी पाठवू शकलो.

नंतर श्री.शिराम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे पुढे सुरु...)

एवढी क्रांती कृषी क्षेत्रामध्ये घडून आली. हरित क्रांतीचा जमाना हा शेतक-यांचा मोठा वैभवाचा जमाना होता. ते वैभव पुन्हा लाभावे या पवित्र हेतूने मा.सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी याठिकाणी चर्चा उपस्थित केलेली आहे. मी जास्त काही बोलणार नाही. परंतु आमच्या शेतक-यांच्या परिस्थितीचा, त्यांच्या दैन्यावस्थेचा मी थोडक्यात आढावा घेतो. या सदनामध्ये पाश्चिमात्य शेतक-यांबद्दल बरीच माहिती दिली गेली. पाश्चिमात्य देशात आणि आपल्या देशामध्ये शेतमालाचे भाव कसे कसे आहेत याचीही आकडेवारी याठिकाणी देण्यात आली. अमेरिका, इंग्लंड या देशामध्ये किती शेतकरी आहेत ? अमेरिकेत 15 टक्के शेतकरी आहेत आणि इंग्लंडमध्ये 7 टक्के शेतकरी आहेत. इंग्लंड मधला 7 टक्के शेतकरी संपूर्ण इंग्लंडची गरज भागवतो. अमेरिकेतील 15 टक्के शेतकरी हा अमेरिकेचीच नाही तर संपूर्ण जगाची गरज भागवितो. तेथील संपूर्ण शेतीचे यांत्रिकीकरण झालेले आहे. पाश्चिमात्य देशात अत्यंत आधुनिक प्रकारची शेतीची यंत्रे, तंत्रज्ञान, रासायनिक खते बी-बियाणे वापरली जातात. म्हणून त्यांचे दर जास्त आहेत. आमच्या देशामध्ये देखील हरित क्रांती झाली. आमचा देश हा केवळ अन्नधान्यामध्येच संपन्न झाला पाहिजे असे नाही तर आमच्या देशातील शेतकरी देखील संपन्न झाला पाहिजे हा हेतू आहे. परंतु हळूहळू परिस्थिती बदलत गेली. मा.सदस्य श्री. फुंडकर म्हणाले ते बरोबर आहे. शेतकरी हा आपला अन्नदाता आहे. कापूस पिकविणारा शेतकरी देशातील सर्व लोकांच्या अंगावर कपडा घालता, त्यांची इज्जत झाकतो. पण त्याची स्वत:ची इज्जत झाकण्यासाठी त्याला वीतभर कपडा देखील मिळत नाही. जो शेतकरी आपल्या शेतात सोन्याची कणसे पिकवितो आणि सा-या देशातील जनतेच्या पोटाला भाकरी देतो त्या आमच्या शेतक-यावर उपाशी राहाण्याची पाळी येते, त्याला आत्महत्या करावी लागते या पेक्षा दुसरे दुर्दैव कोणते असू शकेल ? हा शेतकरी काय मागतो ? तर हा शेतकरी कामाचे दाम मागतो. तो आमदाराची, खासदाराची किंवा मंत्र्याची खुर्ची मागत नाही तर कामाचे दाम मागतो. हे कामाचे दाम मागत असताना त्याच्या पदरात पोलिसांच्या लाठ्या किंवा गोळ्या पडतात आणि त्याला जेलयात्रा किंवा स्मशानयात्रा भोगावी लागते. हे आमच्या देशाचे दुर्दैव आहे. मा.सदस्य श्री. गडाख साहेबांनी अतिशय महत्वपूर्ण चर्चा याठिकाणी उपस्थित केली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. शेती आणि शेतकरी यावर आमच्या देशाची अर्थव्यवस्था आणि लोकशाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे पुढे सुरु...)

तरलेली आहे. अण्णाभाऊ साठे असे म्हणाले होते की, हे जग शेषाच्या फण्यावर तरलेले नाही तर ते या जगातील कष्टकरी शेतकरी आणि गरीब कष्टकरी जनता यांच्या हातावर तरलेले आहे. ज्या शेतक-यांच्या तळहातावर या देशाची कृषी अर्थव्यवस्था उभी आहे ते हात जर कमजोर झाले तर आमच्या देशाच्या अर्थव्यवस्थेचे काय होईल याची चिंता आम्हाला सारखी सतावत राहते. जेथे सत्ताधा-यांचे हितसंबंध गुंतलेले असतात त्याच ठिकाणी ते लक्ष देतात आणि त्यांचाच विकास होतो. ज्या भागाशी त्यांचे हितसंबंध असतात त्याच भागाचा विकास होतो. मग ते सत्ताधारी इकडचे असोत किंवा तिकडचे असोत. ते फक्त आपापल्या विभागाचा विकास करतात. आता व्यवस्थाच तशी आहे त्याला आपण काय करणार ? ही व्यवस्था आपल्याला बदलावी लागणार आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

एखाद्या गृहस्थाने तुमच्या खूर्चीला हात हावला तर तुम्ही तिला हात लावू देणार नाही. प्रस्थापित मंडळी व्यवस्थेला धरुन ठेवणारी आहेत. ती व्यवस्था जीवंत रहावे असे वाटते. तुम्ही सत्तेला हात लावला, खूर्चीला हात लावला तर तुम्ही काही म्हणणार नाही. कदाचित मी जो शब्द वापरणार आहे तो पार्लमेंटरी होईल की नाही याची मला शंका आहे. एखाद्याच्या परिवारातील महिलेच्या साडीला हात लावला तरी ते चवताळणार नाही. पण यांच्या व्यवस्थेला हात लावला तर ही मंडळी चवताळून उठतात. आमचा शेतकरी हा या व्यवस्थेचा बळी आहे. सन्माननीय सदस्य श्री. गडाख साहेब आपण सांगितले की, काही मुठभर लोक शेतक-यांच्या कुशीतून जन्माला येऊन त्यांना सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा प्रापत होते. त्यात मग कवाडे असतील, पवार असतील, चव्हाण असतील, देशमुख असतील, रावतेजी असतील, पाटील असतील, यांना सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. शेतक-यांच्या कुशीतून ग्रामीण भागातील मंडळी जन्माला आलेली आहेत त्यांना सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा झाली. पण शेतक-याच्या नशिबी आलेले दारिद्रय आम्ही दूर करु शकलो नाही यापेक्षा दुसरी दु:खाची गोष्ट कोणती असेल. सभापती महोदय, राज्यातील शेतक-यांचा अत्यंत जाणीवपूर्वक, योजनाबध्द रितीने, अत्यंत कणखरपणे, त्यांच्या समस्या सोडवून त्यांना एक कृत्रिम जीवन कसे प्राप्त होईल, यादृष्टीकोनातून प्रत्यन करणे आवश्यक आहे. या ठिकाणी आर्थिक सहाय्याबद्दल बोलण्यात आले. या ठिकाणी सिंचनाबद्दल बोलण्यात आले, शेतक-यांच्या रक्षणासाठी, त्यांचे होत असलेले शोषण थांबविण्यासाठी त्यांना उचित अशा प्रकारचे भाव मिळावे यासाठी सरकारने अनेक कायदे केले. सन्माननीय सदस्य श्री. फुंडकर साहेब आपण मघाशी सांगितले की, या केंद्र सरकारने कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायदा केला. कृषी उत्पन्न बाजार समितीबद्दल अनेक सदस्य बोलले त्यामुळे मी त्यासंबंधी रिपीटेशन करीत नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्या हया शेतक-यांना मदत करण्याऐवजी दलालांचे अड्डे बनलेले आहेत. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. विलासराव शिंदे यांनी देखील मघाशी भाष्य केलेले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतक-यांचे शोषण होत आहे ते थांबविण्यापेक्षा शेतक-यांचे शोषण करणारी नवीन यंत्रणा शासनाने निर्माण केलेली आहे. हा एक मोठा संशोधनाचा विषय आहे. आपल्या राज्यात कृषी विद्यापीठ आहेत. परभणीला कृषी विद्यापीठ आहे ते आम्ही संघर्षाने मिळविलेले आहे. आम्हाला हे विद्यापीठ सहज मिळालेले नाही. त्याच प्रमाणे अकोला येथील पंजाबराव कृषी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेद्र कवाडे...

विद्यापीठासाठी आम्हाला लाठया खाव्या लागल्या. सन्माननीय सदस्य फुंडकर साहेब प्रा. जोगेंद्र कवाडे यासाठी जेलमध्ये जाऊन आले. या संघर्षात आपणही होतात. मोठया प्रमाणात संघर्ष केल्यानंतर अकोला येथील पंजाबराव कृषी विद्यापीठ आम्हाला मिळालेले आहे. राहुरीचे कृषी विद्यापीठ आहे. कोकणात कृषी विद्यापीठ आहे. या कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन करण्यात येते. त्यांच्या संशोधनाचा काहीही फायदा शेतक-यांना मिळत नाही. एच.एम.टी. या जातीचा तांदळाचे नाव आपण ऐकले असेल. हा तांदुळ अतिशय चांगला आहे. या तांदळाचा तुमच्या कृषी विद्यापीठाने शोध लावलेला नाही. कृषी विद्यापीठांनी नवीन नवीन कोणती बीयाणे शोधून काढली याची मला माहिती नाही. परंतु चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही तालुक्यातील नांदेड येथील लहानशा गावातील श्री. खोब्रागडे नावाचा एका बौध्द शेतक-याने या नवीन धानाच्या जातीचा शोध लावला. त्यावेळी एच.एम.टी. घडयाळ फार प्रसिध्द होते. म्हणून त्याने त्या तांदळास एच.एम.टी. नाव देऊन टाकले. हा नवीन तांदूळ त्याने आपल्या शेतात उगवला. त्यांनी तो थोडा थोडा जमा केला. तो पुन्हा तो तांदूळ पेरत गेला. तो तेव्हापासून वाढत गेला. आता सगळीकडे हा तांदूळ वाढत आहे...

यानंतर श्री. कानडे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्रकवाडे..

खोब्रागडे नावाच्या बौध्द शेतक-याने एचएमटी नावाची तांदळाची जात शोधून काढली. परंतु अकोला येथील कृषी विद्यापीठाने त्याला उघडे पाडले. जी जात बरोबर नाही असे सांगितले. आपल्या देशाचे महामहीम राष्ट्रपतींनी राष्ट्रपती भवनात त्याचा सन्मान केला. शेतकरी जेव्हा आर्थिकदृष्टया अडचणीत असतो तेव्हा कर्ज घेतो. नैसर्गिक आपत्ती येते. पीकपाणी येत नाही. ओला दुष्काळ पडतो तर कधी सुका दुष्काळ पडतो. उसावर लोकरी मावा येतो. संत्र्यावर,कापसावर रोग पडतात, धानावर तुडतुडी नावाचा रोग पडतो. पीक येत नाही. शेतक-याचे मशागतीसाठी केलेला सर्व खर्च वाया जातो. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये माल नेण्यासाठी केलेला खर्च वाया जातो. एखाद्या कारखान्यामध्ये उत्पादन केले जाते कच्चा माल पोहोचेपर्यंत सर्व खर्च त्या किंमतीमध्ये धरला जाणे आवश्यक आहे याचा शासनाने विचार करावा. शेतकरी आज सर्वात जास्त परेशान आणि त्रस्त आहे तो त्याच्या आर्थिक अडचणीमुळे आहे. बँकांकडून शेतकरी कर्ज घेतात. शेतीसाठी अवजारे आणतात,ट्रॅक्टर आणतात,शेतकरी विहिर खोदतो त्यावर पंप बसवितो. बियाणे पेरतो. बियाण्यांचा प्रश्न मघाशी याठिकाणी मांडण्यात आला. बियाणे टाकतो पण ते उगवतच नाही. कारण नकली बियाणे शेतक-यांना विकले जाते. यामध्ये शेतक-याचे नुकसान होते. शेतक-याची फसवणूक होते. नकली बियाणे विकणा-यांवर कठोर कारवाई करण्याची तरतूद कायद्यामध्ये करावी अशी मी यानिमित्ताने शासनाला विनंती करतो. सभापती महोदय, आमचा शेतकरी खर्च भागविण्यासाठी बँकेतून कर्ज घेतो. परंतु अस्मानी आणि सुलतानी संकट आल्यावर दिलेल्या मुदतीमध्ये हा शेतकरी कर्ज फेडू शकत नाही. यासंदर्भात यापूर्वी मा.सदस्यांनी उदाहरणे सुध्दा दिलेली आहेत. मी सुध्दा यासंदर्भात एक उदाहरण सांगतो. अनेक लोक मला मराठवाडयाचे सुपुत्र समजतात. मी मराठवाडयाचा भूमिपुत्र नसतो तरी सुपुत्र निश्चितच आहे. शेतक-याला आत्महत्या करण्यास कसे प्रवृत्त केले जाते याचे हे एक जिवंत उदाहरण आहे. नांदेड जिल्हयामध्ये शनिगाव आहे. तेथील एका शेतक-याने ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी 90 हजार रुपयांचे कर्ज घेतले. 10 वर्षे सतत नापिकी आल्यामुळे तो हे कर्ज फेडू शकला नाही. 10 वर्षामध्ये 90 हजार कर्जाचे व्याजासहित 17 लाख रुपये झाले. त्यापैकी कसेबसे या शेतक-याने बँकेकडे 2 लाख रुपये जमा केले. बँकेचे समाधान इ ाले नाही.

यानंतर श्री. गायकवाड ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ....

अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना मदत करण्या ऐवजी त्या शेतक-यांची संपूर्ण जमीन व घर ग्रामीण बॅन्केने लिलावात काढले होते.त्या गावातील व्यापारी लोकांनी, पैसेवाल्या लोकांनी रिंग करुन सहा लाख रुपयास त्याची संपूर्ण शेत जमीन आणि घर विकत घेतले होते. अशा वेळी शेतकरी तरी काय करील.? आजपर्यन्त एकूण 556 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत.कर्जबाजारी झालेला शेतकरी यापेक्षा दुसरे काय करणार ? आमच्या देशातील मूठभर 50 औद्योगिक घराण्यांनी 50 हजार कोटी रुपये बुडवले असून या देशातील सरकार आणि पोलीस त्यांचा बाल सुध्दा बाका करु शकले नाहीत.या औद्योगिक घरांण्यापैकी एकाच्याही घरावर जप्ती आणली नाही.त्याची कार जप्त केली नाही किंवा त्याचा कारखाना जप्त केला नाही. परंतु

शेतक-यांच्या शेतीवर आणि घरावर मात्र जप्ती आणली जाते व त्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जाते. या देशातील 50 लोकांनी मोठया प्रमाणावर कर्ज बुडवले होते. त्याचबरोबर हर्षद मेहता सारख्या लोकांनी 50 हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला होता व त्या पैशाचा अपहार केला होता.त्या संदर्भात चोकशी करण्यास रिझर्व्ह बॅन्क ऑफ इंडियाला सांगण्यात यावे असे मला सांगावयाचे आहे.या देशातील पुंजीपती,भांडवलदार,कारखानदार लोकांनी 50 हजार कोटी रुपयांचा अपहार केला आहे व सरकारचे पैसे बुडवले आहेत. त्याबद्दल रिझर्व्ह बॅन्क ऑफ इंडियाने आकडेवारी प्रसिध्द करावी अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे.देशाच्या तिजोरीतील 50 हजार कोटी रुपये बुडवले जातात आणि नैसर्गिक आपत्तीमुळे जेव्हा हे शेतकरी कर्ज परत करु शकत नाही तेव्हा सरकार सुध्दा हे कर्ज माफ करीत नाही , त्यावरील व्याज माफ करीत नाही , व्याजाचा दर कमी करीत नाही,कर्जाच्या परतफेडीची मुदत वाढवून देत नाही.अशा परिस्थितीमध्ये त्या शेतक-याला आपल्या मुलीचे वा मुलाचे लग्न करता येत नाही. घरावर जप्ती येणार आणि आपली बेइज्जती होणार म्हणून तो शेतकरी नाईलाजास्तव आत्महत्या करीत असतो.या

शेतक-याला वाचविण्यासाठी राज्य सरकार वा केन्द्र सरकार काहीही प्रयत्न करीत नाही.या अल्पकालीन चर्चेत भाग घेत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत त्यामुळे मी त्याचा पुनर्रच्चार करणार नाही.सभापती महोदय, मला शेवटी एक मुद्दा मांडावयाचा आहे की ,आपल्या देशात क्रॉप प्लॅनिगची सिस्टीम आणली पाहिजे.प्रत्येक पिकांचे नियोजन करण्यात आले पाहिजे. त्याचबरोबर देशातील अन्नधान्याची गरज किती आहे तसेच परदेशात

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेन्द्र कवाडे ....

आपण अन्नधान्याची निर्यात शकतो काय या दृष्टीने जर अन्नधान्याचे नियोजन आपण करु शकलो तर बरे होईल.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कलेक्टीव्ह फार्मिग व को-ऑपरेटिव्ह फार्मिग करण्यात यावे अशा प्रकारची एक सूचना केली होती.अशा प्रकारे जर करता आले तर आपल्या देशातील शेतक-यांना अनेक संकटापासून आपल्याला वाचवता येईल.तेव्हा या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करावा अशी माझी त्यांना विनंती आहे. या कल्पनेचा कसा प्रचार करता येईल ,कसा प्रसार करता येईल या दृष्टीने विचार करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे. कौटूंबिक परिस्थितीमुळे शेत जमिनीचे सब डिव्हीजन आणि फ्रेगमेन्टेशन झाले आहे तेव्हा त्याचे कन्सॉलिडेशन कसे करता येईल या दृष्टीने प्रयत्न व्हावयास पाहिजे. आज शेत जमिनीचे छोटे छोटे तुकडे झालेले आहेत हे तुकडे इतके लहान आहेत की, त्या तुकडयांमध्ये नांगरसुध्दा वळवता येत नाही.शेतक-यांच्या प्रश्नावर मला पुष्कळ बोलावयाचे होते. कृषी अर्थ शास्त्राचा प्राध्यापक म्हणून ब-याच गोष्टीचा मला उल्लेख करावयाचा होता परंतु वेळेच्या अभावी मी तो उल्लेख करु शकत नाही.या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या भावनांशी मी सहमत आहे. शेतक-यांची ही अवस्था बदलली पाहिजे, त्यांना आधार दिला गेला पाहिजे. आपण निराधार आहोत असे शेतक-यांना वाटता कामा नये.यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत. आत्महत्या केल्यानंतर त्या शेतक-यांच्या वारसदारांना एक लाख रुपयांची मदत करणे हे काही चांगल्या सरकारचे आणि चांगल्या माणुसकीचे लक्षण नाही.माझ्या सारखा एखादा कार्यकर्ता असा प्रश्न विचारील की एखादा शेतकरी ..

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.कवाडे ....

मेल्यानंतर एक लाख रुपये मदत देता तर मग एखादा मंत्री मरत असेल तर त्याला 10 लाख रुपये आपण देणार काय ? तसे असेल तर कोणी मंत्री मरावयास तयार आहे का ? आमचे मित्र श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, अनेक मंत्री विदेशामध्ये जातात आणि मग आमचा शेतीचा माल विदेशामध्ये केव्हा जाणार आहे ? निर्यात केव्हा आणि कशी वाढणार याचाही विचार करणे आवश्यक आहे. तेव्हा ज्या काही समस्यांच्या काळोखाच्या अंधारात चाचपडणारा आमच्या शेतकऱ्यांना उजेडाचे जीवन, प्रकाशाचे जीवन लाभो अशी अपेक्षा मी या प्रसंगी व्यक्त करतो. अन्यथा असे म्हणावे लागेल की, पहाट झाली म्हणता पण उजेड कोठे आहे ? दिवस उगवला म्हणता पण सूर्य कोठे आहे ? आणि मग प्राध्यापक कवाडे म्हणतो आहे की, स्वातंत्र्य मिळाले म्हणता, गुलामगिरी संपली म्हणता तर स्वातंत्र्य कोठे आहे ? आमच्या शेतकऱ्यांना या स्वतंत्र भारतामध्ये सन्मानाने, प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार प्राप्त व्हावा यासाठी वाटेल ते करून... ज्यांच्यामुळे देश उभा आहे, ज्यांच्या खांद्यावर आम्ही उभे आहोत त्यांच्यासाठी जे काही करता येण्यासारखे आहे ते करण्याचे काम आमच्या शासनाने करावे एवढे बोलून मी भाषण संपवितो.

श्री. दिवाकर रावते : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी भाषण करताना मला विचारले की, नांदेडमध्ये आत्महत्या केली त्याबद्दल काय म्हणणे आहे ? पण मी त्यांना या निमित्ताने सांगू इच्छितो की, तुमच्या मुळशीच्या एका शेतकऱ्याने खाजगी सावकारी करणाऱ्या सावकाराकडून 3 हजार रुपये कर्ज घेतले होते.... म्हणजे त्याच्या वडीलांनी ते कर्ज घेतले होते आणि त्याने ते कर्ज फेडता फेडता सावकाराला 35 हजार रुपये दिले पण कागदावर मात्र ते फेडलेले नव्हते. म्हणून मग तो सावकार कोर्टामध्ये गेला आणि त्याने त्या शेतकऱ्यावर थकलेल्या कर्जापोटी जप्ती आणली आणि कोर्टा मार्फत त्याची जमीन बळकावली. ही सहा महिन्यापूर्वीचीच गोष्ट आहे. त्याने त्या जमिनीची किंमत तीन लाख रुपये सांगितली. सावकाराने सांगितले की, तुझ्या जमिनीचे 3 लाख रुपये दे आणि जमीन परत घे. तेव्हा शेतकऱ्याने सांगितले की, माझ्याकडे तीन लाख रुपये देण्यासाठी नाहीत म्हणून मग त्याने त्या सावकाराचा खून केला आणि जेल मध्ये गेला. त्याला आता आम्ही वकील देत आहोत. ... ही आपल्याच भागातील केस आहे म्हणून आपल्याला सांगितली.

..... 4आर 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे : अध्यक्ष महोदया, मी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना सांगू इच्छितो की, आपल्याच सदनातील एका अत्यंत जबाबदार सदस्यांनी सांगितलेली ही माहिती आहे. नांदेड मधील ही घटना आहे. मलाही आश्चर्य वाटले. अशा प्रकारची घटना या राज्यात घडत असेल तर त्यापेक्षा अधिक न बोलणे बरे असे वाटते. या ठिकाणी मी माननीय मंत्री महोदयांना बोललो की, ते अत्यंत संवेदनशील आहेत. ते याकडे जातीने लक्ष देणारे आहेत, शेतकऱ्यांच्या दु:खावर फुंकर घालणारे मंत्री आमच्या कृषी विभागाला लाभले आहेत. तेव्हा अशा घटना या पुढे तरी घडणार नाहीत या दृष्टीने आपण बँकांना सूचना दिल्या तर आपल्याला शेतकऱ्यांचे जीवन सुखी करता येईल. धन्यवाद.

..... 4आर 2 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सदाशिव पोळ (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महाराज, राज्यातील शेतकरी अडचणीत आला आहे त्या संबंधात अत्यंत जिव्हाळ्याची चर्चा सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी येथे सुरू केली आहे आणि त्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. रावते, श्री.फुंडकर, श्रीमती नलावडे, प्रा. कवाडे यांनीही भाग घेतला आहे. या चर्चेमध्ये भाग घेऊन माझे विचार मांडण्यासाठी मी आता उभा आहे. अध्यक्ष महाराज, शेतकरी अडचणीत आला तर त्याला दिलासा देण्यासाठी, त्या अडचणीतून मार्ग काढण्याच्या दृष्टीने ही चर्चा चालू आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनेक अडचणी आहेत. दुष्काळ पडणे, अतिवृष्टी होणे, गारपीट होणे किंवा अवेळी पाऊस पडणे आणि हाती आलेले पीक निघून जाणे इ. इ. कित्येकदा तर आलेल्या पिकाला मार्केटमध्ये चांगला भाव मिळत नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती नलावडे यांनी सांगितले की, एकच पीक अति प्रमाणात घेतले जाते आणि त्यामुळे देखील भाव पडतात. तर अशा अनेक गोष्टींमुळे शेतकरी अडचणीत येतो. ...

(यानंतर श्री. जागडे .... 4एस 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सदाशिवराव पोळ...

सभापती महोदय, वर्षभरातील सर्व पिकांचे भाव सरकारने अगोदर जाहीर केले तर कोणते पीक घ्यावयाचे हे शेतकरी ठरवू शकेल. काद्यांचे पीक एवढे येते की शेतक-यांना उत्पादन खर्च सुध्दा मिळत नाही. तेव्हा पिकाचे दर शासनाने अगोदर जाहीर करणे आवश्यकत आहे.

सभापती महोदय, पीक विम्या बाबत बोलावयाचे झाले तर सर्कलवाईज पीकपाणी केली जाते. मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, संपूर्ण सर्कलमध्ये पाऊस सारखा पडत नाही. त्यामुळे गाववाईज पीकपाणी घेतले पाहिजे. असे झाले तरच शेतक-यांना याचा फायदा होऊ शकेल. तसेच आपण या ठिकाणी जी समिती नेमली आहे त्यामध्ये बँकेचा एक प्रतिनिधी किंवा तंज्ञ शेतकरी या समितीमध्ये घेतला पाहिजे. कारण एका गावाला पीक विम्याचा फायदा मिळतो तर बाजुच्या गावाला तो फायदा मिळत नाही. तेव्हा या बाबतचा विचार करण्याची आवश्यकता आहे. शासनाने असा विचार करावा.

सभापती महोदय, पाण्याची पातळी आज बरीच खाली गेली आहे. ज्या ठिकाणी पाण्याची पातळी भरपूर खाली गेली आहे, त्यांना वीज दिली जाणार नाही, अशी चर्चा सुरु आहे. सभापती महोदय, माझी या निमित्ताने अशी विनंती आहे की, शासनाने शेतक-यांच्या एका पिकासाठी तरी वीज दिली पाहिजे. किंबहूना ज्या ठिकाणी पाण्याची पातळी खाली गेली आहे, ज्या ठिकाणी पाणी कमी आहे, त्या ठिकाणची पाण्याची पातळी वाढविण्यासाठी सरकारने योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत. कोणत्याही परिस्थिती विजेपासून शेतकरी वंचित राहणार नाही, हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, रोहजगार हमी योजनेमध्ये नाला बंडीगसारखी कामे घेतली जातात. आज शेतकरी विहीरीसाठी कर्ज घेत असल्यामुळे तो कर्जबाजारी होत आहे. आज रोजगार हमी योजनेत जवाहर विहीरींची कामे केली जात आहेत. त्याप्रमाणे शेतक-यांची विहीरींची कामे रोजगार हमी योजनेमध्ये घेण्याची गरज आहे. ज्या प्रकारे नाला बंडींगची कामे केली जातात, तशाच प्रकारे शेतक-यांच्या विहीरींची कामे रोजगार हमी योजनेतून घेण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे शेतक-यांच्या जमिनींच्या सपाटीकरणाचे काम देखील रोजगार हमी योजनेतून घेतले पाहिजे. असे झाले तरच आपण या राज्यातील गरीब शेतक-यांना दिलासा देऊ शकेल.

सभापती महोदय, माती परीक्षणाबाबत या ठिकाणी माननीय सदस्य श्री. रावते यांनी आपले विचार मांडले आहेत. आमचा शेतकरी निरनिराळी खते आपल्या शेतात टाकून पिके घेण्याचा प्रयत्न

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सदाशिवराव पोळ....

करीत असतो. परंतु चांगल्या प्रकारचे खत वापरल्यानंतरही शेतक-यांना चांगले पीक मिळत नाही. म्हणून प्रथम त्याच्या शेतातील मातीचे परीक्षण होण्याची आवश्यकता आहे. शेतक-यांना अनेक व्याप असल्यामुळे त्यांना आपली माती परीक्षणासाठी पाठविता येत नाही. म्हणून शेतक-यांच्या शेतावर जाऊन त्याच्या शेतातील मातीचे परीक्षण केले पाहिजे. त्यानंतर त्या शेतक-यांना आपल्या शेतात कोणते खत घालावे, याचे मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची कार्यवाही शासनाने करावी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सदाशिवराव पोळ...

सभापती महोदय, शासकीय कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर त्याला पेन्शन दिले जाते. 58 वर्षे 60 वर्षे नोकरी केल्यानंतर त्याला हमखास निवृत्ती वेतन मिळते. पाचवा वेतन आयोग लागू करावा यासाठी तो संप करतो, मोर्चा काढतो. परंतु शेतकऱ्याला कोणत्याही प्रकारचे पेन्शन मिळत नाही, त्याने कुणाकडे पहायचे? तेव्हा शासकीय कर्मचा-याप्रमाणे शेतकऱ्याला देखील पेन्शन देण्याची गरज आहे. ज्या वेळी शेतकरी शेतामध्ये काम करु शकत नाही, शारिरीक श्रम करु शकत नाही त्यावेळी त्याला शासनाने पेन्शन देण्याची गरज आहे. सरकारने याबाबत निर्णय घेऊन या लोकांना दिलासा दिला पाहिजे व त्यांच्यासाठी पेन्शन योजना चालू केली पाहिजे. सभापती महोदय, काही महत्वाच्या गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख झाला असल्यामुळे मी त्याची पुनरुक्ती करणार नाही. पिक कर्जावरील व्याजाचा दर 6 टक्के करावा अशी मागणी करण्यात आली. त्यासाठी थ्री टायर सिस्टीमऐवजी टू टायर सिस्टीम करुन त्यांना कर्ज देता आले पाहिजे. राष्ट्रीयीकृत बँका ज्या पध्दतीने कर्ज देतात त्या पध्दतीने सहकारी बँकांनी कमी दराने कशा पध्दतीने कर्ज देता येईल याचा विचार केला पाहिजे. आज त्या ठिकाणी जो सचिव असतो तो शेतकऱ्यांना कर्ज देतो, शेतकऱ्याने दिलेल्या व्याजातून त्याच्या पगाराचा खर्च भागविला जातो. तेव्हा ज्या प्रमाणे तलाठी, ग्राम सेवक यांना शासनाकडून पगार दिला जातो त्या प्रमाणे सचिवाचा पगार सुध्दा देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली तर शेतकऱ्याला आणखी कमी दराने कर्ज मिळेल व त्या मधून त्याला दिलासा मिळेल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगन्नाथ शेवाळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी भाषण करणार नसून केवळ एक-दोन महत्वाच्या सूचना या चर्चेच्या निमित्ताने करणार आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या झालेल्या दैन्यावस्थेबद्दल या सभागृहात सर्वंकष चर्चा झाली आहे. अशा प्रकारची चर्चा यापूर्वी अनेक वेळा घडवून आणण्यात आली आहे परंतु त्यामधून आऊटपुट निघाल्याचे निदर्शनास आले नाही. या बाबतीत मला असे सुचवावयाचे आहे की, प्रशासनाने त्यांचे अधिकार वापरावेत. परंतु या चर्चेच्या निमित्ताने आपण या ठिकाणी ज्या सूचना करतो त्यांचा निपटारा करण्यासाठी किंवा त्यामधून मार्ग काढण्यासाठी एखादी समिती नियुक्त करावी. आपण सातत्याने प्रयत्नशील राहिला आहात . त्यामुळे याही बाबतीत आपण प्रयत्न कराल. ज्यामुळे त्या समितीचा उपयोग आपल्याला चांगला होईल. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन निर्णय घ्यावा असे मला वाटते. याचे कारण असे की, प्रशासनातील अधिकारी वर्ग किंवा कृषी अधिकारी, कृषी विद्यापिठातील संशोधक यांच्याकडून आपल्या पदरामध्ये फारसे काही पडते असे मला वाटत नाही. म्हणून या बाबतीत त्यांच्याकडून सूचना घेऊन त्या बरहुकूम आपण अंमलबजावणी करावी.

माननीय सदस्य श्री. गडाख साहेबांनी 8 टक्के व्याजाचा उल्लेख केला, त्यांना कदाचित 6 टक्के व्याज म्हणावयाचे असेल. म्हणून शेतकऱ्याला कमीत कमी व्याज दराने कसा पुरवठा होईल अशाप्रकारच्या उत्पादन, प्रक्रिया व मार्केटींग अशा तीन महत्वाच्या गोष्टी आहेत. कारण हा प्रश्न तात्काळ सुटणार नाही. आपण एकविसाव्या शतकाला सामोरे जात असतांना, खुल्या अर्थ व्यवस्थेला सामोरे जात असतांना राज्यातील शेतकऱ्याला जागतिक स्पर्धेमध्ये उभे करण्यासाठी व त्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्यासाठी मी सुचविलेल्या समितीचा उपयोग होईल. तेव्हा शासनाने अशाप्रकारची समिती नेमावी व निर्णय प्रक्रियेला गती आणावी. मी केलेल्या सूचनेचा शासनाने आदर करावा असे बोलून माझे भाषण संपवितो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, मघाशी मी माझ्या भाषणात 8 टक्के व्याजाने कर्ज मिळावे असे म्हटले होते, पण त्याऐवजी 6 टक्के व्याजाने कर्ज मिळावे अशी त्यात दुरुस्ती करण्यात यावी. शेतक-यांच्या प्रश्नांच्या संदर्भात आज खूप चांगली चर्चा झाली. सुदैवाने आपल्या राज्याला माननीय श्री.बाळासाहेब थोरात यांच्यासारखे कृषी मंत्री लाभलेले आहेत. त्यांच्या वडिलांनीही त्यांचे संपूर्ण आयुष्य सहकार आणि शेतीमध्ये घातले आणि आयुष्यभर सातत्याने या विषयातील प्रश्न मांडत राहीले. तेव्हा या राज्याला एक संवेदनाक्षम आणि कार्यक्षम मंत्री लाभलेला आहे. शेवटी राज्य शासनालाही काही मर्यादा आहेत. यामध्ये केंद्र शासनाचा पुष्कळसा संबंध आहे. परंतु काही प्रमाणात व्याज दर कमी करणे किंवा इतर ज्या काही गोष्टी आहेत, त्याबाबतीत त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी आणि दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची एक छोटीशी कमिटी स्थापन करावी. जेणेकरुन ही समिती शेतक-यांच्या काही प्रश्नाच्या संबंधात एक महिन्यात, दोन महिन्यात निर्णय घेऊ शकेल अशी परिस्थिती आहे. म्हणून त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उपाय सुचविले तर बरे होईल एवढेच मला सांगावयाचे आहे.

. . . .4 यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.अनंत तरे) : सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाखसाहेबांनी अतिशय महत्वाच्या विषयावर येथे चर्चा घडवून आणली आहे. शेतकरी सावकाराच्या दावणीतून मुक्त होण्यासाठी भू-विकास बँकेचा जन्म झाला. पण ही भू-विकास बँक आज बंद आहे, लिक्वीडीशन मध्ये आहे. या बँकेचे लिक्वीडीशन रोखण्याच्या संदर्भात शासन काही करणार आहे का ? 200 कोटीच्या कर्जासाठी शासनाने जर 2 कोटीची हमी दिली तर भू-विकास बँकेला हे 200 कोटी रुपये मिळणार आहेत आणि शेतक-यांना कर्ज मिळणे बंद झालेले आहे, ते पुन्हा सुरु होण्यास मदत होणार आहे. तेव्हा यासंदर्भात देखील माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला तर बरे होईल.

. . . .4 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, भारतातील आणि महाराष्ट्र राज्यातील शेतक-यांच्या सद्यस्थितीबाबत सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी येथे चर्चा उपस्थित केली आहे आणि ही चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांच्या व्यतिरिक्त 8 सन्माननीय सदस्यांनी त्यामध्ये भाग घेतला आहे आणि त्यावर साडेतीन तासापेक्षा जास्त वेळ चर्चा झाली आहे. अत्यंत चांगल्या प्रकारची चर्चा असा मी याचा उल्लेख करीन. या विषयाच्या अत्यंत खोलवर जाऊन, बारीकसारीक गोष्टींचा अभ्यास करुन, शेतक-यांपुढे आज कशा प्रकारची आव्हाने आहेत यावर देखील चर्चा झाली आहे. केवळ या गोष्टींवर चर्चा झाली नाही तर याबाबतीत काही उपाय सुचविणे असेही या चर्चेचे स्वरुप राहीलेले आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, पांडुरंग फुंडकर, विलासराव शिंदे, श्रीमती कांता नलावडे, सर्वश्री.जोगेंद्र कवाडे, सदाशिवराव पोळ आणि जगन्नाथ शेवाळे यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे यामध्ये सहभाग घेतला आणि याठिकाणी एक अविस्मरणीय चर्चा झाली. साधारणत: कृषीच्या संबंधात वेगवेगळया पध्दतीने चर्चा होते, पण आज एक विषय घेऊन येथे चर्चा झाली आहे आणि ती चर्चा आपल्या सर्वांच्या लक्षात राहील अशा प्रकारची आहे हे मी सांगू इच्छितो. देशाला स्वातंत्र्य मिळाले, तेव्हा 35 कोटी लोकसंख्या होती. स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या देशाच्या नेतृत्वावर पहिली जबाबदारी आली आणि ती म्हणजे या देशातील 35 कोटी जनतेचे पोट कसे भरावयाचे. तेव्हा देशात सिंचन व्यवस्था कमी प्रमाणात होती. धान्य पुरेसे नव्हते आणि त्यामुळे 1960 ते 1970 या काळात आपण पी.एल.-480 असा करार करुन अमेरिकेतून लाल गहू आयात करीत होतो हे आपल्याला आठवत असेल. त्यावेळच्या माननीय मंत्र्यानी सभागृहात आपल्या भाषणात असा उल्लेख केला होता की,"आता तुम्ही काही काळजी करण्याचे कारण नाही. आपण पी.एल.-480 गहू आयात करण्यासंबंधी करार केलेला आहे आणि त्यामुळे आता कोणीही उपाशी राहणार नाही." त्यावेळी सर्वांनी बाके वाजविली होती. त्यानंतर हरितक्रांतीची सुरुवात झाली. कै.पंडित जवाहरलाल नेहरु यांनी भाक्रानांगल हे ठिकाण तीर्थक्षेत्र म्हणून राहील असा उल्लेख केला. कै.लालबहादूर शास्त्री यांचे नेतृत्व आले आणि त्यांनी "जय जवान जय किसान" अशी घोषणा केली. त्यानंतर कै.श्रीमती इंदिरा गांधी यांच्या कालखंडात त्यावेळी कै.जगजीवनराम आणि कै.व्ही. सुब्रमण्यम् हे भारताचे कृषी मंत्री होते.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखापासून नाही

श्री.बाळासाहेब थोरात (पुढे चालू...

डॉ.आण्णासाहेब शिंदे कृषी मंत्री होते. डॉ.स्वामिनाथनसारख्या शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. त्यावेळेस तरुण शास्त्रज्ञ म्हणून ते नावाजलेले होते. त्यांनी संपूर्णपणे देशातील अन्नधान्य उत्पादन करण्याच्या विषयाला चांगली गती दिली. त्यावेळेस आपण हायब्रीड वाण स्वीकारले. त्यावेळेस आपण रासायनिक खतांचा वापर करण्यास सुरुवात केली, आपण किटकनाशके वापरण्यास सुरुवात केली. आपण 2000 सालातून 21 व्या शतकाकडे जात असतांना सांगू लागलो की, आम्ही अन्नधान्याच्याबाबतीत स्वयंपूर्ण झालेलो आहोत. आमच्याकडे आता भाजीपाला भरपूर पिकतो. आमच्याकडे फळबागा मोठयाप्रमाणात उत्पादित झालेल्या आहेत. हे स्वावलंबन आपण मिळविले. नेतृत्वाच्या दूरदृष्टीतून, धोरणातून शास्त्रज्ञांच्या कष्टातून व ज्ञानातून, शेतकऱ्यांच्या मेहनतीतून आपण यश मिळविलेले आहे. 35 कोटीची लोकसंख्या 100 कोटीवर जात असतांना, त्यांना पुरेसे अन्न निर्माण करण्याचे काम आपण केले, ही वस्तुस्थिती प्रथम आपण मान्य केली पाहिजे. ज्यांनी या क्षेत्रामध्ये काम केले, त्यांच्याबद्दल आदर निर्माण करण्याचे काम देखील आपण केले पाहिजे. हे सगळे होत असतांना, आपल्यासमोर काही नवीन आव्हाने दिसत आहेत. ज्यावेळेस आपण 21 व्या शतकाकडे वाटचाल करीत आहोत, त्यावेळेस आपण एका बाजूला म्हणतो की,आपल्याकडे गव्हाच्या उत्पादनाने कोठारे भरलेली आहेत. आमच्याकडे दुधाचे उत्पादन मोठयाप्रमाणावर होत आहे, साखर निर्माण होत आहे. आमच्याकडे केळीचे उत्पादन मोठयाप्रमाणावर होत आहे. हे एका बाजूला सांगत असतांना, तांदळाच्या उत्पादनात पहिला क्रमांक देशाने मिळविलेला आहे, हे एका बाजूला सांगत असतांना आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा विचार करतो तेव्हा प्रश्न पडतो की, आपण हे सगळे केले, परंतु त्याचवेळी या शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात ? त्याचा दरिद्रीपणा का जात नाही ? या प्रश्नाची चर्चा करण्याची पुन्हा वेळ येते, ही वेगळी दोन टोके देखील आपल्याला पहायला मिळतात. मला एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, महाराष्ट्राच्या स्तरावर बोलत असताना, आपल्याकडेही कृषीच्या क्षेत्रामध्ये दोन फरक झालेले दिसतात. 50 वर्षाच्या कालखंडामध्ये सिंचनाच्या क्षेत्रामध्ये आपण काम केले. 30 हजार कोटी रुपयाचा खर्च या बाबींवर केला आपण अनेक धरणे बांधली. धरणाचे पाणी लाभक्षेत्रामध्ये आपण देतो, नियोजनाप्रमाणे जी टक्केवारी आहे, ती 18 टक्यापर्यन्त अचिव केलेले आहे. म्हणून आपण लागवडीलायक क्षेत्राच्या 18 टक्क्यापर्यन्त पोहोचलो, असे आपण म्हणतो. परंतु वस्तुस्थिती पहायला गेल्यानंतर थोडासा त्यामध्ये फरक दिसतो. वाढते नागरीकरण आहे, वाढते औद्योगिकरण आहे, याशिवाय आपल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.बाळासाहेब थोरात (पुढे चालू...

पाणी वापराच्या पध्दती आहेत, त्याचा परिणाम जरी 18 टक्के दिसत असला, तरी ते 18 टक्के नाही हेदेखील मला सांगणे आवश्यक आहे. पुढच्या पाच-दहा वर्षाच्या कालखंडामध्ये आणखी काही वेगळे चित्र पहायला मिळेल. सगळी धरणे त्यावेळेस पूर्ण होतील. आपण असे म्हणू की लागवडीलायक क्षेत्राच्या 38 टक्के सिंचन क्षमता मिळविणार आहोत. पण ज्या पध्दतीने आपण पाण्याचा वापर करतो आहोत, ज्या पध्दतीने नागरीकरण वाढत आहे, औद्योगिकरणाकरिता पाणी लागणार आहे, याच पध्दतीने पाण्याचा वापर करत गेलो तर 18 टक्के जे अचिव्हमेंट आहे, ते 10-12 टक्क्यावर जाऊन थांबेल आणि 38 टक्के सिंचनही तेवढे होणार नाही, ते 20-25 टक्क्याच्या आत राहील, अशाप्रकारची परिस्थिती आहे. आपण धरणावर मोठयाप्रमाणावर पैसा खर्च केलेला आहे. आपण पाट, चाऱ्या काढल्या, काही शेतकऱ्यांच्या शेतापर्यन्त पाणी नेऊन देण्याचे काम मोठयाप्रमाणावर केलेले आहे, त्यावर कारखानदारी उभी राहिली. मला हे मान्य केले पाहिजे की, ही सगळी कारखानदारी, औद्योगिकरण,जे काही सहकाराच्या माध्यमातून उभे झाले, त्याबाबत अभिमानाने उल्लेख केला पाहिजे, अशाप्रकारचे त्यामधून काम व प्रगती झालेली आहे. आज साखरकारखानदारीमुळे निव्वळ महाराष्ट्राला 1800 कोटी रुपयाचा रिव्हेन्यू गोळा होतो. हे सगळे वाढत असतांना गेली चार-पाच वर्षे आपल्याला कठीण गेल्यामुळे ही साखरकारखानदारी मोडीत निघण्याची परिस्थिती निर्माण झाली. मोठया प्रमाणावर सहकारी तत्वावर साखरकारखाने आपण काढले. आता खाजगी कारखानेही काढले गेलेले आहेत. मध्यंतरीचा कालखंडात पाऊस-पाणी कमी झाला. तरी पण सन 1999-2000 ला देशात प्रचंड साखरेचे उत्पादन झाले त्या पध्दतीने बाहेर साखरेचे साठे निर्माण केले. बाहेर साखर भरपूर, शेतामध्ये ऊस नाही, म्हणन आपल्याकडे साखरेचे बाजार कोसळले, उत्पादन खर्च वाढतो आहे.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

दुसरीकडे लोकरीमाव्यासारखा रोग होता. या सगळया गोष्टींमुळे साखर कारखानदारी अडचणीत आली.या सगळया अडचणीतून आपण बाहेर कसे पडावयाचे याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी केला. यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न सुध्दा आपण करीत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी विचारले की, आपण नेमके काय केले आहे ? माननीय श्री. शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली आणि माननीय श्री. विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली, या अडचणीत आलेल्या साखर कारखानदारीला या वर्षी पडलेला बरा पाऊस, साखरेचा वाढत असलेला बाजार या सगळयांचा परिणाम एक चांगली अर्थव्यवस्था निर्माण होण्याकरिता होईल याची मला खात्री वाटते. या सगळया साखर कारखानदारीची परिस्थिती, त्यातील अडचणी, शेतकऱ्यांना काढावे लागलेले कर्ज, त्यामुळे निर्माण झालेले दुरावे, या सगळयातून जे शेतकरी अडचणीत आले, साखर कारखाने अडचणीत आले, बँका अडचणीत आल्या, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अडचणीत आली, गाव पातळीवरील सोसायटया अडचणीत आल्या आणि संपूर्णपणे या अर्थव्यवस्थेत निर्माण झालेला इम्बॅलंस पाहता यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न निश्चितपणे चालू आहे आणि तो मार्ग निघेल. कर्जाच्या बाबतीत चांगल्या पध्दतीने चर्चा झालेली आहे. माननीय सहकार राज्यमंत्री त्यावर बोलणार आहेत म्हणून मी त्यावर फार खोलात जाऊन बोलणार नाही. परंतु यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न चालू आहे. एका बाजूला दहा वीस टक्के बागायती क्षेत्र आहे. आजची परिस्थिती अशी आहे की, बागायती शेतकरी असो किंवा जिरायती शेतकरी असो, कोणीही सुखी नाही, हे आपल्याला मान्य करावे लागेल. दुपारी दुधाच्या बाबतीत महत्वाचा उल्लेख झाला. मागच्या वर्षी पश्चिम महाराष्ट्रातील 11 जिल्हयांमध्ये मोठा दुष्काळ होता. त्या सगळया दुष्काळामध्ये लाखो लोकांनी काम केले. त्या ठिकाणी आत्महत्या झालेल्या दिसत नाही त्याचे कारण म्हणजे दुधाच्या धंद्यामुळे ही माणसे जगू शकली. ज्या गावामध्ये पाण्याचा टँकर जातो तेथील आमच्या भगिनी असतील, शेतकरी असतील, दुध उत्पादक असतील ते कोठून तरी पाणी आणून गायीला द्यावयाचे आणि दूध उत्पादन करावयाचे ही परिस्थिती त्या कालखंडामध्ये पहावयास मिळाली. दूध उत्पादनामुळे ते शेतकरी जगले. या दुधाच्या धंद्यामध्ये मोठा माणूस नाही. त्यामध्ये अत्यंत गरीब शेतकरी, शेतमजूर, मागासवर्गीय आहेत. दुधाचे उत्पादन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. बाळासाहेब थोरात ....

चांगले होऊ शकते हे मुद्दाम सर्व सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे. एका बाजूला 20 टक्के जरी बागायती क्षेत्र धरले तरी कृषी विभागात पुढची सर्वात महत्वाची समस्या म्हणजे आम्हाला धोरण ठरवावयाचे असेल जर ते नेमके कोणाचे ठरवावयाचे ? आम्हाला धोरण ठरवावयाचे असेल तर जे 80 टक्के शेतकरी, जो 80 टक्के भूभाग पावसावर अवलंबून आहे त्याकरिता काय धोरण आखतो हे महत्वाचे आहे. या ठिकाणी अभ्यासपूर्ण भाषणे झाली. यासंदर्भातील बारकावे या ठिकाणी मांडले गेले. उत्पादकतेच्या बाबतीत आपला पंधरावा क्रमांक आहे ही वस्तुस्थिती नाकारण्याचे कारण नाही. दर हेक्टरी जे उत्पादन येते त्याबाबतीत आंतरराष्ट्रीय तुलनेमध्ये भारत देश कमी दिसतो आणि भारताच्या तुलनेत आपले राज्य फार कमी दिसते. आपले राज्य याबाबतीत खूप खाली दिसते. आमच्या शेजारच्या राज्यांपेक्षा आमच्या महत्वाच्या पिकांच्या बाबतीत आमचे दर हेक्टरी उत्पादन कमी दिसते. या सगळयांचा अभ्यास केला आणि याचे कारण काय याचा विचार केला तर यामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टी आढळून आल्या. एक गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील लहरी मान्सून. दर वर्षाचा याबाबतीतील तक्ता पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, मान्सूनने झटका दिला नाही असे वर्ष सापडणार नाही. मागच्या तीन चार वर्षात पावसाच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हयांमध्ये ताण होता. या वर्षी विदर्भातील जिल्हयांमध्ये पावसाच्या बाबतीत ताण पडलेला दिसतो. बुलढाणा असेल किंवा अकोला असेल त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला. ज्या ठिकाणी पावसाची शाश्वती वाटत होती त्या ठिकाणी अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या पावसाचा लहरीपणा, मान्सूनचा लहरीपणा हे महाराष्ट्रातील दर हेक्टरी उत्पादन कमी होण्याचे प्रमुख कारण आहे. दुसरे कारण पाहिले तर आपल्याकडील मातीचा असलेला पोत हे कारण आहे. इतर राज्यांमध्ये बिहार, उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा या ठिकाणी दरहेक्टरी उत्पादन वर गेलेले आहे. गुजरातमध्ये आपल्यापेक्षा चांगली परिस्थिती आहे. मध्यप्रदेशमध्ये आपल्यापेक्षा बरी परिस्थिती आहे. त्या ठिकाणी सुध्दा पाऊस बरा आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात....

आपल्या राज्यातील मातीचा पोत चांगला नाही, हलक्या मातीचे पोत असलेले क्षेत्र मोठे आहे, त्याचा परिणाम दर हेक्टरी उत्पादन कमी होण्यावर होत असतो ही परिस्थिती आहे. याचा विचार करीत असताना उत्पादन खर्च जादा असतो आणि भाव मिळत नाही. उत्पादन खर्च जादा का येतो याचा विचार केला तर सगळयांच्या लक्षात येईल की, एखादे हक्काचे बियाणे टाकल्यावर पीक घेऊ लागलो आणि त्याचे सरासरी उत्पादन येऊ शकले नाही तर होणारा खर्च भागिले क्विंटल काढले तर उत्पादन खर्च वर जातो. महाराष्ट्रातील सगळया पिकांची ही परिस्थिती आहे. सरासरी उत्पादन मिळत नाही. देशाचे कृषीमूल्य आयोग बसते त्यावेळी पंजाब, हरियाणा यांची तुलना करीत असताना उत्पादन खर्च जादा असेल तेव्हा भाव देत असताना त्यांची तुलना करुन भाव दिला जातो आणि त्यामुळे भाव कमी मिळतो त्यामुळे शेतक-यांना मदत पाहिजे त्या प्रमाणामध्ये होत नाही ही वस्तुस्थिती आहे. कृषी विभागाचा महत्वाचा प्रश्न असा आहे की, जेथे पाऊस लहरी आहे, तेथे मदतच पुरी पडणार नाही, शेतक-यांना मदत देण्याचा विचार करीत असताना एक नवीन अभियान घेत आहोत, त्याची या खरीप हंगामापासून संपूर्ण महाराष्ट्रात पाडव्यापासून सुरुवात होईल, त्याचे नाव "महाराष्ट्र महापीक अभियान" या अभियानाच्या अंतर्गत शेतक-यांनी काय करावयाचे आहे ते सांगितले जाईल. हेक्टरी उत्पादन वाढविणे हा उद्देश आहे. ज्या पिकाचे उत्पादन करावयाचे आहे त्यासाठी जे इम्पूट टाकावयाचे आहे ते कमी खर्चाचे कसे टाकावयाचे आणि उत्पादन खर्च कमी कसा होईल हे ठरविले जाईल. त्यामुळे हे अभियान या खरीप हंगामापासून सुरु करीत आहोत. संपूर्ण महाराष्ट्रात त्याची सुरुवात करीत आहोत. याठिकाणी असे विचारले गेले की, कृषी खात्यासाठी नेमके बजेट किती आहे ? मी हे मान्य करतो, पूर्वीच्या बजेटमध्ये आणि आताच्या बजेटमध्ये खूप फरक आहे. परंतु एखादे वर्ष सोडल्यास बाकीच्या कालखंडामध्ये फरक पडलेला नाही. अनेक मार्गांनी कृषीची संसाधने असतात ते मिळत असताना माझ्या खात्याकडे सगळयात महत्वाची कोणती गोष्ट असेल तर 35 हजार अधिकारी व कर्मचारी ही आहे. इतकी मोठी ताकद माझ्या खात्यामध्ये आहे असे मी मानणारा आहे. इतकी मोठी ताकद या

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

खात्यामागे आहे. सगळी कामे पैशाने होतात असे नाही, त्या माध्यमातून काम होतील असा मला विश्वास आहे. मा.सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांच्या मुळाशी हात घालण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. यामध्ये मातीचे परीक्षण करावयाचे आहे, त्या शेतक-याला त्याची जाणीव करुन द्यावयाची की, जमिनीचा कसा पोत आहे ? त्यासाठी त्याला प्रशिक्षण देऊन माहिती देण्याचा प्रयत्न करावयाचा, केवळ वरुन खते टाकत राहून उपयोगी नाही तर जमिनीचा पोत सुधारण्यासाठी कमी खर्चात काय करता येईल यासाठी एक ग्रीन मॅन्यूअल दिले जाईल. मग त्यात ताग इत्यादीची माहिती असेल. या ग्रीन मॅन्यूअलचा उपयोग करुन कमी खर्चामध्ये पोत सुधारण्याचा प्रयत्न करीत आहोत. आमचा तसा प्रयत्न आहे. शेतीमध्ये बियाणे ही सुध्दा महत्वाची बाब आहे. ज्यावेळी शेतक-याला शाश्वतपणे भाव मिळत नाही, त्याला ते परवडत नाही त्यावेळी ते पीक लावत असताना खत घालत नाही, महागडे बियाणे घेण्यासाठी तो घाबरतो म्हणून बियाण्यासंबंधी निर्णय घेत असताना जे महत्वाचे पीक असेल जे हायब्रीड नसलेले पारंपारिक बियाणे वापरले जाते ज्याला सरळ बियाणे म्हणतात असे ज्वारीचे मालदांडीसारखे बियाणे असेल ते वापरुन त्या गावामध्ये प्लॉट करावयाचे, बीजग्राम करावयाचे आणि पुढील वर्षी त्या त्या शेतक-याने ते पीक घ्यावयाचे, त्याला चार पैसे द्यावयाचे आणि त्या बियाण्याचा मक्ता निर्माण करावयाचा. त्याचप्रमाणे पेस्टीसाईडचा वापर करुन कीड नियंत्रण करावयाचे आहे.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शोधनासाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात पुढे सुरु...)

हे निगेटिव्ह फॅक्टर्स कमी उत्पादनाला कारणीभूत आहेत. पिकावर पडणारी कीड हे देखील शेतक-याच्या आत्महत्येचे कारण आहे. पिकावर कीड पडल्यानंतर काहीच उत्पादन हातात येत नाही. म्हणून कीड व्यवस्थापन हे झाले पाहिजे. अनेक तालुक्यामध्ये आणि जिल्ह्यामध्ये हे कीड व्यवस्थापन यशस्वी झालेले आहे. महापीक अभियानाच्या माध्यमातून चांगल्या प्रतीचे आणि मोठ्याप्रमाणावर उत्पादन कसे वाढविता येईल यादृष्टीने आमचे प्रयत्न झालेले आहेत. एका बाजूला खर्च कमी करायचा आणि दुस-या बाजूला उत्पादन वाढवून शेती कशी फायदेशीर करता येईल असे प्रयत्न आम्ही करीत आहोत. हे करीत असताना यामध्ये दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. गावमंडळ, कृषी मंडळ, कृषी सप्तक यांचा देखील आम्ही उपयोग करुन घेत आहोत. कृषी चिकित्सालय स्थापन केलेली असून त्यांचा देखील चांगल्या पध्दतीने आम्ही उपयोग करुन घेत आहोत. या सर्व गोष्टींतून एक चांगल्या प्रकारचे वातावरण या कृषी क्षेत्रामध्ये निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. यामध्ये पडणारा पाऊस ही एक अत्यंत महत्वाची बाब आहे. मान्सूनचा भरवसा काय देणार ? मान्सून जर आलाच नाही तर काय करणार ? या ठिकाणी अनेक माननीय सदस्यांनी पाण्याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे असे सांगितले. त्यांनी जे सांगितले ते देखील मान्य करु. परंतु त्यासाठी मान्सून सतत राहिला पाहिजे. मान्सून आला नाही तर काय करणार? या प्रश्नाला एकच उत्तर देता येईल की, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविणे. आपल्या कृषी खात्याने मागील वर्षी मृदसंधारणाच्या कामावर जवळ जवळ 700 ते 800 कोटी रु. खर्च केले. परंतु पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामाचा एकात्मिक फायदा झाला नाही. पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमामध्ये भरपूर कामे झाली, पाणी अडवले गेले. परंतु त्याचा फायदा मिळाला नाही. तेव्हा प्रत्येक गावामध्ये पाणलोटक्षेत्र विकासाचा कार्यक्रम कसा चांगल्या पध्दतीने राबविता येईल, सीसीटी कसे घेतले जावेत, शेततळी कशी घेतली जावीत, नाला बंडिग कसे करता येईल आणि शेवटी पाझर तलाव आणि के.टी.वेअर कसे करता येईल यादृष्टीने कार्यक्रम करीत असून रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ही कामे करीत आहोत. माझी माननीय सदस्यांना विनंती आहे की, या सर्व अभियानामध्ये आपला देखील सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. आपण जेथे जेथे जाता, भाषणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात पुढे सुरु...)

करता त्या त्या वेळी याबाबतीत शेतक-यांचे प्रबोधन केले पाहिजे. पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून या कामामध्ये आपण सहभागी झाले पाहिजे. पाणलोट क्षेत्र विकासाच्या कामामध्ये शेतक-यांचा सहभाग ही देखील अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. मोकाट जनावरांमुळे त्या क्षेत्राचे खूप मोठे नुकसान होते. मोकाट जनावरे सर्व गवत खावून टाकतात. त्यामुळे जमिनीत पाणी जिरत नाही. जमीन ओसाड होते. गवत वाढले तर त्यावर 10 ऐवजी 100 जनावरे पोसली जाऊ शकतात. परंतु तसे होत नाही. त्याचप्रमाणे पाणलोट क्षेत्राच्या खाली विहिरीला पाणी लागले आणि एखाद्या धनदांडग्याने बोअर घेतली तर तो त्या बोअरने 10 विहिरींचे पाणी काढून घेतो. म्हणून या पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाच्या बाबतीत शेतक-यांमध्ये जागृती निर्माण करण्याची गरज आहे. पाण्याचे नियोजन, बजेटींग कसे करायला पाहिजे हे त्यांना शिकविण्याची गरज आहे. आपल्याला किती पाणी उपलब्ध होते ? उपलब्ध पाण्याचा आपण किती आणि कसा वापर करतो? आठमाही आणि बारमाही पिकांसाठी किती पाणी शिल्लक ठेवले पाहिजे हे गावातील शेतक-यांनी बसून ठरविले पाहिजे. आम्ही दुष्काळी तालुक्यसामध्ये पाणलोट क्षेत्र विकासाचा कार्यक्रम राबविला असून तेथे आम्ही यशस्वी झालो आहोत.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

श्री. पोपट पवार नावाचे नगर तालुक्यातील सरपंच आहेत. त्यांनी आपल्या गावाची अतिशय आदर्श पध्दतीने बांधणी केली. गावात पाण्याचे बजेटींग केले. दोन वर्ष पाऊस 100 ते 200 मि.ली.होता. परंतु आता त्या ठिकाणी दोनवेळा पंप मारला तर पाणी बाहेर येत होते. पिण्यासाठी पाणी बोअरचे आणि शेतीला विहिरीचे पाणी द्यावयाचे असे चांगले नियोजन त्यांनी केलेले आहे. ते शक्य आहे त्यासाठी पाण्याचे चांगले नियोजन करणे आणि त्यात जनतेचा सहभाग असणे आवश्यक आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी खूप चांगले मार्गदर्शन केले, सन्माननीय सदस्यांनी देखील चांगल्या प्रकारे सहभाग घेतला पाहिजे अशी मी आपेक्ष व्यक्त करतो. लहरी मान्सुनला एकच उत्तर आहे ते म्हणजे पाणलोटाचा कार्यक्रम मोठया प्रमाणात हाती घेणे असे आहे. हे काम आपल्याला करावे लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. पोळ हे देखील पाणलोटाच्या बाबतीत बोलले. हे करीत असताना एक महत्वाची गोष्ट पाहिली तर रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळबाग विकास कार्यक्रम आपण चांगल्या प्रकारे राबवित आहोत. आपण दहा,पंधरा वर्षापूर्वीचा कालखंड आठवा. आपण त्यावेळी रसासाठी आंबे खरेदी करावयाचो. तेव्हा कोणत्यातरी झाडाचा आंबा चांगला आहे, त्या शेतक-यातील मळयातील आंबे चांगले आहेत.ज्यावेळी ते शेतकरी पाटी घेऊन बाजारात आणावयाचे त्यावेळी आपण आंबे खरेदी करीत होतो. आज आपण मोठया शहराच्या गावात गेलात, लहानशा खेडयात गेलात त्या गावांमध्ये आंब्याच्या पेढया आहेत. प्रत्येक ठिकाणी हापूस मिळतो. पायरी मिळतो, केशर आंबा मिळतो, वनराज आंबा मिळतो, हे सर्व आंब्याचे प्रकार ग्रामीण भागापर्यन्त जाऊन पोहोचले आहेत. हा फळबाग विकासाच्या कार्यक्रमाचा तो परिपाक आहे. राज्यात अनेक फळे निर्माण करण्यात आलेली आहेत. याला चांगले स्वरुप त्या त्या क्षेत्रामध्ये कसे देता येईल. याचा सेच्युरेशन पॉईंट फार लवकर आला. शेतक-यांवरील पहिले संकट मान्सुनचे आहे आणि दुसरे संकट मार्केटींगचे आहे. मी कधी कधी गंमतीने म्हणावयाचो की, मामाचे संकट आहे. दोन्ही मा एकदा जुळले तर काहीच अडचण रहात नाही. परंतु मार्केटिंग ही सुध्दा आपल्या दृष्टीने खूप अडचणीची गोष्ट आहे. त्यासाठी चांगले काय काम करता येईल या गोष्टीचा विचार करणे अत्यंत महत्वाचा आहे. कोणतेही क्षेत्र वाढले तर सगळे कोसळून पडते. मधल्या कालखंडामध्ये ऊसाचे क्षेत्र कमी झाले. तेथे लोकांनी टमॉटो लावले. भाजीपाला लावला. त्यांनी लावलेल्या भाजीपाल्यास पुरेसा भाव मिळालेला नाही. शेतक-यांनी कांदे लावले त्या कांद्यांचे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

उत्पादन मोठया प्रमाणात झाले. त्या कांद्यांचे काय करावयाचे हा प्रश्न निर्माण झाला. या परिस्थितीचे कशा पध्दतीने नियोजन करावयाचे यासंबंधी आम्ही विचार करीत आहोत. यासाठी दोन गोष्टींचा आमचा प्रयत्न चालला आहे. संपूर्ण देशाचे मार्केटींगचे नेटवर्क पसरलेले आहे. ते आमच्या शेतक-याला कळाले पाहिजे. आपण मधल्या काळात केंद्र शासनाच्या सहाय्याने "आत्मा" नावाच्या संस्था स्थापन केल्या होत्या. त्यांचे काम अत्यंत चांगले झाले. त्यांनी शेतक-यांना अतिशय चांगल्या प्रमाणात नेटवर्क मिळवून दिले. "आत्मा" नावाची संस्था ती या वर्षापासून प्रत्येक जिल्हयात सुरु करीत आहोत. या संस्थांनी बाजारभावातील मार्गदर्शन शेतक-यांना करावयाचे आहे. आता सगळया तालुक्यात आपण बाजारभाव माहिती होण्याची व्यवस्था सुरु करीत आहोत. त्याच्यातून त्या शेतक-यांना माल कुठे पाठवावयाचा हे समजू शकेल. एक नवीन क्षेत्र मार्केटींगच्या बाबतीत खुले झालेले आहे. मार्केटींगच्या बाबतीत काही बदल होताना आपल्याला दिसता आहेत.कॉन्ट्रक्ट फॉर्मिंग नावाचा प्रकार सध्या येत आहे. या ठिकाणी उल्लेख केला गेला की, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दलालांचे राज्य आहे. त्या ठिकाणी शेतक-यांचे मोठया प्रमाणात शोषण होत आहे. ही गोष्ट मी नाकारीत नाही. त्या झाकल्या रुमालाखाली काय चालले असते हे आम्हाला समजत नाही. गावाच्या ठिकाणी शेतकरी 2 रुपये किलोन टमॉटो विकतो आहे. आणि तोच टमॉटो मुंबईत आपण 20 रुपये किंमतीने खरेदी करीत आहोत. हे मधले 18 रुपये कुठे जातात हे कोणाला समजत नसते. या सगळया परिस्थितीचा बदल करण्यासाठी नवीन युग येत आहे, त्याबाबतीत सांगतो की, केंद्र शासनाने माननीय श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली या सगळया मार्केटींगच्या कायद्याचा बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंबंधीचा ड्राफ्ट सुध्दा तयार करुन पाठविलेला आहे.आता नवीन मार्केटींगचा कायदा येणार आहे. त्याच्यात सगळयात महत्वाच्या दोन गोष्टी आहेत. तुम्हाला यापुढे खुली खरेदी करता येणार आहे. विदर्भातील नागपूर व इतर गावात, तसेच मराठवाडयातील लातूर आणि काही गावे आहेत तेथे आय.टी.सी. कंपनीने "इ-54" नावाने सोयाबीनची खरेदी केलेली आहे. त्यांनी जवळपास 600 केंद्र उघडली आहेत. डिसनेटच्या सहाय्याने कॉम्यूटर आणि इंटरनेट तेथे दिले. तेथील सुशिक्षित बेराजगारांना कामे उपलब्ध करुन दिली. त्यास केंद्र प्रमुख केला. सोयाबीनला कोणत्या गावात काय भाव आहे याची माहिती त्या ठिकाणी येत असते...

यानंतर श्री. कानडे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ....

शेतकरी त्याठिकाणी स्वत: जाऊन पहात असतो त्याला माल विकायचा असेल तर तो माल आणण्यासाठी त्याला रिकामे पोते दिले जाते.पोते घरी घेऊन जातो पोत्यातून तो माल घेऊन येतो.त्याला कोणताही वेळ लागत नाही. मोजमापाची व्यवस्था केलेली असते.खुली व्यवस्था आहे. या योजनेला विरोध आहे आणि काही अडचणी आहेत. मार्केटींगची वेगळी व्यवस्था उभी रहात आहे. फार काळ आता आपण दाबून ठेवू शकत नाही.स्पर्धा निर्माण करु या संदर्भात चांगली बाजारपेठ कशी मिळेल याचा विचार करुन सोयाबीनला परवानगी दिलेली आहे. पुढील काळामध्ये आणखी काही करावे लागेल. आता नवीन कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग येते आहे. आतापर्यंत शेतक-याचा माल बाजारात नेत होतो तेथे गि-हाईक ठरायचे. ज्या उत्पादकांना रॉ मटेरियल म्हणून शेतक-याचा माल लागतो त्याने आता शेतक-याशी कॉन्ट्रॅक्ट करावयाचे,भाव अगोदर निश्चित करावयाचा आणि त्या कॉन्ट्रॅक्टचे पालन करायचे. त्याच्याकरिता केंद्र शासनाकडून आणखी एक विचार झालेला आहे आणि तो म्हणज कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगकरिता कायदा निर्माण करण्याचा. उद्या पिकाचा बाजारभाव वाढला तर शेतक-याने असे म्हणता कामा नये की पीक इकडे देईन तुम्हांला देणार नाही आणि बाजारभाव कोसळला तरी व्यापा-यांनी आणि उद्योजकांनी असे म्हणता कामा नये की मी तुझा माल घेणार नाही. याकरिता हे करावे लागणार आहे. याला चांगले स्वरुप देण्याच्या दृष्टीने निर्णय होत आहेत. मार्केटींगच्या बाबतीत मोठा बदल करण्याचा संपूर्ण देशामध्ये प्रयत्न चालू आहे. महाराष्ट्रात सुध्दा तशा प्रकारचा प्रयत्न चालला आहे. एका बाजूला चांगल्या पध्दतीचे नियोजन केले. पाणलोट क्षेत्राचा कार्यक्रम केला. चांगल्या पध्दतीने योजना राबविल्या. हे सगळे करुन जर त्या शेतक-याला अडचण आली तर शाश्वत कवच असले पाहिजे आणि ते विम्याचे असले पाहिजे. त्याला एक चिलखत असले पाहिजे आणि ते विम्याचे असले पाहिजे. आतापर्यंत आपण पाहतो आहेत की,1983 सालापासून निरनिराळया योजना घेऊन आपण आलो आहोत परंतु एक निर्दोष योजना आतापर्यंत सापडली नाही. 1999 सालापासून राष्ट्रीय विमा योजना आपण राबवीत आहोत. मागील 2003 मध्ये खरीप आणि रब्बी मिळून शेतक-यांना 300 कोटी रुपये शासनाने दिले. त्याच्यामध्ये कोणतीही दुसरी विमा कंपनी नाही. भारत सरकारलाच आपण त्याचे अधिकार दिले. जो काही वाटा असेल तो 50 टक्के राज्य आणि 50 टक्के केंद्र शासन देत आहे. मदत करण्याचा प्रयत्न आपण केला परंतु त्याला जेवढे सार्वत्रिक स्वरुप यायला पाहिजे तेवढे आले नाही. त्याला शेतक-यामध्ये जागृती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ...

करावी लागेल. गारपीट झाल्यावर आपण म्हणतो की आम्हांला विमा मिळाला पाहिजे. परंतु प्रिमीयम भरलेला नसतो. शाश्वती नसते की पुढे काय होणार आहे म्हणून प्रिमीयम भरण्याची एक पध्दत आपण ठेवू शकलो तर आपण चांगल्या पध्दतीने विम्याचा उपयोग करुन घेऊ शकतो. आयसीआयसीआय कंपनीने आणि इपको कंपनीने पावसावर आधारित अशी विमा योजना आणली आहे. ते सुध्दा प्रयोग चालले आहेत. मा.सदस्य श्री. पोळ यांनी यासंदर्भात उल्लेख केला. यामध्ये जे दोष आहेत ते दूर केले जातील. 5-7 गावे असतात त्या सर्कलचा विमा आपण घेतो. आता केंद्र शासनाच्या वित्त मंत्र्यांनी त्यांच्या भाषणामध्ये या योजनेचा उल्लेख केलेला आहे. आता नवीनविमा योजना आणण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि नवीन योजनेमध्ये दोष राहू नयेत यादृष्टीने आपण सूचना करीत आहोत. मला खात्री आहे की तशा प्रकारची योजना लवकरच येईल. काही महत्वाच्या चर्चा येथे झाल्या. प्रा. कवाडे यांनी सांगितले की,ऊसाच्या बाबतीत शासन मदत करते पण आम्हांला मदत होत नाही. तशी परिस्थिती नाही. विदर्भामध्ये दुष्काळ आहे मागील 20 कोटी रुपये डिसेंबरमध्ये वाटून पूर्ण झाले आणि आता 83 कोटी रुपये पेक्षा जादा म्हणजे 100 कोटी रुपयापर्यंत आपण पोहोचू. जेथे 50 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे अशा धान उत्पादक शेतक-यांना हे पैशाचे वाटप चालले आहे. आपण कृषीला बजेट कमी असे म्हणत असलो तरी कृषीचे जे निरनिराळे अंग आहे तेथे आपण खर्च करीत असतो. कापसाची आपण मोठया प्रमाणात खरेदी केली त्यामुळे तोटा सहन करावा लागणार आहे. सबसिडी देतो त्याच्यामध्ये नुकसान सहन करावे लागणार आहे. ही मदत लोकशाही आघाडी सरकार हे करीत आहे हे सुध्दा मी सांगेन. बियाणे आणि किटकनाशकांच्या संदर्भातील जे कायदे आहेत ते केंद्र शासनाने नव्याने बनविण्यास घेतलेले आहेत. त्यामध्ये त्रृटी दूर व्हाव्यात म्हणून प्रयत्न चालला आहे आणि त्यात आम्ही काही सूचना सुचविल्या आहेत. विद्यापीठाच्या जैविक प्रयोगशाळेच्या संदर्भातील उल्लेख श्री.रावते यांनी केला. जैविक शाळेसाठी यावर्षी 2 कोटी रुपये खर्च झालेले आहेत पुढील वर्षी 2 कोटी रुपये खर्च होतील आणि 4 कोटीची जैविक प्रयोगशाळा राहुरी कृषी विद्यापीठामध्ये पूर्णपणाने उभी राहील. त्यादृष्टीने कारवाई सुरु आहे. इतर काही लागवडीच्या संदर्भातील उल्लेख याठिकाणी करण्यात आला. अनेक सूचना चांगल्या पध्दतीने आलेल्या आहेत. त्याच्या नोंदी आम्ही घेतलेल्या आहेत. यापुढील जो कालखंड आहे मा.सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी जो उल्लेख केला...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ..

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी अत्यंत व्यापक स्वरुपाची चर्चा उपस्थित केलेली आहे. दर हेक्टरी शेती उत्पादन वाढविण्याचा आपला प्रयत्न चालला आहे. त्यामागचा आपला असा उद्देश आहे की, या शेतक-यांनी आत्महत्या करता कामा नये. तो शेतकरी वाचला पाहिजे. तसेच दुस-या बाजूला आंतरराष्ट्रीय आव्हाने आपल्या समोर आहे. या संदर्भात मी आपल्याला एक उदाहरण देतो. आपण पहिलीच्या आणि दुसरीच्या वर्गात आहोत आणि दहावीची आणि बारावीची परीक्षा देत आहोत.शेतक-यांची आज अशी अवस्था आहे. या सर्व अवस्थेला आणि आव्हानांना आपल्याला तोंड द्यावे लागणार आहे.आपण जर तोंड देऊ शकलो नाही तर मुक्त अर्थव्यवस्थेमुळे परदेशातून आपल्याकडे फार लवकर माल येणार आहे.मुक्त अर्थ व्यवस्थेमुळे आपल्या बाजारपेठेत दूध येईल, भाजीपाला येईल ,फळे येतील. आज परदेशातील सफरचंद मोठया प्रमाणावर आपल्या देशात येत आहेत. एक विशिष्ट प्रकारच्या पिशवीतून टिकली लावलेले सफरचंद आजसुध्दा मोठया प्रमाणावर आपल्या बाजारपेठेत उपलब्ध होत आहेत.परदेशातून आपल्याकडे दूध,भाजीपाला आणि फळे येणार आहेत आणि आपल्यापेक्षा स्वस्त दरात येथे ते मिळू शकतील.या बाबतीत मी आपल्याला एकच उदाहरण देऊ इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी जागतिक स्पर्धेच्या बाबतीत चांगल्या शब्दात चित्र या ठिकाणी रेखाटलेले आहे. काही दिवसापूर्वी मला ब्राझिलला जाण्याची संधी मिळाली होती.ऊसाची शेती पाहण्यासाठी मी तेथे गेलो होतो ब्राझिल हा आपल्यापेक्षा मोठा देश आहे व आपल्यापेक्षा त्या देशाची लोकसंख्या खूपच कमी आहे.आपल्या पेक्षा तो देश चार ते पाच पट मोठा आहे आणि तेथील लोकसंख्या 20 कोटी एवढीच आहे.तेथील शेती पाहत असतांना काही गोष्टी आमच्या निदर्शनास आल्या होत्या. आम्ही तेथील अधिका-यांना व शेतक-यांना विचारले की आपल्याकडे ऊसाची शेती किती आहे ? तेव्हा कोणताही शेतकरी आपली शेती किती आहे हे हेक्टर मध्ये वा एकरमध्ये सांगू शकत नाही. त्या देशामध्ये शेती किती आहे हे किलोमिटर्समध्ये सांगण्यात येते.त्या ठिकाणी किलोमिटर्स मध्येच शेती मोजली जाते.त्या ठिकाणी ऊसाची लागवड पूर्णपणे यंत्राव्दारेच केली जाते. तेथे लागवड होत असतांना खते टाकण्यात येत असतात.तेथील

शेतक-याला जर आपले शेत पहावयाचे असेल तर तो हेलिकॉप्टर शिवाय पाहू शकत नाही.त्यांचे साखर कारखाने आणि आपले साखर कारखाने यामध्ये सुध्दा फार फरक आहेत. आपल्याकडे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ..

असलेल्या साखर कारखान्याच्या बाबतीत आपण अभिमानाने सांगतो की , या वर्षी अमुक इतके गळीत केले आहे आणि अमुक इतका ऊसाला भाव दिला आहे.परंतु त्या देशातील एक कारखाना 50 लाख टन क्षमतेचा आहे तेथे पाचशे ते सहाशे मजुरांवर तो कारखाना चालतो. हारर्व्हेस्टीगसह हे मजूर सर्व कामे करीत असतात.त्या देशातील साखरेचा उत्पादन खर्च आपल्यापेक्षा कमी आहे. आपल्याकडील ऊसची लागवड करणे, त्याला पाणी भरणे, खते देणे यावर होणारा खर्च जास्त असतो .त्यानंतर साखर कारखान्यापर्यन्त ऊसाची वाहतूक करावी लागते. त्यासाठी वेगळा खर्च येतो . त्यामुळे उत्पादन खर्चसुध्दा वाढतो . परंतु त्या देशात मोठया प्रमाणावर ऊसाची शेती असते आणि साखर कारखानेसुध्दा जास्त क्षमतेचे असतांना त्या देशात उत्पादन खर्च खूपच कमी येत असतो.याहीपुढे जाऊन मी आपल्याला असे सागतो, की ब्राझिल हा देश औद्योगिक राष्ट्र बनल्यामुळे त्या देशाला इतर सबसिडीज जास्त मिळतात.आम्हाला कधी कधी असे वाटते की ,त्या देशातून नऊ रुपये लिटर इतक्या कमी भावाने अल्कोहोल कसे काय मिळू शकते ? आपल्याकडे अल्कोहोलचा उत्पादन खर्च हा 14 रुपये लिटर इतका आहे. परंतु त्या देशातून मात्र 9 रुपये लिटर या भावाने अल्कोहोल मिळू शकते.याचा परिणाम असा होत आहे की ,इतर अनेक देशातून आपल्या देशात हा शेतीमाल स्वस्तात डम्प होऊ शकतो. व त्यामुळे आपली अर्थव्यवस्था मोडू शकते ही वस्तुस्थिती आहे.आपल्यापुढे जी काही आव्हाने आहेत त्याला कशापध्दतीने तोंड द्यावयाचे हा महत्वाचा प्रश्न आहे. या आव्हानांना जर तोंड द्यावयाचे असेल तर आपल्याला अधिक अग्रेसिव्ह व्हावे लागेल.आपल्याला जास्तीत जास्त चांगल्या गुणवत्तेचा माल निर्माण करावा लागेल.आपल्याला उत्पादन खर्च कमी करावा लागेल .तसेच याकरता जे काही इनफ्रास्ट्रक्चर हवे आहे ते निर्माण करावे लागेल. हे इनफ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे.त्याचबरोबर चीन या देशाचेसुध्दा शेतीच्या संदर्भातील मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. इतर देशांचेसुध्दा मोठे आव्हान आपल्यासमोर आहे. या आव्हानांना तोंड देण्याची ताकद आपण निर्माण करणे आवश्यक आहे. केन्द्र सरकार असो , राज्य सरकार असो , आमचा विभाग असो या सर्वावर खूप मोठी जबाबदारी आहे.केवळ शेतक-यांना जगविणे एवढया पुरतीच ही जबाबदारी नाही तर हा देश टिकवावयाचे असेल तर या शेतक-यांना प्रथम वाचविले पाहिजे. जर आपण शेतकरी वाचवला आणि त्याला ताकद दिली तरच हा देश सामर्थ्यवान होईल. अन्यथा आज जागतिक स्पर्धेमध्ये आपण टिकू

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ..

शकणार नाही अशी आपली अवस्था होणार आहे. त्यामुळे तशा प्रकारचे काम आपल्याला पुढच्या काळात करावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी निर्माण केलेली चर्चा आणि त्या चर्चेत उपस्थित केलेले मुद्दे कृषी विभागाला निश्चितपणे उपयोगी पडणारे आहेत. आपण आम्हाला उपयोगी पडणारे चांगले मुद्दे मांडले याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानतो.आपण जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याबाबतीत चर्चा करण्याची माझी केव्हाही तयारी आहे.आपण सर्वांनी या ठिकाणी अतिशय सुंदर चर्चा केली आहे त्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

श्री.जगन्नाथ शेवाळे (बसून) : समितीच्या बाबतीत आपण उल्लेख केला नाही.

श्री.बाळासाहेब थोरात :सभापती महोदय,समितीच्या बाबतीत उल्लेख करावयाचा राहून गेलेला आहे. त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की ती चांगली कल्पना आहे. व्याजाच्या दराच्या बाबतीत माननीय राज्यमंत्री खुलासा करणार असल्यामुळे मी त्यासंबंधी काहीही उल्लेख केलेला नाही.परंतु शेतकरी आत्महत्या करतात त्याचे मुख्य कारण हे आहे की, शेतक-यांनी जे कर्ज घेतलेले असते व त्यावर त्याला अधिक व्याज द्यावे लागते.शेतक-यांनी घेतलेल्या कर्जामुळे व त्यावरील व्याजामुळे त्याला आत्महत्या करावी लागत असते.याबाबतीत विचार करण्यासाठी एखादी समिती गठीत करण्यात यावी अशी सन्माननीय सदस्यांनी कल्पना मांडलेली आहे.

श्री.जगन्नाथ शेवाळे (बसून) :सर्व शेती व्यवसायाशी संबंधित प्रश्नाचा त्या समितीने विचार करावा.

श्री.बाळासाहेब थोरात : सर्वच विषयाचा विचार करण्यापेक्षा एक विषय घेऊन जर समितीने विचार केला तर बरे होईल.याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन निश्चित निर्णय घेऊ या.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीरत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी शेती संबंधात येथे चर्चा उपस्थित केली आहे. येथे येण्यापूर्वी मी देखील शेतकरीच होतो. त्यामुळे ज्या अनेक प्रश्नांची आज येथे चर्चा झाली, एक शेतकरी म्हणून मलाही ते प्रश्न पडायचे. अमेरिकेतील एक हेक्टरवाल्या शेतकऱ्याबरोबर आपल्याकडील 2-5 एकराचा शेतकरी जागतिक स्पर्धेमध्ये उतरणार कसा ? आज येथे सन्माननीय सदस्यांनी केलेल्या वेगवेगळ्या चर्चेतून मलाही त्यात थोडीशी अधिक माहिती झाली. मनामध्ये जी भीती वाटत होती तिच्याबाबतीत केवळ अशा तीन साडेतीन तासाच्या चर्चेतून नाही तर खरोखरी पुन्हा एकदा किंवा अनेकदा या प्रश्नांवर तज्ज्ञ मंडळींनी बसून ..तज्ज्ञ म्हणजे त्यातील एक्स्पर्टस् .. केवळ शब्दांचे खेळ करणारा नाही तर वस्तुस्थितीची जोड देवून मार्ग काढणारा, शोधणारा, अशांच्या बरोबर बसून चर्चा करण्याची माझी तयारी आहे. आज भारतीय शेतकऱ्यांच्या दृष्टीने असे एकत्रित बसणे आणि मार्ग शोधणे हे अत्यंत आवश्यक आहे. तसा सहकाराच्या विषयाकडे येण्यापूर्वी मी येथे एक शेतकरी म्हणूनच बोलू इच्छितो. शेवटी "Whereever there is life, there is a risk". शेती आणि शेतकऱ्याच्या शेतातील झाडे .. मग ती कापसाची असोत, ऊस असो वा सोयाबीनची असोत, प्रत्येकामध्ये जीवन असल्यामुळे ते पाण्यावर, बिमारीवर, त्यामध्ये करीत असलेल्या मेहनतीवर हे सर्व उत्पन्न अवलंबून असल्याने शेती हीच सगळ्यात मोठी रिस्क आहे. परंतु वडिलोपार्जित व्यवसाय म्हणून, पिढ्यान् पिढ्या करीत आलेला व्यवसाय म्हणून किंवा अन्य दुसरा कोणता व्यवसाय जमत नाही म्हणून किंवा त्यासाठी गाव सोडून जाण्याची तयारी नसल्यामुळे म्हणा, आजही 70 टक्के लोक या शेती व्यवसायामध्ये आहेत. या व्यवसायातील तंत्रज्ञान कितीही पुढे गेलेले असेल, प्रगतीच्या कितीही गोष्टी आपण करीत असलो तरी एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, या शेतीमध्ये सगळ्यात मोठ्या प्रमाणात एम्प्लॉयमेंट पोटेंशिअल आहे. 20-50 रुपये रोजाने असेल पण सगळ्यात मोठा रोजगार हा या शेतीमध्ये मिळतो म्हणून या उद्योगाकडे गांभीर्याने पाहून, त्याला वास्तवाची जोड देवून, काम करणे आवश्यक आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, यामध्ये पुष्कळ चांगले दिवस येऊन गेले आहेत आणि आलेले देखील आहेत. आज सरकारच्या प्रयत्नांनी शेती खूप सुधारली आहे परंतु खुल्या अर्थकारणामुळे शेती समोर आज आव्हाने देखील मोठी निर्माण झालेली आहेत. त्याचबरोबर शेतीसंबंधात जे सहकार चळवळीतील कारखानदारी, बँकींग असो वा सेवा

..... 5सी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दांडेगावकर .....

सोसायट्या असोत किंवा प्रक्रिया करणारी कारखानदारी असो, तेसुद्धा कोठल्या धोरणामुळे अडचणीत आलेले आहेत. अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.गडाख हे सहकारातील एक तज्ज्ञ आहेत. त्यामुळे त्यांना माहिती असेलच की, यापूर्वी 16 टक्के व्याजाने कर्ज घेऊनदेखील अनेक कारखाने कर्जमुक्त होऊ शकले आहेत. किंबहुना 16 टक्के व्याजदर होता तेव्हा आत्महत्ये पर्यात वेळ आलेली नव्हती. परंतु आज 9-10 टक्के दराने कर्ज मिळत आहे आणि त्यासाठी सरकार देखील प्रयत्न करीत आहे. परंतु शेवटी मागणी आणि पुरवठा याचा साधा रेशिओ लावला तरी आपल्या लक्षात येईल की, यापूर्वी कर्ज घेण्यासाठी आपण बँकांच्या दारामध्ये रांगा लावत होतो परंतु आज मोठमोठ्या बँकादेखील कर्ज घ्या म्हणून मागे लागल्या आहेत. त्यांचे एजन्टस् त्यासाठी फिरत आहेत. शेतीमध्ये देखील थोडेसे असेच झालेले आहे. मागणीच्या प्रमाणात पुरवठा कमी आहे म्हणजे कर्जाचा पुरवठा मागणी पेक्षा कमी आहे त्यामुळेच मधल्या काळात व्याजाचा दर जास्त होता आणि आज तो 10-8 रुपयांवर आलेला आहे आणि तो अजून खाली येऊन 6 टक्केवर येण्यासाठी काय काय मार्ग काढता येईल यासाठी सरकार म्हणून आम्ही निश्चितच प्रयत्न करू. मध्यंतरी आयुक्तांनी सर्क्युलर काढले आहे की, जिल्हा बँका असोत किंवा आपली महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असो, त्यांनी 10 टक्के दराने कर्ज पुरवठा करावा. आता किती कारखाने याला पात्र होतील हे सांगता येत नाही. .....

(यानंतर श्री.जागडे ....5डी 1 ...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. दांडेगावकर...

कमी व्याजाचा दराने शेतक-यांना कर्जपुरवठा झाला पाहिजे, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. मला मंत्री होऊन चारच महिने झाले आहे. मी ही बाब अतिशय गांभीर्याने घेतलेली आहे. शेवटी शेती आणि सहकारी चळवळ वाचू शकली तरच राजकारणातील आपल्या या पदाला काहीतरी अर्थ आहे. उलट राजकारण बाजुला ठेवून माननीय सदस्यांना ज्या ज्या सूचना करावयाच्या असतील, त्या त्यांनी कराव्यात. सहकारी चळवळीला वाचविण्यासाठी मी प्रसंगी दोन-चार बैठका घेणार आहे. कारण ग्रामीण भागातून ही सहकारी चळवळ वजा केली तर कोणीही खेड्यामध्ये जाऊन साखर कारखाना काढणार नाही. कोणी सोयाबीनचा उद्योग काढणार नाही. कोणी कापसाचा उद्योग काढणार नाही. माननीय सदस्य श्री. रावते, श्री. फुंडकर आणि इतर मा. सदस्यांनी खंत व्यक्त केली आहे. हळदीचे उत्पादन मराठवाड्यातील हिंगोलीला जास्त होते आणि मार्केट किंवा कारखानदारी असो की संशोधन केंद्र असो, ते मात्र सांगलीला. कापसाच्या बाबतीत मराठवाड्याची आणि विदर्भाची परिस्थिती तशीच झाली आहे. त्याला काही दोष त्यांचा नाही. या चळवळीमध्ये काम करणा-या माणसांचा दोष आहे. ज्या जिद्दीने आणि चिकाटीने काम करायाला पाहिजे, तेवढे काम मराठवाडा आणि विदर्भामध्ये झाले नाही. मराठवाड्यात 30 साखर कारखाने आहेत तसेच विदर्भात 14 साखर कारखाने आहेत. परंतु हे सगळे उद्योग आज आजारी पडले आहेत. उद्योग आजारी पडण्यामध्ये अवेळी पडणारा पाऊस हे एक कारण आहे. ॲश्युअर्ड रेनफॉल असणा-या जिल्ह्यांना सुध्दा गेल्या तीन ते चार वर्षात अनियमित पावसाला तोंड द्यावे लागले आहे. त्यामुळे एकदा कारखाना आजारी झाला की, बँक आजारी आणि त्यातील सभासद आजारी. अशा प्रकारचे हे दुष्टचक्र सुरु झालेले आहे. सभापती महोदय, सहकारी चळवळ ही गरीब माणसांसाठी असणारी चळवळ आहे. जी माणसे चरितार्थासाठी शेती करतात, ग्रामीण भागात रोजगार करतात, त्या माणसाला दिलेली अनेक कर्ज अनेक वेळा थकीत राहतात. त्यामुळे आपल्या सर्वांना एका वेगळा दृष्टीकोन घ्यावा लागणार आहे. तसा विचार आपणाला करावा लागणार आहे. सभापती महोदय, एका बँकेच्या पारितोषिक वितरणाच्या कार्यक्रमांच्या वेळी मी अशा प्रकारचे स्टेटमेंट केले होते. त्याचे वृत्त इंग्रजी पेपरमध्ये आले. राज्याचे राज्यमंत्री असे असे म्हणत आहेत, असे असे सरकारचे धोरण असेल आणि यामुळे कर्जाच्या धोरणावर परिणाम होणार आहे. शेवटी सहकारी चळवळ ही ग्रामीण महाराष्ट्राची गरज आहे. ही चळवळ वाचविण्याचा प्रयत्न सरकार निश्चित करणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दांडेगावकर....

सभापती महोदय, साखर उद्योगासाठी साडे बाराशे कोटी रुपयाचे पॅकेज येत आहे. याची आपणाला कल्पना आहे. ही बाब प्रोसेसमध्ये आहे. साखर यापूर्वी कधीच एक्सपोर्ट केली नाही, त्यामुळे एक्सपोर्ट सबसिडीचा प्रश्न आला नाही. सभापती महोदय, उत्पादन खर्चावर आधारीत शेतमालाला भाव मिळाला पाहिजे, ही गेल्या दहा-पंधरा वर्षापासून मागणी करण्यात येत आहे. ही मागणी करणारे कृषी मुल्य आयोगाच्या प्रमुखपदी बसलेले आहेत. आता ही मागणी ते पूर्ण करु शकले नाहीत. ही व्यवहारातील अडचण आहे. त्यांची इच्छा नव्हती असे मी म्हणणार नाही. हे निश्चित आहे की, ही मागणी काही चुकीची नाही. उत्पादन खर्चावर भाव अजून मिळत नाही. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे सर्व मार्गाचा अवलंब केला पाहिजे. पंजाबमधील शेतक-याचे एकरी उत्पादन आणि महाराष्ट्रातील शेतक-याचे एकरी उत्पादनाचा विचार तर यामध्ये तिपटीचा फरक पडतो. परदेशात 100 टन ऊस काढणारे शेतकरी आहेत. आपण कोठे 25 ते 30 टन एकर ऊस काढत असतो. गहू सात ते आठ क्विंटल काढीत असतो. कापसाचेही तीन चार क्विंटलचे ॲवरेज असते.

(यानंतर श्री. सरफरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दांडेगावकर...

माननीय कृषीमंत्र्यांनी सांगितलेल्या पध्दतीने उत्पादन वाढविले पाहिजे तरच उत्पादन खर्च कमी होईल. उत्पादन खर्चावर आधारीत भाव सद्या मिळत नाही तो मिळाला पाहिजे याकरिता गेल्या 15 वर्षापासून या विषयावर चर्चा चालली आहे. निश्चितपणे आज ना उद्या या प्रश्नाला न्याय मिळाल्याशिवाय रहाणार नाही. व्याजाच्या बाबतीत खुलासा केला, त्याबाबत वेगवेगळया बँकाबरोबर बोलणी चालू आहेत. थ्री टायर सिस्टीम आपल्याला एकत्रितपणे कमी करता येईल काय? आपण सहकारातील तज्ज्ञ आहात. उद्या आपण डायरेक्ट फायनान्स करावयाचे म्हटले तर या बँका उद्या शेतकऱ्यांना डायरेक्ट फायनान्स करणार नाहीत. त्यामुळे आपल्याला सिस्टीममध्ये खर्च कमी करुन व्याजाचा बोजा कमी कसा करता येईल हा सेटअप ठेवण्यासाठी विचारविनिमय चालू आहे. वैद्यनाथन समितीने वेगवेगळया शिफारशी केल्या आहेत. उशीर झाल्यामुळे त्याच्या तपशिलात जात नाही. या सभागृहात बोलणारे सभासद हे त्या त्या विषयातील तज्ज्ञ आहेत म्हणून मी कमी शब्दात उत्तर देत असतो.. वैद्यनाथन समितीने रिपोर्ट केला आहे. त्यातून आपल्याला साडे चौदा हजार कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. त्यामधून आपल्या प्रायमरी सोसायटया सुधारल्या तर मग जिल्हा बँका, राज्य बँका, ही थ्री टायर सिस्टीम सुधारुन जाईल अशी मला खात्री आहे. त्यासाठी आपल्या कायद्यात व त्या संस्थांच्या वर्कींगमध्ये बदल करावे लागतील. ते जर बदल स्वीकारले आणि हे साडे चौदा हजार कोटी रुपयांचे पॅकेज आले तर या सहकारी चळवळीसमोर ज्या अडचणी आल्या आहेत त्या दूर होऊन पुन्हा एकदा पहिल्यापासून चांगल्या पध्दतीने सुरुवात करता येईल अशी मला खात्री आहे.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, वैद्यनाथ समितीने जरुर शिफारशी सुचविल्या आहेत. त्यात त्यांनी म्हटले आहे की, सहकारी बँका किंवा जी सिस्टीम आहे त्यांनी आम्हाला मदत केली पाहिजे असे गृहीत धरले आहे. हा सिस्टीममधील दोष आहे. म्हणून 3 टायर सिस्टीममध्ये प्रत्येक ठिकाणी एक, दोन टक्क्यापर्यंत मार्जीन आपण कमी करु शकलो तर 6 टक्क्यांनी कर्ज शेतकऱ्याला मिळू शकते हे सरकार करु शकेल काय? राज्य पातळीवरील राज्य सहकारी बँकेचा प्रशासकीय खर्च किंवा सोसायटीचा खर्च कमी करण्यासाठी तुम्हाला दिल्लीला किंवा वैद्यनाथन कमिटीकडे जायची गरज नाही, ते सरकार करु शकते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगन्नाथ शेवाळे : 3 टायर सिस्टीम सुध्दा आज नॅशनलाईज बँकामध्ये आहे. या बँका आज 25 कि.मी. च्या क्षेत्रात कर्ज पुरवठा करतात. तर मग आपल्याला कां करता येत नाही? गावोगावी सोसायटया आपल्याला कशासाठी पाहिजेत? केवळ 4 टक्क्याचा फरक त्यामधून लागलीच दूर होईल.

श्री. दांडेगावकर : आपण केलेल्या सूचनेबाबत शासन निश्चितपणे प्रयत्न करील ते फार अवघड नाही. परंतु आपणा सर्वांना 5-6 वर्षानी मते मागावी लागतात. म्हणून जिल्हा बँक, राज्य बँक, विकास बँक असो आपण थोडे फ्लेक्झिबल रहातो. नाही तर खर्चामध्ये कपात करणे फार अवघड नाही. याबाबत सरकार म्हणून निश्चितपणे सर्व संस्थांना एक-दोन वेळा सूचना देण्यात येतील. इतकेच नव्हे तर त्याबाबत कार्यवाही सुध्दा करील. माननीय सदस्य श्री. शेवाळे 3 टायर सिस्टीम व राष्ट्रीयीकृत बँकाच्या बाबतीत बोलले. आज आपण पहातो की, राष्ट्रीयीकृत बँका कोऑपरेटिव्ह सेक्टरमध्ये ॲग्रिकल्चर फायनान्स करतो असे सांगतात. परंतु त्या फायनान्स रिपेईंग कॅपॅसिटी बघून जे क्रिमी फार्मर आहेत, जे क्रिमी लेअर आहेत त्यांना करतात. आपली चळवळ लहानात लहान माणूस काम करीत आहे त्याच्यासाठी असल्यामुळे त्याच्याबरोबर तुलना होणार नाही. म्हणून आपल्या सिस्टीमध्ये सुधारणा करुन कशी कमी करता येईल आणि व्याजाचा दर 6 टक्के आठ टक्के पर्यंत आणता येईल. आज इंडस्ट्रीतसुध्दा व्याजाचा दर साडे सात टक्केपेक्षा खाली आलेला नाही. हजारो कोटी रुपये फायनान्स पुरवठा होतो त्या ठिकाणी सुध्दा व्याजाचा दर सव्वा 7 टक्के पर्यंत आला आहे. तेव्हा शेतीमध्ये सात ते आठ टक्क्यापर्यंत खाली आणू शकलो तर ती एक अचिव्हमेंट राहील. त्यादृष्टीने निश्चितपणे सरकार त्यामध्ये लक्ष घालील. माननीय सदस्य श्री. रावते मागील कर्जाची थकबाकी 786 कोटी रुपयें हे सरकार देतो म्हणाले होते असे म्हणाले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर . . . .

ते वर्कींग कॅपिटल टर्म लोन होते. साखरेचे भाव एकदम कोसळल्यामुळे साखर कारखानांना कर्ज मिळण्यासाठी अडचण येत होती. म्हणून आपण 786 कोटी रुपयांचे कर्ज राज्य सहकारी बँकेकडून साखर कारखान्यांना उपलब्ध करुन दिले आणि त्यासाठी पाच वर्षाचे हप्ते बांधून दिलेले आहेत आणि त्याची गॅरंटी शासनाने घेतलेली आहे. दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्यांनी 39 कोटी रुपयांबाबत उल्लेख केला होता. ती पूर्वहंगामी कर्जाची थकबाकी होती आणि त्यावेळी कारखान्यांना कर्ज उपलब्ध करुन दिले आहे. मघाशी पॅकेजच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. त्याबद्दल मी खुलासा केलेला आहे. पॅकेज येत आहे, फक्त कारखानावाईज् थोडेसे व्हेरिफीकेशन होऊन ते पॅकेज कारखान्यांपर्यंत पोचविता येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटीलसाहेबांनी कृषी बाजार समितीच्या बाबतीत आणि परदेशात जात नाही वगैरे मुद्दे मांडले. शेवटी आपण सुरुवात करीत आहोत. गेल्या वर्षीपासून नाशिक जिल्हयातून द्राक्षाचे दोन-चार कन्टेनर परदेशात जात आहेत. आंबा एक्सपोर्ट होत आहे. आता एक्सपोर्ट व्हावयास सुरुवात झालेली आहे. आजपर्यंत आपल्याला इम्पोर्टेडची क्रेझ होती, आज आपण एक्सपोर्टच्या मागे जात आहोत, प्रयत्न करीत आहोत. सुरुवातीच्या काळामध्ये काही अडचणी येतील. पण आपल्याकडील शेती माल हा निश्चितपणे परदेशामध्ये आपण पाठविणार आहोत. अशा प्रकारे माल परदेशात पाठविण्याच्या दृष्टीने पणन मंडळाने आणि मार्केटींग कमिटयांनी प्रयत्न सुरु केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.फुंडकरसाहेब प्रक्रिया करणा-या कारखानदारीच्या बाबतीत बोलले. फुंडकरसाहेब, मी आपल्या मताशी थोडासा सहमत आहे की, महाराष्ट्रामध्ये साखर कारखाने ज्या प्रमाणात उभे राहू शकले, त्या प्रमाणात इतर सहकारी कारखानदारी उभी राहीली नाही. अलाईड इंडस्ट्रीज मग त्या सोयाबीनवरील असोत, कापसावरील असोत किंवा आपल्याकडे पिकणारा मका असो, धानाची पिके असोत, त्यावर प्रक्रिया करणा-या इंडस्ट्रीज् त्या-त्या भागामध्ये उभ्या रहावयास हव्या होत्या, त्या उभ्या राहीलेल्या नाहीत. शेवटी मराठवाडा आणि विदर्भ तर फॉलोईंगच करतो. दुस-यांनी काही केले असे म्हटल्यावर आपण जाऊन पहावयाचे आणि "चलो, अपने यहाँ शुरु करेंगे" असे होते. पण आपल्याकडे सुध्दा सोयाबीनचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढलेले आहे. तुमच्याकडील दोन-तीन जिल्हयामध्ये पहिल्यापासून धानाचे पीक आहे. मराठवाडयामध्ये सुध्दा कापूस आहे. यावर सुध्दा प्रक्रिया करणारे कारखानदारी जरी उभी राहीली नसली तरी, आज पुन्हा एकदा सूत गिरण्यांना, कापड उद्योगाला

. . . .5एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर . . . .

चांगले दिवस येत आहेत. म्हणून ही कारखानदारी उभी करण्यासाठी शासन म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करीन. यासाठी त्या-त्या विभागातील कार्यकर्त्यांनी अशा प्रकारचे प्रस्ताव दाखल करावयास पाहिजेत. आजपर्यंत जेवढे प्रस्ताव आलेले आहेत, त्याबाबतीत छाननी सुरु आहे. व्याजदराच्या बाबतीत मी खुलासा केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी दामदुप्पट कर्ज योजनेच्या बाबतीत उल्लेख केला होता. दामदुप्पट योजनेच्या बाबतीतील 44(अ) चा कायदा, हा सहकारी कायदा झाला होता, तेव्हाचा आहे. आजही काही लहान शेतकरी किंवा काही कर्ज मर्यादेपर्यंत दामदुप्पट कर्ज योजनेला मान्यता आहे. पण आज सगळीकडेच दर वाढलेले आहेत. त्यामुळे ही मर्यादा वाढविण्याच्या दृष्टीने सुध्दा सर्व संबंधितांशी चर्चा करुन, 44(अ) नुसार जे काही नियम आहेत, विधानसभेमध्ये सिनिअर मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी तो कायदा बदलतो असे सांगितले आहे. त्या अनुषंगाने त्यावेळी सुध्दा याचा जरुर तो विचार करुन याबाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी एका गोष्टीचा खुलासा करावा. एक म्हणजे दामदुप्पट कर्ज योजनेच्या संदर्भात कायद्यात बदल होणार नाही अशा प्रकारची अधिकृत घोषणा सन्माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी विधानसभेमध्ये केली आणि टी.व्ही.वर सुध्दा आम्ही ती ऐकलेली आहे. म्हणून त्यासंदर्भात आपल्याकडून ठाम उत्तर अपेक्षित आहे. कारण तशी घोषणा झाली आहे. दुसरे म्हणजे मी अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी विषय काढला होता, पण त्याचे उत्तर मिळाले नाही आणि आज बेल वाजविल्यामुळे मला ते सांगण्यासाठी वेळ मिळाला नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये जेव्हा लोकरी मावा रोगामुळे ऊस उत्पादक शेतकरी अडचणीमध्ये आला तर 100 रुपये ऊस उत्पादकाला देण्याच्या बाबतीत निर्णय झाला आणि केंद्र शासनाकडून ते पॅकेज जाहीर झाले होते. त्यातील 50 रुपयाप्रमाणे 300-350 कोटी रुपये आपल्यापर्यंत आले आणि ते शेतक-यांपर्यंतही पोहोचले आहेत. उर्वरित 300 कोटी रुपये अजून आलेले नाहीत. हा टीकेचा भाग नाही. आमचे केंद्र शासनामध्ये कृषी मंत्री आहेत, ते काय करीत आहेत ? वगैरे हा भाग नाही. पण ते पैसे अजून केंद्र शासनाकडून आलेले नाहीत. तर या शेतक-यांना उरलेले 50 रुपये मिळण्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? आपण कारखान्यांसाठी पॅकेज जाहीर केले. पण शेतक-यांना अजून जे 50 रुपयाप्रमाणे पैसे मिळावयाचे होते, ते मिळाले पाहिजेत. ते अधिकृतपणे मिळणे आवश्यक आहे.वाजपेयी सरकारने दिले आणि या सरकारने दिले

. . . .5 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रावते . . . .

नाहीत. तर याबाबतीत आपण पाठपुरावा कसा करणार आहात ? याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला तर बरे होईल.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : त्यासाठी देखील प्रयत्न चालू आहेत. ओपन मार्केट बॉरोविंग होते की काय होते, आपण राहिलेल्या 50 रुपयाच्याबाबतीत म्हणत आहात, ती 300 कोटी रुपयाची रक्कम आहे. त्यासाठी प्रकरणे आणि प्रयत्न चालू आहेत. दामदुप्पटच्या बाबतीत खालच्या सभागृहामध्ये भूविकास बँकेच्यानिमित्ताने ती घोषणा झाली होती. सहकारी बँकांची दामदुप्पट योजना लागू आहे. पण भूविकास बँकेला ते लागू नव्हते. त्या संबंधाने खालच्या सभागृहामध्ये मा.मंत्री डॉ.कदम साहेबांनी जाहीर केले होते की, भूविकास बँकेलाही ती योजना लागू करण्याच्या संबंधात कायद्यामध्ये बदल करू. आज परत ओ.टी.एस.च्याबाबतीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.शिंदे साहेब आणि सन्माननीय सदस्य श्री.फुंडकर साहेबांनी मुद्दा उपस्थित केला. ओ.टी.एस.च्याबाबतीमध्ये आपण परत फेरविचार करु. सहकार चळवळीमध्ये खरेच दोन प्रकारचे थकबाकीदार असतात. काही विल-फूल डिफॉल्टर आहेत, काही नैसर्गिक आपत्तीमुळे, परिस्थितीमुळे डिफॉल्टर आहेत. विल-फूलच्याबाबतीत आपल्याला गृहित धरता येणार नाही.. पण जे नॅचरल कॅलामिटीमुळे, पिकांचे नुकसान झाल्यामुळे जे डिफॉल्टर होतील, याबाबतीत शासन जरुर विचार करेल. सन्माननीय सदस्यांनी सचिवांचा प्रश्न उपस्थित केला. शेवटी प्रायमरी सोसायटी ही आपली आहे. तो माणूस संस्थेचे हिशोब ठेवतो...मला वाटते, त्याबाबत समिती नेमलेली आहे त्या समितीचे प्रमुख सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेबच आहेत. त्यांच्याकडून अहवाल आल्यानंतर त्या सचिवांचाही विचार करता येईल. पण शेवटी या संस्थांनी देखील आपल्या स्टाफला सांभाळून, स्वत:च्या पायावर उभे रहण्याची या पुढच्या काळामध्ये तयारी ठेवली पाहिजे. सरकार संस्था स्थापन करण्यासाठी मदत करेल. पण मदतीवरच आयुष्यभर संस्थेने चालावे, ही संस्थांनी अपेक्षा करु नये, असे मला वाटते. स्वत:च्या पायावर उभे राहीपर्यन्त मदत घ्यावी, एकदा उभे राहिल्यानंतर संस्थांनी देखील स्वत:च्या पायावर चालले पाहिजे.

सन्माननीय सदस्या श्रीमती कांताताई नलावडे यांनी देखील सहकारी बँकांच्या दलालाच्याबाबतीत सांगितले की, विहिरीच्या कर्जाला देखील पैसे द्यावे लागतात. सन्माननीय सदस्यांनी कोणत्या बँकेमध्ये असे प्रकार होतात ते मला रितसर सांगितले तर सबंधितांवर चौकशी करुन, कार्यवाही करण्यात येईल. कारण अशी दलाली सहकार क्षेत्रामध्ये या पुढच्या काळामध्ये होत असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.कवाडे साहेबांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संबंधाने काही मुद्दे मांडले. कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून होत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (पुढे चालू...

असलेले शोषण थांबले पाहिजे. मुळात शेतकऱ्यांचे शोषण व्यापाऱ्यांकडून होऊ नये, याच उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना झाली होती. त्यांच्या कामकाजामध्ये काही कमीजास्त होत असेल, तर त्या संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत सांगितले तर त्या कृषी उत्पन्न बाजार समितीला समज दिली जाईल. कारण मूळ उद्देश कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करताना शेतकऱ्यांची पिळवणूक होणार नाही, फसवणूक होणार नाही, हाच त्यातील मुळ उद्देश आहे. कलेक्टीव्ह को-ऑपरेटिव्ह फार्मिग आणि कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगच्या बाबतीतही चर्चा झाली. आज कॉन्ट्रॅक्ट फॉर्मिगच्याबाबतीत सन्माननीय कृषी मंत्री महोदय आताच बोललेले आहेत. त्यामुळे मी त्याबाबतीत काही बोलणार नाही. को-ऑपरेटिव्ह फार्मिगच्याबाबतीत त्यांनी जी सूचना केली ती सूचना तपासून घेतली जाईल. पण शेवटी शेतीमध्ये पर्सनल अटेंन्शन असल्याशिवाय शेती होऊ शकत नाही. इतर अनेक व्यवसाय मॅनेजर्स ठेवून होऊ शकतात, पण लहान शेतकऱ्यांची स्मॉल स्केल फार्मिंगची फार मोठी संख्या आहे. त्या ठिकाणी मॅनेजर ठवून काही होऊ शकत नाही. उद्या जर कार्पोरेट फॉर्म झाले तर हेच शेतकरी मालक असूनदेखील कार्पोरेट फॉर्मिंगच्या कायद्याप्रमाणे त्या शेतावर मजूर म्हणून त्यांना काम करावे लागेल. त्या दृष्टीने तपासणी करून योग्य ती नियमावली किंवा कार्यवाही त्यावेळसे करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.सदाशिवराव पोळ यांनी सचिवांच्यासंबंधात, त्यांच्या पगाराच्या संबंधात बोलले. सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथराव शेवाळे साहेब व्याजदराच्या संबंधाने बोलले. व्याजदराच्या बाबतीत आताच खुलासा केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे साहेबांनी भूविकास बँकेच्या अवसायनाच्याबाबतीत बोलले. भूविकास बँकांचा चार वर्षापूर्वी विभाजन करण्यात आले. 15 शाखा आणि एक मुख्य कार्यालयाची शाखा अशा मिळून 15-16 शाखा अवसायनात काढल्या होत्या. त्यापैकी 9 बँकांना उच्च न्यायालयाकडून स्थगिती असून जैसे थे परिस्थिती आहे. त्या ठिकाणी संचालक मंडळ आहेत. शिखर बँक आणि पाच बँका यावर लिक्विडेडर आहेत. आपण म्हणाला की, 2 कोटी रुपयाची रक्कम भरून त्यांना 200 कोटी रुपये मिळणार आहेत. उलट भूविकास बँकांची थकबाकी जवळजवळ 1300 कोटीच्या जवळपास आहे. सरकारने त्याच्यासाठी 10 वर्षाचे हप्ते पाडून घेतलेले आहेत. 2016 पर्यन्त हे कर्ज फेडायचे आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये या संबंधाने एक बैठक झाली.

यानंतर श्री.बरवड.....

अशुद्धीत प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ...

त्यामध्ये राज्य सहकारी बँकेने भूविकास बँकेला काही प्रमाणामध्ये कर्ज पुरवठा करतो, जवळजवळ 13-14 बँका चालू आहेत, त्यांना कर्जपुरवठा करतो असे सांगितलेले आहे. त्यामुळे याही बँका बंद व्हाव्यात अशी इच्छा नाही. शासनाने मध्ये एक समिती नियुक्त केली होती. कमिशनर यांची शिफारस आली होती की, या बँका व्हायेबल नाहीत त्यामुळे बंद कराव्यात. पण तरी पुन्हा एकदा नाबार्ड, सरकार आणि संबंधित सर्व बसून यात काही व्यवहार्य तोडगा निघून या बँका पुनरुज्जीवीत करता येतात काय यादृष्टीने सरकार प्रयत्न करणार आहे. तीन महिन्यांच्या आत याबाबतीत व्यवहार्य तोडगा आपण घेणार आहोत. शेवटी एक तर सरकार यामध्ये इन्व्हॉल्व नाही. यामध्ये फायनांन्सींग एजन्सीज आहेत, नाबार्ड आहे, इतर बँका आहेत. त्या सगळयाच्या समक्ष बसून, सोबत बसून भूविकास बँकांच्या बाबतीत सुध्दा व्यवहार्य तोडगा काढण्यात येईल. या चर्चेच्या बाबतीत मला जी माहिती प्राप्त झाली त्यावरुन अत्यंत आश्चर्य वाटले की, गेल्या चार पाच वर्षामध्ये शेती या विषयावर पहिल्यांदाच ही चर्चा ठेवण्यात आली असल्याचे सांगण्यात आले. मी सभागृहात नवीन आहे. 60-70 टक्के सदस्य आपण शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून या ठिकाणी येतो. त्यामुळे चार पाच वर्षानंतर पहिल्यांदा ही चर्चा ठेवली गेली त्याचे मला आश्चर्य वाटले. आज सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेबांनी वाट मोकळी करुन दिलेली आहे आणि हा महाहराष्ट्राचा महत्वाचा विषय आहे. मग शेती असो किंवा सहकारी चळवळ असो. सन्माननीय कृषी मंत्रिमहोदय बोलले की, आज कोठे तरी आपण सर्वांनी मिळून वास्तवाची आणि व्यवहाराची कास धरावी लागणार आहे. कोणी तरी घोषणा केल्या असतील, मला माफ करा, कोणीही असो. या बाजूला असो किंवा त्या बाजूला असो, मला व्यक्तिगत काही बोलावयाचे नाही पण या घोषणांमुळेच सहकारी चळवळ अडचणीत आलेली आहे. कोणी सांगितले की, कर्ज भरु नका. त्यासाठी 40-40 रुपयांना गावोगावी फॉर्म भरुन घेतले गेले. कर्ज भरु नका, काय होते ते बघू, बिलकुल कर्ज भरावयाचे नाही असे सांगितले गेले. कोणी व्याज माफ करतो म्हणाले असतील, कोणी मुद्दल माफ करतो म्हणाले असतील. पण 1994-95 पर्यन्त चांगली वाढत गेलेली ही चळवळ 1994-95 नंतर राजकारणापोटी, कोणत्याही बाजूची माणसे असो, चारही पाचही पक्षाची माणसे असो, ते असे बोलल्यामुळे या चळवळीसमोर अनेक आव्हाने आणि अडचणी उभ्या राहिलेल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ....

जसे नैसर्गिक आपत्तीच्या अडचणी आहेत तसेच आपल्या बोलण्यातूनसुध्दा काही अडचणी या चळवळीसमोर उभ्या राहिलेल्या आहेत. ही चळवळ नीट चालावी हीच सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांची इच्छा दिसते. त्यामुळे मी विनंती करतो की, राजकारणाच्या पलीकडे सुध्दा जाऊन वास्तवावर आधारित निर्णय जर आपण या चळवळीसाठी घेतले तर जी चळवळ कधी महाराष्ट्राचे भूषण होती ती चळवळ पुन्हा एकदा येत्या पाच दहा वर्षाच्या काळामध्ये महाराष्ट्राचे भूषण होईल असा आशावाद व्यक्त करुन, आपण सर्वांनी ज्या मौलिक सूचना केल्या त्याबद्दल त्या त्या दृष्टीने कारवाई करण्याचे प्रयत्न करण्यात येतील एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

--

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी शेवटी कोणी काही घोषणा केल्या त्याबाबत सांगितले. विजेच्या संदर्भात जी घोषणा केली होती ती अंमलात आणली जाणार होती. ती घोषणा माघारी घेत आहेत. कापसाच्या संदर्भातील घोषणाही माघारी घेत आहेत. आम्ही आपल्याला एक प्रश्न विचारला होता की, आपण व्याज माफी जाहीर केली होती ती दिली काय ? ती घोषणाही अशीच आहे काय ? याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : व्याजमाफीचे झालेले आहे. रब्बी 2003 आणि रब्बी 2004 चे 353.59 कोटीच्या व्याजाच्या बाबतीत हे झालेले आहे आणि त्यांच्या खाती त्या रकमा जमा होतील.

तालिका सभापती (श्री. अनंत तरे) : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनाक 7 एप्रिल, 2005 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 43 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 7 एप्रिल, 2005 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही